
बुजुर्ग
रामकृष्ण बात्रे


बुज़ुर्ग

# बुजुर्ग

रामकृष्ण बाके

संपर्क
सौ वीणा बाक्रे देशपांडे
इमेल : emailveenadesh@gmail.com

All rights reserved: no part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording, or otherwise without the prior permission of Veena Bakre Deshpande

एस. एम.

तुमच्या प्रेरणादायक स्मृतीस

# प्रकाशकीय

रामकृष्ण धोंडो बाक्रे ऊर्फ तात्या बाक्रे हे मुंबईच्या सांस्कृतिक विश्वातले एक नामवंत व्यक्तित्व आहे. लोकमान्य, लोकमित्र, समाचार भारती, नवशक्ती आणि नवाकाळ यांच्या माध्यमातून त्यांची पत्रकारिता संपन्न झाली. त्यांच्या स्फुट लेखनाला अभिजात शैलीचा स्पर्श आहे.

एक मर्मज्ञ संगीत समीक्षक आणि विदग्ध रसिक म्हणून त्यांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या हजेरीमुळे संगीताच्या मैफिलींना वजन प्राप्त होते आणि संगीतप्रेमींच्या विश्रब्ध बैठकींना एक निराळाच रंग चढतो. त्यांचे लेखन काय आणि संभाषण काय, दोहोंना ताल असतो, तोल असतो आणि त्यांचे संस्कारित मन औचित्याचा विवेक कधी सोडत नाही.

वयाची पाऊणशे सरली आणि आयुष्य ऐंशीच्या घराकडे झुकू लागले, पण जीवनाला दिलखुलास दाद देणाऱ्या तात्यांच्या जीवनाला रसिक दिलखुलास दाद आहेत.

संगीत क्षेत्रातील बुजुर्गांची चित्रे काढणारा हा कुशल चितारी स्वतःच बुजुर्ग म्हणून मान्यता पावला आहे. त्याच्या रसावलेल्या लेखणीचे हे ललित विभ्रम वाचकांना मोहक वाटले. म्हणून तर ही व्दितीयावृत्ती.

## अनुक्रम

* लेखकाचे मनोगत
* थोडे प्रास्ताविक : ना. ग. गोरे
* पुरस्कार : कुमार गंधर्व

१. अक्षरकीर्ती राजा अक्षरकीर्ती गायक
२. अल्लादियाखां
३. सारेच शापित!
४. गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर
५. खांसाहेब भूर्जीखां
६. मोगूबाईंचे मतलबी टीकाकार
७. पं. शरच्चंद्र आरोळकर
८. भ्रमणयोगी पंडित निवृत्तिबुवा
९. पं. जगन्नाथबुवा : पुरोहित की प्रेषित
१०. हे तो स्वप्नीचे धन

# मनोगत

स्व. एस्. एम्. यांच्या पहिल्या पुण्यतिथीस आपलं योगदान काय असा विचार मनात आला. एस्. एम्. ना आजाराच्या काळात संगीत हे अमृतमय वाटे. वसंतराव देशपांडे यांचा 'मारवा' , किशोरीताईंचा 'भूप' , छोटे गुलामअली यांच्या गझला या खुराकावर ते खूष असत. ८८ साली पुण्यातील एकदोन खाजगी मैफलींनाही स्वारी आवर्जून गेली होती आणि तकियाच्या आधाराने रात्री ११ वाजेपर्यंत बसून किशोरीताईंच्या गाण्यात वेदनाविस्मृती अनुभवत होती हे मला ठाऊक आहे. म्हणून आपले काही जुने व काही नवे संगीतविषयक थोर कलावंतांचे लेख संकलित करावेत आणि ते एस्. एम्. यांच्या स्मृतीस अर्पण करावेत असा मनानं निर्णय घेतला. या कामी श्रीरंग वरेरकर आणि श्री. वसंत फेणे या साहित्य-संगीतप्रेमी मित्रांनी हे घडून आलंच पाहिजे असा तगादा लावला. त्यामुळे हे पुस्तक तयार होऊ शकले. विख्यात रेखाचित्रकार श्री. ओके. यांनी ग्रंथनिविष्ट बुजुर्गांची रेखाचित्रं काढून दिली त्यामुळं त्या लेखांची श्रीमंती किती तरी पटींनी वाढली हे प्रांजळपणे कबूल केलंच पाहिजे.

'साधना ट्रस्ट' चे कार्यकारी विश्वस्त प्रा. सदानंद वर्दे आणि 'साधना' साप्ताहिकाचे संपादक कविवर्य वसंत बापट यांनी प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. तसेच पुस्तकांच्या विक्रीतून जे मानधन मला द्यायचे ते एस्. एम्. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनला द्यावे ही माझी विनंतीही मान्य केली याबद्दल मी त्यांचा व्यक्तिशः आभारी आहे.

या संग्रहात पं. मल्लिकार्जुन मन्सूर, डॉ. के. जी. गिंडे, पं. दिवाकर कायकिणी, पं. वि. रा. आठवले, पं. वामनराव सडोलीकर या बुजुर्गांचा समावेश नाही असा आक्षेप येण्याचा संभव आहे. पण पृष्ठमर्यादा आणि कालानुक्रम या दोहोंचे संतुलन राखून मला उपरिनिर्दिष्ट बुजुर्गांवर यापुढच्या लेखकांनी लिहावं असं वाटलं असेल तर जाणकारांनी ते समजून घ्यावं. पहिलं ख्यालाचं विद्यापीठ इचलकरंजीचं - बाळकृष्णबुवांचं. दुसरं कोल्हापूरचं - संगीतसम्राट अलादियाखां, भूर्जीखां यांचं. तिसरं अंजनीबाई मालपेकरांचं, ग्रामदैवत म्हणून पंढरपूरचे पं. नारायणराव थिटे यांचं, ज्यांनी अनेक गाजते शिष्य आणि गाजत्या बंदिशी निर्माण केल्या त्या

पं. जगन्नाथबुवांचं; अशी संगीत विद्यापीठांची एक सरळ रेषा आखून बुजुर्गांची निवड केली आहे. ती रसिकांच्या पसंतीस उतरावी. गानतपस्विनी मोगूबाईंच्या बाबतीत मला जरा वेगळा विचार सुचला. ‘सुचला’ म्हणण्यापेक्षा अनेकांनी तो सुचविला हे म्हणणे अधिक योग्य होईल. सूरश्री केसरबाई केरकर यांच्या चरित्रात मोगूबाईंच्या चारित्र्यहननाचा जो गह्यं प्रयत्न झाला त्याला एका दिवाळी अंकात मी उत्तर दिलं होतं. तो उत्तरपक्ष पुस्तकात प्रविष्ट केल्यानं पुढच्या अभ्यासकांना दोन्ही बाजू समजून घेण्याचं साधन उपलब्ध होईल असं मला सांगण्यात आलं व मलाही ते पटलं. म्हणून ‘मोगूबाईंचे मतलबी टीकाकार’ हा लेख समाविष्ट केला आहे. माझी ही भूमिका वाचक समजून घेतील, अशी मला आशा आहे.

श्री. नानासाहेब गोरे यांनी माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून आणि डॉ. कुमार गंधर्व यांनी पुरस्कारादाखल चार शब्द लिहिण्याची तसदी घेऊन मला कायमचे उपकृत करून ठेवले आहे. त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत हेच मला समजत नाही.

**रामकृष्ण बाक्रे**

# थोडे प्रास्ताविक

श्री. रामकृष्ण बाक्रे यांनी आपल्या मनोगतामध्ये आपले 'बुजुर्ग' हे पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा काय होती याचे कथन केले आहे. एस्. एम्. जोशी ऊर्फ अण्णा हे केवळ राजकीय नेते नव्हते. ज्या अनेक कार्यकर्त्यांना ते आपल्या पितृस्थानी आहेत असे वाटे त्यापैकीच श्री. रामकृष्ण बाक्रे हे एक. ज्यांना आपण आपल्या पित्यासमान मानले त्या अण्णांना कॅन्सरसारखा शरीर जाळणारा विकार झालेला असताना, संगीताचे स्वर ऐकून त्यांचा दाह काही काळ तरी शांत होई; हे लक्षात घेऊन त्यांना आपण एक वेगळीच स्वरूपाची श्रद्धांजली अर्पण करावी असा विचार श्री. बाक्रे यांच्या मनात आला आणि पूर्वीच्या पिढीतले जे बुजुर्ग गायक, त्यांच्या जीवनाबद्दल लिहिलेले लेख ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावे आणि तो ग्रंथ अण्णांना अर्पण करावा असे त्यांनी योजिले. त्या संकल्पातूनच हा सुंदर ग्रंथ निर्माण झाला आहे. एसेम सारख्या गानलुब्ध पित्याला त्यांच्या पुत्रतुल्य मित्राने वाहिलेली ही श्रद्धांजली वाचताना, शरशय्येवर पडलेल्या भीष्माच्या मुखीं, पृथ्वीमध्ये बाण मारून तेथून निघालेली जलधारा घालणाऱ्या अर्जुनाची आठवण मला झाली. आज अण्णा हयात असते तर त्यांना हे पुस्तक वाचून मोठा संतोष प्राप्त झाला असता खास.

श्री. बाक्रे यांनी या पुस्तकाचे अंतरंग उलगडून दाखवताना असे म्हटले आहे की, पहिले ख्यालाचे विद्यापीठ इचलकरंजीचे- बाळकृष्णबुवांचे, दुसरे कोल्हापूरचे- संगीत सम्राट अल्लादियाखां, भूर्जीखां यांचे, तिसरे अंजनीबाई मालपेकरांचे, ग्रामदैवत म्हणून पंढरपूरचे- पंडित नारायणराव थिटे यांचे, ज्यांनी अनेक गाजते शिष्य आणि गाजत्या बंदिशी निर्माण केल्या त्या पंडित जगन्नाथबुवांचे... अशी संगीत विद्यापीठांची एक सरळ रेषा आखून बुजुर्गांची निवड केली आहे.

या निवेदनावरून वाचकांनी जर अशी समजूत करून घेतली की, जर इतक्याच पीठांचा उल्लेख खुद्द ग्रंथकार करतो तर त्या विद्यापीठांच्या कुलगुरूबद्दल त्यांचे लिखाणही थोडकेसेच असणार. वाचकांचा हा कयास मात्र बरोबर ठरणार नाही, कारण श्री. बाक्रे यांनी या प्रत्येक विद्यापीठाच्या चबुतऱ्यावर जो वृक्ष उभा केलेला आहे तो अनेक शाखा-उपशाखा,

पाने-फुले आणि फळे यांनी बहरलेला आहे. संगीताचे हे स्निग्धच्छाय वृक्ष उभे करताना लेखकाने प्रत्येक बुजुर्गाबद्दलची खूपच माहिती गोळा केली आहे. यासाठी त्यांनी जे प्ररिश्रम घेतलेले दिसतात ते पाहून मी तरी अवाक् झालो. एकेका बुजुर्गाचे बालपण, गानविद्या मिळविण्यासाठी त्याने घेतलेले परिश्रम, त्याचे आप्तेष्ट, मैफिलीमध्ये त्यांना साथ करणारे साथीदार, त्यांना ज्यांनी आश्रय दिला ते इचलकरंजीकर, शाहू महाराज यांसारखे संस्थानिक, त्यांनी बांधलेल्या बंदिशी, त्यांचे वृद्धापकाळ आणि मृत्यू... या सर्व बाबतीत श्री. बाक्रे यांनी इतक्या बारकाव्याने लिहिले आहे की, आपल्या डोळ्यांसमोर ते सर्व बुजुर्ग उभे राहतात. त्यांच्याबद्दलच्या आख्यायिका, त्यांनी आपल्या शिष्यांबरोबर अथवा मित्रांबरोबर केलेले वार्तालाप हे देखील ग्रंथकर्त्याने एखाद्या सिद्धहस्त कादंबरीकाराच्या शैलीने रंगविले आहेत. विशेष म्हणजे ते नुसते रंजक नाहीत तर उद्बोधकही आहेत. उदाहरणार्थ पंडित शरच्चंद्र आरोळकर यांनी ख्याल गायकीबद्दल लेखकापाशी केलेला खुलासा, ख्याल पेश करणे म्हणजे काय याचे स्पष्टीकरण करीत असताना, राग हे आसन असून ख्याल ही एक अवस्था आहे असे जेव्हा पं. आरोळकर सांगतात आणि बंदिशीमध्ये शब्द हे स्वरालंकार टांगून ठेवण्याच्या खुंटया नव्हेत असे आपले ठाम मत देतात त्या वेळी माझ्यासारख्या वाचकाला नवा प्रकाश लाभल्याप्रमाणे वाटते.

शाकुंतलात एक छोटा पण हृद्य प्रसंग केला आहे. दुष्यंताची एक राणी हंसपदिका अंतःपुरात गात असते. तिच्या गायनाची वाखाणणी विदूषकाकडून ऐकल्यावर राजाही त्या रागपरिवाही बंदिशीला दाद देतो. पण ‘गाण्यातल्या अक्षरांचा अर्थ तुला समजला काय?’ असा प्रश्न विदूषकाने केल्यावर राजा त्याला सांगतो : ‘समजला तर! मी एके काळी तुझी फार लाडकी होते आणि आता राणी वसुमती तुला प्रिय असावी अं? असा झणझणीत टोमणाच या गाण्यातून तिने दिलेला आहे.’ या संवादावरून एक गोष्ट स्पष्ट आहे की, गाण्यातला स्वरसंयोग आवडला तरी अक्षरांचा अर्थ सगळ्यांना समजतोच असे नाही, अशी मार्मिक टीकाच कालिदास करीत आहे. अल्लादियाखां, भूर्जीखां अशा बुजुर्गाबद्दल लिहिताना आपल्या सहजप्राप्त गाण्याने भल्याभल्यांना विस्मित करणाऱ्या तानीबाईसारखीचा उल्लेख ते टाळीत नाहीत आणि खांसाहेब अल्लादियाखां, भूर्जीखां यांच्याप्रमाणेच अंजनीबाई मालपेकर आणि जगन्नाथबुवा यांच्या संगीतक्षेत्रातील अमोल कामगिरीबद्दलही ते सारख्याच रसिकतेने लिहितात.

ग्रंथकर्त्याने निरनिराळ्या बुजुर्गांच्या गाण्यातील जे बारकावे सांगितले आहेत त्यांचा आस्वाद घेण्यासाठी संगीतात मुरलेलाच मनुष्य हवा. पु. ल. देशपांड्यांच्या भाषेत कानसेन

हवा, एवढी माझी पात्रता नाही. तरीदेखील आपल्याकडेही नव्या बंदिशी बांधणारे आणि नवे राग निर्माण करणारे गायक होऊन गेले हे वाचल्यानंतर अंगावर उगीचच मूठभर मांस चढल्यासारखे वाटले. कारण आपल्याकडे ‘कंपोजर’ नाहीत असे जे म्हटले जाते ते त्यामुळे खोटे ठरते.

खूप प्रेमाने आणि तितक्याच मेहनतीने लिहिलेल्या ग्रंथामध्ये एखाददुसऱ्या स्थळी काही दोष आगंतुकपणे राहून गेले आहेत असे वाटते. शांता आपटे यांच्याबद्दलचे लिखाण मला पाल्हाळिक वाटले. तसेच सूरश्री केसरबाई आणि गानतपस्विनी मोगूबाई यांच्यांतील वादावरील लेखसुद्धा या ग्रंथात अनुचित वाटला. श्री. बाक्रे यांच्यासारख्या सुसंस्कृत लेखकाकडून असा औचित्यभंग व्हावयास नको होता. पण हे दोष किरकोळ आहेत असे मी म्हणेन. गायनकलेवरील अपार प्रेमामुळे आणि बुजुर्गांबद्दलच्या अपार आदरामुळे हा जो ग्रंथ श्री. बाक्रे यांनी एस्. एम्. जोशी यांच्या श्रद्धांजलीच्या निमित्ताने सिद्ध केला तो अतिशय वाचनीय झाला आहे यात शंकाच नाही. संगीताच्या क्षेत्रात जाती आणि धर्मभेद कसे लुप्त झालेले होते हे या पुस्तकावरून स्वच्छपणे दिसून येईल.

एस्. एम्. जोशींना भावणारी अशीच ही आणखी एक गोष्ट होय.

पु. ल. देशपांडे

# पुरस्कार

पत्रकारांच्या वर्तुळात माझे असे अनेक मित्र आहेत की ज्यांना मी चाहतो आणि जे मला चाहतात. श्री. रामकृष्ण बाक्रे हे अशा मित्रांपैकी एक हे सांगण्यास मला आनंद वाटतो. १९५२ सालापासून त्यांचा माझा परिचय. अनेकदा ते देवासला येऊन गेले आहेत. आपल्या लेखनाची कच्ची सामग्री त्यांनी अनेकदा येथे गोळा केली आहे. मधुकरवृत्तीने असा मधुसंचय करीत राहाणे हा त्यांचा छंदच आहे. या वृत्तीतून लिहिलेले आणि प्रतिष्ठित नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले अथवा न झालेले पण संगीताच्या दुनियेशी निगडित असलेले लेख, संकलित करून 'बुजुर्ग' या शीर्षकाखाली ते एक पुस्तक प्रसिद्ध करीत आहेत ही बाब माझ्या मनाला आनंद देणारी आहे. मला विशेष आनंद होतो या गोष्टीचा की, श्री. बाक्रे हे संकलन त्यांचे राजकीय क्षेत्रातील गुरू, संगीतप्रेमी स्वर्गीय एस्. एम्. जोशी यांच्या स्मृतीस अर्पण करीत आहेत.

सांगीतिक वाङ्मयात अशा लेखांना निश्चित स्थान असते. कै. गोविंदराव टेंबे यांनी हा उपक्रम सुरू करुन भावी लोकांना एक दिशा दाखवून दिली. त्या दिशेनेच विशेष परिश्रम घेऊन श्री. बाक्रे वाटचाल करीत आहेत याबद्दल माझ्या मनात संशय नाही. 'बुजुर्ग' या पुस्तकात श्री. बाक्रे यांनी ज्या दहा बुजुर्गांचा समावेश केला आहे त्यात बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्यापासून पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्यापर्यंत बहुतेक ठळकठळक बुजुर्ग येऊन गेले आहेत. महाराष्ट्रात ख्याल गायकीचे पहिले विद्यापीठ स्थापन करणारे म्हणून पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आहेत तसे जयपूर गायकीचे अध्वर्यू खांसाहेब अल्लादियाखां हेही आहेत. मला गुरुस्थानी असणाऱ्या कै. अंजनीबाई मालपेकर आहेत, तशाच गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकरही आहेत. पण प्रत्येक लेखाचा ढाचा मात्र वेगवेगळा आहे. केवळ त्या त्या श्रेष्ठ गुरूचे चरित्र सांगायचे आहे हा लेखकाचा उद्देश आहे असे दिसत नाही. उदाहरणच द्यायचे तर मी असे म्हणेन की, बाक्रे यांनी इचलकरंजीच्या पहिल्या विद्यापीठात प्रत्येक विद्यार्थ्याला छात्रवृत्ती किती आणि कोणत्या स्वरूपात मिळत होती याचा उल्लेख लेखनाच्या ओघात चपखलपणे बसविलेला आहे. मनोरंजन आणि उद्बोधन ही दोन्ही उद्दिष्टे

त्यामुळे आपोआप सिद्धीस जातात.

मला येथे आणखी एक वेगळा मुद्दा संक्षेपाने मांडावासा वाटतो, कोणत्याही थोर कलाकाराबद्दल लिहिताना त्याचे थोरपण विश्लेषणात्मक पद्धतीने लिहून लेखकास ते सिद्ध करता आले पाहिजे असे मला म्हणायचे आहे. या पुस्तकात समाविष्ट न करण्यात आलेल्या पण संगीत क्षेत्रात अफाट कर्तृत्व गाजवून गेलेल्या दोन बुजुर्गांचेचे उदाहरण घेऊ. पं. विष्णु दिगंबर आणि पं. विष्णु नारायण भातखंडे यांच्याबद्दल खूप लिहून झाले आहे. तरी देखील या दोघांनी एकत्र येऊन कार्य केले असते तर भारतीय संगीतात अधिक लक्षणीय भर पडली असती असे बिनधास्त विधान करणारी माणसे मी पाहिली आहेत. विश्लेषणात्मक नजर नसली म्हणजेच अशी विधाने सुचतात. पं. विष्णु दिगंबर यांच्या ठिकाणी क्रांतदर्शित्व (व्हिजन) होते तर पं. भातखंडे यांना सांगीतिक सरोवरातील पालापाचोळा काढून टाकून त्याचे पाणी स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आणि पिण्यायोग्य करावयाचे होते. आणि त्या दोघांनी हे केले. एकदा वाटचाल सुरू केल्यावर दोघांनीही मागे वळून बघितले नाही. यशापशाची पर्वा केली नाही. तो प्रश्नच मुळी त्यांना सुचला नाही. अशी जर दोघांची उद्दिष्टेच वेगळी तर ते समकालीन असले तरी एकत्र येऊन कार्य करणार कसे? पं. भातखंडे यांना गवई लोक का घाबरत याचाही खुलासा या मुळे होऊ शकतो.

आणखी एकदोन उदाहरणे देण्याचा मोह मला होतो. मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या अंगी थोर कलाकार बनण्याची सुप्त बीजे आहेत हे ते नाट्यकलाप्रवर्तक मंडळीत असतानाच स्पष्ट झाले होते, कारण सवाई गंधर्वच खुद्द त्या मंडळीत होते. त्यांनीच मास्तरांना तालीम द्यावी असे मास्तरांच्या पालकांना वाटत होते. पण सवाई गंधर्वांनी मास्तर कृष्णा यांना पं. भास्करबुवांच्या स्वाधीन करावे अशी शिफारस केली. हा इतिहास आहे. तो फक्त काय घडले ते सांगून लेखकाने थांबता कामा नये. सवाई गंधर्वांनी पं. भास्करबुवा बखले यांच्याकडेच अंगुलिनिर्देश का केला हे जर लेखकाला सांगता आले तर त्यामुळे त्या घटनेचे विश्लेषण योग्य प्रकारे झाले असे होईल. त्यामुळे सवाई गंधर्वांचे मोठेपण अधिक उठावदार होऊ शकेल.

आणखी एक उदाहरण. माझे गुरूजी प्रो. बी. आर. देवधर यांच्यापाशी आपल्या जवळील बंदिशींचे भांडार एखाद्या निरागस बालकाप्रमाणे खुले करणारे शेदेखां इतरांपाशी ओठ घट्ट मिटून घेत असत हे मला ठाऊक आहे. असे ते का करीत याची उपपत्ती लेखकाला सांगता आली पाहिजे. आपणास याद असलेली बंदीश 'रिपेअर' करून घेण्याचे, ती परिष्कृत स्वरूपात टिकवून ठेवण्याचे स्थान फक्त देवधरजीच आहेत हे शेदेखां पुरतेपणी जाणून होते. म्हणूनच शेदेखां असे वागत. असे विश्लेषण करणे म्हणजेच इतिहासात त्या त्या व्यक्तीला

न्याय देणे होय, असे मला वाटते.

प्रस्तुत पुस्तकात मी उल्लेखिलेली उदाहरणे नाहीत आणि ती नसणारच, कारण श्री. बाक्रे यांनी या बुजुर्गांवर लिहिलेलेच नाही. पण ज्यांच्यावर त्यांनी लिहिले आहे त्यांच्या संदर्भात अशी विश्लेषणात्मक विवेचनाची दृष्टी आढळून येईल. पं. जगन्नाथबुवा पुरोहित ही व्यक्ती १९४५ सालापर्यंत कोल्हापूरच्या बाहेर फारशी कोणाला ठाऊक नसता एकदम त्यानंतरच त्यांचा लौकिक दूरवर कसा पसरत गेला याबद्दल श्री. बाक्रे यांनी केलेले विवेचन त्यांच्या ठिकाणी ही विश्लेषणात्मक दृष्टी असल्याचेच द्योतक होय. त्यांनी असेच आणखी आणखी लिहीत राहावे व सांगीतिक वाङ्मयात आपले योगदान कोणते ते जाणवून द्यावे. सबंध पुस्तकाचे समीक्षण करण्याचे उद्दिष्ट माझ्यापुढे नसून पुरस्काराचे चार शब्द लिहिणे एवढाच हेतू असल्याने मी आता हे पुस्तक वाचकांच्या हातीं सोपवितो.



# १. अक्षरकीर्ती राजा आणि अक्षरकीर्ती गायक

श्रीमंतांची स्वारी बैठकीच्या खोलीकडे झपझप चालत गेली त्यावरून सकाळचे आठ वाजायला एखादुसरे मिनिटच कमी असणार हे उघड होते.

हिंदुस्तानच्या लहानमोठ्या साडेसातशे संस्थानिकांत रावसाहेब मंडलिकांच्या मानदंडाने वक्तशीरपणाला जपणारी श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकरांसारखी व्यक्ती दुसरी कोणी क्वचितच झाली असेल. तसेच काही अपवादात्मक कारण असले तर वाड्यातील दिनक्रम पाच-सहा मिनिटे अलीकडे-पलीकडे होई, पण सकाळी सहापुढे राजेसाहेब शय्येवर सहसा दिसायचे नाहीत. साडेसात वाजेपर्यंत राजवाड्यापुढील अंगणात फेऱ्या व्हायच्याच. अगदी पाऊसच कोसळत असला तर वाड्यातील चौसोप्यावर सकाळचे फिरणे व्हायचे पण तेही साडेसातपर्यंतच. मग थट्टी पागेतील फेरी, देवदर्शन होऊन अर्धा चकोर दशमीबरोबर सौम्यसा चहा घेतला की स्वारी आठच्या ठोक्याला बैठकीच्या खोलीत हजर व्हायची. आजही ती तशीच हजर झाली होती.


टपालातील निवडक पत्रे वाचून श्रीमंत टाइम्सची शीर्षके नजरेखालून घालीत असतानाच खाजगी कारभाऱ्यांनी वर्दी दिली.

"बुवासाहेब भेटीसाठी आले आहेत श्रीमंतांच्या."

"कोण बुवासाहेब?"

"दुसरे कोण? गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर."

"असं? आश्चर्य आहे! एवढ्या सकाळी सकाळीच बुवासाहेबांना भेटीची आवश्यकता वाटली? पाठवा त्यांना आत."



“जशी आज्ञा.”

क्षणभरातच बुवांची तपःपूत मूर्ती खोलीत आली. स्मितरेषा दोन्ही बाजूंनी उमटल्या. श्रीमंतांच्या चेहऱ्यावर मात्र स्मितरेषेबरोबरच एक प्रश्नचिन्हही दिसत होते. बुवांनी ते ओळखले आणि अभिवादन होताच ते म्हणाले,

“अशी औपचारिक भेट मागितल्यामुळे सरकारना आश्चर्य वाटलेलं असणार...”

“काही अघटित घडू लागलं म्हणजे माणसाला आश्चर्य हे वाटणारच.”

“पण मी विचार केला, जी गोष्ट जिथं सांगणं योग्य तिथंच सांगितलेली बरी. भोजनाच्या वेळी पंक्तीला बसायचा रोज मान मिळतो म्हणून त्या संधीचा गैरफायदा घ्यावा है मला ठीक वाटलं नाही.”

“योग्यच आहे विचार आपला.”

“शिवाय ‘उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म’ या वृत्तीनं श्रीमंत भोजन करीत असता एखादी अप्रिय गोष्ट त्या वेळी कानावर घालून श्रीमंतांचा चित्तविक्षोभ करावा हेही मला उचित वाटलं नाही.”

“म्हणजे प्रकरण बरंच गंभीर दिसतंय?”

“मानलं तर गंभीर, नाही तर अगदी क्षुल्लक!”

“काय घडलंय् ते तर सांगाल?”

“काय घडणार आहे ते आधी सांगतो. इचलकरंजी सोडून कायमचं मुंबईला राहायला जावं अशा निर्णयावर आलोय् मी.”

“एवढा उबग आला इचलकरंजीचा? माझा?”

“छे, छे, श्रीमंत, आपल्याबद्दल असं कसं मनात येईल? आपल्यासारखा संगीताचा मर्मज्ञ श्रोता आणि कलावंतांचा आश्रयदाता शोधून मिळायचा नाही. म्हणून तर दरमहा पंचवीस मिळतात की पस्तीस मिळतात याचा विचार न करता मिरजेहून इथं आलो. मुंबईला दोनचार नायकिणींना तालीम दिली तरी महिना हजारभर रुपये घरी येतील. पण तो विचार माझ्या मनाला आजवर शिवला नाही.”

“म्हणजे आज शिवला!”

“माझ्या बहिश्चर प्राणांचीच आबाळ व्हायला लागल्यावर का न शिवावा?”

“गाणं शिकण्यासाठी इथं येऊन राह्यलेल्या परगावच्या विद्यार्थ्यांची आबाळ होत्येय् असं आम्ही समजावं का?”

"छे, छे, श्रीमंत, त्या विद्यार्थ्यांची आबाळ होत्येय् असं कोण म्हणेल? प्रत्येकाला भाताच्या दोन मोठया मुदी, पाच भाकरी, गुंडीभर सांबार आणि गुंडीभर ताक सरकारातून रोज मिळत असताना त्यांची कशी आबाळ होईल? उलट वाडयातून एवढं जेवण नेल्यानंतर त्यांना गावात मधुकरीसाठी फिरावं लागत नाही. हेच त्यांच्यावर महदुपकार आहेत."

"मग आबाळ होणारे हे बहिश्चर प्राण कोणते?"

"माझी हत्यारं सरकार, माझी हत्यारं हेच माझे बहिश्चर प्राण आहेत, कोणत्याही कलावंताचे तेच असतात, तबला-डग्गा, मृदंग, तंबोरे यांना आम्ही प्राणांपलीकडे जपतो. त्यांच्या अन्नात कपात झाली म्हणून मला श्रीमंताकडे फिर्याद घेऊन यावं लागलं."

"अन्नकपातीचा तपशील कळेल का?"

"मृदंग, तबले वगैरेंच्या वाद्या टिकाव्यात, सहजी ओढ काढता येऊन पुडी सुरेल राहाव्यात म्हणून दर महिन्याला शिगोशीग भरून एक वाटी लोणी आणि एक वाटी हळद मिळत असे वाड्यातून. त्यांत आता कपात केलीय्."

"कुणी केली?"

"ते मी कसं सांगणार? श्रीमंतांनी चौकशी करावी."

"कोण आहे रे तिकडे? कोठीकडील कारकुनास हजर करा."

कोठीकडील कारकून येतात आणि जमिनीस हात टेकून अभिवादन करून अदबीने उभे राहतात.

"काय रे, बुवासाहेबांच्या तैनातीसाठी वाड्यातून ज्या गोष्टी दरमहा दिल्या जातात, त्यांत लोणी आणि हळद यांचा समावेश आहे?"

"आहे सरकार!"

"अलीकडे त्यात काही कपात झालीय्?"

"थोडीशी."

"कुणाच्या हुकुमानं?"

"माफी असावी, पण आपल्या या छोट्याशा संस्थानात काटकसरीनं राहूनच अभिवृद्धी करून घेता येईल असं स्वारींच्या चार-दोन वेळा बोलण्यात आलं. म्हणून शिगोशीग वाटी देण्याऐवजी सपाट वाटी अशी योजना केली."

"मूर्ख आहेस! बुवासाहेबांच्या तैनातीतील काही कमी करायचं नाही. प्रत्यक्ष मी सांगितलं तर प्रश्न वेगळा. आलं लक्षात? पुन्हा अशी तक्रार येता उपयोगी नाही, आली तर

गुरुचरित्राचं पारायण करायला लावीन शिक्षा म्हणून.''

''आज्ञा सरकार.''

हा काही कपोलकल्पित किस्सा नव्हे. सत्तर वर्षांपूर्वी इचलकरंजीच्या राजवाड्यात खरोखरीच घडलेली ही घटना. श्रीमंत बाबासाहेब स्वतः एक चांगले सतारवादक होतेच, त्यामुळे संगीत हा त्यांच्या अनेक आस्थाविषयांपैकी एक प्रमुख विषय होता. स्वतःच्या आवडीचे विषय कोणते या प्रश्नाचा ऊहापोह करताना त्यांनी एके ठिकाणी लिहिले आहे: ''ज्यांमध्ये मनुष्य स्वतःला विसरतो तेच त्याचे खरे आवडीचे विषय होत. माझ्या काळज्या-कटकटींचा विसर पाडून माझ्या मनाला प्रसन्नता आणणाऱ्या तीन गोष्टी आहेत, आणि त्या म्हणजे वाचन, संगीतश्रवण आणि संभाषण.''

अभिजात संगीताविषयी आस्था ही मनाच्या अभिजात वृत्तीतूनच जन्म पावते. बाबासाहेबांची सर्वच बाबतींतील ही अभिजातवृत्ती चांगली जोपासली गेली होती. न्या. मू. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, न्या. मू. तेलंग, भांडारकर, लोकमान्य टिळक, रावसाहेब मंडलीक, महादेव चिमणाजी आपटे ही त्या काळातील सच्चरित अग्रणी मंडळी श्रीमंतांना गुरुस्थानी होती. यापैकी प्रत्येकाकडून त्यांनी आपल्या जीवनासाठी काही ना काही घेतले होते. या संगीतविषयक लेखात श्रीमंत बाबासाहेबांच्या अभिजाततेची सर्वच उदाहरणे देणे शक्य होणार नाही. पण त्यांच्या मनाचा सुसंस्कृतपणा झळाळून दिसावा असे एक उदाहरण देणे अस्थानी न ठरावे.

बाबासाहेबांच्या पत्नी माईसाहेब यांना पहिल्या बाळंतपणानंतर शारीरिक अपात्रता निर्माण होऊन अपत्यसंभवाची आशा उरली नाही. सामान्य माणसालाही अनपत्यतेचे दुःख दुःसह असते. इथे तर गादीला वारस हवा होता. बाबासाहेबांची नुकतीच कोठे पंचविशी उलटली होती. त्या दृष्टीने नजिकच्या हितचिंतकांनी आणि पोलिटिकल एजंटाने बाबासाहेबांनी दुसऱ्या लग्नाचा विचार करावा असे सुचविले. गोरा साहेब त्यांना म्हणाला, ''तुम्ही तरुण आहात, तुम्हा लोकांत मुलासाठी दुसरी बायको करणे निषिद्ध मानीत नाहीत, फार काय तो शिष्टसंमत मार्ग समजला जातो. तुम्हीही या मार्गाने जाऊन औरस पुत्राचे जनक होऊ शकाल.''

यावर उदात्त मनाच्या बाबासाहेबांनी गोऱ्या साहेबाला सांगितले, ''एक पत्नी असता दुसरी करणे हे असंस्कृतपणाचं आहे. त्यात माणुसकी नाही. माझ्या पत्नीपासून पुत्रप्राप्तीची आशा नाही हा तिचा अपराध नव्हे. आणि तिचा कसलाही अपराध नसता तिच्या उरावर सवत नाचवणं हा अन्याय होईल.''

रावसाहेब मंडलीक यांच्याकडून वक्तशीरपणाबरोबरच हा विवाहविषयक विचार श्रीमंतांनी आपलासा केलेला असावा असे दिसते.

आज उभ्या भारतात 'महाराष्ट्राचे मँचेस्टर' म्हणून इचलकरंजीचे नाव गाजते आहे. पण न्या. मू. माधवराव रानड्यांचा सल्ला घेऊन श्रीमंत बाबासाहेबांनी बाहेरून कोष्टी कुटुंबे मुद्दाम बोलावून आणून त्यांची वसाहत येथे केली यात त्याचे मूळ आहे, तसेच विठ्ठलराव दातार यांच्यासारख्या संस्थानच्या कारकुनास नोकरीच्या बंधनातून मुक्त करून पहिला यंत्रमाग काढण्यास सर्व प्रकारे मदत केली यातही आहे, हे फारच थोडे जाणतात. या सर्व विचारात आणि खटपटीत माणुसकीने ओतप्रोत भरलेले बाबासाहेबांचे जे दर्शन घडते तेच त्यांचे दर्शन, संगीत क्षेत्रातील कलावंतांना आपलेसे करून घेताना घडते. या संबंधात गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे यांच्या, इचलकरंजीतील पहिल्या गाण्याचा किस्सा सांगितला पाहिजे.

पं. रामकृष्णबुवा वझे त्या वेळी बेळगावी राहात होते. महाराष्ट्रभर त्यांच्या गाण्याचा लौकिक पसरलेला. पण श्रीमंतांना त्यांचे गाणे ऐकण्याचा योग आलेला नव्हता. थोरामोठ्या विचारवंतांशी संभाषण करायला मिळावे म्हणून मुद्दाम खटाटोप करून आपण अशा भेटीगाठी घडवून आणीत होतो अशी प्रांजळ कबुली श्रीमंतांनी आठवणी लिहिताना दिली आहे. मोठ्या गवयाचे गाणे मनसोक्त ऐकायला मिळावे म्हणूनही ते मुद्दाम खटपटीत असत आणि स्वदस्तुरची पत्रे लिहून त्यांना ते आपलेसे करीत. वझेबुवांच्या बाबतीत मात्र पहिल्या पत्रासरशी असे घडू शकले नाही. श्रीमंत आधी बिदागी ठरवून कुणाचेही गाणे क्वचितच करीत असत. स्वतः गाणे ऐकल्यानंतर त्या त्या कलावंतांचा योग्यतेनुरूप सन्मान करीत. एकदा त्यांनी वझेबुवांना लिहिले, "आमचेकडे श्री व्यंकटेश व शांतादुर्गा यांचा नवरात्रोत्सव होतो हे आपल्या कानावर असेलच. या उत्सवाचे निमित्ताने आपण इचलकरंजीस यावे, म्हणजे श्रींची सेवा होऊन आम्हांसही आपले गाणे ऐकण्याचा आजवर न साधलेला योग येईल."

वझेबुवा पक्के व्यवहारी. त्यांनी उत्तर धाडले, त्यात बिदागीचा विशिष्ट आकडा लिहिला आणि तो आकडा मान्य असेल तरच आपण नवरात्रात गावयास येऊ असे कळवले. श्रीमंत गाण्यावर उदंड प्रीती करीत आणि वझेबुवांचे गाणे ऐकल्यानंतर बुवांनी मागितली त्यापेक्षाही पाच-दहा रुपये जास्त बिदागी त्यांनी दिलीही असती; पण अशा व्यावहारिक रोखठोक पातळीवर श्रेष्ठ कलाकाराशी पहिला संपर्क जुळून यावा हे त्यांना बरे वाटले नाही. श्रीमंतांनी तो विषय तेवढ्यावरच सोडला.

नवरात्र होऊन गेले, दसरा-दिवाळी-संक्रांत-होळी या क्रमाने उन्हाळा आला, उन्हाळ्यात

श्रीमंत इचलकरंजीस राहात नसत. ७१ मैलांवर आजाऱ्यास जाऊन 'माधवगिरी' स राहात. आजरा तालुका इचलकरंजी संस्थानाचाच भाग होता. निसर्गरम्य आंबोली घाटाचा रस्ता माधवगिरीपासून चार-पाच मैलांवरच आहे. सव्वातीन हजार फूट उंचीवरचे हे थंड हवेचे विश्रामधाम श्रीमंतांना महाबळेश्वरापेक्षा अधिक पसंत पडे. महाबळेश्वरला थंड हवेसाठी येणाऱ्या धनिकांची नि सरदार दरकदारांची गर्दी असे. माधवगिरीच्या बंगल्यात निवांतपणा असे. रोज डोंगराची मन मानेल इतकी चढ उतार करावी, हिरड्याच्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन त्याची योग्य प्रकारे वासलात लावावी, मनसोक्त वाचन करावे, आमराईत जावे, फणस काजू अननस लागवडीची देखभाल करावी, दुर्बिणीतून तीस मैलांवरचा समुद्र बघावा, आवडत्या कलावंतास बोलावून घेऊन गाणे ऐकावे, यांमध्ये उन्हाळा कुठच्या कुठे संपून जायचा. शेवटी पुनः आजाऱ्यास येऊन आठवडाभर राहून मृग नक्षत्र लागण्याच्या सुमारास स्वारी इचलकरंजीस परतायची.

त्या वर्षी श्रीमंत असेच परतीच्या मार्गावर आजाऱ्यास मुक्काम करून होते. एके दिवशी सकाळी बाह्यतः बावळया वाटणाऱ्या वेषातील एक व्यक्ती श्रीमंतांचे शिकाऊ खाजगी चिटणीस श्री. माधवराव लेले यांच्या पुढ्यात येऊन उभी राहिली आणि नमस्कार करून म्हणाली,

"मी गवय्या आहे, मला श्रीमंतांची भेट मिळेल काय?"

"आपण गवई आहात हे कशावरून ओळखायचं? गवई असाल तर गाऊन दाखवा, मग पाहू या भेटीचं,"

"मी श्रीमंतांनाच गाणं ऐकवू इच्छितो."

"ठीक आहे. पण गवई आहात याची थोडी खुण तर पटवाल की नाही?"

श्रीमंत बाबासाहेब पलीकडील व्हरांड्यात झोपाळयावर वाचीत बसले होते. त्यांच्या कानावर हे संभाषण स्पष्टपणे जाते आहे याची या दोघांना सुतराम कल्पना नव्हती. श्रीमंत झोपाळयावरूनच म्हणाले, "लेले, द्या त्या गवईबुवांना इकडे पाठवून!"

अजूनही लेल्यांना हा खरोखरीच कोणी गवई आहे की कसे याबद्दल शंका होतीच. म्हणून ते स्वतःच बुवांना घेऊन व्हरांड्यात आले. एका खुर्चीवर त्यांना आसनस्थ करून पुढे काय होते हे पाहू लागले.

अभिवादन करून तो पाहुणा म्हणाला, "मी वझेबुवांचा मुलगा शिवराम. काही कामानिमित्त आजऱ्यास आलो होतो, तो श्रीमंतांचा मुक्काम इथंच असल्याचं कळलं. श्रीमंतांची इच्छा असेल तर आज ऐकवीन म्हणत होतो."

“चांगली कल्पना आहे. साथीला बरोबर कुणी आहे?”

“असा काही योग येईल याची कल्पनाच नसल्यानं कुणाला बरोबर आणलेलं नाही.”

“निदान तंबोरा तरी....?”

“नाही. तोही नाही. पण आपल्याकडे एखादा असेल तर घेईन चालवून.”

“सांगायला खेद वाटतो आम्हांला, पण इथं एकही हत्यार नाही.”

“तरीदेखील माझं गाणं ऐकावंच श्रीमंतांनी.”

“आधारसुराशिवाय गाणार?”

“पाहतो प्रयत्न करून गावात तंबोरा मिळतो का ते.”

“कधी याल ऐकवायला?.

“श्रीमंत वेळ देतील तेव्हा,”

“रात्री नऊ साडेनऊला या.”

“फार फार आभारी आहे.”

रात्री शिवरामबुवा आले. दिवसभर खटपट करून तंबोरा जरी ते मिळवू शकले नव्हते तरी गावात त्यांना एक छोटीशी तंबोरी मिळाली होती. उगाच नावापुरता आधारस्वर. जवारीदार तंबोऱ्याची सर तंबोरीस कुठून येणार? तबल्याची साथ तर नव्हतीच. पण श्रीमंत श्रोते आणि शिवरामबुवा गायक! गाणे सुरू झाले.

खाजगी चिटणीस हळूच आपल्या खोलीत गेले अन् त्यांनी बिछान्यावर अंग टाकले. कधी नि कशी झोप लागली हे त्यांना कळलेच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी नवाच्या सुमारास श्रीमंतांनी शिवरामबुवांना निरोप देण्यासाठी बोलावले होते. ते उपस्थित होताच, एका खोलीत त्यांना बसवावयास सांगून श्रीमंतांनी लेल्यांना हाक मारून विचारले, “कसं काय वाटलं रात्रीचं गाणं?”

“माफी असावी सरकार, मी रात्री गाणं ऐकूच शकलो नाही. जरा आडवा झालो तो गाढ झोप लागून गेली.”

“अरेरे, एक नामी आणि सर्व दृष्टींनी आगळी बैठक हुकवलीत. बरं, आता बुवांची संभावना करायची आहे. बिदागी किती द्यावी?”

“पाच रुपये पुरतील काय?”

(लेले यांना, पाच रुपये ही त्या काळच्या मानाने मोठीच रक्कम वाटली हे नवल नव्हे. पाच रुपयांत त्या काळी मणभर ज्वारी येई.)

"असं करा, तबकात पंचवीस रुपये घालून व त्यावर एक विडा ठेवून घेऊन या."

आणि शिवरामबुवांना निरोप देतेवेळी श्रीमंत म्हणाले, "मी देतोय ही बिदागी थोडी आहे. आपणांजवळ फार मोठी विद्या आहे. आपण नवरात्रात इचलकरंजीस या. त्या ठिकाणी सर्व साथीनिशी मी आपलं गाणं ऐकेन व आपली उचित अशी संभावना करीन."

संगीतावरील श्रीमंतांचे प्रेम असे प्रत्ययाला आल्याने शिवरामबुवा तर श्रीमंतांचे प्रेमी झालेच पण हे सर्व मुलाकडून समजल्यावर खुद्द वझेबुवाही विरघळले. श्रीमंत आजऱ्याचा मुक्काम आटोपून इचलकरंजीस येऊन काही दिवस होतात न होतात तोच बेळगावहून वझेबुवांचे श्रीमंतांना पत्र आले. त्यात त्यांनी म्हटले होते, "श्रीमंत गायनविद्येचे जाणकार आहेत हे आता मला कळलं आहे. बिदागीचा प्रश्न गौण आहे. मी माझं गाणं येत्या नवरात्रात आपणांस ऐकवणार आहे."

या पत्रव्यवहारानंतर पं. रामकृष्णबुवा वझे मुलासह प्रथम इचलकरंजीस आले. गंमत अशी की नवरात्रात तीन गाणी होऊन श्रीमंतांचा निरोप घ्यायला ते गेले तेव्हा त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. आपल्या पहिल्या पत्रात त्यांनी जी विशिष्ट बिदागीची अट घातली होती तेवढी बिदागी श्रीमंतांनी ताटात घालून दिली होती!

वझेबुवा मग केवळ इचलकरंजीसच नव्हे तर पुण्यात शनवारातील वाड्यात श्रीमंतांचा मुक्काम आहे असे कळताच येत आणि गाणे ऐकवीत! ते देखील ज्यावेळी जेवढी बिदागी मिळेल तेवढ्यावर संतुष्ट होऊन! मुरलेल्या कलावंताला अखेर खरी धन्यता वाटते ती रसज्ञापुढे कलाप्रदर्शन करण्यात.

* * *

अशीच धन्यता वाटणारे दुसरे श्रेष्ठ गवई खांसाहेब अब्दुल करीम खां. या ठिकाणी श्रीमंत आणि खांसाहेब यांचे गहिरे संबंध सांगणे अस्थानी ठरु नये, अब्दुल करीम खांचे गाणे १८९९ च्या अखेरीस इचलकरंजीच्या माळ बंगल्यावर श्रीमंतांनी मुद्दाम घडवून आणले होते. त्या वेळी गावात प्लेगचा प्रादुर्भाव होता म्हणून गाणे माळ बंगल्यावर झाले. गाण्यास श्रीमंतांबरोबर बाळकृष्णबुवा, ध्रुपद गायक केशवबुवा गोगटे ही तज्ज्ञ मंडळीही उपस्थित होती. या बैठकीत बाळकृष्णबुवांनी खांसाहेबांची तारीफ करून म्हटले, "पोरवय असूनही सुरेल नि घरंदाज गात आहेत. मला तर बंदेअलींच्या बीनातील जोडवादनाची आठवण होत्येय्."

श्रीमंत खांसाहेबांवर व खासाहेब श्रीमंतांवर १८९९ ते १९३७ इतका दीर्घकाल फिदा होते. बिदागी किती मिळते याचा विचार न करता बोलावणे गेले की खांसाहेब इचलकरंजीस

येऊन गाऊन जात. अशाच एका प्रसंगी निपाणीच्या एका धनिकाने खांसाहेबांना प्रचंड बिदागीचे आमिष दाखवून इचलकरंजीचे गाणे रद्द करून निपाणीस येण्याबद्दल निरोप धाडला. त्यावर खांसाहेबांनी कळवले, "दुनियेत देनेवाले खूप भरलेत. सुननेवाले लाखांत चारदोनही नाहीत. असा लाखांतला सुननेवाला इथं इचलकरंजीत आहे. त्याला सोडून मी येऊ शकत नाही."

खांसाहेब ३७ च्या ऑक्टोबरअखेर पैगंबरवासी झाले, पण त्या वर्षीच उन्हाळ्यात माधवगिरीस खांसाहेबांना साथीदारांसह बोलावून अनेक वर्षे अतृप्त राहिलेली शिकारीची इच्छा श्रीमंतांनी पूर्ण केली. अब्दुल करीमना गाण्याइतकेच शिकारीचे वेड होते, पण बडोदा सोडल्यापासून चाळीस वर्षांत ते वेड कुणी पुरवले नव्हते श्रीमंतांना खांसाहेब कदरदान का म्हणत ते यावरून कळेल.

माधवगिरी या श्रीमंतांच्या उन्हाळ्यातील निवासस्थानाचा उल्लेख वर आलाच आहे, त्या निवासस्थानापासून पाच-एक मैलांवर 'खोतोबाची राई' नावाची किर्र झाडीची जागा शिकारीसाठी श्रीमंतांनी निवडली होती. खांसाहेबांना शिकार वाघाचीच हवी होती म्हणून प्रथम दोन दिवस ट्रायल घेण्यासाठी खोतोबाच्या राईत बोकड बांधण्यात आले. बोकडाने सारखे ओरडत राहिल्याखेरीज केवळ वासाने वाघोबा येणार नाहीत हे ओळखून बोकडाच्या कानाच्या पाळयात लहानसा दगड दोरीने गच्च बांधण्यात येई व त्याच्या वेदनेमुळे बोकड बें बें करी! पहिल्या दोन्ही चाचण्या या युक्तीमुळे यशस्वी झाल्या. पहिल्या दिवशी वाघाने बोकडाचे मुंडके शिल्लक ठेवून बाकीचा सबंध भाग तोडून नेला होता. पावलांच्या खुणांवरून ते काम वाघाचेच असा तर्क माहितगारांनी केला. दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच जागी दुसरा बोकड बांधण्यात आला. त्याचा फक्त एक खूर तेवढा जागेवर शिल्लक उरला होता.

याप्रमाणे दोन दिवस यश मिळताच वाघोबा नक्की सोकावले, आता मचाण बांधून खांसाहेबांना शिकारीसाठी तिथे नेण्यास हरकत नाही असे श्रीमंत म्हणाले, मचाण बांधले. खांसाहेबांच्या बरोबर चांगले दोन नेमबाज शिकारी दिले. त्यांना श्रीमंतांनी सांगितले, "शिकार खांसाहेबांनाच करू द्या. त्यांचा नेम हुकला आणि शिकार निसटत्येय् असं वाटलं तरच तुम्ही गोळी झाडा."

खोताच्या राईकडे स्वाऱ्या रवाना झाल्या. सूर्य अस्तास जात असतानाच मंडळी मचाणावर जाऊन बसली. बोकड बांधण्यात आला. पुरेसा संधिप्रकाश असतानाच वाघोबांनी बोकडावर झेप टाकली आणि त्याच क्षणी खांसाहेबांनी बरोब्बर नेम धरून वाघाला लोळवला. पहिल्या गोळीनेच काम झाले होते. पण उगीच संशयाला जागा नको म्हणून

आणखी दोन गोळ्या खांसाहेबांनी झाडल्या. शिकार साधली यामुळे ते इतके खूष होते की, माधवगिरीस परत येताच श्रीमंतांना म्हणाले, "शिकाऱ्याचा नेम आणि गवयाची सम या दोन्ही गोष्टी साधणं यात खरं 'इल्म' (विद्या) असतं. कित्येक वर्षांनंतर बंदूक हाती धरूनसुद्धा माझा नेम चुकला नाही, याची मला एवढा आनंद झालाय् की म्हणाल तर आजची सारी रात्र गाऊन मी श्रीमंतांना खूष करीन."

हा सगळा किस्सा सांगून माधवराव लेले म्हणाले, 'मग दुसऱ्या दिवशी सकाळी निरोप घेण्यापूर्वी खांसाहेब असे गायले, असे गायले की जन्मात मी तेवढे रसीलं गाणं ऐकलं नाही.'

* * *

भूगंधर्व रहिमतखां यांनाही श्रीमंत असेच इचलकरंजीस बोलावून घेत. छत्रे खांसाहेबांना घेऊन येत नि मग कधी खांसाहेबांनी राजवाड्यापुढील पटांगणात भरणाऱ्या बाजारातील चार गाजरे खिशात टाकून दहाची नोट गाजरविक्रेतीच्या अंगावर भिरकावून चालू लागावे, तर कधी श्रीमंतांनी बिहागाची फर्माईश केली असता मनात ठाण मांडून बसलेला केदार बिहागात मिसळवून बेचैनी पैदा करावी. तर आणखी कधी गायनाची बिदागी म्हणून झुंबराचा एक लोलकच मागून घ्यावा, अशा गमती घडल्या आहेत.

पण वझेबुवा काय, अब्दुल करीम खां काय अगर भूगंधर्व रहिमत खां काय, यांना बोलाविण्यात आणि आपलेसे करण्यात श्रीमंतांची गाण्यातील उच्च अभिरुची दिसून येते, एवढे फार तर म्हणता येईल. गायनाचार्य बाळकृष्णबुवा यांच्या संदर्भात श्रीमंत बाबासाहेबांचा आणि श्रीमंतांच्या संदर्भात बाळकृष्णबुवांचा जेव्हा जेव्हा विचार येतो तेव्हा, ते एक वेगळेच नाते होते; त्या मागे श्रीमंतांची विद्याभिवृद्धीची एक वेगळी दृष्टी होती हे समजून येते. बाळकृष्णबुवांना इचलकरंजीत ठेवून घेऊन आणि त्यांचा योगक्षेम चालवून एक संगीत विद्यापीठ चालवावे हा श्रीमंतांचा दृष्टिकोण होता. त्या काळात हा विचार अगदी नवाच म्हणावा लागेल.

पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीस येण्याआधी मिरजेस मिरजकरांकडे होते. मिरजकरांच्या औषधाने त्यांचा दमा कायमचा गेला होता म्हणून तिथेच राहायचे असे ठरवून त्यांनी घरही बांधले होते. गुंडोपंत इंगळे, पं. विष्णु दिगंबर यांच्यासारखी अद्वितीय शिष्यमंडळी त्यांनी मिरजेसच तयार केली. पण मिरजकरांकडे गवई म्हणून बुवांना अनन्यसाधारण महत्त्व नव्हते, जे इचलकरंजीकरांकडे मिळाले. पं. विष्णु दिगंबर यांच्या चरित्रात प्रो. देवधर यांनी हा उल्लेख केला आहे. १८९६ साली पं. विष्णु दिगंबर आपल्याला न विचारता आणि आपण इचलकरंजीस गेलो आहोत अशी संधी साधून मिरजेतून कायमचे निघून गेले, यामुळे

बाळकृष्णबुवा खूपच संतापले. पुढे १८९८ च्या सुमारास बाळकृष्णबुवांच्या पत्नीचे निधन झाले, मिरजेस प्लेग सुरू झाला, तेव्हा तीन लहान मुले घेऊन संसारयात्रा कशी चालवावी हा प्रश्न आला, यावेळी श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर पुढे झाले. उत्तरेतील पक्की गायकी तिच्या ग्वाल्हेरी वैभवानिशी कृष्णा-पंचगंगेपर्यंत आणणाऱ्या या श्रेष्ठ गायकास इचलकरंजीस ठेवून घेऊन एक गानविद्यापीठ आपणच का चालवू नये असा विचार श्रीमंतांच्या मनात खचित येऊन गेला असेल. बाळकृष्णबुवांनाही इचलकरंजी प्रिय होतीच. आज इचलकरंजीभोवती एखाद्या उपनगराप्रमाणे असणारी कबनूर, कोरोची, सिरव्दाड ही गावे बाळकृष्णबुवांच्या घराण्यातील जोशीपणाची गावे होती. इचलकरंजी वाढत गेल्यानं आता या गावांना इचलकरंजी पालिकेची बस सर्विस दिवसभर असते. जणू ती उपनगरेच बनली आहेत. या गावासंबंधीचे आपलेपणही बुवांना इचलकरंजीस ओढून न्यायला कारणीभूत झाले असेल. काहीही असो, श्रीमंत अनेक बड्या कलावंतांचे गाणे ऐकत, पण बाळकृष्णबुवांविषयी त्यांना जी धन्यता वाटत होती ती त्यांनी एके ठिकाणी नोंदवूनच ठेवलीय. ते लिहितात: ‘‘बुवांचे गाणे सतत ऐकल्यामुळे त्यांची पद्धतच मला विशेष प्रिय वाटू लागली. बाळकृष्णबुवा गायनकलेतील भीष्म होते. गाण्यास बसले म्हणजे आपल्याकडून कधी कसूर करायची नाही व ऐकणारास खूष करायचे हे त्यांचे ब्रीद होते. कोणताही राग कोणत्याही वेळी गाण्यास मी सांगितल्यास बुवा खुशाल गात व ‘राजाज्ञया सदागेया न तु कालं विचारयेत्’ या संगीतदर्पणातील वचनाचा आधार देत.

असे बाळकृष्णबुवा पत्नी निवर्तल्यानंतर इचलकरंजीस आले. प्रथम सर्वच परिवार राजवाड्यात होता, आईविना पोरकी झालेली बाळकृष्णबुवांची मुले श्रीमंत माईसाहेब यांच्या देखरेखीखाली वाढू लागली. बुवांनी रोज सायंकाळी राजवाड्यातील व्यंकटेश मंदिरात देवापुढे गायचे, ज्या दोन हजारांवर चिजा बुवांना मुखोद्गत होत्या, त्यांची उजळणी इथे देवापुढे व्हायची. पगार सुरुवातीस पंचवीस रुपयेच होता, पण बुवा दौऱ्यावर गेले आणि चार चार महिने दौरा चालला तरी ती रजा भरपगारी धरण्यात येई. शिवाय अधूनमधून श्रीमंत भारी वस्त्रे आणि सुवर्णालंकार यांचा आहेर करीतच असत.

पुढे बुवांच्या आकर्षणाने शिष्यसंख्या वाढू लागल्यावर राजवाड्यानजिकच बुवांना सरकारातून एक घर देण्यात आले. सध्या इचलकरंजीस जिये फौजदार राहतात तिथे मागच्या बाजूला हे घर होते. खरे तर उत्तर भारतीय संगीताची गंगा दक्षिण काशीपर्यंत आणणाऱ्या या महापुरुषाचे हे घर स्मारक म्हणून इचलकरंजीत असणे आवश्यक होते. पण बुवांच्या पश्चात् पुढे बऱ्याच वर्षांनी त्यांच्या नातवांनी ते विकून टाकल्यामुळे आणि आता त्या जागी एक

नवीच वास्तू उभी असल्यामुळे या स्मारकास इचलकरंजी मुकली. पण या घरातच बुवांचे संगीत विद्यापीठ आकार घेत होते. पं. गजाननबुवा जोशी यांचे वडील अंतुबुवा, वामनबुवा चाफेकर, बेंदरे, पंढरपूरचे शंकरबुवा मदनंत, मिराशीबुवा, भाटेबुवा, काळेबुवा इत्यादी मंडळी, पाणपोईवर तहानलेल्यांनी रीघ लावावी तशी बुवांपाशी होती. श्रीमंतांचे यातील कर्तृत्व हे की आपल्या नोकरीत असलेले मिराशीबुवा, काळेबुवा, माटेबुवा यांच्या गळ्याचा गुणधर्म आणि गाणे शिकण्याची त्यांची आवड लक्षात घेऊन ते ज्याला जशी सवलत हवी असेल तशी देत.

बाळकृष्णबुवांना व्यवहार कळत नसे असे सांगतात. काही बाबतीत कळत नसे हे खरेच आहे. सांगलीला एका गाण्याची ५० रुपये बिदागी त्यांनी मोजण्याचा प्रयत्न केला, तर एकदा ती ४८ रुपये भरली तर दुसऱ्या वेळी ५२ रुपये! अखेर कंटाळून 'हे माझं काम नव्हे' असे म्हणून त्यांनी काळेबुवांना सांगितले, "बरोबर मोज, कमी असले तर मागून घे आणि जास्त असतील तर यजमानांना परत कर!"

एकदा असाच औषधासाठी मध हवा होता. बुवांनी शिष्यवर्गांपैकी एकाला हाक मारली. घरातून एक मोठे पातेले त्याच्या हाती दिले व कडोसरीचा एक आणा देऊन वाण्याकडून मध घेऊन ये म्हणून सांगितले. वाणी शहाणा. त्याने द्रोणात मध घालून द्रोण पातेल्यात ठेवून शिष्याची बोळवण केली! तेव्हा कुठे एक आण्यास मध किती याचे ज्ञान बुवांना झाले.

पण हा व्यवहार न जमला तरी ज्या परंपरेत आपण शिकलो त्याच परंपरेत शिष्यांनी शिकले पाहिजे. गुरुसेवेवाचून विद्या नाही हा व्यवहार त्यांनी कधीच सोडला नाही. बुवांचा आमरण सर्व व्यवहार सांभाळून त्यांच्याकडे गाणे शिकलेले इचलकरंजीचे दत्तोपंत काळे राजवाड्यात खाजगीकडे नोकरीस सेते. त्यांच्या मधुर आवाजीवर लुब्ध होऊन श्रीमंतांनी त्यांना नोकरीतील सवलत दिली. पण गुरुसेवेबाबत मात्र कसलीही सवलत त्यांना मिळाली नाही. आरंभीच्या दिवसात तर काळे यांच्या श्वशुरांनीच त्यांच्या तोंडचा गाण्याचा घास काढून घेतला.

त्याचे असे झाले. काळेबुवा वाड्यात आहेत आणि गाण्याची तालीम घेण्यास बसलेले नाहीत अशी खात्री करून घेऊन त्यांच्या पहिल्या पत्नीचे वडील मराठे, बुवांच्या बि-हाडी आले. इतर काही विद्यार्थी तेव्हा तालीम घेतच होते. नवखा माणूस घरी आलेला बघताच तालीम थांबली. नमस्कार चमत्कार झाले. मराठ्यांनी बोलण्यास प्रारंभ केला.

"मी मराठे. इचलकरंजीसच असतो. आमचे जामात दत्तोपंत काळे..."

"अजून आलेला नाही दत्तू. सरकारवाड्यात असेल."

“नाही, मी त्यांना शोधायला नव्हतो आलो. त्यांच्याबद्दल काही सांगायला आलो होतो.”

“सांगा ना.”

“दत्तोपंतांना गाणं शिकवणं आपण बंद करावं अशी माझी आपल्याला विनंती आहे.”

“कारण?”

“आम्ही या गावचे सावकार, दत्तोपंत सुखवस्तू गृहस्थ. चांगली सरकारात खाजगीत नोकरी आहे. कशाला त्यांनी या विद्येत पडावं? ब्राह्मणांची विद्या नव्हे ही.”

“म्हणजे आम्ही ब्राह्मण उरलो नाही असंच म्हणा ना?”

“आपल्याबद्दल मला काही म्हणायचं नाही. मी आपला नाकासमोर पाहून चालणारा, प्रतिष्ठा सांभाळून राहणारा माणूस. आमच्या जावईबोवांनी या विद्येपायी फर्लांगभर दूर असलेल्या हौदावरून पाणी आणून आपल्या घरी भरावं, भर रस्त्यावरून पाणक्याप्रमाणं खांद्यावर भरलेली तांब्याची घागर वाहावी हे आम्हांला रुचत नाही. लोक तोंडावर बोलले नाहीत तरी माघारी बोलतातच.”

“असं, असं. म्हणजे आपला खरा आक्षेप दत्तूनं गाणं शिकावं याला नसून त्याला रस्त्यावरून तांब्याच्या घागरीतून पाणी आणावं लागतं याला आहे तर? आपण यावर तोड काढू शकतो.”

“कोणती?”

बाळकृष्णबुवांनी जवळच बसलेल्या एका शिष्यास उठवले आणि सांगितले.

“कोपऱ्यावर नाईक सराफाकंडे जा आणि त्यांना चांदीची एक छोटीशी बिंदगी (कळशी) किती दिवसांत करून मिळेल, असं बुवांनी विचारलंय् म्हणून सांग.”

बुवांचा उपरोध मराठे सावकारांच्या चटकन् लक्षात आला नाही. त्यांनी अभावितपणे विचारलं,.

“चांदीची बिंदगी कशाला?”

“तुमच्या जावयाची पाणी आणताना अप्रतिष्ठा होऊ नये म्हणून.”

“माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता, आपण त्यांना शिकवणंच बंद करावं असं मला सांगायचं होतं.”

“आपली तशी इच्छाच असेल तर मी बंदी करतो त्याला इथं यायची. पण शिकायचं असेल तर इथं पडेल ते काम करूनच शिकावं लागेल. आम्हीही गुरुजींच्या पिकदाण्या

धुऊनच शिकलो.”

आणि या घटनेनंतर दत्तोपंत काळे यांची तालीम बंद झाली. दोन वर्षे अशीच गेली. भाटेबुवा, मिराशीबुवा नवीन नवीन राग पैदा करताहेत, तयार होताहेत नि आपण मात्र एवढी गोड आवाजी असून नि एवढा असाधारण गुरू लाभला असता कोरडेच राहतो आहोत याची काळेबुवांना खंत वाटून राहिली होती.

दोन वर्षांनी नवरात्रात एक अकल्पित घटना घडली. नेहमीप्रमाणे राजवाड्यात जेवणाच्या पंगती अधिकारपरत्वे निरनिराळ्या जागी मांडल्या जात होत्या. सरकारस्वारीसमवेत बाळकृष्णबुवा एका दालनात होते तर कारकुनांची पंगत दुसऱ्या दालनात होती. श्लोकगायन व्हायचे ही पद्धत होतीच. बाळकृष्णबुवांचा श्लोक झाल्यावर दुसऱ्या दालनातील कारकुनांच्या पंगतीत बसलेल्या दत्तोपंत काळ्यांना इतर कारकुनांनी श्लोक म्हणण्याचा आग्रह केला. दत्तोपंतांनी उगीच आधार म्हणून मोरोपंतांची पुढील आर्या घेतली आणि गौड सारंग असा उभा केला की शेजारच्या वरिष्ठांच्या दालनात जो तो कानांत प्राण आणून ऐकू लागला. आर्याही मोठी अर्थपूर्ण होती.

***देवी म्हणे अनार्या, नाही तुझिया मनात पापदर***
***ओढू नको फरफरा घेऊ दे सावरोनि हा पदर***

अनार्या या शब्दावर जणू सम ठेवून काळेबुवा आलापीत होते. श्रीमंतांना काळेबुवा शिक्षणाला वंचित झाले आहेत हे ठाऊक होते. ते साभिप्राय नजरेने बाळकृष्णबुवांच्या नजरेतील भाव निरखीत होते. श्लोक संपला. पंगत उठली. मंडळी आंचवायला बाहेर आली. तिथेच दत्तोपंतांना हाक मारून बाळकृष्णबुवा म्हणाले, “उद्यापासून तालीम घ्यायला ये!”

हेच दत्तोपंत काळे पुढे इचलकरंजीचे दरबार गवई झाले. बाळकृष्णबुवा साधारणमानाने पांढरी पाचमध्ये गात. आवाजाला गोडवा नि घुमारा या दोन्ही गोष्टी अगदी पराकोटीच्या होत्या. तालातील हाणामारी त्यांना रुचत नसे. त्यामुळे लयकारीची लढन्त करण्यापेक्षा दोन वेळा सरळ अस्ताई-अंतरा प्रथम म्हणून झाला की मग क्रमाने उपजकाम चालत असे, आलापीनंतर चिजेतील अक्षरे योग्य त्या ठिकाणी तोडूनच बोल-तान सुरू होई.

बोल-तानेची बढन्त मात्र बुवा जशी पेलत तशी इतरांना, इतकेच काय खुद्द अण्णाबुवांनाही नेहमीच पेलत नसे. अण्णाबुवा पुढे पुढे हुकमेहुकूम बुवांप्रमाणे गाऊ लागले होते व बुवांचे सुपुत्र म्हणून त्यांनी परंपरा चालवलीही असती. पण दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले.

एकदा श्रीमंतांच्या पुढ्यात बाळकृष्णबुवा गात असता आणि स्वरसाथीला एका

तंबोऱ्यावर काळेबुवा व दुसऱ्यावर अण्णाबुवा असता तार सप्तकात घुसणाऱ्या तानांचे सट्टे चालू होते. सरळ आरोही अवरोही सट्टे घेऊन समेवर यायचे एकाने रिषभापर्यंत पल्ला गाठला तर दुसऱ्याने गंधार दाखवायचा. आणि या स्पर्धेत त्या दिवशी अण्णाबुवा हुकले... नि काळेबुवांनी तोच स्वरधागा उचलून ठाणकन समेचा लक्ष्यवेध केला. त्यासरशी श्रीमंतांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे दाद निघून गेली.

"शाब्बास काळेबुवा!"

बाळकृष्णबुवांवर या उद्गारांचा परिणाम चांगला झाला नाही. पुढच्या सबंध गाण्यात त्यांनी एकदाही काळेबुवांना इशारा केला नाही. सांगायचे तात्पर्य इतकेच की, तसे इतर बाबतीत अव्यवहारी असणारे बाळकृष्णबुवा सामान्य माणसाचे रागलोभादि व्यवहार सांभाळून होते.

काळेबुवांनी मग त्याच दिवशी योग्य संधी पाहून श्रीमंतांची गाठ घेतली आणि हात जोडून म्हणाले, 'एक विनंती करायला आलो होतो'

'तुम्ही काय विनंती करणार ते ठाऊक आहे काळेबुवा, बुवासाहेबांच्या समक्ष शाबासकी नको हीच ना? पण माझा अगदी नाइलाजच झाला हो. उत्स्फूर्तपणे दाद निघून गेली आणि मागाहून चुटपूट लागून राह्यली.'

* * *

एक गोष्ट खरी की पं, बाळकृष्णबुवांचे गाणे नेहमी चढत्या क्रमाने रंगत जायचे. प्राकृतिक दोषामुळे गाणे रंगले नाही असे क्वचितच व्हायचे. बुवा सहसा संतापत नसत, पण संतापले तर मात्र राग अनावर होई. इतका की सर्व अंग थरथरू लागे. अशा वेळी गावे लागले तर मात्र ते गाणे कधीच रंगत नसे. श्रीमंतांनी एकदा हा अनुभव घेतला होता. विष्णु दिगंबर ज्यावेळी मिरजेहून गुपचूप चालते झाले त्यावेळी बाळकृष्णबुवांचा मुक्काम इचलकरंजीस सरकारवाड्यावर होता. मुद्दाम गाणे ऐकण्यासाठीच श्रीमंतांनी त्यांना बोलावून घेतले होते. उत्तररात्री मिरजेहून ती बातमी आली. छायानटातील रामगीतगोविंदम्‌मधील एक अष्टपदी गाऊन बाळकृष्णबुवा गाणे आटोपते घेणार होते.

***रामचंद्रकरकमलमुदारम् । भज भजनीयम् अमलम्***

असे त्या अष्टपदीचे शब्द. बुवा कवी जयदेवाच्या गीतगोविंदापेक्षाही रामगीतगोविंदातील अष्टपदी गाणे अधिक प्रशस्त मानीत, गीतगोविंद फार शृंगारिक तर वाटत नव्हते? ती अष्टपदी संपल्यावर त्यांना विष्णु दिगंबरांच्या पलायनाची वार्ता कुणी तरी सांगितली. त्यांचा अगदी संताप संताप झाला. म्हणाले, "मला आत्ताच्या आत्ता मिरजेस गेलं

पाहिजे. आमचा धंदा कुंभाराचा. एक मडकं बिघडलं तर दुसरं तयार करीन. काय समजतो विष्णू स्वतःला?”

श्रीमंत म्हणाले, “बुवासाहेब आपण मिरजेस जरूर जा, पण जरा उजाडू दे. तिथपर्यंत बिभास आणि ललत मधील एकेक चीज होऊ दे.” पण बुवांचा चित्तविक्षोभ एवढा जबर होता की, त्यांचा स्वरच मुळी कापू लागला. गाणेच थांबवावे लागले.

असा एखादा अपवाद वगळता बाळकृष्णबुवा हे त्यांच्या काळात ‘सर्वेषां मूर्ध्नि’ च होते. आकाराच्या ताना, गमक-ताना, ढाल-ताना यांचा पाऊस पडू लागला म्हणजे मूगंधर्व रहिमतखांसारखा ऋतू मनाचा कलावंतही बुवांच्या जवळ येऊन म्हणायचा, ‘अच्छा बालकिसन, बहुत मजा किया!’

* * *

बाळकृष्णबुवांची अखेर देखील श्रीमंतांच्या दरबारातील सेवेने झाली ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे. २४ साली अण्णाबुवासारखा प्रतिबाळकृष्णबुवा हा लौकिक मिळवू लागलेला मुलगा निवर्तल्यावर बाळकृष्णबुवा मनाने उन्मळूनच गेले होते. २६ सालचा नवरात्रोत्सव उगवला. श्रीमंतांनी बुवांना आता कसलीही तोशीस लागू द्यायची नाही असे ठरवले होते. त्यांचे वेतन ६५ रुपये केले होते. गाण्याची सक्ती नव्हती. पण नवरात्रोत्सव सुरू झाल्यावर या भीष्माचार्यांना राहवले नाही. तो प्रसंग सांगण्याआधी या दरबार हॉलचे संगीताशी असलेले नाते थोडे अधिक स्पष्ट केले पाहिजे.

इचलकरंजीच्या या उत्सवात राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये सर्व कार्यक्रम तोफेच्या इशाऱ्याबरहुकूम होत. सकाळी पुष्करणीची तोफ साडेसहाला व्हायची आणि पंचगंगेचे पाणी व्यंकटेशाच्या नि शांतादुर्गेच्या पूजेसाठी यायचे. साडेआठला दुसरी तोफ व्हायची आणि व्यंकटेशापुढे निमंत्रित गवयाचे गाणे साडेदहापर्यंत चालायचे. या नऊ दिवसांत सगळ्या गावाला राजवाड्यात मुक्तद्वार असे. रात्री साडेआठला तोफेसरशी कीर्तन सुरू होई आणि १० वाजून पंचवीस मिनिटांनी ‘हेचि दान दे गा देवा’ होऊन आरती झाली की साडेदहाला तोफ होऊन त्या दिवसाचा कार्यक्रम संपायचा. उत्सवातील जागराच्या रात्री मात्र सबंध रात्र गाणी चालत. आणि साडेदहापुढे सहसा कधीही न जागणारे श्रीमंत रात्रभर निमंत्रित गवयांची गाणी ऐकत बसून राहात. तसा हा राजवाडा कोल्हापूरच्या न्यू पॅलेसच्या धर्तीवर बांधलेला आहे. श्रीमंत बाबासाहेब १८९२ साली गादीवर आले त्या आधी नुकताच तो बांधून पुरा झालेला होता. पण इशाऱ्याची तोफ ज्या कोरविणीच्या बुरुजावळून उडे तो बुरूज आणि वाड्याभोवतालचा तट से मात्र १७३८ साली पुण्याच्या शनिवारवाड्याच्या बांधणीबरोबरच

बांधून झालेला आहे. त्या वेळी इचलकरंजी संस्थानच्या संस्थापकांचे सुपुत्र श्रीमंत व्यंकटराव गादीवर होते. थोरल्या बाजीरावांची बहीण अनुताई या व्यंकटरावांच्या पत्नी. चिमाजी अप्पांनी वसईवर स्वारी केली त्या वेळी गोव्यातून वसईकडे रसद जाऊ नये, गेली तर ती अडवली जावी म्हणून श्रीमंत व्यंकटरावांना पेशव्यांनी गोव्यावर स्वारी करण्याचा आदेश दिला होता. नेमक्या याच वेळी इचलकरंजीस वाड्याभोवती तट आणि बुरुज बांधण्याचे काम चालू होते. कोरविणीचा बुरूज हा टेहळणीचा बुरूज असल्याने चांगला उंच बांधला गेला होता. इतिहासकाळात त्यावरून तोफही उडविली जात असेल. त्याला टेहळणीचा बुरूज असे नाव पडण्याऐवजी कोरविणीचा बुरूज असे नाव पडले. त्यामागे परंपरेने कानावर येणारी दंतकथा असावी: बुरूज बांधण्याचे काम चालू असता कोणी एक कामावरली कोरवीण बुरुजाखाली कोसळली व गाडली गेली. या दंतकथेपटी परिसरात भयही निर्माण करण्यात येत असे. इतके खरे की रोज रात्री दहा वाजता या तटावरून कोरविणीच्या बुरुजापर्यंत ‘चौकी पहारे हुश्शार’ असा पुकारा करीत अर्धा तास गस्त चालायची. प्रथम या गस्तीबरोबर ताशा असे आणि बुरुजापर्यंत कडाडून वाजणारे ते वाद्य बुरुजापाशी येताच त्याच्या सन्मानार्थ खाडकन बंद केले जाई. इचलकरंजीतील ज्या मिरवणुका वाद्ये वाजवीत तटाच्या या बाजूने जात त्यादेखील बुरुजापाशी आल्यावर वाघे बंद करीत. रात्री गस्त घालताना पुढे ताशाऐवजी शिंग वाजविण्यात येऊ लागले तेव्हा हे शिंगवादन जणु दरबार हॉल व कोरविणीचा बुरूज यांमधील स्वरसेतूच ठरले! ते कसे ते सांगण्यासाठी हा प्रस्ताव.

नवरात्रोत्सवात रात्री दरबार हॉलमध्ये पिलूबुवा फलटणकर यांचे कीर्तन असे. कोरविणीच्या बुरुजाशी जाईपर्यंत दोन-चार वेळा शिंग वाजे आणि तितक्या वेळा फलटणकरबुवांचा पेटीवाला त्या शिंगवादनाची दरबारात पायपेटीवर तंतोतंत साथ करी! सगळे सकौतुक पहात असतानाच या मनोज्ञ विक्षेपाचा शेवट हरिदासबुवा ‘सीताकान्तस्मरण जय जय राम’ असा करीत.

असा हा सर्व दर्जाच्या स्वरांनी आकंठ तृप्त झालेला हॉल २६ सालच्या उत्सवात अनपेक्षितपणे बाळकृष्णबुवांच्या गायनाचा धनी झाला. कुणाच्याही ध्यानीमनी नसता जागराच्या रात्री बुवासाहेब काठी टेकीत टेकीत आले नि श्रीमंतांना म्हणाले, ‘आज मी गाणार!’ आणि गाणार म्हटल्यावर बाळकृष्णबुवांना कोण अडविणार?

गौड मल्हार (प्यारे आवो जी) आळवून त्यांनी श्रोत्यांना दीड तास शिकार केले. ‘हीच माझी अखेरची सेवा’ असे हात जोडून श्रीमंतांना म्हणाले आणि घरी जाऊन झोपले. गानक्षेत्रातील भीष्माचार्यांनी आयुष्याची भैरवी पुढे माघ महिन्यात केली हे खरे, पण त्यांच्या

सुरांनी सुस्नात होण्याची श्रीमंतांना, दरबार हॉलला आणि काही अंशी त्या कोरविणीच्या बुरुजाला अखेरची संधी मिळाली ती नवरात्रोत्सवातच.

बाळकृष्णबुवा गेले पण आपल्यामागे केवळी थोर परंपरा उभी करून गेले. १८७७ साली आपली खडतर तपश्चर्या पूर्ण करून बुवा ग्वाल्हेरच्या संगीताची कावड घेऊन महाराष्ट्रात आले आणि प्रथम सातारच्या छत्रपतींकडे राहिले. त्या वेळी गणू भिलवडीकर नावाचा तडफदार शिष्य त्यांना मिळाला. १८८० पर्यंत बुवांची ऐन तारुण्यातली तळपती गायकी, तालीम घेत असता भिलवडीकरांना कंठगत करता आली. बाळकृष्णबुवांची शैली गणपतिबुवांनी एवढी तंतोतंत उचलली होती की एकदा तर कुरुंदवाडचे अधिपती साफ चकले.

कुरुंदवाडला श्रीमंतांकडे गणेशोत्सवात मोठमोठे गवयी गात. सकाळची बैठक चालू असता श्रीमंतांची स्नानाची वेळ झाली म्हणून ‘मी आंघोळ करून घेतो, तोवर कुणा तरी नवख्या गवयाला बसवा,’ असे सांगून ते गेले. कारभा-यांनी भिलवडीकर नवीन म्हणून त्यांना बसविले. पण भिलवडीकरबुवांनी रंग भरायला सुरुवात करताच स्नानगृहात असलेल्या श्रीमंतांपुढे साक्षात् भ्रांतिमान अलंकारच उभा राहिला. प्रश्न पडला की आपण कुणी तरी नवख्याला बसवा असे सांगून आलो असता बाळकृष्णबुवा कसे गायला बसले? झटपट आंघोळ संपवून ते हॉलमध्ये आले तर गात होते गणपतिबुवा भिलवडीकर! असे हे भिलवडीकर बाळकृष्णबुवांच्या नंतर सहाच महिन्यांत गेले.

*　　　　　*　　　　　*

बाळकृष्णबुवांचे दुसरे लाडके शिष्य पं. गुंडुबुवा इंगळे. बुवा त्यांना गुंडामहाराज म्हणत. पं. विष्णु दिगंबर, यांच्या आधी एक वर्ष शिष्यशाखेत दाखल झाले होते. पण हा ज्येष्ठताक्रम त्यांच्या कामी आला नाही. सवलती मिळाल्या त्या सर्व विष्णु दिगंबर यांना. कष्ट वाट्यास आले ते मात्र गुंडबुवांच्या, विष्णु दिगंबरांना सरकारवाड्यात खास तालीम मिळे आणि जेवणही तिथेच व्हायचे. गुंडुबुवांना मात्र मधुकरी मागावी लागे. तरीही बाळकृष्णबुवांचे अपत्यनिर्विशेष प्रेम गुंडुबुवांना मिळत होते. गुंडुबुवांचा स्वभाव गुरुजींची मर्जी राखण्याचा म्हणून असेल किंवा बाळकृष्णबुवांना तोपर्यंत मुलगा नव्हता म्हणूनही असेल, गुंडुबुवा त्यांच्या खास मर्जीतील होते. विष्णु दिगंबरांना खास तालीम देतेवेळी बुवा गुंडोपंतांना आपल्याबरोबर घेऊन जात. पुढे त्यांना तसे करण्यास बंदी करण्यात आली. मग गुंडुबुवा चोरून प्रवेश करून आड बाजूने तालीम ऐकू लागले. तेव्हा एके दिवशी त्यांना पकडून श्रीमंत मिरजकरांपुढे उभे करण्यात आले. तेव्हा वाड्यात प्रवेश करण्यासच बंदी करण्यात आली.

बाळकृष्णबुवा कळवळले. मग गुंडुबुवांना खास तालीम घरीच मिळू लागली. वाड्यात विष्णु दिगंबरांना शिकवीत तर घरी गुंडुबुवांना. पण शिवाय वाड्यात न शिकविलेल्या चिजाही शिकवीत. यामुळे गुंडुबुवांकडे बाळकृष्णबुवांच्या कोणत्याही शिष्यापेक्षा अधिक चिजांचा भरणा होता. पं. विष्णु दिगंबर उत्तरेत निघून गेल्यावर बाळकृष्णबुवांनी गुंडुबुवांना हैद्राबादेस हद्दूखांचे जावई बन्नेखां यांच्याकडे पाठवून ग्वाल्हेरहून आणावयाच्या राहिलेल्या चिजाही आणवल्या.

बाळकृष्णबुवांच्या अव्वल आमदानीत तयार झाल्याने गुरुजींच्या गाण्यातील सर्व खुब्या त्यांना ठाऊक होत्या. चिजेतील शब्दांवर कसे मुरडावे व जाता जाता सहज लोच घेऊन कसे नटवावे यात गुंडुबुवांचा हातखंडा होता. तानापेक्षा स्वरावर ठरून आलाप, बोल-उपज व बोल-ताना या अंगांनी चिजेची बढत व खुलावट करण्याकडे त्यांचे विशेष लक्ष असे. पाच मिनिटांत गाणे जमवता आले पाहिजे असे बाळकृष्णबुवा म्हणत. गुंडुबुवांनी ती कला आत्मसात केली होती. गुंडुबुवांचा सर्वात मोठा गुण म्हणजे चिजेमधील अक्षरांची ते अशी काही उचल करीत, जुळणी करीत आणि त्यांची बांधणी बांधीत समेवर येत की त्या वेळी प्रत्यक्ष बाळकृष्णबुवाच गात आहेत असे वाटे, असा अभिप्राय पं. अनंत मनोहर यांनी दिला आहे. पण बाळकृष्णबुवांच्या पश्चात् गुंडुबुवा जेमतेम वर्षभरच जगले. विषमज्वराने १९२६ साली त्यांचा बळी घेतला. बाळकृष्णबुवा कसे गात हे समजण्याची वाटच बंद झाली.

बाळकृष्णबुवांचे चिरंजीव अण्णाबुवा अल्पायुषी न होते तरीदेखील बाळकृष्णबुवांची शैली महाराष्ट्राच्या कानांवर दीर्घकाळ पडती. बुवांनी आपली विद्या संपूर्णतया अण्णाबुवांना दिली होती. कोणाही शिष्यास माहीत नाहीत असे अनेक राग व चिजा त्यांस वयाच्या पाचव्या वर्षापासून तालीम देऊन शिकविल्या होत्या. १९०९ साली कुरुंदवाडच्या गणेशोत्सवात बाळकृष्णबुवांच्या मागे साथीस बसलेल्या अण्णाबुवांची तयारी बघून भूगंधर्व रहिमतखाँ, अब्दुलकरीम खाँ, व मंजीखाँ यांनी अण्णाबुवांची पाठ थोपटल्याचा उल्लेख आढळतो. बालगंधर्वांनी अण्णाबुवांना सन्मानपूर्वक गंधर्व कंपनीत येण्याबद्दल आडून आडून विचारले व त्या काळात २०० रुपये पगारही देऊ केला; यावरून बाळकृष्णबुवांनी ही दागिना किती कसोशीने घडविला होता हे ध्यानात येते. पण अण्णाबुवा १९२४ किंवा २५ सालीच वारले आणि बाळकृष्ण-शैलीचा आणखी एक नमुना नष्ट झाला.

पं. विष्णु दिगंबर यांनी १९२१ च्या जलशात बाळकृष्णबुवांची याद आणून दिल्याचा उल्लेख प्रो. बी. आर. देवधर यांनी लिहिलेल्या गुरुचरित्रात आढळतो. वीज कडाडल्याप्रमाणे तारसप्तकातून निघून सपाट तानेने मंद्रसप्तकात येणे हे वैशिष्ट्य पं. विष्णु दिगंबर यांनी

दाखवलेच, पण सवाल जबाबाची बोल-तानही ऐकवली अशी देवघरांची नोंद आहे. पण पं. विष्णु दिगंबर यांचा भर गानप्रसाराचे कार्य करण्यावर होता, बाळकृष्णबुवा कसे गात हे दाखविण्यावर नव्हता. पं. अनंत मनोहर यांना रहिमतखांचा सहवास बारा वर्षे घडल्याने त्यांची शैली ही बाळकृष्णबुवांच्या शैलीहून भिन्न झाली होती. त्यामुळे बाळकृष्णबुवांच्या नंतर दीर्घकाळ त्यांचे गाणे ऐकविण्याचे श्रेय प. यशवंतबुवा मिराशी यांच्याकडे जाते. मिराशीबुवांचे खरे आडनाव पंडित, इचलकरंजीस बाळकृष्णबुवांना जे घर मिळाले होते त्याच्या शेजारीच पंडितांचे घर होते. बुवा नव्यानेच राह्मयला आलेले. पंडितांच्या घरात गाण्याबद्दल सगळा आनंदच होता. बाळकृष्णबुवांच्या घरी गाणे शिकण्यासाठी येणाऱ्या शिष्यांचा राबता पाहिल्यावर यशवंत ऊर्फ बाळू मिराशी याने गाण्यावर विरोधी भक्ती सुरू केली. तो बाळकृष्णबुवांच्या शिष्यांना वेडावण्यासाठी गाऊ लागला! त्या वेडावण्याचेच कौतुक झाले! सर्व शिष्यांनी एक दिवस गंमत म्हणून बाळूला बाळकृष्णबुवांच्या पुढ्यात बसवले. गा म्हणताच पोरबुदीनुसार त्याने ‘वेडावण्याची कला’ दाखवली.

“छानच गाऊ शकशील रे तू,” बाळकृष्णबुवा म्हणाले. “मोठ्या गायकाची सर्व बीजं तुझ्यापाशी आहेत. शिकणार का मन लावून?” बुवांनी विचारले.

“आता कसं जमणार? मी सरकारवाड्यावर नोकरीस असतो आणि शिवाय माझं लग्नही झालंय.

“त्याची चिंता नको, श्रीमंतांना सांगून व्यवस्था करता येईल.”

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांना हे समजताच त्यांनी बाळू मिराशीला तीन वर्षे भरपगारी रजा देऊन बाळकृष्णबुवांकडे शिक्षणासाठी ठेवले. बाळू मिराशीस दुसरा लाभ असा झाला की अण्णाबुवांच्या बरोबर त्याला तालीम मिळू लागली. अण्णाबुवांना पुत्रप्रेमापोटी बाळकृष्णबुवांकडून खास म्हणून जे जे मिळाले ते ते सर्व मिराशीबुवांच्या पदरात पडले. श्रीमंत बाबासाहेब घोरपड्यांचे बाळू मिराशीवर केवढे लक्ष! तो तयार झाल्यावर स्वदस्तुरची पत्रे देऊन महाराष्ट्रभर त्याचा दौरा श्रीमंतांनी घडवून आणला. त्याच्या गाण्याबद्दल अभिप्राय मागवले. ते हाती आल्यावर खास बोलावणे पाठवून बाळू मिराशीस वाड्यावर बोलावले आणि श्रीमंत म्हणाले,

“छान गातोस असा अभिप्राय आहे सर्वांचा. आता मी सांगतो तसं कर.”

“आज्ञा व्हावी,”

“ही जाहिरात पाहिलीस?” श्रीमंतांनी एक जाहिरात फडफडावीत विचारले,

“आताच बघतोय आपल्या हातात, काय आहे त्यात?”

"आणखी एक महिन्यानं मुंबईच्या बालीवाला थिएटरात नाट्यकलाप्रवर्तकचा 'सौभद्र' चा प्रयोग आहे. त्यात तुला अर्जुनाची भूमिका करायचीय्."

"मला?"

"हो. इतकं दचकायला काय झालं?"

"कसं जमणार? शिवाय गुरुजींनाही पसंत पडायचं नाही. अण्णाबुवांना गंधर्व द. म. २०० रुपये पगारावर कंपनीत बोलावीत होते तरी साफ नकार दिला गुरुजींनी,"

"तू म्हणजे अण्णाबुवा नव्हेस. आपल्या मुलानं नाटक कंपनीत जाऊ नये असं त्यांना वाटणं स्वाभाविक आहे. तू गेलास तर आड नाही येणार ते. शिवाय मी शब्द दिलाय कंपनीच्या मालकांना. बाळू तयार झाला की कंपनीत पाठवीन म्हणून सांगून बसलोय्"

"मग मला गेलंच पाहिजे"

मिराशीबुवा नाट्यकलाप्रवर्तकमध्ये गेले त्यामागे अशा प्रकारे श्रीमंतांचाच हात होता. ४२ साली या सर्व घटना आठवून श्रीमंतांनी दरबार हॉलमध्येच पं. मिराशीबुवांचा सत्कार केला. गाणे झाले. शेवटी हुजऱ्याने एका चांदीच्या तबकातून शाल आणि श्रीफळ आणून तबक श्रीमंतांच्या पुढे केले. मिराशीबुवांना आयुष्यभर लाभलेली स्नेहाची ऊब त्या दिवशी आणखी शतगुणित झाली. सत्कार इथेच संपला नाही. शाल घालून झाल्यावर दुसरे एक झाकलेले चांदीचे तबक हुजऱ्याने पुढे केले. श्रीमंतांनी त्यावरचे रेशमी आच्छादन दूर करून बुवांना म्हटले -

"पहात बसू नका. हव्या तेवढ्या उचला!"


काय होते तबकात? जवळ जवळ दोन डझन सोन्याच्या आंगठ्या होत्या आणि हव्या तेवढ्या घेण्याची सरकारस्वारीची आज्ञा होती. बुवांनी त्यांतून एकच नवग्रहाची आंगठी घेतली.

महाराष्ट्राला बाळकृष्णबुवांची आठवण अनेक मैफलींतून पं. यशवंतबुवा मिराशी यांनीच करून दिली. १९३६ साली लखनौची कॉन्फरन्स आपल्या देवगिरी बिलावल रागाने त्यांनी अविस्मणीय करून ठेवली असे डॉ. के. जी. गिंडे सांगतात. १९३९ साली औंधास स्वामी शिवानंद यांच्या उत्सवात मिराशीबुवा इतके जमले की, गाणे आटोपल्यावर बाळासाहेब पंतप्रतिनिधी भावनावेगाने म्हणाले, "१९०१, नंतर आज प्रथमच बाळकृष्णबुवांना फिरून ऐकल्याचं समाधान लाभलं." ४० किंवा ४१ साल असेल. प्रो. देवधरांनी पं. विष्णु दिगंबर जयंती समारोहाचे अध्यक्ष म्हणून मिराशीबुवांची योजना केली. त्यावेळी राम मराठे, यशवंत जोशी हे तरुण पुण्यास मिराशीबुवांकडे शिकत असत. ती जोडी

तंबोऱ्यावर होतीच शिवाय कुमार गंधर्वही बसतो म्हणाले. कुमारांना सर्व तंत्रे ठाऊक, कुमार म्हणाले, ''बुवांचा नेहमीचा पांढरी चार स्वर नको. तो ढाला पडला तर बुवा जमायचे नाहीत. एक पट्टी चढीच असू दे.'' मिराशीबुवा साठीचे, दिवस पावसाळ्याचे. बुवांनी 'धूम गरजसो आयो' ही मियामल्हारातील अस्थाई आणि द्रुत त्रितालात 'बोछरन बरसे' या दोन्ही बंदिशी अशा आक्रमकतेने पेश केल्या की, सारंगीवर बसलेले दत्ताराम पर्वतकर, तबल्याच्या साथीला बसलेले कामू मंगेशकर, खुद्द प्रो. देवघर आणि असंख्य श्रोते यांना साक्षात बाळकृष्णबुवाच गात आहेत याची प्रचिती आली, तार सप्तकातून उठून घेतलेल्या सपाट तानांनी ग्वाल्हेर गायकीतील तडफ काय असते याचा उत्तम नमुनाच त्या वेळी मिराशीबुवांनी पेश केला. यानंतरची आणखी एक मेहफिल मुंबईत आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात झाली. १९५९ साली पं. राजारामबुवा पराडकर यांची षष्ट्यब्दी होती आणि शिष्याच्या षष्ट्यब्दीस गाण्यासाठी मिराशीबुवा उपस्थित होते. वसंत रंगत रंगत जाता जाता इतका रंगला की, तार सप्तकातील पंचम लागताच खळूकन श्रोत्यांच्या डोळयांतून आनंदाश्रू ओघळले. ८० च्या घरात गेलेले मिराशीबुवा जमले की असे चमत्कार करून दाखवीत, त्यांच्या हमीर, अडाणा, बहार, भीमपलास आणि जौनपुरी या पाच ध्वनिमुद्रिका निघाल्या त्यांवरून आणि पं. राम मराठे व पं. यशवंतबुवा जोशी जी ग्वाल्हेर गायकी पेश करतात त्यावरून बाळकृष्णबुवा कसे गात असत. याची आता नव्या गायकांनी फक्त कल्पना करायची. बाळकृष्णबुवांची एकही ध्वनिमुद्रिका काढली जाऊ नये हे आश्चर्यच म्हणावे लागेल. ध्वनिमुद्रिकांचे तंत्र १९२६ सालपर्यंत अगदीच विकसित झाले नव्हते असे म्हणता येणार नाही. पण मिराशीबुवांनी एक महान गोष्ट करून ठेवली आहे. त्यांनी बाळकृष्णबुवांकडून रागविस्ताराची तालीम जशी मिळाली तशी ती नोटेशन पद्धतीने लिहून काढून ख्याल गायकीचे तीन भाग प्रसिद्ध केले, तेच खरोखर बाळकृष्णबुवांचे चिरंतन स्वरूपाचे स्मास्क होय.

शिल्परूपाने तो अक्षरकीर्ती गायक अक्षरकीर्ती बाबासाहेब घोरपड्यांच्या बागेत आहे अन् ग्रंथरूपाने संगीताच्या आम दुनियेत.

❀ ❀



# २. अल्लादियाखां

कोल्हापुरातील जुन्या राजवाड्याच्या भव्य प्रवेशद्वारावरील भगवा ध्वज आज उंच चढविलेला होता. राजर्षी शाहू महाराजांचे वास्तव्य शहरात असल्याची ती निशाणी होती. याचा अर्थ महाराज जुन्या राजवाड्यात होते असा नव्हे. न्यू पॅलेस झाल्यापासून महाराज कोल्हापुरात असले की तिथेच असत.

१९२१ सालच्या उन्हाळ्यातील एक टळटळीत दुपार होती ती. माणसे डांबरट झाली तरी रस्ते अजून खडीचेच होते शहरातले. राजोपाध्यांच्या गल्लीतून फाटक्या अंगाची एक व्यक्ती लगबगीने महाद्वार चौकात आली. तिथूनच तिने महालक्ष्मीला हात जोडले. एका टांगेवाल्याला इशारा करून टांगा थांबविला आणि तापल्या कढईतून फुटाणा उडावा तशी आपली कुडी तापल्या रस्त्यावरून, टांग्यात मागच्या बाजूला उडवून दिली. आज स्वारीच्या डोक्यावर टोपी होती हे विशेष. बाकी सारा पोषाख नेहमीचाच. अर्ध्या बाह्यांचा सफेद शर्ट, धोतर आणि कोल्हापुरी वहाणा! ठार काळया व्यक्तीही जेव्हा प्रफुल्लितपणाचे क्षण अनुभवीत असतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळीच लकाकी असते. एखाद्या शाळेतील नुकत्याच रंगवलेल्या फळयासारखी. त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरही तशी लकाकी दिसत होती.

"न्यू पॅलेसकडं घे" रुबाबात ऑर्डर सोडत स्वारीने पाय लांब केले; डोळे अर्धमिटले झाले. बहुधा कसले तरी सुखस्वप्न तरळत असावे डोळयांपुढे.

थोड्याच वेळात शाहू महाराजांपुढे दाखल झाली ती व्यक्ती. लवून मुजरा करून म्हणाली.

"का बोलावलं होतं हुजूरस्वारीनं गरिबाला?"

"हां म्हंजे तुम्ही आलासा व्हय! अरे श्रीपतराव, ह्ये कोण आलंय् बगितलास न्हवं, ह्यांच्या अर्जाचा तो कागद..."

"आता आणतो हुजूर" असं म्हणून महाराजांचे व्यक्तिगत कारकून श्रीपतराव मंडलीक आत जाऊन अर्ज आणून देतात आणि तिथून निघून जातात. नंतर एक क्षण-दोन क्षण महाराजांचे अर्ज वाचण्याचे नाटक चालते. मग शिकार टप्प्यात आल्यावर महाराज नेहमी जसे

भाला लावीत तसे शब्द सुटतात:

"म्हंजे एकंदरीनं खांसाहेब अल्लादियाखां यांच्या रिकाम्या झालेल्या जागी आम्ही तुमची नेमणूक करावी अशी तुमची मागणी आहे म्हणा की-"

"मागणी नव्हे, हुजूरच्या पायाशी विनंती-"

"त्येच त्ये हो. लीद म्हटलं काय, शेण म्हटलं काय, एकच की!" असे म्हणून ढगाचा गडगडाट व्हावा तसे महाराज हसले नि मग जरा थांबून म्हणाले, "आत्ताच ही विनंती करण्याचं कारण-?"

"केसरबाईंना तालीम देण्यासाठी खांसाहेब कायमचे मुंबईला गेलेत. एक वर्ष झालं या गोष्टीला. भवानी मंडपात देवीपुढं सेवा चालू राह्यला हवी ना-"

"खांसाहेबांचे बंधू हैदरखां आहेत ना कोल्हापुरात?"

"आहेत आणि देवीची सेवा ते चालवीतही आहेत पुढे. पण दरबारातून नेमणूक झाली ती थोरल्या खांसाहेबांची. कायदेशीरदृष्ट्या ती जागा आता रिकामी..."

"म्हणजे कोल्हापूरचं राज्य आमच्याऐवजी तुम्हीच चालविताय् म्हणा की?"

"तसं नव्हे हुजूर. आज ना उद्या प्रश्न निर्माण झालाच नव्या नेमणुकीचा तर माझं नाव हुजूरस्वारीपुढं असावं म्हणून अर्ज करून ठेवला. माझ्या मतानं थोरल्या खांसाहेबांनंतर ती जागा मलाच मिळणं रास्त होईल."

"हे तुमचं मत झालं. तुमच्याबद्दल इतरांचं - खुद्द थोरल्या खांसाहेबांचं काय मत आहे, आहे ठाऊक?"

"ते मला कसं ठाऊक असणार?"

"मग ऐकून ठेवा. तुमच्यासारखा अमर्याद, विद्येची योग्यता न जाणता पाहिजे तिथं दावतीला हजर राहून गाणारा, एक नंबरचा स्वार्थी, गुरु घराण्याचा द्वेष करणारा, भास्करबुवा बखल्यांसारख्यांचा तिरस्कार करणारा कोल्हापुरात दुसरा माणूस नाही असं थोरल्या खांसाहेबांना वाटतं. तरीही तुमची नेमणूक त्यांच्या जागी करावी म्हणता? खुळ्यांतच काढायला निघालात की आमास्नी! अहो, केशराच्या मळ्यात गाढवं का सोडतात कुणी चरायला? चला चालते व्हा इथून! खबरदार पुन्हा तोंड दाखवायला याल तर..."



शिकार आता पुरती घायाळ झाली होती.

खाली मान घालून ती व्यक्ती चालू लागली. आता टांगा करून घरी परतण्याचेही भान राहिले नाही तिला. रणरण उन्हात चालत असताही दाट काळोखाचा महासागर आपल्याभोवती पसरला आहे असे वाटत होते तिला...

*                    *                    *

या घटनेतील व्यक्ती कोण या गोष्टीला आता महत्त्व उरलेले नाही. महत्त्व आहे ते राजर्षी शाहू महाराजांच्या हृदयात संगीतमहर्षी अल्लादियाखां यांना काय स्थान होते याला. कोल्हापूरच्या सांस्कृतिक इतिहासाची कोणी सूक्ष्म तपासणी केली तर या संगीतमहर्षीचे १८९५ साली तिथे झालेले आगमन आणि पुढे दोन तपे तिथे झालेले वास्तव्य ही इतिहासाची पुनरावृत्तीच तर झाली नाही ना, असे वाटेल. विंध्य ओलांडून काही हजार वर्षांपूर्वी दक्षिणेत आलेला मंत्रद्रष्टा, सर्वतंत्र स्वतंत्र अगस्ती ऋषी कोल्हापुरात दीर्घ काल तपश्चर्या करीत राहिला होता याच्या खुणा आजही तिथे मिळतात. महालक्ष्मी मंदिराच्या घाटीच्या दरवाजाशी असलेल्या दीपमाळेच्या चबुतऱ्यावर अगस्ती आणि त्याची पत्नी लोपामुद्रा यांच्या प्रतिमा आहेत. मंदिराच्या आवारातील मणिकर्णिका सरोवर काळाची गरज म्हणून बुजवले गेले तरी अगस्ती तिथेच गुहेत राहून तपोबलाने आपली विद्या सतेज बनवीत होता असे सांगतात.

विंध्य नव्हे, पण अरवलीच्या रांगा ओलांडून खांसाहेब अल्लादियाखां दक्षिणेत आले. करवीर नगरीने एका निमित्ताने त्यांना बोलावून घेतले. ***‘संगीतः पञ्चमो वेदः’*** असे तर वचनच आहे आणि त्या वेदाचे ते सर्वतंत्र स्वतंत्र असे मंत्रद्रष्टे होते हे तर आता सर्वांनीच मान्य केले आहे. देवल क्लबासमोरील या महर्षीचा पुतळा, ‘खरी गल्ली’ मधील त्यांचे घर, ही सगळी अगस्तीशी साम्य दर्शविणारीच खांसाहेबांची स्मारके नव्हेत काय?

*                    *                    *

कोल्हापूरच्या मंगळवार पेठेतील गणपती मंदिराच्या मागच्या बाजूने दक्षिणेकडे थोडे पुढे जाताच ही ‘खरी गल्ली’ येते. या गल्लीच्या तोंडाशीच जे पहिले दगडी भिंतींचे घर लागते ते थोरले खांसाहेब अल्लादियाखां यांचे. आज तिथे त्यांचे नातू श्री. अजीजुद्दिन ऊर्फ बाबा राहतात. त्या काळात या घराच्या पाय-यांभोवती कठडा होता, तेवढाच आज नाही. बाकी दर्शनी रुबाब तोच, दगडी दिंडीतून आत प्रवेश करताच उजव्या हाताला आता प्रशस्त स्नानगृह दिसते. पस्तीस वर्षांपूर्वीही इथे स्नानच घडत असे, पण स्वरांचे! थोरल्या खांसाहेबांचे सर्वात धाकटे चिरंजीव पै. भूर्जीखां इथे पं. मल्लिकार्जुन मन्सूर, पं. गजाननबुवा

जोशी, श्री. मधू कानेटकर, श्री. मधू सडोलीकर, धोंडूताई कुलकर्णी यांना रोज तालीम देत.

तळमजला पस्तीस वर्षांपूर्वीच्या आठवणींना जाग आणतो, तर पहिल्या मजल्यावरील दर्शनी भिंतीलगतची तीन खिडक्यांची माडी एकदम १९०० ते १९१० या दशकात घेऊन जाते. इथेच भिंतीला टेकून हुक्क्याची तलफ भागवीत थोरले खांसाहेब आपले तीन सुपुत्र व कै. गोविंदराव शाळिग्राम यांना सकाळ-संध्याकाळ तालीम देत. हुक्क्यातील विझलेला निखारा फुलवून आणायला वारंवार अंतर्गृहात जाता यावे म्हणून ही जागा तालमीसाठी निवडली असेल, पण क्वचित असेही घडे की निखारा फुलवून देता देता खांसाहेबांच्या पत्नी चिजेचा विसरलेला अंतराही फुलवून देत, कारण अष्टौप्रहर गाणे ऐकल्याने त्यांची याददाश्तही जबरदस्त होती म्हणतात.

स्वतः थोरले खांसाहेब आपले बंधू पै. हैदरखां यांच्यासह रोज रात्री जो रियाझ करीत ती जागा मात्र आणखी वरच्या मजल्यावर आहे. मी त्या निवान्त जागेत गेलो तेव्हा रात्रीचे अकरा वाजायला आले होते. ऐंशी-ब्याऐंशी वर्षांपूर्वी याच वेळी या महर्षींचा रियाझ इथे चाले, या कल्पनेनेच माझे मन सुखावले. खांसाहेब तंबोऱ्याची जी जोडी वापरीत ती तिथे काळ्या गवसणीत कोपऱ्यात विसावा घेत उभी होती. क्षणभर वाटले, जंगबहारी, आफ्रिकन तुंब्यांची हेमराजसारख्या कसबी कलावंताने बनविलेली ती जोडी बाहेर काढावी, तिचा जवारीदार स्वर छपरालगतच्या या खोलीत कसा भरून राहतो ते अनुभवावे, पण मी तो विचार आवरता घेतला कारण ती त्या वस्तूची आणि वास्तूची अमर्यादा ठरली असती. माझी काय पात्रता होती त्या जोडीला स्पर्श करण्याची?

थोरल्या खांसाहेबांनी रियाझासाठी हीच जागा का बरे निवडली असेल? आपला रियाझ कोणी चोरून ऐकू नये ही तर इच्छा त्यामागे नसेल? तीच असावी. खांसाहेबांचा रियाझ कानावर पडावा म्हणून त्या काळात कोल्हापुरात कोण म्हणून उत्सुक नव्हते? आपण या घराबाहेर रस्त्यावर उभे राहून जो तानपलटा रात्री दहाच्या सुमारास ऐकला तोच रात्री तीनच्या सुमारासही ऐकला अशी कबुली 'माझा संगीत व्यासंग' या पुस्तकात कै. गोविंदराव टेंबे यांनी दिली आहे. पण कबुली न देणारी आणि आमरण थोरल्या खांसाहेबांविरुद्ध जळणारी, खांसाहेब रजबअली यांच्यासारखीही गायक मंडळी होतीच. रजबअल्लींच्या बाजूने मातबर सरदार बाळासाहेब गायकवाड होते. कसेही करून रजबअली दरबार गवई व्हावेत अशी त्यांची इच्छा होती. पण अनपेक्षितपणे थोरले खांसाहेब आले आणि कोल्हापुरात गाण्याचा मनूच पालटला. खुद्द सरदार गायकवाड यांनाच रजबअलींचे गाणे थोरल्या खांसाहेबांच्या गाण्यापुढे बेचव वाटू लागले. रजबअली त्या वेळी ऐन पंचविशीत तर खांसाहेब

अल्लदियाखां पंचेचाळिशीत. एके दिवशी सरदार गायकवाड रजबअलींना म्हणाले,

“काय गातोस तू अलीकडे. मुळीच ऐकवत नही. अरे त्या खांसाहेब अल्लादियाखांची तरकीब जरा उचल...”

“कशी उचलणार? तशी तालीम मिळाल्यावाचून गळा त्या तरकिबीनं फिरवणं अशक्यच असतं, सरदारसाहेब. खांसाहेब अल्लादियाखां यांच्यासारखं गायला यायला एक तर त्यांची तालीम तरी मिळाली पाहिजे, नाहीतर...”

“नाहीतर काय?”

“त्यांचा रियाझ तरी ऐकण्याची व्यवस्था झाली पाहिजे. खरी गल्लीतील खांसाहेबांच्या घरानजीक एखाद्या घरात माझी झोपण्याची व्यवस्था कराल तर सहा महिन्यांत त्यांची तरकीब हासिल करून दाखवीन मी.”

त्यावेळच्या संस्थांनी वातावरणात आणि वीज न आलेल्या करवीर नगरीत सरदार गायकवाडांना रजबअलींची अशी व्यवस्था लावून देणे सहज शक्य झाले असावे. श्री. गोविंदराव टेंबे जर अनेक मुष्किल पलटे रस्त्यावर उभे राहून ऐकू शकत होते, तर नजीकच्या एखाद्या घरात निवान्त बसून रात्रीच्या शांत वेळी या बंधुद्वयांचा रियाझ आत्मसात करणे रजबअलींना काय अशक्य होते? ते तर मुळातच तयार होते! कोल्हापुरात वीज १९२० साली आली. त्याआधी म्युनिसिपालिटीचे संस्थांनी कंदील ***‘यावत् तैलं तावत् प्रकाशः’*** या चालीवर उजळायचे-मावळायचे! त्या अंधारात शुक्रवार पेठेतून रजबली मंगळवारात बिनधास्त येत असले पाहिजेत, असा निष्कर्ष कोणी काढला तर तो चुकीचा ठरू नये.

महाराष्ट्र कोकिळ कै. शंकरराव सरनाईक यांच्या यशवंत संगीत मंडळीत खांसाहेब रजबअली सहा महिने होते. त्या वेळी बिनधास्त गप्पा करताना आपण अनेक महिने खांसाहेब अल्लादियाखां यांचा रियाझ चोरून ऐकल्याची कबुली त्यांनी दिली होती असे पं. निवृत्तीबुवा सरनाईक आजही सांगतात.

पुढे अनेक वर्षांनी प्रो. बी.आर. देवधर यांना दिलेल्या मुलाखतीत, आपण अल्लादिया खांसाहेबांचा रियाझ चोरून ऐकल्याच्या आरोपाचा इन्कार रजबअलींनी केला आहे. एवढयावरून त्यांचे म्हणणे प्रमाण मानणे कठीण आहे. आपल्याला अंत्रोली घराण्याच्या चिजा आपले नातेवाईक विख्यात सारंगिये हैदरबक्ष यांच्याकडून मिळाल्या असेही रजबअलींनी त्या मुलाखतीत सांगितलें असून हैदरबक्ष खांसाहेब अल्लादियाखांच्या साथीला बसत असत म्हणून ती तरकीब व चिजा दोन्ही गोष्टी आपणास विनायास प्राप्त झाल्या अशी पुराव्याची जोड दिली आहे. पण तीही तितकीशी पटणारी नाही. अल्लादिया खांसाहेबांनी

हैदरबक्ष यांना क्वचितच सारंगीच्या साथीला घेतले असे टेंबे यांनी स्पष्ट लिहून ठेवले आहे आणि तेच खरे असावे कारण अल्लादिया खांसाहेबांना तंबोऱ्याशिवाय साथीची इतर वाद्ये म्हणजे निव्वळ उपसर्ग वाटे.

तात्पर्य, रजबअलींनी खूप दिवस 'खरी गल्ली' तील घरात रात्री जागून काढल्या, थोरल्या खांसाहेबांचा रियाझ ऐकला, पचवला आणि पुढे जिथे जिथे म्हणून अल्लादियाखा यांची गाणी व्हायची तिथे तिथे जाऊन त्यांना उपद्रवही दिला, हा सर्व इतिहास सुसंगत वाटतो. सरदार बाळासाहेब गायकवाड तरण्याबांड रजबअलींना अशा मैफिलींच्या ठिकाणी न्यायचे व थोरल्या खांसाहेबांच्या आधी आमच्या छोट्या रजबअलींना जरा गाऊ द्या म्हणायचे. सरदार गायकवाडांचा शब्द त्या काळात कोण धुडकावणार? मग रजबअली खांसाहेब अल्लादियाखांच्या चिजा, अनवट राग त्यांच्याच तरकिबीनं गाऊन मोठा गोंधळ उडवून द्यायचे म्हणे! वारंवार हे घडू लागले तेव्हा शाहू महाराजांकडे तक्रारी गेल्या. गंमत ही की, असे प्रश्न शाहू महाराज मोठ्या युक्तीने सोडवीत. त्यांनी रजबअलींना बोलावून घेतले, स्वदस्तुराची पत्रे देऊन अखिल भारतीय दौऱ्यावर धाडले व मगच थोरल्या खांसाहेबांच्या मागचा हा उपद्रव संपला!

रजबअल्लींनी १९४४ साली ज्या तऱ्हेने खांसाहेबांच्या एका विनंतीवजा निरोपाला उत्तर दिले, त्यावरूनही रियाझाची ही चोरी त्यांच्या मनात डाचत असावी हे स्पष्ट होते. १९४४ साली म्हणजे वयाच्या नव्वदाव्या वर्षी थोरल्या खांसाहेबांना काही महिने इंदूर नरेशांच्या कन्येची शिकवणी होती. त्यासाठी त्यांचा मुक्काम इंदुरात होता. रजबअली त्यावेळी ६९ वर्षाचे. जवळच देवासला असत. सत्त्वस्थ अल्लादियाखांनी त्यांना निरोप धाडला.

"आपण दोघंही आता मृत्यूच्या दारात उभे आहोत. तरी जिवंत आहोत तोवर कडकडून भेटू या व मनातील किल्मिष काढून टाकू या. आपण देवासहून इंदूरला येऊन जाल तर किती बरं वाटेल."

रजबअलींनी या निरोपास उत्तर पाठवलं: "इतके दिवस आपण भेटलो नाही; आता थोड्या दिवसांसाठी गडबड कशाला? आपण दोघंही स्वर्गातच भेटू!" आहे की नाही मनुष्यस्वभावाचा आगळा नमुना!

खांसाहेब अल्लादियाखांनी अतिमानुष रियाझ तब्बल बत्तीस वर्षे केला असा हिशोब निघतो. खांसाहेब वामनराव सडोलीकर यांच्याशी बोलताना एकदा ते म्हणाले होते, "लॉर्ड कर्झननं दिल्ली दरबार भरविला त्या वर्षी मी रियाझ सोडला" खांसाहेबांच्या या विधानावरून

गणित बसते ते असे : वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत खांसाहेब गाण्याकडे वळलेच नव्हते. आपण भाषापंडित व्हायचे अशा उमेदीने त्यांचे अरबी-फार्सीचे अध्ययन चालू होते १८७० साली त्यांना चचा जहांगीरखां यांची तालीम चालू झाली. आणि १ जानेवारी १९०३ रोजी लॉर्ड कर्झनने दिल्ली दरबार भरविला तेव्हा, छत्रपती शाहू महाराजांबरोबर त्यांना जावे लागल्याने रियाझ बंद झाला. म्हणजे अडीच तपे या ऋषिवयनि तपश्चर्या केली, हा सरळ हिशोब.

सडोलीकरांशी रियाझ या विषयावर ते आणखीही थोडसे महत्त्वाचे बोलले आहेत. त्या बोलण्याच्या वेळी खांसाहेबांचे वय ८७-८८ असावे. ते म्हणाले, "आज गाण्यासंबंधी मला जी समजूत आली आहे ती जर त्या वेळी (१९०३) असती तर मी रियाझ सोडला नसता."

कोल्हापूरला आल्यापासून अखेरपर्यंत खांसाहेब दुधातुपात न्हाले. पण १८७० साली रियाझ आरंभला तेव्हा घरची स्थिती काही फारशी चांगली नव्हती. शेतीतून फक्त धान्य यायचे. वडील, चुलते आणि इतर सर्व मंडळी अहोरात्र गाण्यात! क्वचित दरबारात होणाऱ्या मैफलींतून जी काय प्राप्ती होईल तेवढीच. घरातील स्त्रिया अखंड राबत. फावल्या वेळातील त्यांचा उद्योग असे सूत कातण्याचा. चरख्यावर सुताच्या कुकड्या तयार होत. त्या विकून येणाऱ्या पैशांतून मुलांना खुराकासाठी पैसे मिळत. रोज दोन पैशांचा खुराक! गावात तिळेलाचे हातघाणे चालत तिथून पेढ्यासारखी असणारी तिळाची पेंड आपण आणीत असू व तोच आपला खुराक होता असे खांसाहेबांनी सांगितले आहे. आपली आई व गुरू चचा जहांगीरखां यांची आपल्या वर्तनावर कडक निगराणी असे व १८८४ साली विवाह झाल्यानंतरही त्या दोघांनी खांसाहेबांना लक्ष्मणरेषा आखून दिल्या होत्या. त्याचे उल्लंघन न केल्यामुळेच रियाझाला बळ राहिले असेही खांसाहेबांनी श्रीमती मोगूबाईंना एकदा सूचकतेने सांगितले आहे. ज्याला लौकिक अर्थाने अलौकिक व्हायचे आहे त्याने लक्षात ठेवावे असे हे आहे. रियाझामुळे जी एकाग्रता प्राप्त होई तिने त्यांना काही साक्षात्कार घडवले आणि काही आव्हाने पेलण्याचे सामर्थ्यही दिले असे त्यांचे उर्दूतील अप्रकाशित आत्मचरित्र वाचीत असता लक्षात येते.

एकाग्रतेने रियाझ करीत असता, खोलीतील दिवा केव्हा विझला हे एका रात्री समजलेच नाही आणि त्या अंधारात मयूरारूढ सरस्वतीच्या दर्शनानं पुलकित झालो अशी एक कथा खांसाहेबांनी आपल्या नातवाला निवेदन केलेल्या आत्मचरित्रात आहे. तसेच रियाझाच्या काळात त्यांच्या बुद्धीला पैलू पाडण्यासाठी कित्येक आव्हाने पुढे ठेवली जात. एकदा एक आव्हान चाळीस वर्ष अपुऱ्या राहिलेल्या समस्यापूर्तीचे होते. ते आपण कसे पेलले हे

सांगताना त्याच आत्मचरित्रात खांसाहेब म्हणतात:

“भूप रागात गप, धप, पसा, धसा, अशी जोड वगळून सरगम बनविण्याचे आव्हान चाळीस वर्षांपूर्वी अल्वार संस्थानात दिले गेले होते. ते अपूर्णच राहिले होते. माझ्यापुढे ती समस्या ठेवल्यावर मी रात्रभर गळा आणि लेखणी चालवीत राहिलो. आव्हान पूर्ण करायचेच. कागदावर उतरवायचे असे नव्हे तर गळयावरही चढवायचे अशी माझी जिद्द होती. भूपात आरोहात अथवा अवरोहात वरील स्वरजोड्या टाळून रागरूप कायम राखणे ही एक कसरतच होती. मी चिटोऱ्यामागून चिटोरी फाडीत होतो पण सरगम बनत नव्हती. शेवटी अगदी रडकुंडीला आलो. ईश्वराची अनेकदा करुणा भाकली. सगळी खोली चिटो-यांनी भरून गेली होती. अखेर पहाटे पहाटे तो करुणासागर प्रसन्न झाला. सरगम प्रथम गळयात रुणझुणली नि मग मी ती कागदावर उतरविली.
गगरे सारेसा धध, गग धध रेरे सासा, रेरेधध, धधरेरे, गगरेसा.

**अंतरा**

गगपप, धधपप, सासारेरे, धधरेध, धधपप, गगरेसा, रेसारेरे, सारेसा, धधधधधध, गगगग, रेरेरेरे, सासा, गगरे.

ग्वाल्हेर गायकीत वक्र रागातून सुद्धा सरळ ताना घेण्याचे कौशल्य, या उलट सरळ रागातून वक्र व पेचदार ताना घेण्याचे खास कौशल्य जे खांसाहेब अल्लादियाखां यांच्या गायकीत पूर्ण विकसित झालेले दिसून येते त्याचा पाया अशा रियाझाने पूर्ववयात घातला होता हे वरील समस्यापूर्तीवरून लक्षात यावे.

खांसाहेबांचा रियाझ कधी कधी अशा चमत्कारपूर्णतेने तानउपज प्रकट करी की गळा आणि कल्पना या दोहोंत अधिक वेग कोणाचा हे सांगणे कठीण होई. यामुळे कधी कधी अघटितही घडून जाई. कलकत्त्यास बाबू दुलिचंद यांच्याकडे असे अघटित घडले. त्यावेळी डॉ. व्ही. एन्. शिरोडकर यांच्या सासूबाई श्रीमती ताराबाई वेलिंगकर उपस्थित होत्या. शिवाय हार्मोनियमपटू गणपतभैय्या, ठुमरी-भैरवीचे अजोड बादशहा मौजुद्दिन ही मंडळीही होती. संध्याकाळची वेळ. नोकरांनी नुकतीच शामदाने उजळविली होती. त्यांच्याकडे पाहत गणपतभय्यांनी खांसाहेबांना ‘दीपक’ रागाची फर्माईश केली. रागाची बढत होता होता बलपेचाचे फिक्रे सुरू होताच शामदानातील मेणबत्या भडकू लागल्या! इशारा करून खांसाहेबांना थांबवावे लागले! तानसेननंतर विसाव्या शतकात रागाच्या परिणामकारकतेचा हा पुन्हा एकदा आलेला प्रत्यय म्हणावा काय? अडीच तपे अमानुष रियाझ केलेला गायकच हे अघटित घडवू शकतो.

अशा प्रतिभावन्ताला उर्दू मुशाहिऱ्यातील समस्यापूर्ती करणे काय अवघड होते? शाहू महाराजांना लहर आली तर तेही सहजासहजी घडून जाई आणि खांसाहेबांचा पूर्ववयातील भाषाभ्यास प्रकट होई. एक प्रसंग सांगण्याजोगा आहे. मिरजेच्या उरुसासाठी जमलेल्या शाहिरांना शाहू महाराजांनी कोल्हापुरास एकदा बोलावून घेतले होते. त्या मेळाव्यात महाराजांशेजारीच खांसाहेब कुतूहलाने बसले होते. शाहिरांनी एक पंक्ती समस्यापूर्तीसाठी ऐलान केली. ती अशी :

**नाखुने यारपे जब रंग हीना का देखा**

(प्रियकराच्या नखावरील मेंदीची लाली जेव्हा तिने बघितली)

अनेक शाहिरांनी अक्कल चालविली, पण महाराजांच्या पसंतीस उतरेल अशी एकही समस्यापूर्ती झाली नाही. महाराजांनी खांसाहेबांना विनंती करताच त्यांनी पुढील पंक्ती एका कागदावर लिहून दिली आणि मग ती काव्यकल्पना अशी पूर्ण झाली

**बह गया आशिके मुशतरका जिगर खूं होकर ।**
**नाखुने यारपे जब रंग हीना का देखा ।।**

(प्रियकराच्या नखावरील मेंदीची लाली जेव्हा तिने बघितली तेव्हा तिचे हृदयच रक्त बनून वाहू लागले!)

समस्यापूर्ती जाहीर होताच वाहव्वाचा जल्लोष झाला त्या मेळाव्यात. खांसाहेबांची प्रतिभा याही क्षेत्रात अशी चमकून जाई. याचेही कारण पूर्ववयात केलेला रियाझ!

*　　　　　*　　　　　*

कोल्हापूरला खांसाहेबांना आणायला निमित्तमात्र झाले बापूसाहेब कागलकर. शाहू महाराजांचे हे जनक घराण्यातील धाकटे बंधू आणि अत्यंत विश्वासातले. बापूसाहेबांच्या परिवारातील श्रीमती तानीबाई कागलकर यांना खांसाहेब अल्लादियाखां यांची तालीम देण्यासाठी आणायचे हा आंतरःकोऽपि हेतुः! असे आणायचे तर त्या महर्षीचा इतमाम राहील अशा प्रकारे आणावे म्हणून मग पूर्ण विचारान्ती दरबार गवई म्हणून पाचारले. या तानीबाईंचा उल्लेख खांसाहेबांच्या चरित्रात पापणीची उघडझाप करावी तितकाच टेंब्यांनी केला आहे. त्याची कारणे त्या वेळच्या परिस्थितीत काही असतील. आज तानीबाईंच्या योग्यतेचा विचार अधिक व्हायला हवा. खांसाहेब कोलहपूरला आले त्यावेळी त्यांचे वय ४०-४१ इतकेच. म्हणजे खांसाहेबांच्या ऐन उमेदीतील गायकीची तालीम तानीबाईंना मिळाली. वयाच्या ६५ व्या वर्षी केसरबाईंना घडवायला घेणारे खांसाहेब एक असाधारण योग्यतेची गायिका घडवू शकले तर ऐन उमेदीत तानीबाईंना त्यांनी काय योग्यतेच्या बनवल्या असतील? खांसाहेबांनी

एकदा बालगंधर्व, भास्करबुवा आणि टेंबे यांना तानीबाईंचे गाणे ऐकवले त्यावेळी भास्करबुवा म्हणाले म्हणे की, 'या अशा जाहीर मैफलीतून गात राहतील तर आमच्यासारख्यांनी काय गावे?' भास्करबुवांचा हा अभिप्राय बरेच काही सांगून जातो. तानीबाई जाहीर मैफलीतून गात नव्हत्या हे त्यावरून स्पष्ट होते. तसेच त्या अत्यंत तयार असल्या पाहिजेत हेही सूचित होते.

पण अशा अभिप्रायापेक्षा तानीबाईंना प्रत्यक्ष पाहिलेल्या, त्यांची तालीम ऐकलेल्या व्यक्तींनाच भेटण्याचा मी प्रयत्न केला. आज ८४ वय असलेले श्रीमती तानीबाईंचे मेहुणे (धाकट्या बहिणीचे पती) श्री. विनायकराव घोरपडे कोल्हापूरला ताराबाई पार्कमध्ये राहतात. श्रीमती श्रुती सडोलीकर, काटकर हिचे हे साक्षात् आजोबाच असल्याने त्या वशिल्यावर त्यांच्याशी अगदी जवळिकीने दोन दिवस गप्पागोष्टी झाल्या. त्या गप्पांचा सारांश असा सांगता येईल:

१८९५-९६ साली खांसाहेब अल्लादियाखां यांची तालीम श्रीमती तानीबाईंना सुरू झाली. ती १९०७ पर्यंत चालू होती. प्लेग अथवा उन्हाळा या दिवसांत सर्व राजपरिवार पन्हाळगडावर असे, त्यावेळी तालीम तिथे चाले. एरवी कोल्हापुरात नागाळा भागात, जिथे हल्ली जिल्हा परिषदेचे कार्यालय आहे तिथे बापूसाहेब कागलकर यांच्या बंगल्यावर चाले. भगवानदास नावाचा सारंगीवाला साथीला असायचा आणि नुकतेच दिवंगत झालेले कोल्हापुरातील तबलिये श्री. गणपतराव गुरव यांचे चुलते शंकरराव तबल्याच्या साथीस असत. पन्हाळ्यावर तालीम सकाळ-संध्याकाळ चाले तर कोल्हापुरात दुपारी दोन वाजता सुरू होई. १९०० साली खांसाहेबांनी आपली तिन्ही मुले बुंदीहून कोल्हापूरला आणली. तानीबाईंच्या तालमीच्या वेळी ती एकाग्रतेने तालीम ऐकत बसत. आणखी एक मुलगा खांसाहेबांच्या परवानगीविना अधूनमधून तालीम ऐकायला आणून बसवला जात असे. तो म्हणजे पुढे ख्यातकीर्ती झालेला गायक नट केशव भोसले. खांसाहेबांनी एकदा तानीबाईंपाशी नाराजी व्यक्त केली तेव्हा त्या म्हणाल्या, 'त्याने तालीम ऐकावी अशी श्रीमंत बापूसाहेब महाराज यांची इच्छा आहे.' खांसाहेबांनी त्यानंतर पुन्हा कधीही नाराजी व्यक्त केली नाही. एवंच केशव भोसले यांच्या गायकीवर या शिकवणीचा असर झाला असला पाहिजे असे मानण्यास हरकत नाही.

तानीबाई बालपणी कुशल नर्तिका होत्या. भाजलेल्या परळात, परळ फुटू न देता तालावर त्या पदविन्यास करीत असत असे सांगतात. त्यांचा आवाज उंच टिपेचा, अत्यंत मधुर आणि भाऊराव कोल्हटकर यांच्याप्रमाणे खूप दूरवर पोचणारा होता. यासंबंधी (बहुधा १९०२-१९०३ साली) घडलेला एक किस्सा सांगण्यासारखा आहे.

खांसाहेब अब्दुल करीमखां यांचे सुरेल गाणे कोल्हापूरचे सरदार बाळासाहेब गायकवाड यांनी १९०२ साली बेळगावला प्रथम ऐकले. त्यांनी लगेच खांसाहेबांना कोल्हापूरला येण्याचे निमंत्रण दिले. खांसाहेब अब्दुल करीमखां यांची कोल्हापुरात जी काय चार दोन गाणी झाली त्यांपैकी एक श्रीमंत बापूसाहेब कागलकर यांच्या बंगल्यावर झाले. सगळीच खाशी मंडळी. मध्यरात्र उलटून गेल्यावर केव्हा तरी करुणरसाने ओथंबलेले अब्दुल करीमखांचे गाणे संपले. तंबूर गवसणीत गेले. कॉफीपान चालू होते तेव्हा कुणीतरी बापूसाहेब कागलकरांना हळूच सुचवले, 'आज योग आलाच आहे, तर श्रीमती तानीबाईंना बसू द्या ना जरा वेळ गायला'

बापूसाहेबांनी अंतर्गृहात जाऊन तानीबाईंना मंडळींची इच्छा कळविली. तेव्हा त्या म्हणाल्या, "पाहुण्या कलाकाराला अगत्यपूर्वक बोलावून त्याच्या गाण्यानंतर त्याच आसनावर त्याच्यासमक्ष यजमानांनी गायला बसणं ही मैफलीची अमर्यादा होईल. खांसाहेबांच्या आधी मी गायले असते तर गोष्ट वेगळी."

''पण मंडळींचा आग्रह फारच दिसतोय..."

"असं म्हणता, मग निदान खांसाहेबांची यथास्थित रवानगी होईपर्यंत तरी मला बसता येणार नाही असे सांगावं आपण त्यांना..."

मैफलीत मग खुणेचा शब्द फिरला आणि जो तो स्वस्थपणाने पान जमवण्याचे नाटक करीत राहिला. रीतीप्रमाणे खांसाहेबांचा यथोचित सत्कार करून त्यांना बंगल्याच्या फाटकाशी तयार असलेल्या सारवट गाडीत नेऊन बसविण्यात आले. निरोप दिला; घेतला. गाडी हलली. एक फलांगभर गाडी गेली असेल नसेल तो कुठेतरी तंबोरे गोल बोलताहेत आणि सुवर्णसळईसारखा आकारयुक्त षड्ज त्यात मिळून वर उंच उठतोय् असे खांसाहेब अब्दुल करीमना जाणवू लागले. त्यांनी काय झाले असेल याचा अंदाज घेतला. तानीबाईंचे नाव त्यांच्या कानांवर होतेच. सारवट गाडी त्यांनी परत फिरवली. बंगल्याच्या फाटकाशी आणून उभी केली. मैफलीचा बेरंग होऊ नये म्हणून स्वतः मात्र गाडीतच बसून राहिले. वर परज रागातील 'अंखिया मोरी लागी' या चिजेची बिलपंत सुरू झाली होती. भर चौगण लयीने उठून पल्ल्यापल्ल्याच्या झोलेदार आलापीने बाई समेवर येत होत्या आणि वाहवा घेत होत्या. तास-सव्वा तास खांसाहेब तिन्ही सप्तकांत सारखाच नितळ व एकधर्मी राहणारा तानीबाईंचा आंसयुक्त स्वर दोन्ही कानांत भरून घेत होते.

तानीबाई जाहीर मैफलीतून गायल्या नाहीत हा म्हटले तर सरंजामशाहीचा अभिशापच होय. पण क्वचित देवाची सेवा म्हणून त्या गायल्याही असाव्यात. त्यांचे असे एक गाणे कोल्हापूरला कुंभार गल्लीतील दत्तापुढे आपण ऐकले आणि ते खांसाहेब अल्लादियाखां

यांच्या गाण्यासारखेच होते अशी आठवण श्रीमती धोंडूताई कुलकर्णी यांचे एक गायनगुरू श्री. गजानन धोंडो बाकरे यांनी सांगितली. श्री. बाकरे त्यावेळी स्वतः अप्पया बुवा यांच्याकडे गाणे शिकत होते. साधले घराण्यातून तबलावादन आणि पुढे (३१ ते ३५) खांसाहेब अल्लादियाखां यांचे पुतणे नथ्थनखां यांच्याकडून गाणे अशी विद्या त्यांनी संपादन केली. कुमारी धोंडूताई व त्यांची बहीण शकुन्तला या दोघींना ख्यालाच्या दरवाजापर्यंत नेऊन सोडण्याचे शिक्षण त्यांनी दिले व त्याच्या मोबदल्यात नथ्थनखांकडून तालीम घेतली. आज ऐंशीच्या घरात असलेले हे गृहस्थ नथ्थनखां यांच्या आठवणीने गहिवरतात.

आपल्या कन्येच्या मृत्यूचा आघात सहन न होऊन तानीबाईंनी १९०९ नंतर गाणेच सोडले आणि त्या अध्यात्म आणि योगाभ्यास याकडे वळल्या असे म्हणतात. श्रीमती बाबलीबाई, श्रीमती अंजनीबाई मालपेकर यांच्याप्रमाणेच तानीबाईंनी केवळ देवासाठी गायचे ही भूमिका पुढे घेतलेली दिसते. पण त्यांच्या गाण्याची योग्यता काय होती हे पाहायचे असल्यास खांसाहेब अल्लादियाखां यांचे पुढील उद्गार मार्गदर्शक ठरावेत. संग्रहणीच्या विकाराने खांसाहेबांना फार त्रास होऊ लागला व जीविताची शाश्वती वाटेना तेव्हा ते तानीबाईंना म्हणाले:

**अगर संयोगसे मै जल्द चल बसा तो मेरे लड़कों को तुमही तालीम देना!**

तानीबाईंनी खांसाहेब अल्लादियाखां यांची पेचदार गायकी सर्वात आधी आत्मसात केली, त्याप्रमाणे महाराष्ट्रात बाबुराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीची मुहूर्तमेढही त्यांच्यामुळेच रोवली गेली हाही इतिहासच आहे. केशवराव धायबर यांच्या 'एका जीवनाची पटकथा' या पुस्तकात त्याविषयीची माहिती मिळते. १९३१ साली टॉकी मशीन बघण्यासाठी त्या आपले मेहुणे विनायकराव यांच्याबरोबर व्हिक्टोरियातून हिंडत असता चर्नी रोड स्टेशनसमोर व्हिक्टोरियातच हृदयविकाराचा जबरदस्त झटका येऊन कोसळल्या. कोसळता कोसळता एवढेच ओरडल्या:

**तो आला, तो आला, विनायकराव मी चालले.**

खांसाहेबांना त्यांच्या निधनाची बातमी कळताच त्यांनी डोईचा साफा आदराने खाली काढून ठेवला. शिष्याबद्दल केवढी आदराची भावना!

तानीबाईसंबंधीच्या या आठवणी ताराबाई पार्कमधील ज्या बंगल्यात बसून ऐकल्या तिथेच 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटाची फिल्म घेतली गेली हे मागाहून समजले आणि मोठी गंमत वाटली. विनायकराव हे सर्व आलटून पालटून सांगत होते. तानीबाईंच्या

मृत्यूचा प्रसंग सांगताना त्यांना आतून अगदी भरून आले. म्हणाले, 'आता जेव्हा मी माझी नात श्रुती हिच्या गाण्याबद्दल अधूनमधून छापून आलेलं वाचतो तेव्हा स्वाभाविकपणेच ३१ साली गुप्त झालेली ती सरस्वती पुन्हा प्रकट तर झाली नाही ना असे माझ्या वेड्या मनाला वाटून जातं...!' विनायकरावांची भावना मी समजू शकलो.

*　　　　　　　　*　　　　　　　　*

खांसाहेब अल्लादियाखां यांची बडदास्त तानीबाई कशी राखीत हे मला वामनराव सडोलीकर यांच्याकडून कळले. खांसाहेबांची बडदास्त हा एक स्वतंत्र विषयच होऊ शकतो. पुढे श्रीमती मोगूबाई, श्री. गुलुभाई जसदनवाला, श्री. अनंतराव शिरगावकर, धोंडूताईंचे वडील अशी सर्वच मंडळी खांसाहेबांना काही म्हटल्या काही कमी पडू देत नसत हे खरेच आहे. पण तानीबाईकडील बडदास्त सर्वांहून वेगळी असायची. आठवड्यातून दोनदा खांसाहेबांचा साफा मंदसर प्राजक्ताच्या देठांनी रंगविण्यात येई. साफ्याला प्राजक्तांच्या देठांची झाक यायला हवी असे. या कामासाठी धोंडीबा अडसुळे नावाच्या इसमाची खास नेमणूक झाली होती. तो सीझनमध्ये प्राजक्ताचे देठ जमा करून, वाळवून, कुटून ठेवी! खांसाहेबांच्या सगळ्या सवयी कोकणस्थ चित्पावन ब्राह्मणास शोभेशा! नाहीतरी मुळात ते 'शांडिल्य गोत्रोत्पन्न त्रिप्रवरान्वित' होतेच ना! शाहू महाराजांकडून खाजगीतून रोज खांसाहेब आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी शिधा यायचा. त्यांत दरमाणशी कोल्हापुरी मापाने एक शेर अत्यंत सुवासिक असा जिरगा तादूळ, एक माप शुद्ध लोणकढे तूप, हंटले पामर्सची बिस्किटे, बकऱ्याचे चार रत्तल मटण असे. खांसाहेबांच्या मुलांचे कपडे राजवाड्यातील मुलांच्या कपड्यांबरोबर एकाच कापडाचे होत. खांसाहेबांना लिंबू, आंबा, माईनमूळ यांचे लोणचे अतिप्रिय. ते कोल्हापुरात सडोलीकरांच्या घरून जायचे. पुढे मुंबईत मोगूबाईंनी ती जबाबदारी उचलली होती. त्याशिवाय पोरबंदर तुपाचे डबेही त्या पाठवीत. धोंडूताईंचे पिताश्रीही कोल्हापुरात लोणी खरेदी करून तूप बनवून मुंबईस पाठवीत. खांसाहेबांना अतितलम मर्सराईज्ड धोतरजोडी लागे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात यासाठी फार धावधाव करावी लागे. नवी धोतरजोडी आणली की धोतराच्या टोकाच्या दशा काढून खांसोब त्या जपून ठेवीत व धोतर थोडेसे कुठे विरले तर त्या दशांनी स्वतः उत्कृष्ट रफू करीत; कसे म्हणाल तर जोडरागाचे ब्लेंडिंग कराव त्याप्रमाणे! साफ्यासाठी त्यांना १२६ नंबरची मलमल लागे. मोगूबाई सांगतात: 'ही मलमल इतकी पारदर्शक व तलम असे की तळहातावर चौपदरी घडी घातली तरी हातावरल्या रेषा स्वच्छ दिसत'. मुंबईस साफा रंगविण्यास मात्र प्राजक्ताचे देठ नव्हते. त्यासाठी रंगाच्या वड्या वापरीत.

अखेरपर्यंत असे एका राजयोग्याचे वैभव भोगले खांसाहेबांनी. पण वैभवाच्या दुलईला व्यथेचेही एक अस्तर आतून असलेच पाहिजे असा तर ईश्वरी संकत नसावा! जगाला ऊबदार दुलई दिसते. आतल्या अस्तराला बिलगून झालेले आत्म्याचे आक्रंदन ऐकू येतेच असे नाही.

केसरबाईंची शिकवणी सुरू झाली ही एका वैभवी कालखंडाची जशी सुरुवात तशी व्यथेच्याही कालखंडाची सुरुवात म्हणावी लागेल. १९२१ साल होते. मुंबईतील पन्हाळा लॉजवर खांसाहेब राहत व तेथूनच शिकवणीस जात. एवढ्यात हिंवताप मागे लागला. एक दिवसाआड हीव भरून यायचे. दोन-तीनपर्यंत ताप यायचा. शेठ गोपालदास पास्ता एके दिवशी सकाळी आले समाचाराला, तर खांसोहबांचा चेहरा पार उतरून गेलेला!

"दवापाणी ठीक चालू आहे ना? प्रकृती फारच ढासळलेली दिसते" शेठजींनी विचारलं.

''हिंवताप आहे तो, काहीतरी परिणाम होणारच. पण ताप गेला की मी टुकटुकीत असतो."

''आता ताप नाही ना?"

''नाही. काल ताप आलाच नव्हता."

''तरीही चेहरा पार उतरलेला का?"

''तो उतरावा अशीच बातमी आली ना गावाकडली आज..."

''काय ऐकलं खांसाहेबांनी?"

''राजस्थानात उनियाराला दुष्काळ पडलाय्. एक दाणा पिकलेला नाही यंदा. आमची कुठे आणि कुटुंबकबिला मोठा. यंदा त्यांचं कसं होईल या चिंतेत आहे मी."

''मी काही सेवा करू का? आज रात्री थोडा वेळ गायला याल घरी?"

खांसाहेब हो म्हणून गेले. शेठजीही उठून गेले. हिवतापाच्या पाळीचा दिवस हे दोघेही विसरले. सकाळी अकराला हीव भरून आले. दोन डिग्री ताप चढला. संध्याकाळी पाच वाजता उतरला. शेठजींना शब्द दिलेला. गायला तर जायला हवे. त्यांनी मित्रांना बोलावलेले असणार. मग रात्री शाल पांघरून खांसाहेब हजर झाले. आतून भरून येऊन गायले. शेठ गोपाळदासांनी दोनदा कागद फिरवला. एकदा मध्यंतरापूर्वी आणि नंतर मैफल संपता संपता. चौदा हजारांचे आकडे पडले होते! खांसाहेब एकदा या मैफलीसंबंधी बोलताना वामनराव सडोलीकरांना म्हणाले, 'आयुष्यात सर्वात अधिक बिदागी ज्या मैफलीनं दिली ती ही मैफल, अकालग्रस्तांच्या कामासाठी योग्य वेळी पैसे मिळाले यानंच मी धन्य झालो.'

* * *

ज्येष्ठाआधी कनिष्ठाने या जगाचा निरोप घेतल्याचे प्रसंग वारंवार एखाद्या व्यक्तीवर आले तर तीही एक विदारक व्यथा होऊन बसते. खांसाहेब अल्लादियाखां आपल्या विद्यावैभवाचा इमला उभा करीत असतानाच एकेक अप्रतिम घडविलेला चिरा कोसळतोय हे बघण्याची पाळी त्यांच्यावर आली. ही मरणसाखळी गुंफायला काळपुरुषाने सुरुवात केली १९२२ साली. त्या वर्षी पं. भास्करबुवा बखले गेले आणि पुढे तब्बल दोन तपे खांसाहेबांनी त्यांची आठवण होऊन दरवेळी म्हटले: **“अब मेरे साथ भाष्कर नही, मेरा जी नहीं चाहता कि मै गाऊं”**

१९३१ साली तानीबाई गेल्या आणि पाठोपाठ ३२ साली बडेजींचे -खांसाहेबांच्या सर्वात मोठ्या मुलाचे-सुपुत्र अब्दुल हकीम दिवाळीच्या दारूच्या स्फोटात ठार झाले! हा नातू उत्तम गायक बनेल असा विश्वास वाटू लागला असतानाच चौपाटीवरील मरीन मॅन्शनच्या गच्चीवर हा स्फोट झाला! ३६ साली पाठचे बंधू हैदरखां निवर्तले, ज्यांची याद अजूनही श्रीमती मोगूबाईंच्या गाण्यातील बोलअंगामुळे होते. ३७ साली तर त्याहून मोठा अनर्थ घडला. हाच घराण्याचा विद्यादीप अशी कीर्ती ज्यांनी आपल्या ख्यालगायनाने कमाविली आणि हाच तो महाराष्ट्राचा पहिला भावगीत गायक असे सामान्य मराठी माणूस ज्यांच्याबद्दल मुक्त कंठाने म्हणू लागला ते खांसाहेबांचे मधले चिरंजीव मंजीखां वयाच्या अवघ्या अठेचाळिसाव्या वर्षी वारले! मंजीखां यांच्या मृत्यूने खांसाहेब हादरलेच. दिङ्मूढ होऊन एक जागी बसून राहिले. पुत्राच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी श्री. गुलुभाई जसदनवाला यांनी त्यांना कसेबसे दरवाजापर्यंत नेले आणि तिथे मात्र त्या धीरपुरुषाने आपल्या आत्म्याचे खरेखुरे आक्रंदन एका वाक्यात ऐकवले. म्हणाले,

**भली की तूने मंजी! आज तू नही मर गया, मेरा हजार सालका गाना मार डाला!**

खांसाहेब अल्लादियाखां यांना मुलगे तीन, पहिले श्री. नसिरुद्दिन. ते सर्वात बड़े म्हणून बडेजी, दुसरे श्री. बदुद्दिन पण मधले म्हणून मंजी आणि तिसरे श्री. शमसुद्दिन पण वर्णानं भुरे म्हणून भूर्जी यापैकी मंजीखांसाहेबांबद्दल पुष्कळच लिहिले गेले आहे पण बडेजींबद्दल फारसे लिहिले गेले नाही. त्यांचा आवाज रुंद पण किंचित बसकट होता आणि खांसाहेब अल्लादियाखां यांच्या गायकीतील बेहलाव्याचे अंग त्यांनी प्रकर्षाने आत्मसात केले होते. अतिमेहनत केल्यामुळे ते रक्त ओकू लागले आणि म्हणून त्यांना उनियारास शेतीची देखभाल करण्यासाठी धाडण्यात आले, असे लिहिले गेले आहे. पण ते सर्वस्वी खरे नाही. त्यांना गाण्यातून हुसकून लावण्याचा कटच कोल्हापुरात झाला होता असे म्हणतात. संस्थानी राजवटीत काय शक्य असते आणि नसते याची चर्चा न केलेलीच बरी. पण श्री. नसिरुद्दिनखां

किती थोर योग्यतेचे गवई होते याविषयी सांगणारे आजही भेटतील. खांसाहेब अल्लादियाखां यांच्या निधनानंतर चाळिसाव्या दिवशी श्री. वामनराव देशपांडे यांच्या निवासस्थानी स्वरांजली वाहण्याचा कार्यक्रम झाला त्यावेळी बडेजींनी खंबावती आणि कामोद हे राग पेश केले होते. वडिलांच्या पहिल्या पुण्यतिथीस मुंबई आकाशवाणीवरही त्यांचे गाणे झाले होते. स्वारी अधूनमधून कोल्हापूरला आली की जुन्या आठवणी येऊन सैरभैर व्हायची. आपणास बळेच गाण्याच्या प्रांताबाहेर काढून लावले गेले आहे ही सल अगदी अखेरपर्यंत त्यांच्या मनात कुठे तरी होती खास.

खांसाहेब अल्लादियाखां यांचे तिसरे सुपुत्र उस्ताद भूर्जीखां हाही एक खास लेखनाचा विषय आहे. आज पं. मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या गाण्याने त्यांना विख्यात गुरु म्हणून अखिल भारतीय कीर्ती प्राप्त झाली आहेच, पण मंजीखांसाहेबांच्या मृत्यूनंतर घरातील विद्या-परंपरा उस्ताद भूर्जीखा हेच चालवतील अशी खात्री खांसाहेब अल्लादियाखां यांना वाटू लागली व त्यामुळेच ते मंजीखां यांच्या मृत्यूच्या धक्क्यातून सावरले असे म्हटले तर वावगे ठरू नये.

स्थिरमती कर्तृत्ववान माणसे अशी सावरली म्हणजे आयुष्याच्या प्रयोजनाचा फेर-विचार करू लागतात. खांसोहब अल्लादियाखां यांनीही तो १९३७ साली केला असला पाहिजे. सर्व दुःखांचा आणि व्यथांचा विसर पडायला हवा तर सतत चोवीस तास विद्यादानाच्या कार्यात स्वतःला गुंतवून ठेवले पाहिजे हे त्यांनी मनोमन ठरवले असावे. आपण एखाद्या माळ्याप्रमाणे विद्येची कलमे लावीत गेलो; श्री. त्रिभुवनदास जरीवाला यांना ध्रुपदधमार दिला; भाष्करला विद्या दिली; तानीबाईला दिली; अबदुल हकीमला दिली; पण ती सारी कलमे काळाने उपटून टाकली आणि आता नियतीने मंजीखां सारखे खुशबू देणारे कलमही छिनून घेतले! ठीक आहे; जिवात जीव असेतो आता नवी कलमे तयार करीन असा त्यांच्या मनाचा निर्धार झाला असला पाहिजे. १९३७ ते १९४५ च्या ऑगस्टपर्यंतच्या त्यांच्या कार्यप्रवण आयुष्याचा सुसंगत अर्थ लावायचा तर तो असा लावला पाहिजे, असे मला वाटते.

या काळात काय दिनक्रम असे त्यांचा? ३७ साली खांसाहेब अल्लादियाखां यांचे वय ८२. बाबुलनाथनजीक सर्वेअर बिल्डिंगमध्ये सहकुटुंब रहायचे. सकाळी नऊपर्यंत स्नानादी सर्व व्यवहार आटोपून प्रथम काही वर्षे कुण्याच्याही मदतीवाचून भारतीय विद्याभवननजिकच्या अजिंक्य मॅन्शनमध्ये श्री. अनंतराव शिरगावकर यांच्या घरी जायचे. पुढे त्यांचे नातू बाबा त्यांना तिथे पोचवीत. ३७ सालीच कु. लीला शिरगावकर यांची तालीम खांसाहेबांनी पत्करली. दोन एक तास तालीम व्हायची. मग अनेकदा जेवणही तिथेच घेत. पुढे

त्याच ठिकाणी श्री. गुलुभाई जसदनवाला आणि आपले नातू श्री. बाबा ऊर्फ अजीजुद्दिन यांना ते संध्याकाळी तालीम देऊ लागले. श्री. अजीजुद्दिन ऊर्फ बाबा हे उस्ताद भूर्जीखांचे चिरंजीव. १९२१ साली जन्मलेले. आता त्यांचे वय घराण्याची विद्या संपादन करण्यायोग्य झालेले. त्यांना शिरगावकरांकडे सायंकाळी तर तालीम मिळेच, पण त्याशिवाय श्री. वामनराव सडोलीकर यांच्याबरोबर ब्लॅव्हटस्की लॉज समोरील श्री. राऊत यांच्या खोलीतही मिळे. आणखी गंमत ही की श्री. वामनराव सडोलीकर यांनादेखील बाबांच्या बरोबर तालीम मिळून शिवाय श्रीमती सुशीलाराणी पटेल यांच्या तालमीच्यावेळी अप्रत्यक्ष तालीम मिळेच. कारण खांसाहेबांना तिथे घेऊन जाणे आणि घरी परत नेऊन सोडणे हे काम श्री. वामनराव सडोलीकर यांच्याकडेच असे व श्रीमती पटेल यांना स्वतःच ते पूर्वी शिकवीत असल्याने वामनराव सडोलीकरांना पटेलांच्या घरी तालमीच्या वेळी उपस्थित राहण्याची मुभा होतीच. हे एवढे विस्ताराने सांगायचे एवढ्यासाठी की खांसाहेब बहुतेक वेळ सर्वेअर बिल्डिंगच्या बाहेर काढून रात्री विश्रांतीसाठी निवासावर परतायचे. ३४ सालानंतर श्रीमती मोगूबाईंची तालीम खांसाहेब पुन्हा घेऊ लागले होतेच. ४४ साली विक्रमादित्य कॉन्फरन्सनंतर सूरश्री केसरबाईंनाही खांसाहेबांची तालीम पुन्हा काही काळ हवीशी वाटू लागली. केसरबाईंना काही ध्वनिमुद्रिका द्यायच्या होत्या आणि त्यात श्रीमती मोगूबाईप्रमाणे बोल फिरवण्याचे अंग यायला हवे म्हणून तशी खास तालीम लॅबर्नम रोडवरील विष्णुपंत शिरोडकर यांच्या निवासस्थानी चालायची. माझ्यासारख्याला असा प्रश्न पडतो की, एवढ्या वृद्धापकालात खांसाहेब इथून तिथे, तिथून तिथे जाण्या-येण्याचे जे कष्ट घेत त्यापेक्षा सर्वेअर बिल्डिंगमध्ये बसूनच सगळं विद्यादान का करीत नसत?

पण त्याचे उत्तरही मिळाले. सर्वेअर बिल्डिंगमध्ये आपल्या खोलीत राहूनच खांसाहेब तालीम देत राहते तर बहुधा कुणालाच ती तालीम सातत्याने मिळाली नसती. क्षणाक्षणाला तीत खंड पडला असता, व्यत्यय आला असता. सर्वेअर बिल्डिंगमधील त्यांचे निवासस्थान हा अक्षरशः चव्हाटा असायचा. खांसाहेब आहेत हे कळायचाच काय तो अवकाश. मोठ्या नेत्याच्या बंगल्यावर जसा सकारण-अकारण लहान मोठ्या सर्वांचा राबता असतो तसा तिथे असायचा. अशा चव्हाट्यावर तालीम देणे, त्यातून या घराण्याच्या गायकीची तालीम देणे हे मुष्किलच. वामनराव सडोलीकर आणि बाबा यांना कधी कधी चौपाटीवर फिरायला गेल्यावर आरामात बाकावर बसून खांसाहेबांनी नव्या नव्या चिजा सांगितल्या आहेत त्याचे कारणही हेच.

तर मग श्री. अजीजुद्दिन ऊर्फ बाबा मैफलीतून गात का नाहीत? आजवर का गायले

नाहीत? एकदम ऊजू प्रश्न. या कलमावरही नियतीची दुष्ट नजर पडली हे त्याचे उत्तर. बाबांना तालीम मिळून ते रियाझ करीत असता डोळ्यात रक्त चढते आहे. आणि ते रक्ताळलेले होत आहेत हे लक्षात आले. डॉक्टरी तपासणी झाली. त्यांनी सागितले, या मुलाला मैफली मारायच्या असतील तर डोळे गमवावे लागतील, अंधत्व येईल!

खांसाहेब अल्लादियाखां यांच्यावर हा आणखी एक आघातच होता. पण त्यांनी धीर सोडला नाही. बाबाला - आपल्या लाडक्या नातवाला-उत्तमोत्तम चिजा कंठगत करायला लावायच्या, त्यांचा विकासक्रम समजून घायचा, फक्त मैफलीत गायचे नाही एवढे पथ्य त्याला पाळायला सांगायचे असे त्यांनी योजले. बाबांचे कलम खांसाहेबांनी असे तयार केले आहे. त्यामुळे आज बाबांकडून पं. मल्लिकार्जुन मन्सूर, धोंडूताई कुलकर्णी, वामनराव सडोलीकर आणि त्यांचे बंधू मधुकरराव यांना जरूर तेव्हा घराण्यातील खास खास अशी लेणी मिळू शकतात. पं. मन्सूर तर कोल्हापूरला त्यासाठी मुद्दाम मुक्काम करून राहतात! बाबांनी आजोबांकडून हे विद्याधन वारसा हक्काने मिळवलेच, पण शेवटच्या तीन वर्षात जेव्हा जेव्हा सवड आणि एकान्त मिळाला तेव्हा खांसाहेबांकडून त्यांच्या जीवनातील अनेक घटना, पूर्वजांविषयीची माहिती, त्यांचे पराक्रम यासंबंधीची माहिती मिळविली व खांसाहेबांच्याच शब्दात ती लिहून ठेवली. या संगीत सम्राटाचे उद्या विस्तृत चरित्र लिहायचे कुणी योजले तर या साधनसामग्रीचा फार मोठा उपयोग होईल.

सर्वेअर बिल्डिंगमधील खांसाहेबांचे निवासस्थान ही एक अदालतही होती. खांसाहेबांच्यापुढे तिथे अनेक तक्रारी मांडल्या जायच्या. एकदा तर तक्रार मांडली गेली बालगंधर्वांच्या विरुद्ध. फिर्याद गुदरणारी असामीही सामान्य नव्हती. खांसाहेब अझमत हुसेनखां हेच तक्रार घेऊन आले होते. बालगंधर्वांना खांसाहेब अल्लादियाखां यांच्या हृदयात एक वेगळंच स्थान होते. पूर्वी जसे काही दरबारातून अमुक इतके खून माफवाले सरदार असत ना तसे. गंधर्व गळ्यातला दैवी चमत्कार खांसाहेब अल्लादियाखांनी स्वतःच कितीदा तरी अनुभवला होता. गंधर्व कंपनीचा मुक्काम खांसाहेब असतील तिथे असला तर पहिल्या रांगेतील दोन आसने खांसाहेबांसाठी नेहमीच राखून ठेवली जात. खांसाहेबांची तिलककामोदमधील ‘सूर संगत’ ही बंदीश तर प्रसिद्धच आहे. त्या बंदिशीबरहुकूम बेतलेले ‘स्वयंवर’ मधील ‘मम सुखाची ठेव देवा’ हे पदं खांसाहेबांनी गंधर्व गळ्यातून प्रथम ऐकले तेव्हा रूपक तालाशी लडिवाळ लय साधीत गंधर्व जेव्हा ‘आप्त देव धर्म’ या पंक्तीच्या वेळी वरच्या षड्जावरून मध्यसप्तकातील पंचमापर्यंत अवरोही मींड घेऊन आले त्यावेळी खांसाहेब भर थिएटरात आसनावरून उठून ‘जीते रहो’ असे ओरडले होते. गंधर्व हा त्यांचा

वीक पॉईंटच. अझमत हुसेनखां यांची गंधर्वांविरुद्ध तक्रार तरी काय होती?

**“तायाजी, आज बालगंधर्वने पूरिया धनाश्री रेडिओ स्टेशनसे सुनवाई और शुद्ध धैवत लगाकरही सुनवाई! कितना अनपढन!”**

खांसाहेबांनी शांतपणे तक्रार ऐकून घेतली आणि अझमत हुसेनखांना म्हणाले, **“बालगंधर्व की बात छोड दो. लेकिन बुजुर्गोंने पूरिया धनाश्रीमे बहोतसी बंदिशे शुद्ध धैवत रखकरही बांधी हुई है. उसका तो जरा ख्याल करो.”**

आणि मग खांसाहेबानी स्वतःच पूरिया धनाश्रीतील सहा बंदिशी अझमतखांना ऐकविल्या. एकूण एक शुद्ध धैवताच्या.

* * *

काळ भराभर जात होता. ४२ साली जगात दुसरे महायुद्ध चालू असता देशात ‘छोडो भारत’ आंदोलन सुरू झाले. खांसाहेब दीड वर्ष कोल्हापूरला रहायला गेले. पुन्हा खरी गल्लीतील घरात. याच वर्षी इंदुमती राणीसाहेबांनी बावडेकरांच्या वाड्यात खांसाहेबांचा भव्य सत्कार केला. कोल्हापूरच्या रसिक जनतेने खांसाहेबांचे अखेरचे गाणे ऐकले ते यावेळी. आता शाहू महाराज नव्हते. राजाराम महाराजांनी पेन्शनही रद्द केले होते खांसाहेबांचे. पण करवीरच्या जनतेच्या हृदयात त्यांना फार मोठे स्थान होते. रस्त्यातून त्यांची जराधवल तेजःपुंज मूर्ती चालू लागली तर मुजरे झडत. त्या नंतर मुंबईची ती विख्यात विक्रमादित्य सहस्त्राब्दी कॉन्फरन्स बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तिथे त्यांचा ‘गायनाचे गौरीशंकर’ या शब्दांत जयकरांनी गौरव केला. या कॉन्फरन्समध्ये सर्वात शेवटी पहाटे पाचच्या सुमारास खांसाहेब अतिगाढया लयीत ‘रामकली’ गायले. सूरश्री केसरबाई आणि सुपुत्र भूर्जीखां हे तंबोऱ्यावर साथीला होते. रूपकची ती गाढी लय अजूनही जाणकार श्रोत्यांच्या आठवणीत आहे.

४५ साली ऑगस्टच्या सुमारास खांसाहेबांना उठून हिंडणे फिरणे अशक्य झाले. आज खेडोपाडी पोचलेले कार्डिओग्रॅम हे यंत्र त्यावेळी प्रथमच मुंबईत आले होते. डॉ. रेग्यांनी ते मुद्दाम आणून खांसाहेबांच्या हृदयक्रियेचा आलेख घेतला. तज्ज्ञ अशा परकीय डॉक्टरला दाखविला. तो तज्ज्ञ म्हणाला, “९० व्या वर्षी इतके ठणठणीत हृदय मी प्रथमच बघतोय्!” आणि त्या तज्ज्ञाचे म्हणणे काय खोटे होते? मृत्यूपूर्वी चार महिने लक्ष्मीबागेत म्युझिक सर्कलतर्फे ते गायले तेव्हा त्यांना उचलून आणावे लागले इतकेच. पहिले काही क्षण आवाजातला कंप जाणवला, पण पुढे त्या बिहागड्याने जी दिव्य कळा धारण केली ती अपूर्वच होती. बहुधा १९४५ च्या डिसेंबरमधील हे गाणे असावे अगदी अखेरचे!

पण अशा महान विभूतींच्या बाबतीत अखेर अशी नसतेच. गाणे हा त्यांचा श्वासोच्छवास असतो, तो थांबतो तेव्हाच ते थांबते. १६ मार्च १९४६ रोजी खांसाहेब गेले त्या दिवशी नाकाला नळ्या होत्या. दर्शनासाठी येणारे लोक एकटक त्यांच्या पहुडल्या देहाकडे बघत होते. एका लयीत त्यांचा उजवा हात बिछान्यावर वर खाली होत होता. कुठल्या बंदिशीची उजळणी डोक्यात चालू होती कोण जाणे! ‘अनाहत नाद’ ही स्वतःचीच तर नसेल? तो लयीत हालणारा हात ज्या क्षणी थांबला त्या क्षणी सारे संपले!

हा लेख खरे तर इथे संपवायला काहीच हरकत नाही. पण एक अतिशय महत्त्वाची माहिती न देता जर मी तो संपवीन तर अपराधी ठरेन असे मला वाटते. कारण आता जी घटना मी सांगणार आहे ती व्यथा तुमची, माझी आहे!

खांसाहेब अल्लादियाखां व त्यांचे बंधू हैदरखां यांनी ऐन उमेदीत आपल्या मदभऱ्या आणि मधुभऱ्या शैलीत गायलेली व ध्वनिमुद्रित झालेली पूर्वी रागातील ‘दर्द के शफाई अल्ला हो अकबर’ ही चीज ऐकलेल्या तीन पुण्यवान व्यक्ती आज हयात आहेत असे सांगितले तर कुणाला खरे वाटेल?

सकृद्दर्शनी वाटणार नाही. पण ती खरी गोष्ट आहे.

चौघांनी हे ध्वनिमुद्रण ऐकले. त्यांपैकी उस्ताद भूर्जीखां आज हयात नाहीत.

पण पं. मल्लिकार्जुन मन्सूर, श्री. मधू कानेटकर व उस्ताद भूर्जीखांचे सुपुत्र बाबा हे आहेत.

कुठे ऐकले यांनी हे ध्वनिमुद्रित संगीत?

जमखिंडीला.

तर आता सगळेच सांगतो. साल बहुधा ४३. जमखिंडीकरांनी गणेशोत्सवात उस्ताद भूर्जीखां यांचे गाणे ठरवले होते म्हणून आपल्या शिष्यांसह खांसाहेब भूर्जीखां उपस्थित होते. अतिथिगृहात संस्थानच्या एका अधिकाऱ्याने खांसाहेबांना सांगितले,

“आपल्या पिताजींची ध्वनिमुदित झालेली एक चीज आमच्याकडे आहे. ऐकायचीय्?”

-आणि त्यांनी ती ऐकविली. जुन्या मेणाच्या बांगडीवर पूर्वी राग ध्वनिमुदित झालेला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात दुसऱ्या एका संस्थानातील आश्रितांनी तिसऱ्या एक संस्थानिकाकडे असलेले ते ध्वनिमुद्रण मिळवणे कठीणच होते. तरीदेखील उस्ताद भूर्जीखां प्रभृतींनी प्रयत्नांची शर्थ केली. पण ती व्यर्थ ठरली! ते ध्वनिमुद्रण हाती आले असते तर केवढी ऐतिहासिक अनमोल वस्तु हर प्रयत्नाने जतन करून ठेवता आली असती.

पण जमखिंडीकरांकडे ही बांगडी कशी गेली असेल?

थोडा तर्क चालवला की हे कोडे सुटते.

सौ. जमखिंडीकर यांचे माहेर बावड्यास. तिथे प्रतिवर्षी रामनवमीच्या उत्सवात खांसाहेब अल्लादियाखां व खांसाहेब हैदरखां गात असत. कधी कधी मुलांनींही बरोबर घेऊन जात. पंत अमात्य बावडेकरांनी १९१५ पूर्वी कधीतरी हे ध्वनिमुद्रण करून घेतले असावे आणि बावड्याहून जमखिंडीस जावईबुवांना भेट म्हणून ती मेणाची बांगडी गेली असावी.

आता या गोष्टीला इतकी वर्षे लोटली आहेत की नंदादेवी पर्वतावर अमेरिकनांनी ठेवलेल्या, पण पुढे बर्फाच्या थरात गुडुपगार झालेल्या किरणोत्सर्गी चाचणीयंत्रासारखीच कालाच्या ओघात या बांगडीची स्थिती झाली आहे.

पण ते अद्वितीय गाणे ध्वनिमुदित झाले होते आणि तो अजोड आवाज कुठे तरी नोंदलेला आहे ही नुसती कल्पनाही केवढी सुखद आहे! कल्पनेत क्षणभर सुखावह असणारी गोष्ट प्रत्यक्षात मात्र चिरंतन व्यथेचीच असते!



# ३. सारेच शापित!

एकेका वास्तूला इतिहासाचे सुवर्णकण कसे बर्फीवरील वर्खासारखे चिकटून बसलेले असतात!

खारमधील सतराव्या रस्त्यावरील कोपऱ्यावरचा बंगला या विधानाची उत्तम साक्ष होऊ शकेल. १९४२ साली जेव्हा श्रीमती शांता आपटे या बंगल्यात राहत होत्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर एका विजयादशमीस खास शांताबाईंच्या हातचे जेवण जेवण्यासाठी या बंगल्यात येऊन गेले होते!

सावरकरांची ही केवळ सदिच्छाभेटच होती आणि शांता आपटे यांचे बंधू बाबुराव जेव्हा स्वातंत्र्यवीरांना आमंत्रण देण्यासाठी गेले तेव्हा त्यांनी एकच शर्त घातली होती. 'जेवायला जरूर येईन. पण स्वयंपाक शांताबाईंनी केलेला असला पाहिजे!'

बाबुरावांनी ती अट मान्य केली. मग बंगल्यात कोण धावपळ! एवढा मोठा माणूस येणार तर शांताबाईंना जमेल असे कोणते पक्वान्न करावे? श्रीखंड आणि दसरा यांचा संबंध खरा, पण ते तयार करण्यात शांताबाईंचा सुग्रणपणा काय दिसणार? म्हणून मग श्रीखंड बाद झाले. बासुंदी बिनभरवशाची, जमली तर जमली आणि नासली तर...? या विचाराने बासुंदीलाही डिच्चू मिळाला. पुरणपोळीत शांताबाई हमखास नापास होणार होत्या म्हणून तोही विचार सोडून द्यावा लागला. शेवटी शांताबाई म्हणाल्या, "मी आपली गहू कांडून फक्कडशी खीरच करीन! त्यात वेलची, जायफळ, भरपूर नारळ आणि उत्तम प्रतीचा गूळ घातला की कसं चविष्ट रसायन तयार होईल. 'लेखण्या मोडून बंदुका घ्या' असा तरुणांना उचित सन्देश देणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचं स्वागत याहून दुसऱ्या कुठल्या बल्य पक्वान्नानं होईल?"

गव्हाच्या खिरीची एवढी वकिली खुद्द शांताबाईंनीच केल्यावर इतरांची काय प्राज्ञा होती दुसरा पदार्थ सुचविण्याची? मेनू ठरला आणि शांताबाईंसाठी स्वयंपाकघरचा 'व्हेनू' देखील बदलला. तळमजल्यावर शांताबाईंची तालीम वाजविणारा तबलजी दत्तू औंधकर एका खोलीत राहत असे. ती खोली खाली करून तिथे तात्पुरते स्वयंपाकघर करण्यात आले.

रोजच्या आचाऱ्याला तिकडे फिरकण्याची बंदी करण्यात आली. वरकामासाठी दत्तू औंधकर आणि गणू दांडेकर शांताबाईंच्या दिमतीस होते. (दत्तू औंधकर तबल्याची साथ करी तर गणू दांडेकर तालमीच्या वेळी शांताबाईंच्या मागे तंबोरा घेऊन बसे.) त्या दिवशी गहू कांडण्यापासून सर्व मेहनत या सुप्रसिद्ध गायिकेने केली. फक्कडशी वांग्याची भाजी, काकडीची कोशिंबीर, वरणभात, पुऱ्या...!

पण विवादी स्वरावर भरपूर न्यास करून रागरूप बिघडवावे त्याप्रमाणे मुख्य पक्वान्नाचे झाले. सगळी मेहनत वाया गेली! गहू शिजण्याआधीच गूळ घातला गेल्याने गहू अर्धवट शिजले नि ती खीर खाण्यासाठी तात्यारावांना खूपच चावाचावी करावी लागली! तरी देखील शांताबाईंनी शर्त पुरी केली म्हणून ते खूष होते.

एवढा दिगंत कीर्तीचा नेता त्या तासाभराच्या सदिच्छाभेटीतही आपल्या विज्ञाननिष्ठेची प्रचिती देऊन गेला. ते दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते. रेशनकार्ड नुकतेच जन्माला आले होते. जीवनावश्यक वस्तूंची चणचण होती. त्या संदर्भात गप्पा चालू असता बाबुराव-शांताबाईचा भाऊ म्हणाला, "अन्नधान्याची टंचाई अशीच चालू राहिली तर जगाचं पुढं कसं होणार? लोक खातील काय?"

आणि त्यासरशी तात्याराव ताडकन् उत्तरले, "त्याची काळजी तुम्हांला नको. पृथ्वीवर तीन हिस्से पाणी नि एक हिस्साच जमीन आहे. माणसाला जमीन अपुरी पडली तर तो अफाट समुद्रातून खाद्यपदार्थ मिळवील!"

*　　　　　　　　*　　　　　　　　*

वर ज्याचा उल्लेख गणू दांडेकर या नावाने केला तो माझा बालमित्र. शांता आपटे यांच्या घरी जवळपास दहा वर्षे अनुभवलेल्या अनेक गोष्टी सांगत असता, सहज ओघात आली म्हणून सावरकर सदिच्छाभेटीची ही गोष्ट त्याने सांगितली. आम्हां दोघांच्या हितगुजाचा मुख्य विषय तो नव्हताच. तो होता अभिजात संगीताच्या क्षेत्रात सिद्धी मिळविण्यासाठी शांताबाईंनी केलेल्या भगीरथ प्रयत्नांचा. सावरकरांच्या भेटीचा किस्सा सांगून गणू क्षणभर थांबताच मी म्हणालो,

"गव्हाची खीर बिघडली हे शांताबाईंच्या सांगीतिक जीवनाचं एक प्रतीकच वाटतंय मला."

"ते कसं काय?"



"आधी गूळ घातल्यानं खीर बिघडली नि पक्वान्न सिद्ध झालं नाही, त्याप्रमाणं आधीच काही दोष शिरल्यामुळे शांताबाईंच्या गायकीची कलाही जशी सिद्ध व्हायला पाहिजे तशी झाली नाही."

"काही अंशी खरं आहे तुझं म्हणणं. पण हे अपयश केवळ शांताबाईंच्याच वाट्याला आलं असं मानण्याचं कारण नाही. काही फुलं उमलून कुजली, काही उमलता उमलता कुजली, तर काही उमलण्यापूर्वीच कुजली, असला प्रकार आहे हा सगळा! शापित कलावंत, शापित घराणं आणि शोकपर्यवसायी शेवट असा हा 'शकार' बाधलाय् आम्हां सगळ्यांना. यातलं फारच थोडं नाट्य शब्दांकित झालंय. खरं म्हणजे विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून हे सारं कुणीतरी लिहायला हवं. पण कोण लिहिणार? सगळे लेखक यशस्वी कलावंतांची शब्दपूजा बांधणारे! एवढा 'महाराष्ट्राचे संगीतातील कार्य' हा ग्रंथराज साहित्य-संस्कृति-मंडळातर्फे प्रसिद्ध झाला पण त्यात एका शब्दानं तरी उल्लेख असायचा होता थिटे गुरुजींचा? इतर कुणाला असोत नसोत, पण आमचे गुरूजी नारायणराव थिटे प्रो. देवधरांना तरी खासच परिचित होते. दोनदा मुलाखत झाली होती दोघांची. कुमार लहान असताना पुण्यास धारणे यांच्या बंगल्यात त्याला बरोबर घेऊन प्रो. देवधर नारायणराव थिटे यांच्या भेटीस आले होते नि पुढं शांताबाईला शिकविण्याच्या निमित्तानं आमचं वास्तव्य मुंबईस असता, नारायणरावांची षष्ट्यब्दी वागळे हॉलमध्ये साजरी झाली त्यावेळी, 'रामनाम सुमिरन' ही तिलककामोदातील, खास करून कोमल निषादाचा वापर असलेली बंदीश ऐकून 'ही थिट्यांना कोणाकडून मिळाली' याची चौकशी करायला आले होते. भातखंडे यांच्या ग्रंथातील लक्ष्यसंगीतकार श्री. अप्पा तुळशी यांच्याकडून आपणास ही मिळाली असं गुरुवर्य थिटे यांनी सांगताच देवधरांनी कानाची पाळी पकडल्याचं मी स्वतः बघितलंय्!"

गणूला कळूसवरू लागले तेव्हा त्याच्या लक्षात आले की परमेश्वराने आपल्या गळयात खडीसाखरेचा खडा ठेवला आहे, एवढेच नव्हे तर आपल्याला शेजारही अशा एका मधाळ आवाजाच्या पुरुषाचा दिला आहे की त्याच्याकडून रोज नवे नवे काही तरी शिकावे. शेजाराला असलेली ही व्यक्ती म्हणजे दत्तोपंत काळे ऊर्फ काळेबुवा! बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांनी द.म. ३५ रुपयांवर इचलकरंजीकरांची चाकरी पत्करल्यावर भाटेबुवा, मिराशीबुवा, अण्णुबुवा (बाळकृष्णबुवांचे चिरंजीव) आणि काळेबुवा ही जी दुसरी बॅच पं. विष्णु दिगंबर यांच्यानंतर घडवावयास घेतली त्यांत अत्यंत मधुर आवाजीचे होते काळेबुवाच.

गणूचे एकीकडे हायस्कूलचे शिक्षण चालू असता काळेबुवांची तालीम त्याला मिळत होती. मॅट्रिक होईतो तीस रागांतील ख्याल विनाताल त्याच्या गळयावर चढले होते. विनाताल

ही मात्र या शिक्षणातील खामीच म्हटली पाहिजे. काळेबुवा मांडीवर डग्गा घेऊन, ताल धरून शिक्षण देत नसत. गळा तयार करून घेणे, रागाचे चलन घटवून घेणे याच गोष्टी होत.

मॅट्रिक झाल्यावर गणूला बुवा म्हणाले, 'गणू, हे बघ, तुला आता घरासाठी आधी मिळवता पुरुष झालं पाहिजे. भाग्यात असेल तर गाणंही पुढं पैसा देईल. पण ही विद्या म्हणजे अळवावरच्या पाण्यासारखी. तू पोटासाठी दुसरा काही तरी व्यवसाय शिकून घे. काय होणं आवडेल तुला?'

त्यावेळी महाराष्ट्रातील प्रमुख शहरांतून नुकतेच विजेचे दिवे सुरू झाले होते. खाजगी वीज कंपन्या असत. त्यांच्याकडे फर्स्टक्लास वायरमन होईपर्यंतचे शिक्षणही. मिळे. गणूने हाच व्यवसाय निश्चित केला. पंढरपूरला 'उपलप वीज कंपनी 'नुकतीच सुरू झाली होती. कंपनीला ट्रेनीज्ची आवश्यकताही होती. गणूला तिथे प्रवेश मिळाला.

इचलकरंजी सोडून पंढरपूरला निघताना काळेबुवा गणूला म्हणाले 'योगायोगानं फार चांगल्या गावी जातोयस तू. तिथं जगन्नाथबुवा पंढरपूरकर नि दत्तोपंत मंगळवेढेकर ही तरुणांची जोडी अती तयार गाते नि अती तयार वाजवते. त्यांच्याकडे शिक्षणासाठी प्रवेश मिळाला तर बघ.'

१७ ऑगस्ट १९३३ रोजी गणू इचलकरंजीहून पंढरपूरला आला. जोशी वकील, काणे वकील, बापट कॉन्ट्रॅक्टर यांच्यासारख्यांकडे त्याचे वारही लागले. याच सुमारास त्याचा मधुर आवाज मी प्रथम ऐकला. आमच्या घरापलीकडेच खाडिलकरांच्या घरी तो उतरला होता. थेट लोंढ्यांच्या सारखी आवाजी आणि फिरत ऐकून मी तर हरखलोच!

पं. जगन्नाथबुवा त्या वेळी शांता आपटे यांना शिकविण्यासाठी पुण्यास असत. त्यामुळे जगन्नाथबुवांचे गुरुजी पं. नारायणराव थिटे यांच्यापर्यंत कसे पोचायचे या प्रयत्नात गणूचे सहा महिने गेले. नारायणराव थिटे यांचे वडील धोंडोपंत थिटे यांची योगायोगाने गाठ पडली. ते गणूस ध्रुपदे शिकवू लागले, आणि एके दिवशी तेच स्वतः गणूस घेऊन आपल्या मुलाकडे म्हणजे पं. नारायणराव थिटे यांचेकडे गेले.

त्याच दिवशी संध्याकाळी घडलेला तो प्रसंग गणू आजन्म विसरणार नाही. महाराष्ट्र गायन समाज ही त्यावेळी केवळ पंढरपुरातच नव्हे, महाराष्ट्रभर नावलौकिक प्रस्थापित झालेली संस्था होती. चौफाळ्यानजिक एका माडीवर हे विद्यालय चाले. बाहेरच्या प्रशस्त दालनात प्राथमिक शिक्षणाचे वर्ग दामुअण्णा मंगळवेढेकर, बाबुराव हरिदास प्रभृती प्रगत शिष्यवर्ग घेत असे. आतल्या बाजूला एक खोली सोडून पलीकडच्या खोलीत चटईवर तक्क्याला टेकून गुरुवर्य नारायणराव थिटे बसलेले असत. दोन वेळा जेवणापुरते घरी

जाण्याव्यतिरिक्त त्यांचा मुक्काम विद्यालयातच असे.

धोडोपंत गणूला बरोबर घेऊन तिथे आले त्यावेळी नारायणराव रेणुका नावाच्या मुलीला ठुमरीची तालीम सांगत होते. तालीम संपेतो धोडोपंत बाहेरच्याच खोलीत बसून राह्यले. आत फक्त निरोप धाडला होता. पाच-दहा मिनिटांतच रेणुकाची तालीम संपली. गणू कुतूहलाने आतील हालचाल बघत होता. नारायणरावांनी चटई साफसूफ केली. तक्क्या व्यवस्थित केला. पानाचा डबा, खलबत्ता, तस्त या वस्तू ठीकठाक केल्या आणि मग वडिलांना हाताला धरून आणून तक्क्याशी बसवून आपण चटईखाली जमिनीवर बसले व वडिलांसाठी पान तयार करून खलबत्त्यात घालून कुटू लागले.

पाच-दहा मिनिटे इकडच्या-तिकडच्याच गोष्टी चालू होत्या. मग अगदी खर्जात दोघांचा संवाद सुरू झाला.

'का येणं केलं होतं?'

तुझ्याकडंच आलो होतो.'

काही विशेष?'

'कामाशिवाय कधी येतो का मी तुझ्याकडं? वर्षातून तीनदा गाठभेट होतो आपली. तुझ्या आईच्या श्राद्धाला, तुझ्या आजोबांच्या श्राद्धाला आणि दिवाळीत भाऊबिजेला.'

'ते ठाऊक आहे म्हणून तर विचारतोय्. आज काही तरी खास काम असल्याशिवाय आला नसणार...'

'खरं आहे. पण मी सांगेन ते करशील का?'

'आजवर कधी नाही म्हणालोय का?'

'हातावर हात मार, करीन म्हण!'

'अगदी निःशंक रहा. जरूर करीन.'

'एक नवीन रोप आणलंय्. जातिवंत दिसतंय्. गेले सहा महिने मी ते वाढवायचा प्रयत्न करतोय. यापुढे तू करावास अशी माझी इच्छा आहे.'

'मुलगा काय करीत असतो इथे पंढरपुरात?'

'दिवे लावीत असतो! साधेसुधे नव्हे, बिजलीचे! गावात नुकतीच वीज आलीय ना, त्या कंपनीत असतो दुपारचा शिकायला.'

'त्याला इथंच राहायला यायला सांगा, माझ्याच खोलीत राहील.'

चौतीस सालच्या पूर्वार्धात गणू गायनसमाजात आला तेव्हापासून त्याची माझी मैत्री

वाढत गेली. संध्याकाळी तो आम्हांला शिकवायला असे. त्याचे शिक्षण कसे काय चालू आहे असे मी अनेकदा विचारी. जरासा मुग्धच असे. पण क्वचित विस्ताराने सांगे. धोंडोपंतांना विद्यादानाची जी उतावीळ होती ती नारायणरावांना नव्हती. पहिले सहा महिने तर त्यांनी निरीक्षणात आणि गणूचा ताल पक्का करून घेण्यात घालविले. ‘परब्रह्म परमेश्वर’ हे ध्रुपद झालंय म्हणतोस तर म्हण बघू, असं सांगून नारायणराव मांडीवर डग्गा घेऊन बसले नि गणू ध्रुपद म्हणू लागला. दुगण, चौगण करताना ताल चुकू लागताच मुद्दाम एक छडी विकत आणून गणूला फोडून काढला. गणू परवा म्हणाला, ‘त्या दिवसापासून ताल चुकला असं कधी झालं नाही.’

गणूही नव्या गुरुजींचे निरीक्षण करीत होताच. रात्री दोनशिवाय गुरुजी कधी झोपायचे नाहीत नि सकाळी दहाशिवाय उठायचे नाहीत. दुपारी एकच्या सुमारास आंघोळ, मग जेवण. तालीम देण्याची निश्चित वेळ अशी नसेच. बहुधा रात्री घराहून जेवण करून आले म्हणजे तंबोरा काढायला सांगत, पण ती देखील रोज व्हायची असे नाही. ते लयभास्कर खाप्रुमाम यांच्या जवळपास पोचण्याच्या योग्यतेचे खचितच होते. एकदा त्यांनी सहा विद्यार्थ्यांना एकाच वेळी सहा निरनिराळे ताल वाजवावयास सांगितले. दीपचंदी, झपताल, चौताल, एकताल, सवारी, २१ मात्रांचा गणेशताल असे ताल विद्यार्थ्यांनी धरले होते तर गुरुजी स्वतःच्या मांडीवर डग्गा घेऊन त्रिताल धरून होते. त्याच तालात त्यांनी एक तराणा सुरू केला आणि प्रत्येकाला त्याच्या त्याच्या तालात समेवर येऊन दाखवून आश्चर्यचकित केले!

पण गुरुजींचा याहून सखोल परिचय गणूला पुढेच व्हायचा होता. तो झाला शांता आपटे यांना शिकविण्याच्या वेळी. नारायणराव प्रथम पुण्याला नि मग मुंबईला शांताबाईंकडेच सुमारे दहा वर्षे राहिले त्या काळात!

गाण्याच्या क्षेत्रात कुणाचे केव्हा आणि कसे बिनसेल ते सांगणे कठीणच असते. खरे तर जगन्नाथबुवांसारखा शिष्य शांता आपटे यांना तेहतीस सालापासून शिकवीत असता ती शिकवणी पुरी करण्याची जबाबदारी पुढेमागे खुद्द गुरूवरच येऊन पडेल हे प्रथम कुणाला सांगूनही खरे वाटले नसते. शांता आपटेंसारख्या नमुनेदार धारणाशक्ती असलेल्या शिष्येला गायकी शिकवायला त्यावेळी कितीजण तरी उत्सुक होते. पन्नास वर्षांपूर्वीचा काळ होता तो. आजच्या एवढे अभिजात संगीताचे प्रेम मध्यमवर्गीय स्त्रियांत त्या वेळी निर्माण झाले नव्हते. प्रभातमध्ये असताना सुरेशबाबू शांताला विनामूल्य शिक्षण देत होते हे तर खुद्द केशवराव भोळयांनीच नमूद केले आहे. पण गाण्यातले ओ की ठो देखील न कळणाऱ्या बाबुराव आपट्यांना सुरेशबाबूंची लायकी काय कळावी? सुरेशबाबूंचे गाणे जनानी आहे, पाच

मिनिटांत झोप आणणारे आहे अशी टीका करून त्यांनी त्या काळात गाजणाऱ्या जगन्नाथबुवांच्या मर्दानी गाण्याची तालीम शांताबाईंसाठी मुक्रर केली. तीही अकस्मात बिनसून संपुष्टात आली. बाबुरावांनी काही करार करूनच ही तालीम सुरू केलेली असल्याने नारायणरावांना करारपूर्तीसाठी शांताबाईंकडे जावे लागले. तरीही आपल्या म्हणून काही शर्ती घातल्याशिवाय नारायणराव गेले नाहीत. या शर्ती अगदी लेखी स्वरूपात नव्हत्या पण तोंडी तरी होत्याच. त्यांचे स्वरूप असे होते : माझी राहण्याची व्यवस्था अगदी स्वतंत्र हवी. माझ्या वेळापत्रकात... म्हणजे उशीरा झोपून उठणे, रोज फिरायला जाणे, रात्री उशीरा जेवण करणे यात बदल होणार नाही. वर्षातून किमान तीन महिने मी सुगीसाठी शेतीवर जाईन त्या वेळी तालीम मिळणार नाही. माझ्या खोलीत माझ्या विश्वासातील एक शागीर्द असेल.

या शेवटच्या अटीच्या पूर्तीसाठी थिटेबुवांनी गणूला बरोबर घेतले. निघताना त्याला बजावून सांगितले- ‘ही मंडळी सर्व सिनेमाच्या झगमगाटातली. आपण साधीसुधी माणसे. कानावर हात, तोंडाला कुलूप नि डोळे सर्व काही पाहून न पाहणारे असे तिथे राहायचे. शांताबाईच्या घरात तू साधे गुणगुणायचे देखील नाहीस. तिला शंका देखील येता उपयोगी नाही की तु तिच्या बरोबरीने तालीम घेतोयस. चित्त एकाग्र करून तिच्यामागे तंबोऱ्यावर राहायचे आणि संधी मिळेल तेव्हा नोटेशन लिहून चिजा पक्क्या करायच्या. सुगीसाठी पंढरपूरला वर्षातून तीन महिने आपण दरसाल येणारच आहोत. त्या वेळी चोवीस तास रियाझ कर पण शांताच्या बंगल्यात तोंड उघडू नकोस.’

थिटेबुवा आणि गणू अशा प्रकारे शांता आपटे राहत असलेल्या जंगलीमहाराज रोडवरील धारण्यांच्या बंगल्यात आले. *थिटेबुवा* असे मी मुद्दामच म्हणतो कारण त्या वेळी तिथे आणखी एक नारायणराव शांताकडून पहाटे गाण्याची मेहेनत करून घेण्यासाठी होते. ते म्हणजे नारायणराव मंगळवेढेकर. तबला साथीसाठी होते दामूअण्णा मंगळवेढेकर. शांताबाईंचा रियाझ पहाटे बरोबर पाच वाजता सुरू व्हायचा. गणू सांगतो की बाईंच्या या रियाझाच्या वेळेत दहा वर्षात एका मिनिटाचाही फरक पडला नाही. सकाळी साडेसातपर्यंत रियाझ होई. नऊच्या सुमारास शांता व बाबुराव मोटारीने स्टुडिओकडे रवाना होत. गुरुजी दहाच्या सुमारास उठत. त्यांना चहा करून देणे, धोतराच्या निऱ्या करून आंघोळीसाठी पाणी काढून देणे ही कामे गणूकडे असत. ते आंघोळीला गेले की खोलीची झाडलोट करून, तस्त घासून पुसून ठेवून गणू जवळच भांबुडर्यास स्वयंपाकासाठी एक खोली घेतली होती तिथे जाई. अर्धा स्वयंपाक दामूअण्णा मंगळवेढेकर करीत नि उरलेला अर्धा, म्हणजे भाकरी थापून भाजण्याचा, गणू करी. पुढे मीही पुण्याला कॅालेजसाठी गेलो तेव्हा अनेकवार आमचे भेटीचे,

गप्पा करण्याचे आणि बऱ्याच वेळा जेवणाचे स्थळ हेच असे. इथेच गणूला तोंड उघडायला परवानगी असे. त्याला गायला मिळावे म्हणून क्वचित नव्या पेठेतील प्रो. लेले यांच्या वाडयातील माझ्या खोलीवर मी बोलवीत असे. पण अशी सवड त्याला वारंवार मिळणे कठीणच होते.

धारणे यांच्या बंगल्यात पहिल्या काही दिवसांतच एक भयानक दृश्य बघताच गणूने बाबुराव आपटे यांचा धसका घेतला! श्री. गोवित्रीकर आडनावाचे शांताचे एक पूर्वीचे गायनशिक्षक आपली थकबाकी मागण्यासाठी बंगल्यावर आले असता बाबुराव वरच्या मजल्यावरून लांबलचक वेताची छडी घेऊन आले नि त्या बिचाऱ्यांना कल्पनाही नसता, सपासप वेत त्यांच्या अंगावर ओढून मानगुटीस धरून त्यांना बंगल्याबाहेर काढण्यात आले.

हा धसका मनात असतानाच आणखी चार दिवसांनी सकाळी साडेनवाच्या सुमारास एक प्रकार घडला. वरच्या मजल्यावरील व्हरांड्यात गणू रात्री सांगितलेल्या कामोद रागातील ताना लिहून काढीत होता.

'नारायणराव थिटे यांची भेट होईल का?' खालून कुणीतरी चौकशी करीत होते आणि 'ते दहा वाजता उठतात. दुपारी या' असे उत्तर मिळाल्याने ती व्यक्ती फाटकातून परत जात होती. बाबुराव, शांताबाई नुकत्याच स्टुडिओत गेलेल्या असल्याने या व्यक्तीला वाईट शब्द ऐकावे लागले नव्हते इतकेच. गणू मात्र तीरासारखा धावला नि त्या व्यक्तीच्या पाठोपाठ गेला. रस्त्याच्या कडेला त्यांना थांबवून त्याने विचारले,

'काय काम होतं नारायणरावांकडे?'

'तुम्ही कोण?'

'मी गणू दांडेकर. त्यांचा शिष्य, इथं त्यांचं सगळं होय-नव्हे पाहण्यासाठी त्यांनी मला बरोबर आणलंय्.'

'मग त्यांना सांगा की खांडेकर येऊन गेले.'

'कोणते खांडेकर म्हणून सांगू?'

'सांगा की, वीस वर्षांपूर्वी, काणे यांच्या बंगल्याच्या आवारात आपण संध्याकाळी श्री राग गात असता आपल्या मांडीखाली बसलेल्या नागाला ज्यानं कंदिलाचा डांब उपसून मारलं तो खांडेकर.'

'खरंच असं काही घडलंय?'

'मग काय मी पदरचं सांगतोय? विष्णुपंत काणे वकिलांनी पंढरपूरच्या स्टेशन रोडवर जागा घेतली होती. बंगल्याचं बांधकाम चालू होतं. जोतं देखील पुरं वर आलं नव्हतं. तेव्हा

आम्ही पंचवीसएक मंडळींनी नारायणराव थिटे यांना गायला बसवलं होतं. पूर्वी म्युनिसिपालिटीचे खांबावरचे कंदिल असत तसाच एक डांब त्या अंगणात होता नि वर कंदील. श्री राग ऐन भरात आला असता बुवांच्या मांडीवरील डग्ग्याखाली आम्हाला जातिवंत नागाचं तोंड दिसलं. सुखासन घालून नि त्यावर डग्गा ठेवून बुवा गात होते. विष्णुपंत काणे यांनी तानपुरा धरला होता. नाग आहे याची खात्री पटताच बुवांना सावध करण्यात आलं. त्यांनी तानपुरा आणि ताल चालू ठेवला व हळूच एक मांडी मोकळी केली. मग दुसरी, आणि एका हाताने डग्ग्यावरचे तालाचे आघात चालू ठेवून दुसऱ्या हाताने मलमलीच्या वस्त्रांचा ओला पिळा दूर ठेवावा तसं ते जनावर दूर केलं. मग विष्णुपंतांना तंबोरा बंद करायला सांगितला. ताबडतोब त्या जनावरानं फणा काढली. बुवा म्हणाले, मारू नका रे त्या रसिक पाहुण्याला! पण आम्ही थोडेच त्यांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत होतो? दोघांनी बळ लावून तो कंदिलाचा डांब उपसला अन् त्याखाली चिरडला त्या नागाला. तुझे गुरुजी म्हणजे काही साधी असामी समजू नकोस. माणिकप्रभूंची कृपा आहे त्यांच्यावर.’

गणूने मान डोलावली.

‘अरे भास्करबुवा ज्या ज्या वेळी पंढरपूरला येत आणि करकरे मुन्सफांकडे उतरत, त्या त्या वेळी प्रथम कुठं जात असतील तर नारायणबुवा थिटे यांच्याकडे. अठरा साली भास्करबुवांचं गाणं पंढरपूरला सांगलीकरांच्या वाड्यात ठरलं होतं. बुवा स्वतः नारायणबुवांच्याकडे गेले नि टांग्यातून त्यांना गाण्याच्या ठिकाणी घेऊन आले. प्रथम त्यांनी नारायणरावांना गायला बसवलं, मग आपण गायले. बिदागी ठरली होती ५१ रुपये. ती हातात पडताच त्यातले २६ रु. काढून नारायणरावांच्या हातावर ठेवीत म्हणाले, *हं हा घ्या प्राप्तीचा अर्धा वाटा! तुझे गुरुजी कसचे घेतात? ते म्हणाले, एका बैठकीवर गाणाऱ्या गवयांनी बिदागी नसते अशी वाटून घ्यायची. आपण आमच्या गावचे पाहुणे कलाकार. आम्हीच आपल्याला बिदागीपेक्षा काही तरी मोठा आहेर करायला हवा. आपल्याला देण्यासाठी माझ्याकडे दोन ठुमऱ्या नि एक गझल आहे. ते सर्व मी देईन. आपण त्याचा स्वीकार करावा.* यावर भास्करबुवा म्हणाले, *आपला हा आहेर मला पसंत आहे. पण मग माझ्याकडूनही आपणाला असाच आहेर स्वीकारावा लागेल. मी काय देऊ आपल्याला? नारायणराव यावर म्हणाले, ‘ये महाभाग’ ही जौनपुरीतील अस्ताई माझ्यापाशी नाही. ती दिलीत तर मला आवडेल.’*

एक खांडेकर येऊन जातो काय नि आपल्या गुरूबद्दलची एवढी महत्त्वपूर्ण माहिती ऐकवतो काय, याचे गणूला फार आश्चर्य वाटले. पुढे गुरूजींना फिरायला घेऊन जाताना याबद्दल विचारून स्वतःची खात्री करून घेतल्यावरच त्याने त्यावर विश्वास ठेवला.

शांताबाई संध्याकाळी ६-७ वाजेपर्यंत स्टुडिओतून येत. पहाटे मेहनत, मग सकाळी स्टुडिओत जाण्याआधी शंभुप्रसाद यांच्या एका शिष्याकडे मुद्राभिनयाचे अर्धा तास इंग्रजीतून शिक्षण, मग दिवसभर स्टुडिओ. संध्याकाळी साडेसातला तिसऱ्या मजल्यावरील हॉलमध्ये तालीम सुरू होई. हॉल चांगला प्रशस्त होता. भिंतीशी तक्क्याला टेकून नि मांडीवर डग्गा घेऊन नारायणराव बसलेले असत. साथीला दामूअण्णा मंगळवेढेकर आणि शांताबाईंच्या मागे तंबोऱ्यावर गणू. बसंतातील 'ये पट बिजनार मिली' या ख्यालापासून धारण्यांच्या बंगल्यात तालमीला प्रारंभ झाला. थिटेबुवांच्या घराण्यात एकताल, आडा-चौताल, झुमरा हेच ठेके प्रायः दिसून आले. तिलवाडा कमीच. एकदा एक राग घेतला की त्यातील दोन तीन ख्याल, तराणे सांगत. शांताबाईंना टप्पा सांगितला पण अगदी शेवटी. ध्रुपदे मात्र किमान पन्नास तरी सांगितली असतील.

अशा एका ध्रुपदानंतरच गणूवर पुन्हा एकदा मार खाण्याचा प्रसंग गुदरला. तेरा मात्रांच्या समतालात 'खेलत फाग' हे ध्रुपद बसविण्यात येत होते. त्या दिवशी शांताबाईंचे लक्षण सुरुवातीपासूनच त्याला ठीक दिसले नाही. अंगावर सेंट मारून जरी त्या तालमीला येऊन बसल्या होत्या तरी सेंटच्या वासाहून वेगळा असा 'तो' वास स्वर लावला की सहज लक्षात येई. दामूअण्णा आणि गणू अगदी नजिक असल्याने त्यांना तर 'तो' वास विशेषच जाणवला. आणि त्यात पुन्हा 'सम' तालातले ध्रुपद शांताला पेलवेना तेव्हा दोघेही एकमेकांकडे पाहून हसले. नारायणरावांच्या लक्षात ती गोष्ट आली. तालीम संपेपर्यंत ते काही बोलले नाहीत. बुवांसाठी आंघोळीचे पाणी काढायला निघताच त्यांनी त्याला अडवले नि दरडावून विचारले,

'रात्री तालमीच्या वेळी हसलासरे का?'

गणू काय सांगणार? खरे कारण सांगावे तर हे बोवाजी शांताची शिकवणी बंद करून पंढरपूरला चालू लागतील याविषयी त्याला खात्रीच होती. त्यामुळे त्याला जे नियमित शिक्षण मिळत होते ते बंद पडले असते. म्हणून बुवांनी प्रश्न विचारताच तो गप्प राहिला. अनेक वेळा विचारूनही तो गप्पच उभा राहतोय असे बघून नारायणराव संतापले. कोपऱ्यातली छत्री त्यांनी हातात घेतली नि ती मोडेपर्यंत गणूला त्या दिवशी बडवून काढले. छत्रीचा दांडाच मोडला तेव्हा निरुपाय होऊन भिंतीशी जाऊन ते बसले नि. म्हणाले, 'आता तरी सांग का हसलास ते?'

'माझं मलाच ठाऊक नाही तर काय सांगू? दामू हसला म्हणून मी हसलो इतकंच.'

या उत्तराने बुवांचे तात्पुरते समाधान झाले. मग ते म्हणाले, 'दामूला (दामूअण्णा मंगळवेढेकर) आता नवीन काही शिकायचं नाहीए. तो इथून बाहेर गेला तर अनेकांच्या साथी

करून प्रपंच करील. तुला अजून भरपूर विद्या कमवायची आहे. उगीच शांताचा अपमान बिपमान होईल असं का वागतोस? ती ताल चुकत होती हे खरं, पण त्यावर तू हसणं योग्य नव्हे. मी पंढरपूरला काय बजावलं होतं निघण्यापूर्वी ते विसरलास इतक्यात? जा. पुन्हा असा चुकलास तर सरळ इचलकरंजीला पाठवीन, पुन्हा कधीही परत न येण्यासाठी.'

बुवांची लायकी शांताबाईंनी ओळखली होती. त्यांच्यापाशी अनेक वर्षे शिकून घेता येईल इतके समृद्ध कोठार आहे हे त्यांनी बाबुरावांना सांगितले असावे, त्यामुळे बाबुरावही थिटेबुवांपुढे नमून असत. पहिल्या महिन्याच्या पगाराचा चेक बाबुरावांनी आणून दिला. तो बँकेतून वटवून आणण्याचे काम गणूला करावे लागले. दुसऱ्या महिन्याला बाबुराव चेक घेऊन येताच नारायणराव म्हणाले, 'ते चेकबुक सगळं ठेवा तुमच्यापाशी. मला रोख रकमेत पैसे देत जा. दांडेकरच्या खोलीचं भाडं द्यायचं असतं. त्याला महिन्याभराचं सामान भरावं लागतं. त्यानं कुठं धावपळ करायची बँकेपर्यंत?'

तेव्हापासून बुवांचा पगार रोख रकमेत होऊ लागला. धारण्यांच्या बंगल्यातून आपटे मंडळी खडकीस एडनवाला यांच्या बंगल्यात राहायला गेल्यावर नारायणराव मंगळवेढेकर प्रकृतीचे निमित्त झाल्याने पंढरपुरास गेले. त्यांना संधिवाताचा त्रास सुरू झाला होता. आणि ते निघून जाताच दामूअण्णाही गेले. मग दत्तू औंधकर हा तबल्यासाठी येऊन राहिला. तोही चांगली साथसंगत करी. या बंगल्यात आल्यापासून गणूला गुरुजींच्या पंक्तीला आयते जेवायला मिळू लागले.

या एडनवाला बंगल्यात असतानाच शांताबाईंचे ते 'सुप्रसिद्ध उपोषण वृत्तपत्रातून गाजले! खरे म्हणजे ते उपोषण जितके खोटे होते तितकेच त्यामागील कारणही खोटे होते. प्रभातचे मालक पगार वाढवीत नाहीत म्हणून स्टुडिओसमोर शांताबाईंनी उपोषण-सत्याग्रह सुरू केला. पण त्यांना खरोखर पगार वाढवून नको होता तर 'माणूस' मधील वेश्येची भूमिका नको होती. 'गोपालकृष्णा' त राधेची भूमिका करून आपण आपली जी प्रतिमा तयार केली आहे तिला आपण धक्का लावून घ्यायला तयार नाही असे त्या खाजगीत सांगत. ते कसेही असो. बाबुरावांच्यासारखा योजक असल्याने ते 'भरपूर आहारयुक्त उपोषण' ठीक पार पडले. दत्तू औंधकर घरून जी

वस्त्र-प्रावरणांची वळकटी उपोषित शांताबाईंना नेऊन देत असे त्या वळकटीतच खाद्यपदार्थांचा डबा असे नि शांताबाई मोटारमध्ये येऊन बसत व त्या पदार्थांचा फन्ना पाडीत!

या उपोषणकाळात आणखी एक गंमत झाली. बंगल्यातील तळमजल्यावरच्या खोलीतील फोन संध्याकाळी सारखा वाजू लागला म्हणून बनूताई (शांताबाईंच्या अनेक

भगिनींपैकी ही एक परित्यक्ता शांताबाईंकडेच राहात असे.) खोलीशी जाते तो काय! महादेवाच्या पिंडीला सर्पाने विळखा घालावा तसा फोनला विळखा घालून भाकरी एवढी फणा काढून बसलेला नागराज! बनूताई तर चीत्कार करीतच बाहेर आली! प्रभातमध्ये नटांना शरीरसौष्ठवासाठी व्यायाम शिकवणारा जिमनॅस्ट प्रल्हाद हा त्या दिवशी बंगल्यावर होता. पण त्याची देखील छाती झाली नाही खोलीत पाऊल टाकायची! मग आसपासच्या शेतातून जी तरुण मंडळी काम करीत होती त्यांना बनूताईने बोलावले आणि सगळ्यांनी मिळून तो प्रचंड लांबीचा नाग मारला! तो नाग बहुधा शांता-बाबुराव यांचे काही देणे लागत असावा, कारण बाबुरावांनी त्याची कातडी पद्धतशीर रीतीने काढून घेऊन त्याचे दोन चप्पलजोड तयार करवून घेतले. एक स्वतःसाठी नि दुसरा शांतासाठी! पुढे कित्येक दिवस ते चप्पलजोड त्यांच्या पायात दिसत.

*  *  *

शांताबाईंना आपल्या राधेच्या भूमिकेचा आत्यंतिक अभिमान वाटत होता असे वर सांगितले ते खरेच आहे. याचे प्रमाण गणूला एडनवाला बंगल्यात वारंवार मिळत असे. खरे तर गणूच्या संगीत शिक्षणाशी या गोष्टीचा संबंध नव्हता; पण सिनेमातील एखाद्या भूमिकेवर मोठमोठे लोकही कसे पागल बनतात हे पाहून त्याला आश्चर्य वाटले व अनेकदा पाहिलेले ते बंगल्यातील दृश्य त्याच्या मनावर कायमचे कोरले गेले.

गोव्यातील कुणी दिगंबरदास कामत नावाचे पन्नाशी ते साठीच्या दरम्यान वय असलेले गृहस्थ 'गोपालकृष्ण' चित्रपटातील शांताबाईंच्या राधेच्या भूमिकेवर एवढे लट्टू झाले की आपल्या छोट्या नातवंडांना बरोबर घेऊन ते पुण्यास आले. जवळजवळ सहा महिने हा गृहस्थ शांताबाईंची फुलांनी पूजा करून त्यांच्या पायाचे तीर्थ घेत असे! पहिल्या पहिल्याने त्यांना गुरख्याने आणि बाबुरावांनी फाटकातून पिटाळून बघितले, पण हा गृहस्थ मोठाच चिकाटीचा निघाला. *शांताबाई शांताबाई, मजला ठाव द्यावा पायी!* हे भजन तो म्हणत असे! त्याच्या भावभक्तीला अवसर द्यायला मग पुढे शांताबाईंनीच मान्यता दिल्याने तो साग्रसंगीत पूजा करून जायचा. एकदा त्याच्या नातवंडांना घेऊन त्याला बाबुरावांनी जेवायला बोलावले होते. पंक्तीला शांताबाईही होत्याच. दूधपाक-पुरीचा बेत होता. या अंधश्रद्ध माणसाने जेवता जेवता आणखी कमाल केली! शांताबाईंच्या वाटीतील थोडी तरी खीर आपल्याला मिळावी अशी त्याची 'पसायदानाची' (पायसदानाची) प्रार्थना होती!

एडनवाला बंगल्यातील अशा किती तरी गमती. तेथून पुढे तर गणूचा नि गुरुजींचा मुक्काम कलकत्त्यालाच होता, कारण 'सत्यवान सावित्री' या तामीळ बोलपटात शांताबाई

काम करीत होत्या व शूटिंग कलकत्त्यालाच चालू होते.

या चित्रपटातील एका गीताला गणूनेही प्लेबॅक दिला असल्याचे मला त्याच्याकडून नंतर कळले, तेव्हा मी म्हणालो, 'गणू या प्लेबॅकमुळे तुझं गायक म्हणून असलेलं स्थान शांताबाईंच्या लक्षात आलं असेल की रे! तुझं 'विद्याहरण' खरं म्हणजे इथंच संपायला हवं होतं?'

'छे रे,' आदो देवी 'हे ते यःकश्चित पद ते काय, त्यावरून शांताबाईला काय कळणार? माझं' विद्याहरणाचं 'बेंड फुटलं मुंबईला सतरावा रस्ता खार इथं! पं. ओंकारनाथांना मी जबाबी साथ दिली तेव्हा!'

*　　　　　*　　　　　*

ते सर्वच नाट्य जसे घडत गेले तसे सांगितले पाहिजे. १९४३ साली ब्राह्मणसभेची काही मंडळी शांताबाईंच्या घरी आपल्या संस्थेसाठी देणगी मागण्यास गेली होती. बाबुरावांनी सांगितलेला आकडा ब्राह्मणसभेच्या मंडळींना मानवेना आणि ती मंडळी मागत होती तेवढी देणगी बाबुरावांच्या हातून सुटेना. तेव्हा बाबुराव म्हणाले, 'देणगी देण्याऐवजी ब्राह्मणसभेसाठी आम्ही शांताचा एक कॉन्सर्टच दिला तर...?'

'वा, वा. असं होईल तर सोन्याहून पिवळे, मान्य आहे तुमची कल्पना.'

'पण कॉन्सर्टसाठी आमच्या काही शर्ती असतील.'

'उत्पन्नाला हात न लावता बाकीच्या काही भर्ती असतील तर जरूर पुऱ्या करू.'

उत्पन्नातील एक कपर्दीकही आम्हांला नको. आमचा आग्रह फक्त साथीदारांचा जो खर्च होईल तो कॉन्सर्ट लावणाऱ्यांनी सोसावा एवढाच आहे.'

'हात्तिच्या! एवढंच ना! तबला-पेटीवाल्यांसाठी कितीसा खर्च येणार? ही शर्त मान्य आहे आम्हांला.'

एवढेच बोलणे होऊन तारीख ठरली नि मग बाबुरावांच्या अंतरीच्या एकेक कळा बाहेर पडू लागल्या. दुपारी एक ते संध्याकाळी सात असा सहा तासांचा कार्यक्रम तीन भागांत विभागलेला असेल असे सभेला कळविण्यात आले *पहिला दीड तास अभिजात गायकीला (पहिले मध्यंतर), दुसरा दीड तास नाट्यसंगीतासाठी (दुसरे मध्यंतर), तिसरा दोन तासांचा भाग सिनेसंगीतासाठी! अभिजात संगीतातील ध्रुपदासाठी पुण्याहून शंकरभय्यांना पखवाजासाठी बोलवावे, तबल्याच्या साथीसाठी शमसुद्दीनना, हार्मोनियमसाठी अंभईकरांना आणि सिनेसंगीतासाठी थेट गोव्याहून ऑर्केस्ट्रा आणवावा* असा तपशील बाबुरावांनी दिला.

शांताबाईंनी आपल्या ओळखीच्या गोव्यातील ऑर्केस्ट्रा-प्रमुखाला बोलावून सिनेसंगीताचे त्यांना हवे होते तसे स्वरलेखन उरकून करारही करून टाकला.

सेंट झेवियर कॉलेजच्या हॉलमध्ये श्री. चिंतामणराव देशमुख प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित असताना झालेला हा जलसा कसा झाला असे ब्राह्मणसभेच्या जबाबदार मंडळींना मी विचारले, तेव्हा एकजण म्हणाले, 'जलसा उत्तमच झाला. हॉलमध्ये मुंगी शिरायलाही जागा नव्हती, इतकी गर्दी झाली होती. खर्चवेज वजा जाता सभेला दहा हजार रुपये सूतिकागृहासाठी मिळाले यावरूनं काय ते समजा.'

'या खर्चाविचात साथीदारांसाठी झालेला खर्च धरायचा का?' मी.

'छे, छे. ती जबाबदारी एका मध्यस्थांनीच स्वीकारली. त्यांना किमान ४-५ हजारांचा तरी फटका बसला असेल. कारण ते बाबुरावांचे मित्र तसे ब्राह्मणसभेचे हितचिंतकही होते.'

गणूने या जलशाची आठवण आपल्या दृष्टिकोनातून सांगितली. तो म्हणाला, 'अभिजात संगीतात शांता गौडसारंगातील 'मेरियन छा' हे ध्रुपद गायली. साथीला होते शंकरभय्या. मग तिने बढहंस राग पेश केला. यावेळी साथीला शमसुद्दीन होते. काळी चार स्वरात झुमरा तालात 'आज बालम' हा ख्याल पेश करून जलद त्रिलात तराणाही तिने सुरेख सादर केला. झुमऱ्याचा ठेका धरून शमसुद्दीन होते. शिवाय शमसुद्दीनना करामत करून वाजवता यावं, पण मूळ ठेका कुठंतरी असावा म्हणून दत्तू औंधकरही ठेका धरून होता. मी अर्थातच तंबोऱ्यावर होतो. शमसुद्दीन एक श्रेष्ठ प्रतीचे वादक यात शंकाच नाही, पण एका समेला शांता अचूक सम दाखवून गेली आणि शमसुद्दीनजी चुकले! दत्तू ठेका धरून असल्याने आमच्या आमच्यात आम्ही नेत्रपल्लवी केली. नारायणराव ऑडियन्समध्ये कोचावरच बसले होते. टप्पाही शांता गायली पण ध्रुपद हे त्या मैफलीतलं सर्वोत्कृष्ट अलंकरण म्हणावं लागेल. सिनेसंगीत गाताना शांता त्या विश्वातील सवयीप्रमाणे टिपेच्या सुरात किंचाळली, ते नारायणरावांना मुळीच रुचलं नाही. सिनेसंगीतात असाही आचरटपणा असू शकतो हे त्यांना प्रथमच जाणवत होतं. घरी गेल्यावर त्याबद्दल शांताची कानउघाडणी करण्यासही त्यांनी कमी केलं नाही.'

या जाहीर मैफिलीमुळं शांता आणि तिचे गुरुजी यांसंबंधी मुंबईत चर्चा होऊ लागली. मुंबईतील कुठलीही चर्चा इतरत्र पोचण्यास वेळ लागत नाही. ४३ च्या अखेरी अखेरीला ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये हा जलसा झाला नि ४४ सालच्या एप्रिलमध्ये पं. ओंकारनाथ आपण होऊन शांता आपटे यांच्या बंगल्यावर आले! तसे ते या आधीही एक-दोन वेळा येऊन बाबुरावांना भेटून, शांताबाईंना कोण शिकवते, काय शिकवते याची चौकशी करून गेले होते.

शांताबाईंच्या बुद्धिमत्तेची तारीफ हा त्यांचा मुख्य मुद्दा असे. त्यावरून ही आपली शिष्या व्हावी असे त्यांच्या मनात असावे असे अनुमान बाबुरावांनी काढून ठेवले होते. पण या प्रत्येक वेळी नारायणराव आणि गणू सुगीसाठी गावी गेलेले असल्याने शांताबाईंचे गुरुजी कसे गातात, तालीम कशी देतात हे बघण्या-ऐकण्याची पं. ओंकारनाथांची इच्छा अपूर्णच राहिली होती.

* * *

इंडियन म्युझिकल सोसायटीने १९४४ च्या एप्रिल महिन्यात पं. भास्करबुवा बखले यांच्या पुण्यतिथीनिमित्त भटवाडीतील लक्ष्मीबागेत पं. ओंकारनाथ यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. जलशाच्या आदल्या दिवशीच आधी टेलिफोन करून पं. ओंकारनाथ संध्याकाळी खारच्या बंगल्यावर हजर झाले. गणू नुकताच गुरूजींना फिरायला नेऊन त्यांच्याबरोबर परत आला होता.

गुरुजी फिरून येऊन टेकतात न टेकतात तोच बाबुराव पं. ओंकारनाथांसह खोलीत आले. नमस्कार-चमत्कार, क्षेमकुशल होताच पं. ओंकारनाथांनी सुरुवात केली.

‘पं. विष्णु दिगंबर यांचं नाव आपण ऐकून असालच. कदाचित आपला परिचयही असेल त्यांच्याशी.’

‘त्यांच्याशीच काय, त्यांचे गुरुजी पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्याशीही परिचय होता. पं. विष्णु दिगंबर पंढरपूरला आले त्या वेळी आमच्या गायनसमाजास भेट देऊन गेले होते.’

‘मी पंडितजींचा शिष्य! आपलं घराणं?’

‘घरचंच. माझे वडील धोंडोपंत चांगले ध्रुपदिये नि ख्यालिये होते. कोल्हापूरचे पं. भगवानदास यांनी त्यांना प्रथम शिकवलं असं ते सांगत. पुढे ते कित्येक वर्ष माणिकप्रभुंकडे होते नि लहानपणीच माझी आई निवर्तल्यामुळे त्यांनी मलाही तिथंच माणिकप्रभूच्या मुलांमध्येच ठेवलं होतं. ज्यांच्याकडून जे जे म्हणून चांगले मिळेल ते ते घ्यायचं या भ्रमरवृत्तीनं मी गाण्यात फिरलो!’

‘सगरा बिगरा जोबनवा ही ठुमरी आपल्याला ठाऊक आहे का?’

‘हो. बनारसी ठुमऱ्या ज्या मला मिळाल्या त्यात ही आहे’

‘आज आता शांताबाईंच्या तालमीची वेळ झाली असेल. मी जरा तालीम ऐकायला बसू शकतो का?’

गुरुजींना अडचणीत टाकणाऱ्या या प्रश्नाचे उत्तर समयसूचक बाबुरावांनी ताडकन् दिले. ते म्हणाले, 'त्याचं काय आहे पंडितजी, आज रात्री शांताला स्टुडिओत रेकॉर्डिंगसाठी जावं लागणार असल्यानं आज तालीम नाहीए. एरवी आपल्याला जरूर ऐकवलं असतं.'

यावर मग दुसऱ्या दिवशीच्या लक्ष्मीबागेतील आपल्या गाण्याला सर्वांनी यावं असं आग्रहाचे निमंत्रण करून आणि पास पाठविण्याची व्यवस्था करतो असं सांगून पं. ओंकारनाथ गेले.

दुसऱ्या दिवशी सात पासेस आले. पण जाणार कोण? नारायणराव म्हणाले, 'मला ही दगदग झेपणार नाही.' बाबुराव म्हणाले. 'शांतानं या गाण्याला जाऊ नये असं माझं स्पष्ट मत आहे. कारण लोकांचं लक्ष गाण्यापेक्षा शांताला पहाण्याकडेच अधिक राहील. शिवाय शांता उपस्थित राहिली याची जाहिरात करून पं. ओंकारनाथ आपली प्रतिष्ठा वाढवतील ते वेगळंच. मी, दत्तू आणि गुरुजींनी परवानगी दिल्यास गणू असे तिघेजण जाऊ.'

आणि ते तिघेच गेले. अकरा वाजून गेले असावेत. पंडितजींचा हेमकल्याण संपत आला होता. तो झाल्यावर त्यांनी दरबारीतील 'हजरत तोरा' सुरू केली. पंडितजींची नीलांबरीतील ध्वनिमुद्रिका ऐकून प्रभावित झालेला गणू दरबारीची पेशकारी पाहून मुळीच प्रभावित झाला नाही. 'हज रत तोरा' अशी आघाती तुकडेपाड तर दरबारीचे वातावरण बिघडवणारीच वाटली त्याला.

या चिजेनंतर मध्यंतर झाले.

'शांताबाई का नाही आल्या?' पंडितजींचा पहिला सवाल.

'तिची प्रकृती ठीक नाही,' बाबुराव.

पंडितजी उमजायचे ते उमजले.

लक्ष्मीबागेतील मैफलीचा उत्तरार्ध पंडितजींच्या गाण्यापेक्षा बोलण्याने अधिक गाजला. भास्करबुवा अप्रसिद्ध राग गात म्हणून आपण आज अप्रसिद्ध तालात एक ध्रुपद म्हणणार आहोत अशी प्रस्तावना करून रुद्रतालात त्यांनी एक ध्रुपद सुरू केले. कामू मंगेशकर तबल्यावर होते. त्यांना 'बजाव ये ताल' असे पंडितजींनी म्हणताच कामू मंगेशकर म्हणाले, 'पंडितजी आप बडे. ये तालमी बडा. लेकिन् जो हथियार मैं बजा रहा हूँ ये इतना बड़ा नही है. इसके लिये सच तो पखावज होना चाहिये. फिर भी कोशिश करूंगा'

आणि मंगेशकरांनी झपतालाच्या दहा मात्रांत एक मात्रा वाढवून वाजवायला सुरुवात केली. तो रुद्र तालाचा असली ठेका नव्हता!

ध्रुपदानंतर पंडितजींचा पेटंट मालकंस धावत्या भाष्यासह अवतरला! 'ये देखो कोमल

गंधार! ये निखाद!' वगैरे.

बैठक आटोपल्यावर बाबुरावांनी पंडितजींना दुसऱ्या दिवशी रात्री नऊपर्यंत भोजनास आणि नंतर शांताचे गाणे ऐकण्यास खारला या असे निमंत्रण दिले. पंडितजींनी 'जितं मया' म्हणून ते स्वीकारले.

नारायणराव, शांताबाई, गणू ही तिघेजण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चर्चा करीत बसली होती. नारायणरावांनी गणूला विचारले 'कसं काय झालं काल रात्री पंडितजींचं गाणं?'

गणूने सगळी हकिगत सविस्तर सांगितली. म्हणाला, 'गाण्याच्या मानानं भपका जास्त आहे, पं. विष्णू दिगंबरांची गादी आपण चालवतो आहोत आणि ती चालवायची लायकी काय ती आपलीच आहे असा दर्प कुठेतरी पंडितजींच्या मनात असावा. ध्रुपदाची तर काल फारच फरफट झाली.!'

'मग शांता, असं कर, आज तू सुरुवातीलाच ध्रुपद म्हण. कुठचं म्हणशील?' .

'रात्रीची दहा-साडेदहाची वेळ आहे. बागेश्रीतलं *पैदा किएकी* हे ध्रुपद म्हणेन.'

'नको, चांगलं सहा रागातलं-खटामधलं- *ये मा भरन जोगिया* हे म्हण. त्या नंतर शुद्धकल्याण गा. कलावंताचं स्वागत आपण आपल्या परीनं चांगल्या कलेनं करू या.'

त्या दिवशी रात्री बॉम्बे रेडिओ स्टेशनचे कलावंत आले होते. त्यांत सारंगिये हमीदखान होते. जेवणे होऊन बैठक दहाच्या सुमाराला सुरू झाली. गणू खांद्यावर टॉवेल टाकून मैफलीची गंमत बघत बाजूला उभा होता. शांताबाईंनी ध्रुपद एवढ्या तडफेने एवढ्या दमखमाने भरले की त्या लयकारीनेच सारेजण दिपून गेले. दत्तू औंधकर साथ करीत होता. ध्रुपदाचा बोजेदारपणा असा असतो की त्यामागून कुठलाही ख्याल सुरू केला तरी दहा-पंधरा मिनिटे तो कानात शिरतच नाही. शांताच्या शुद्धकल्याणातील *बोल न लागी* चे त्या रात्री तसेच झाले. पण ध्रुपदानेच तिने मैफल काबीज केली होती, नव्हे, जिंकली होती.

मग खुद्द पंडितजी गायला बसले. आपले तंबोरे त्यांनी आणले होते, पण भरजरी मखमली आसन आणले नव्हते. हमीद सारंगीवर होते. पंडितजींनी *मोरा मन हरकोले* हा बिहागातील ख्याल निवडला. हमीदची साथ इतकी नमुनेदार होती की पंडितजी जिथे जिथे कणसूर गायले तिथे तिथे त्याने कणसूरच वाजवला. आवाज लागत नाही अशी तक्रार ओंकारनाथांनी करताच हमीद म्हणाले, 'छोड दो पंडितजी, ख्याल नही तो ठुमरी बोलो!'

यावर मात्र पं. ओंकारनाथ रागावले. 'मर्द लोक ठुमरी गात नसतात' असे सांगून त्यांनी गाणेच थांबवले.

चहापान चालू असता पंडितजी बाबुरावांना म्हणाले, 'शांताबाईंच्या गुरुजींचं ऐकवा ना

जरा.’

‘आम्ही ते धारिष्ट करू शकत नाही. आपणच विनंती केलीत तर ते गातील व पाहुण्यांच्या निमित्तानं आम्हांलाही लाभ होईल’

मग पंडितजींची विनंती ऐकून नारायणराव गायला बसले. सुरुवातीला म्हणाले, ‘मी बोलून चालून एक मास्तर माणूस. मला रियाझ नाही. मी काय गाणार? आपण तरुण मंडळी एवढं गाऊन गेला आहात. मी हलकं फुलकं काही मांडण्याचा प्रयत्न करतो.’ काळी दोनमध्ये तंबोरे लावले होते. गुरुजींनी मांडीवर डग्गा घेतला. मागे एका बाजूला शांता. दुसऱ्या बाजूला गणू. हमीदनी सारंगी जुळवून घेतली आणि काफीतला *सैना चला दे तीर* हा टप्पा सुरू झाला. गुरुजी सोळा मात्रांच्या खास टप्प्याच्या ठेक्यातच गात होते. साथीला रेडिओ स्टेशनचा तबलजी होता पण टप्याचा ठेका त्याला पकडता येईना. मग दत्तू औंधकरला बसवले. आता गुरुजींचा डग्गावरील ठेका नि दत्तू वाजवीत असलेला ठेका हातात हात घालून चालू लागले! त्यांची वरवर बेसावध पण अंतर्यामी अतिशय सावध असणारी अत्यंत चपळ नि तितकीच वक्रगती फिरत पाहून हमीदही ‘ये बजाना मुष्कील है’ करीत सारंगी खाली ठेवून स्वस्थ बसला. शांता काळी दोनच्या षडजात साथसंगत करीत होती. टप्यानंतर गुरुजींनी *जानी घन गर्ने* हो कौसी कानड्यातील ख्याल सुरू केला. आठ वर्षात प्रथमच गणूने दोन बोल-ताना ऐकवून बरोब्बर सम गाठताच शांताने साश्चर्य मुद्रेने गणूकडे पाहिले. आपण समजत होतो तसा हा केवळ गुरुजींच्या धोतराच्या निऱ्या करणारा शागीर्द दांडेकर नव्हे तर. पण या आश्चर्यात आणखी भर पडायची होती!

पहाटे चारच्या सुमारास सामसूम झाली. पंडित ओंकारनाथ सोडून बाकी सगळे साथीदार नि कलावंत परत गेले होते. पंडितजी झोपायला राहिले होते. सकाळी आठचा सुमार असेल. गणू नुकताच उठून दात घाशीत उभा होता. तेवढ्यात बाबुराव आले नि विचारू लागले, ‘गणू, बाबा उठले का?’

‘आज कसचे ते लौकर उठतात. रोज दहाशिवाय उठत नाहीत. आज तर पहाटेपर्यंत जागलेले आहेत.’

‘उठवता आलं तर बघ ना त्यांना-’

‘का?’

‘पंडितजी पुन्हा गायला बसायचंय् असं म्हणताहेत...’

‘पाहातो प्रयत्न करून.’

गणूने गुरुजींना उठवले. त्यांना सगळी हकीगत सांगताच म्हणाले, ‘मी जरा उषःपान

करून घेतो. तोवर तंबोरे वगैरे घ्या लावून. आलोच.' बाबुरावांनी लगेच भराभर फोन फिरवला. रेडिओ स्टेशनला गाडी पाठवून जे मिळतील त्यांना बोलावून घेतले. तोवर पंडितजी एक तंबोरा घेऊन बसलेही होते. रात्री गण गुरुजींच्या मागे बसून थोडेसे गायला हे त्यांनी बघितलेले असल्याने गुरुजींनाच ओंकारनाथांनी विचारले, 'आपली हरकत नसेल तर दुसरा तंबोरा घेऊन या तरुण मुलाला बसू द्या.'

नारायणरावांनी गणूला खूण केली. दत्तू ठेक्यावर होता. पंडितजींनी त्यांची सर्वप्रसिद्ध देवगिरी बिलावल रागातील *आ बना ब्यान* ही चीज सुरू केली. दत्तूला बजावले, 'भाई सिर्फ ठेका बजाना.' गणू नुसताच तंबोरा वाजवीत होता. पाच एक मिनिटांनंतर त्याला म्हणाले, 'चुपचाप क्यों बैठे हो लडके, स्वर तो लगाव!'

गणूने क्षणभर गुरुजींकडे बघितले आणि त्यांची संमती दिसताच सुरेल साथसंगत सुरू केली.

थोड्या वेळाने चिजेचे चलन आत्मसात करून पंडितजींच्या उपजेवर आपली उपज सुरू केली. बोल-तान सुरू होताच बोल-तानही फेकली. एकदा वाहवा मिळाल्यावर स्फुरण चढल्यागत पंडितजी समेला टेकताच गणू तेथून उठावण घेऊन फिरू लागला. या साथीच्या वेळी शांताचा चेहरा पाहण्यालायक होता. पुढे भैरव रागात पंडितजी शिरले. गणूला या ख्यालात धैवत दोन प्रकारांनी सांगितलेला. बहारात तीव्र नि भैरवात कोमल. पंडितजी त्यावर दटावू लागले.

गणू म्हणाला, 'शंका असेल तर धैवत धरून ठेवा नि त्या त्या अंगानं उमटतोय् की नाही ते पाहा.'

नारायणरावांनी एवढे शब्द ऐकताच डोळे वटारले! मग पुढे मात्र गणूने विशेष आक्रमक न बनता बेताबेतानेच साथ केली. पंडितजींनी शेवटी गुणकलीतील *भोर भई* या अस्ताईची फक्त आउटलाईन दाखवून आपले गाणे संपवले.

गाणे संपल्यावर शांता गुरुजींना म्हणाली, 'बाबा, काय हो, दांडेकर सुरेख गायला आज. मला कल्पना नव्हती हा इतका तयार असेल.'

आणि यावर बाबा म्हणाले, 'तो होय, तो तसाच आहे!'

या दिवसापासून शांता गणूशी बरोबरीच्या नात्याने वागू लागली. पण ही कथा इथे संपत नाही. या ओंकारनाथ भेटीतून एक नवेच प्रकरण निर्माण झाले.

पं. ओंकारनाथांना त्यांच्या निवासस्थानी पोचवण्यासाठी बाबुरावांनी मोटर काढली. तंबोरेही पोचवायचे असल्याने गणू मागल्या बाजूला होता. व्हीलवर बाबुराव. त्यांच्या शेजारी

पंडितजी. आता सर्व काही ठीक होऊन गेल्यावर पंडितजींना बोचकारण्याची काही आवश्यकता होती का? कुणीही छेड काढावी अशी काही तकलुपी योग्यता पं. ओंकारनाथांची नव्हती. पण कधी कधी अंगावर जळते निखारे ओतून घेण्यात बाबुरावांनाच परम हर्ष होत असे. गाडी व्यवस्थित मार्गाला लागताच बाबुराव पंडितजींना म्हणाले, 'पंडितजी, रात्रीपेक्षा सकाळची आपली बैठक चांगली झाली.'

'होतं असं कधी कधी.'

'पण खरं तर दोन्ही बैठका आपल्या लौकिकाला साजेशा झाल्या नाहीत.'

'मतलब?'

'मतलब इतकाच की चार तंबोरे, दीडदमडीचं भरजरी आसन हा सरंजाम नसल्यामुळेच आपले गाणे चढले नाही.'

पंडितजी त्यावर काही बोलले नाहीत. पण मनातून त्यांनी निश्चित निर्णय घेतला असावा की जे याच्या बंगल्यावर जमले नाही ते मी याला बंगालमध्ये बोलावून साधीन!

खारच्या बंगल्यातील या बैठकीमुळे हमीदद्धारा गुरुजींचे नाव रेडिओच्या बॉम्बे स्टेशनवर गेले नि त्या मंडळींच्या मग बंगल्यावर फेऱ्याच सुरू झाल्या. 'बाबांचं गाणं रेडिओवर झालंच पाहिजे' असा आग्रह सुरू झाला. बाबुराव नि शांताबाई त्यांना पुरून उरल्या होत्या. त्या वेळी रेडिओवर सर्वात वरच्या श्रेणीच्या गायकाला दोन वेळा गाण्याचे अवघे १५० रुपये देत. या फीमध्ये बाबा येणार नाहीत व गाणारही नाहीत असे बाबुरावांनी सांगितले. अखेर आनंदराव ढोलेकरांनी बाबुरावांना सांगितले, 'नियमाप्रमाणं जास्तीत जास्त बिदागी दीडशेच असली तरी मी पदरचा एक रुपया त्यात घालतो, पण बाबांच्या गाण्याचं ठरवा'. आणि शेवटी गाणे ठरले! सकाळी बाबा तोडी नि रात्री दरबारीतील 'जलधर तोरा' ही चीज गायले. शांता व गणू दोघेही साथीस होते. त्या वेळी म्हणजे ४४ साली टेप नव्हती. रेडिओला एखाद्या विशेष कलावंताची स्मृती जतन करायची असेल तर सरळ मेणाच्या बांगडीवर - रेकॉर्डवर - ध्वनिमुद्रण करीत. नारायणरावांच्या या दोन्ही रागांची, पाऊण पाऊण तासांची ध्वनिमुद्रिका आकाशवाणीने घेतली होती. बाबुरावांनी ती बंगल्यावर आणून बाबांना पुन्हा ऐकवलीही होती. आता ती ध्वनिमुद्रिका आकाशवाणीकडे आहे की बाबुरावांच्या वारसदारांकडे आहे हा प्रश्नच आहे.

इथे ओघानेच आले म्हणून नारायणरावांच्या गायकीबद्दल स्थूलमानाने थोडेसे सांगणे आवश्यक आहे. नारायणराव शिकवीत वेगळे आणि गात वेगळे. म्हणजे या दोन्ही शैलीच वेगळ्या होत्या. आपला गळा विद्यार्थ्यांच्या गळ्यात घालायचा हे त्यांचे धोरण नव्हते.

विद्यार्थ्यालाही ते जमले नसते. तिन्ही सप्तकांत त्यांचा समेशी पाठशिवणीचा जो खेळ चाले आणि दरबारीसारख्या रागात ते जी कामगत करीत ती ऐकणाराचा ऊर भरून आणणारी असे. उपज चिजेचे शब्द घेऊन टाकत नि मूर्छना अंगाने खर्जात उतरत. उपजा क्रमवारीने जात. टप्प्यात त्यांचा गळा अतिद्रुत गतीने फिरे. मध्येच दीनानाथांसारखी आरोही-अवरोही भरारी मारून ते लक्ष्य टिपीत (*शांत दांत*मधील दीनानाथ आठवावा). गमकीची तान आणि सपाट तान हे दोन्ही प्रकार त्यांच्या गायकीत होते. ती लयीच्या अंगाने जाई तशीच लयीच्या चौपटीत. वयोमानाने एखादा कणसूरही लागे. 'जलधर तोरा' या आकाशवाणीच्या ध्वनिमुद्रिकेत तसा तो लागला आहे नि गणूने पटकन् आवाज लावून तो झाकण्याचाही प्रयत्न केला आहे. अतिविलंबित लयीत गाणे त्यांना मंजूर नव्हते. तालाशी चाललेली क्रीडा श्रोत्यांच्या अनुभवाला यायला हवी तर सामान्यतः मध्यलयच हवी असे त्यांचे मत. लयकारीत दिढीने नि पाऊण पटीने जात नि पंचमापर्यंतची बढत होताच खाली खर्जातील पंचम ते मध्यसप्तकातील पंचम अशी ये जा सुरू होई. याची अखेर, पुरा खर्ज ते अतितार षड्जापर्यंत ये जा करण्यात होई. मात्र त्यांचा अतितार षड्ज पं. भीमसेन यांच्याप्रमाणे चोरट्या आवाजातला असे.

नारायणरावांची षष्ट्यब्दिपूर्ती चिकित्सक समूह हायस्कूलच्या वागळे हॉलमध्ये ५/१०/१९४४ रोजी झाली. आदल्या दिवसापर्यंत या समारंभाची कल्पना नारायणरावांना नव्हती. बंद गळ्याचे चार कोट, सहा तलम धोतरजोड्या, एक डझन शर्ट, चांदीचे तस्त, चांदीचा पानाचा डबा, दोन आंगठ्या, चांदीचे तांब्याभांडे हा सगळा सरंजाम बाबांच्या खोलीत पुष्पगुच्छासह ५ ऑक्टोबरला सकाळी शांता व बाबुराव घेऊन आली तेव्हा त्यांनीच दोघांकडे प्रश्नचिन्हांकित मुद्रेने बघितले.

'हे काय आहे?'

'आम्ही सर्वांनी एक चांगला कट शिजवलाय तुमच्याविरुद्ध.'

'कसला?'

'आज रात्री एकसष्टी साजरी करणार आहोत आम्ही आपली. गिरगावातील वागळे हॉलमध्ये. आपल्याला गावं लागेल.'

तरीही संध्याकाळपर्यंत नारायणराव उदासीनच होते. ते कधीच रोज दाढी करवून घेत नसत, त्या दिवशीही घेतलेली नव्हती.

संध्याकाळी बाबुराव आले व म्हणाले, 'बाबा, दाढी करून घेणार का?'

'दाढीचा एकसष्टीशी काय संबंध? ती गाण्याच्याही आड येईल असं नाही.'

‘तरी पण केलेली बरी.’

‘माझी सर्दी वाढेल दाढी केली तर...’

‘तिचा बंदोबस्त आमचे फॅमिली डॉक्टर केळकर करतील. वाटलं तर त्यांना इंजेक्शनची सामुग्री बरोबर घेऊन जवळ बसवतो दाढी होत असताना.’

मग दाढी झाली. नवे कपडे घातले. गणूने अत्तराची कुपी बाबांच्या कोटाच्या खिशात ठेवलेली आहे अशी नेत्रपल्लवी करताच बाबुराव आणि शांता यांनी सबंध कुपी उलटी करून आपल्या हातावर अत्तर ओतून घेतले नि बाबांच्या कोटाला सर्व बाजूंनी फासले! या एकसष्टीच्या निमित्ताने त्यावेळच्या ‘चित्रा’ साप्ताहिकात नारायणरावांची ‘खास घेतलेली’ म्हणून एक मुलाखत प्रसिद्ध झाली होती, पण गणू सांगतो की अशी मुलाखत नारायणरावांनी कुणालाही दिलेली नव्हती. ती सर्व बाबुरावांनी घडवून आणलेली करामत होती. नारायणराव रेडिओवरील बातम्या - त्याही अधूनमधून - ऐकत पण वृत्तपत्र कधीच वाचीत नसते. त्यामुळे आपल्या नावाने एक मुलाखत छापून आली आहे हे त्यांना कधीच समजले नाही. मुलाखत शांताची प्रतिष्ठा वाढेल अशा रितीनेच तयार करण्यात आलेली होती. आणि नारायणरावांच्या गौरवपरच सर्व काही त्यात लिहिले होते. त्यामुळे तिचा प्रतिवाद करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. या मुलाखतीत नाराणरावांच्या शेतीवर एका झोपडीपुढे बसून शांताबाई गुरुजींकडून गाण्याची तालीम घेत आहेत असे एक छायाचित्र आहे. ते, मुद्दाम तशी योजना करून, एका सुगीच्या वेळी शांताबाईंच्या धावत्या भेटीत बाबुरावांनी काढून घेतले होते. सबंध दहा वर्षांत अशी तालीम मात्र कधीच देण्यात आली नव्हती. ‘जाऊ मी सिनेमात’ नावाचे जे एक पिटुकले पुस्तक शांताबाईंनी लिहिले त्यात घालण्यासाठी हे छायाचित्र काढण्यात आले होते.

ते असो. वागळे हॉल समारंभाच्या वेळी चिक्कार भरलेला होता. मी त्या वेळी मुंबईतच पण बेचाळिशी आंदोलनाशी संबंधित अशा संघटनात्मक कामात व्यग्र असल्याने रात्री बऱ्याच उशीरा वागळे हॉलवर पोचलो. त्या मैफिलीस प्रा. देवधर उपस्थित होते. पूरियात निरनिराळ्या ढंगाच्या चार बंदिशी नारायणरावांनी पेश केल्याचे मागाहून समजले तेव्हा मोठी चुटपूट लागून राहिली. ‘नही हो खेलार’ हा धमारही मी ऐकू शकलो नव्हतो. ‘बांधिवे यार दी’ ही काफीतील टप्पा मी गेलो तेव्हा चालू होता आणि शिष्यद्वयाच्या साथसंगतीमुळे नि नारायणरावांच्या वक्रगती फिरतीमुळे सभागृह डोलत होते. त्या रात्री सर्वाधिक रंगली ती खमाज व तिलंग अशा जोड रागामधील ‘सावली सुरत न्यारी’ ही ठुमरी. विशेषतः सावली या एकाच शब्दावर बोलबर्ताव करताना तबलजी शमसुद्दीन व नारायणराव यांच्या परस्परांना ज्या हुलकावण्या चालू होत्या त्याची मजा लयकारीची विशेष आस्था असणाऱ्यांनी अपरंपार

घेतली. म्युझिकल आर्ट सोसायटीच्या वतीने ही विशेष मैफल आयोजित करण्यात आली होती.

*　　　　　　　　*　　　　　　　　*

चव्वेचाळीसच्या ऑक्टोबर मधील ही मैफल आटोपल्यावर थोड्याच दिवसांत कलकत्ता कॉन्फरन्सचे वेध लागले. याच कॉन्फरन्समुळे पुढे मुंबई हायकोर्टात खटला उभा राहिला. बाबुरावांच्या मते या कॉन्फरन्सचे निमंत्रण कलकत्त्याच्या लालाबाबूंनी पं. ओंकारनाथ यांच्या काही सुप्त हेतुपूर्तीसाठी दिले होते. बाबुराव आपटे यांचे एक नातेवाईक सी.आय.डी. ऑफिसर होते. त्यांच्या मार्फत चौकशी करूनच आपण या निष्कर्षावर आलो आहोत असे बाबुरावांनी सांगितले. बहुधा ते खोटे नसावे. पं. ओंकारनाथ यांना पोचवायला जाताना मोटारीत बाबुरावांनी त्यांचा केवढा अपमान केला होता!

बाबुरावांचे इतर दोष काहीही असोत, त्यांचे प्लॅनिंग परफेक्ट असे! कलकत्त्याची संगीत परिषद कशी जिंकायची हे त्यांनी सर्व डावपेच आखून ठरवले होते. परिषदेत दोन सिटिंग्ज मिळणार होती. एक खास शांताबाईंना नि दुसरे नारायणराव आणि शांताबाई यांना. यासाठी १२ हजार रुपये लालाबाबू आणि कॉन्फरन्सचे अन्य ४३ आयोजक यांनी द्यावेत असा करार होता. पं. ओंकारनाथ या परिषदेत सर्वात शेवटी गाणार होते व त्यानंतर ‘वन्दे मातरम्’ हे गीतही म्हणण्याचा मान त्यांच्याकडेच होता! कलकत्त्याच्या कॉन्फरन्समध्ये नेहमीच ते शेवटी गात. ते भाषणबाज असल्याने यावेळी शांताची नि गुरुजींची निंदाव्यंजक स्तुती करणार व या दोघांना उत्तर देण्याची संधीही न देता ‘वन्दे मातरम्’ म्हणून परिषद संपविणार अशी माहिती बाबुरावांनी काढली होती.

पण याबद्दल नारायणरावांना काहीही न सांगता, आमंत्रण पत्करले असल्याचे तेवढे सांगितले. लगेच दोन दिवसांत सात हजारांची मखमल बंगल्यात आली. कलकत्त्याच्या ज्या हॉलमध्ये गाणे होणार होते त्याची मापे मागवून मखमलीचा पडदा, मखमलीचे कार्पेट, लोड, गिरद्या, तंबोऱ्याच्या खोळी वगैरे बनवायला शिंप्यांना ऑर्डर दिली. पं. ओंकारनाथ भरजरी मखमली आसनावर बसून गातात नि इंप्रेशन मारतात काय, तर मग सबंध स्टेजच शांताच्या गाण्याच्या वेळी मखमलीने मढवून काढतो... ही होती अफाट बाबुरावांची अचाट कल्पना! शक्य असते तर क्लच दाबल्याबरोबर स्टेजही बाहेर काढले असते, असे म्हणायचे बाबुराव. त्यांच्या तोंडात सगळी अरेतुरेची भाषा! आसनासकट पं. ओंकारनाथाला विकत घेतील आमचे बाबा! अशीही मुक्ताफळे बाहेर पडायची. नारायणरावांना यापैकी काहीही ठाऊक नव्हते. कलकत्याच्या कॉन्फरन्समध्ये गायचे आहे एवढेच त्यांना सांगण्यात आले होते.

आठ जानेवारीला मंडळी कलकत्त्यास गेली! हॉटेल ॲव्हेन्यूमध्ये उतरली. थंडीचे दिवस. साडेचार वाजताच तिथे सूर्यास्त व्हायचा. शांताबाईंचे पहिले 'सिटिंग' ९ तारखेस दुपारी दोन वाजता होते. आधीचे कलाकार उठून जाताच बाबुरावांनी झटपट मखमलीचा ड्रॉप आतल्या बाजूने लावून घेतला. सगळा मंच भरजरी मखमलीने सजवला! झालरी आणि विंगा देखील मखमलीच्या! विंगेत एक सी. आय.डी. हातात पिस्तुल घेऊन उभा. बाबुरावांच्या खिशातही त्यांचे स्वतःचे रिव्हॉल्वर होतेच!

शांताबाईंनी मियाचा सारंग (मल्हारयुक्त सारंग) पेश केला. त्यानंतर 'अवगत आदान' हे ध्रुपद होताच शांताबाई उभ्या राहिल्या नि चक्क बंगालीत भाषण करू लागल्या!

भाषण त्यांना लिहून देण्यात आले होते आणि त्यांनी तो पाठ केले होते. पहिल्या रांगेत लालाबाबूंची तरुण मुले बसली होती. या नाट्यमय परिवर्तनावर ती निहायत खूष होती. तरुण वयात सिनेनटी आणि सुस्वरूप गायिका यांच्याबद्दल जी ओढ असते तीच त्यांच्या ठिकाणी होती. त्यातून पुन्हा शांताबाई बंगाली भाषेत बोलू लागताच तारुण्योद्भव आदराने उत्कर्षबिंदूच गाठला.

शांताबाई भाषणात म्हणाल्या, "मातृभूमीला वंदन केल्याशिवाय माझे गाणे कधीच संपत नाही. म्हणून सर्व श्रोत्यांनी उठून उभे राहावे आणि माझ्या या भावनेचा आदर करावा." हे शब्द ऐकताच पं. ओकारनाथ संतापाने लाल झाले! त्यांनी खूण करताच काही श्रोते उठून उभे राहिले व 'वन्दे मातरम् म्हणू नका' अशा घोषणा देऊ लागले. शांताबाई ओरडल्या, 'हा राष्ट्रगीताचा अपमान आहे. या गीताला जन्म देणाऱ्या वंगभूमीत हा अपमान कोणीही सहन करणार नाही!' आता लालाबाबूंची दोन्ही मुले उभी राहिली व 'राष्ट्रगीत झालंच पाहिजे' हा नारा देऊ लागली. सगळीकडे एकच गोंधळ! लालाबाबूंचे लोक स्टेजवर धावले तर सी.आय्.डी. पिस्तुल रोखून उभे! आले तसे पळाले! सगळयांनीच टिऱ्यांना पाय लावले! पण तशा त्या धुमश्चक्रीत राष्ट्रगीत झालेच! ताबडतोब पडदा टाकून बाबुरावांनी झटक्यात मखमल गुंडाळली आणि सर्वजण हॉटेल ॲव्हेन्यूवर परतले! पुढे त्या कॉन्फरन्सचे काय झाले कुणास ठाऊक!

हॉटेल ॲव्हेन्यूच्या दुसऱ्या मजल्यावर शांता व बाबुराव यांच्या खोल्या होत्या. तिसऱ्या मजल्यावर गणू व नारायणराव! दुसऱ्या दिवशी शांता व नारायणराव यांची संयुक्त बैठक होणार होती. लोक बोलवायला आले तेव्हा बाबुरावांनी दुसऱ्या मजल्यावरूनच त्यांना परत पाठवले. बाबुराव त्यांना म्हणाले, 'आर्टिस्टस् आताच मोटारीनं हॉलवर गेले आहेत. तुमची बहुधा चुकामूक झाली असावी. मी थोड्याच वेळात हॉलवर येत आहे. तुम्ही पुढं व्हा.'

मंडळी गेली. लगेच बाबुरावांनी मखमलीचे तेहतीस डाग मोटारीत भरले. आम्हा सर्वांना सामानासह हावडा स्टेशनवर नेऊन प्रथम श्रेणीच्या राखीव कुपेत बसवून टाकले. दोन कुपे लाटले. एकात शांताबाई आणि बाबुराव व दुसऱ्यात नारायणराव आणि गणू. परतणाऱ्या कलाकार मंडळींसाठी जे आरक्षण कॉन्फरन्सच्या आयोजकांनी करून ठेवले होते त्याचा फायदा बाबुरावांनी घेतला. खरे तर आम्हा सर्वांना एक कुपेही पुरला असता. पण आयोजकांची जिरविण्यासाठी चार ऐवजी आठ जागा आपटे आणि मंडळींनी उपटल्या. यामुळे अन्याय झाला तो बिचाऱ्या डी. व्ही. पलुस्कर यांच्यावर!

पलुस्करांना पहिल्या वर्गाचे तिकीट जवळ असूनही वाराणसीपर्यंत तिसऱ्या वगन यावे लागले. वाराणसीला गणूच्या लक्षात ही गोष्ट येताच त्याने ती गुरुजींना सांगितली. नारायणराव म्हणाले, ‘आधी जा आणि सामानासह त्यांना आपल्या कुपेत घेऊन ये. पं. विष्णु दिगंबरांचा मुलगा आणि त्याची अशी उपेक्षा!’

‘पण बाबुरावांना ही गोष्ट समजली तर...?’

‘खड्यात गेला बाबू! मी पाहून घेईन त्याला काय सांगायचे ते.”

त्यानंतर बापू पलुस्कर मुंबईपर्यंत त्या कुपेत होते. कलकत्त्याची कॉन्फरन्स संपली. पण तिचे कवित्व पुढे चार वर्षे शिल्लक राहिले. बाबुरावांनी येताक्षणीच मुंबईच्या हायकोर्टात नुकसान भरपाईचा दावा लावला. ४४ जण प्रतिवादी आणि लालाबाजूंसकट त्या सर्वांवर समन्से निघाली. ४५ साली लावलेला दावा ४९ साली सुनावणीस निघाला. करारभंग हा त्यातील मुख्य मुद्दा! गणूला इचलकरंजीच्या पत्त्यावर समन्स आले होते. ४४ प्रतिवाद्यांनी कलकत्त्याहून मुंबईस यायचे, राहायचे, तारखांवर तारखा पडायच्या, हे सर्व टाळण्यासाठी सुनावणीच्या पहिल्या दोन दिवसांतच शांताबाईंचे ॲफिडेविट होताच तडजोड झाली व पै न् पै नुकसान बाबुरावांनी वसूल केले!

४६ साल उजाडले आणि कुणाच्याही ध्यानीमनी नसता एक विलक्षण मुलाखत नारायणरावांच्या आयुष्यात आपली नोंद ठेवून गेली. त्या वेळच्या प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रांनी देखील या मुलाखतीची दखल घेतली होती. नेमके काय घडले होते?

क्रिप्स मिशन एप्रिलमध्ये भारतात येऊन गेले. त्यात सर पेथिक लारेन्स नावाचे जे सभासद होते त्यांना भारतीय संगीताबाबत विशेष आस्था होती. पाश्चात्य संगीतात तर त्यांना गती होतीच. नारायणरावांची आकाशवाणीने घेतलेली ध्वनिमुद्रिका ऐकून ते खुषावले होते आणि नारायणरावांना त्यांनी भेटीकरिता बोलावून घेतले होते. ही भेट झाली तेव्हा इंटरप्रीटर म्हणून कुणी काम केले ते आज पडताळून पाहता येणे अशक्यच आहे, पण लॉरेन्ससाहेबांचा

प्रश्न आणि नारायणरावांचे त्यावरील उत्तर बघता पाश्चात्य आणि पौर्वात्य संगीताची जुजबी माहितीही नसणारा बाबुराव आपटे यांच्यासारखाचे कुणी तरी तो असला पाहिजे याविषयी शंका उरत नाही.

'आमचे संगीत हिंदुस्थानी संगीतात बसवता येईल का?' अशा आशयाचा प्रश्न लॉरेन्ससाहेबांनी विचारला असता नारायणरावांना त्या प्रश्नाचा रोख समजावून देणाराने 'इंग्रजी काव्यपंक्तींचा हिंदुस्थानी ख्याल होऊ शकेल का?' अशी मल्लीनाथी केली. त्या अनुरोधाने नारायणराव म्हणाले, इंग्रजी काव्यपंक्ती मला चार-सहा वेळा ऐकविल्यास व त्यांचा भावार्थ सांगितल्यास योग्य राग आणि ताल निवडून हिंदुस्थानी संगीतात त्यांना स्थान देता येईल!

एकूण कानडीने केला मराठी भ्रतार याच थाटाची ही मुलाखत झाली असे म्हटले पाहिजे. एरवी हार्मनी आणि मेलडी यांची कॉकटेल ख्याल गायकीत कधीतरी शक्य आहे का? असो.

४६ साल असेच चालले होते. शांताबाईंसह सर्वजण अंधेरीच्या लल्लुभाई पार्कमध्ये राहावयास गेली होती. तालीम नेहमीप्रमाणे चालू होती. पण ओळीने सतत तीन-चार दिवस नारायणरावांना विचित्र अनुभव येत होता. आपण तालीम देत असता शांता अशी पेंगते काय? आजवर असे कधी घडले नव्हते. एके दिवशी सकाळी ते गणूला म्हणाले, 'गणू, बाबुरावला मी बोलावलंय म्हणून सांग. या चांगल्या मुलीच्या मागे किती बयादा लावायच्या याला काही सीमा आहे की नाही? अतिश्रमानं ही मुलगी हल्ली रोज पेंगते. तालीम द्यायची तरी कशी?'

दोन-चार वेळा सांगूनही गणूने काही बाबुरावांना बोलावले नाही तेव्हा संतापून नारायणराव म्हणाले, 'अरे XXX रोज मी तुला सांगतोय् तर तू बाबूला बोलावीत का नाहीस?'

'का बोलावीत नाही ते मी तुम्हाला संध्याकाळी फिरायला बाहेर पडल्यावर सांगेन. इथे चर्चा नको. या बंगल्यात भिंतीलाही कान असतात!'

संध्याकाळी फिरायला म्हणून गुरुशिष्यांची जोडी बाहेर पडली. वर्सोव्याच्या रस्त्याला निवांत जागी बसल्यावर गणू म्हणाला-

'शांताला येणारी पेंग अतिश्रमाची नाही!'

'मऽऽग कसली?'

'ती अलीकडे फार घेऊ लागलीय्...'

'काय म्हणतोस? भांगबिंग पिते की काय पोरगी?'

'भांग नव्हे- भांगेची आई पिते!'

'हरे राम! आता मला इथं राहायचं नाही!' कपाळावर हात मारून घेत नारायणराव म्हणाले.

आणि मग एके दिवशी बाबुराव-शांताला बोलावून नारायणरावांनी प्रस्थान ठेवले! शांतपणे म्हणाले 'खूप दिलंय् मी शांताला. त्याचाच रियाझ केला, मनन-चिंतन केलं तर ती आणखी नाव काढील. या उपर काही अडचण आलीच तर पंढरपूरला या. मी सांगेन. मला आता कशाचीही अपेक्षा नाही. गणूही आता मुली बघण्यासाठी वरचेवर इचलकरंजीला जात असतो. त्याचंही लग्न होईल. आपण करार पुरा झाला असं समजून ही शिकवणी संपवू या. शांता बुद्धिमान आहे; समंजस आहे; तिचं कल्याण होवो!'

नारायणरावांना शांताबाबत बसलेल्या धक्क्यातून सावरायला विशेष त्रास पडला नाही. पण पुढे दोन वर्षांनी गणूबाबत त्याहून मोठा धक्का बसला तेव्हा मात्र ते स्वतःला सावरू शकले नाहीत.

गणूचे ४६ साली लग्न झाले तरी तो मधून मधून काही महिने पंढरपूरला येऊन राहात असे. रियाझ करीत असे. पूर्वीप्रमाणेच नारायणरावांची सेवा करीत असे. ४८ साली सोलापूर जिल्ह्यात प्लेगप्रतिबंधक उपाय योजण्यात आले होते. पंढरपूर हे यात्रेचे ठिकाण म्हणून अनेक वाड्यांतून 'सायनोगॅसिंग 'केले होते. गायन समाजातही ते झाले होते. संध्याकाळी कंदिल पुसून, रॉकेल भरून गुरुजींच्या खोलीत उजेड करावा म्हणून गणूने कंदिल उलगडला. त्यातली वात संपली होती. पलीकडच्या खोलीत कपाटात वातींचा जुडगा होता. पण त्या खोलीला नुकतेच सायनोगॅसिंग करून ती पक्की बंद केली होती. पटकन् जाऊन एक वात काढून आणली तर काही बिघडणार नाही म्हणून गणूने खोली उघडली. वात काढली. तो झटदिशी परत आला. पण तेवढ्यानेही त्याच्या श्वासावाटे बराच विषारी वायू घशात गेला होता! त्याला ते लगेच जाणवले नाही. रात्री अंथरुणाला पाठ टेकताच लक्षात आले की आपल्याला खोकला सुरू झाला आहे व तो भयंकर आहे. बसून घेता येईल तेवढीच झोप त्याला मिळू लागली! रियाझाला बसला तर मुळचा आवाज गायब! पिंजलेला षड्ज लागू लागला! एकाऐवजी तीन स्वर!

पाच वर्षे उपाय चालू होते. गणूचे गाणे संपले आहे हे नारायणरावांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. पाच वर्षात कसलाही उपाय न चालता त्याचा गळा बेसूर गाऊ लागलेला पाहताच ते सैरभैर झाले. त्यांनी एक दत्तक घेतला होता खरा पण संगीताचा वारसा टिकवणारा गणूच अशी त्यांची भावना होती. आणि एके दिवशी गणू पंढरपूरला नसतानाच त्यांनी हे

जीवन संपवण्याचा निर्णय मनाशी घेतला. ज्याला ज्याला म्हणून आपण विद्यादान केले त्याला त्याला ते लाभले नाही हाच विचार त्यांना अखेरीस सतावीत असावा. ते सकाळी उठून चंद्रभागेवर गेले. सात वेळा पाण्यात जाऊन सात वेळा परत आले. कुणाच्या तरी पाहण्याने आपले महाप्रस्थान बिघडू नये म्हणून पंढरपूरपासून दोन मैलांवरील यमाईतुकाईच्या देवळाकडे ते गेले. तिथे ताऱ्यांच्या मळ्यात विहीर एकाकीच होती. फक्त एक म्हातारी थोडा वेळ तिथे होती. हा माणूस विहीरीत चुळा भरतो आहे हे पाहून ती म्हणाली, ‘पेयाचे पानी हाय वं म्हातारबाबा, चुळा टाकू नगा हिरीमंधी.’

मग दर वेळी चूळ भरून नारायणराव वर येत, चुळ खळखुळून टाकून देत नि पुन्हा विहिरीत उतरत. त्यांच्या या येरझारांकडे ती म्हातारी थोडा वेळ बघत बसली होती. तीही कंटाळून निघून जाताच नारायणरावांना हवा तो एकान्त मिळाला. कपडे त्यांनी व्यवस्थित काठावर ठेवले आणि दोन-अडीच पुरुष पाणी असलेल्या विहिरीत उडी घेऊन देहत्याग केला! संध्याकाळी त्यांचा पार्थिव देह वर काढला तेव्हा तो पद्मासन घातलेल्या अवस्थेत होता! ताऱ्यांच्या विहिरीत एक घराणे बुडाले होते! (११ मार्च १९५३)

* * *

गणूला ही सर्व हकीकत नवव्या दिवशी क्रियाकर्मांतराला उपस्थित राहण्यासाठी तो आला तेव्हा समजली.

मी त्याला परवा विचारले?’ ‘दहाव्या दिवशी शांता, बाबुराव वगैरे कुणी आलं होतं?’

त्याने नकारार्थी मान हलवली. तो म्हणाला, ‘शांताचा करार चिजा नि ध्रुपद यांच्याशी होता. नियतीशी करार करून बसलेल्या या व्यक्तीशी त्यांना काय कर्तव्य होते?’

‘म्हणजे मग ४६ नंतर तुझी नि शांताबाईंची भेट झालीच नाही तर...’

‘झाली तर, एकदाच योगायोगानं झाली. मी आपण होऊन तिच्याकडे कधीच

गेलो नव्हतो. पण तिचं बोलावणं आल्यावर ते टाळता येणंही अशक्य झालं- ते बहुधा १९५४ साल असावं...’

गणू पुढे किती तरी वेळ तो तपशील सांगत होता. त्याचा मथितार्थ असा : पुण्याचे आकाशवाणी केंद्र नुकतेच सुरू झाले होते. गणूचे ग्रेडेशन प्रथम मुंबई केंद्रावर पं. रातंजनकरांनी केले. ‘सरफरदा बिलावल’ हा राग त्यांनी त्याला गायला सांगितला होता व त्या ऑडिशनमध्ये तो उत्तीर्ण झाला होता. पुढे पुणे केंद्राला इचलकरंजी जवळ म्हणून त्याचे नाव तिकडे वर्ग केले होते. दुपारी एक ते दीडचा कार्यक्रम असेल. स्टेशननजीक कलेक्टर ऑफिसजवळ त्या वेळी हे केंद्र होते. दामूअण्णा मंगळवेढेकर मृदंगावर साथीला होते. *‘नीरख*

*मदनमूरत श्याम'* हे भीमपलासातील ध्रुपद गाताना दोघे अक्षरशः जुगले! ठाय, दुगण, चौगण, आड, कुआड, जागा घेत घेत अर्धा तास कधी संपला ते लक्षातही आले नाही दोघांच्या. खामी होती एकच. गणूचा पूर्वीचा आवाज नव्हता पण मांडणी शास्त्रशुद्ध आणि झुंज द्यायला परममित्र दामूअण्णा! कार्यक्रम संपल्यावर खुद्द स्टेशन डिरेक्टरनी येऊन गणूचे अभिनंदन केले नि अशी काही ध्रुपद स्टाफ आर्टिस्टना शिकवाल का असेही विचारले. तेवढ्यात ब्युटी ऑफिसर येऊन। म्हणाला,' शांता आपटे फोनवर दाडेकरांना बोलावताहेत.'

गणूने बाहेर येऊन फोन उचलला. 'हॅलो, मी दांडेकर बोलतोय.'

'अभिनंदन!'

'कशाबद्दल?'

'आता ऐकवलेल्या ध्रुपदाबद्दल! मला बाबांनी न सांगितलेलं असं बरंच नवीन नवीन तुझ्याकडे दिसतंय्. तु चोरून ठेवलंस तरी ते लपून राह्यलं नाही.'

'मी चोरून ठेवलं असं कसं म्हणता? रेडिओचा प्रोग्रॅम का जाहीर प्रोग्रॅम असतो. वाटेच्या वाटसरानंही ऐकावा.'

'बरं, बरं, मी आता इथून गाडी पाठवते. रेडिओ स्टेशनमध्येच राहा. इथं आल्यावर अधिक बोलू.'

'इथं म्हणजे खडकीला एडनवाला बंगल्यावरच ना? मी जरूर येतो. गाडी पाठवू नका. मी आता ससूनमध्ये एका रुग्ण मित्राला भेटायला जातोय्. तिथून लोकलनं मी खडकीला येईन.'

'जरूर ये. मी वाट पहातेय.'

फोन संपला. सुमारे दीड तासानंतर गण पूर्वीच्या खुणा न्याहाळीत बंगल्यापाशी पोचला, तर आमूलाग्र परिवर्तन झालेले! 'शांता आपटे कन्सर्न्स' अशी भली मोठी पाटी! सहा हजार कोंबड्यांचा 'क्लक् क्लक्' असा कलकलाट! अजस्न कुक्कट फार्म झाले होते तिथे. गणूला शंका आली म्हणून जवळच्याच श्रीमती अंजनीबाई मालपेकरांच्या बंगल्यात जाऊन शांता आपटे शेजारच्या बंगल्यात राहतात ना याची त्याने खात्री करून घेतली व दरवानाच्या हाती चिठ्ठी धाडली.

दोन मिनिटांतच प्रथम दीपा, मग नयना या बाबुरावांच्या छोट्या कन्या नि मागोमाग शांताबाई आल्या. शरीराचा पूर्वीचा बांधेसूदपणा आता गेला होता. ते सबगोलाकार होऊ लागले होते. डोळ्यांतही पूर्वीचे तेज अथवा उभारी नव्हती. तरीही त्या रंगभूमीला आणि रंगभूमी त्यांना जगवीत होती. त्या जवळ येऊन पोचेतो असे अनेक विचार गणूच्या मनात

येऊन गेले.

'हा कोंबडीखाना कशाला काढलाय् एवढा मोठा? संगीताचं या क्लक् क्लक्शी काही तरी नातं आहे का?' गणूचा पहिला सवाल.

'संगीताशी नसेल, पण आम्ही देखील आता तुझ्याप्रमाणेच शेतकरी आहोत दांडेकर. शेतीशी या व्यवसायाचं नातं आहे. शिवाय मी नि बाबुराव आता अमेरिकेला जाणार, जगभर फिरणार. मग इथं बाबुरावाच्या बायकोला-प्रभावतीला-मन रमायला काही नको का? म्हणून हा प्रचंड उत्पादक व्यवसाय उभारलाय.'

'प्रचंड म्हणजे भलतंच प्रचंड आहे प्रकरण!'

'पण कोंबड्यांतही वर्णव्यवस्था आहे बरं का? या लेगहॉर्न कोंबड्या निव्वळ अंडी घालतात पण त्यांना ती उबवता येत नाहीत. ते काम देशी कोंबड्यांकडून करून घ्यावं लागतं. एखाद्यानं लक्ष घातलं तर २४ तास अपुरे पडतात कोंबडीपालनाला.'

फार्म बघत नि अद्ययावत् यंत्रसामग्रीची माहिती घेत गणू आत आला. आता बाबुरावही गप्पात सामील झाले. कलमी आंब्यांच्या फोडींनी भरलेले ताट पुढ्यात होते. शांताबाई म्हणाल्या, 'हे आबे आमच्याच बागेतले आहेत बरं का... आणि हो... तुझी शेती कशी काय चाललीय्?'

'माझी कसली मिरपुटली शेती? मिळते चतकोरभर भाकरी.

'म्हणूनच म्हणत्ये मिरपुटली शेती सोड नि इथं येऊन रहा.'

'कशाला?'

'तेच तर सांगायला बोलवून घेतलं तुला. आता बाबा तर वारले; खूपदा मनात येतं, चिजांची, टप्प्यांची, ध्रुपदांची उजळणी करावी. ज्ञान घासून पुसून लखलखीत ठेवावं. तु इथं आलास तर किती सुलभ होईल हे सगळं करणं?'

'कल्पना चांगली आहे...'

'चांगली आहे म्हणून तर म्हणतेय्. बरं आम्ही काही आता तुला पूर्वीसारखा पंक्तीला जेवून रहा म्हणून नाही सांगत. चांगला हजारभर मासिक पगार देऊ.'

'एक हजार!'

'हो.'

'पंधराशे दिलात तरी मला हे प्रपोजल मान्य नाही.'

'असं कसं म्हणतोस? आपण चांगली संगीत अकादमी काढू या. तू प्राचार्य हो. विद्यार्थी

येतील. बाबांचं कार्य पुढे चालू राहील-'

'प्राचार्य होण्याची आपली लायकी नाही शांताबाई. कितीसं मिळालंय् तुम्हाला नि मला नारायणरावांकडून? त्यांच्या निधनानंतर त्यांची मोडीत लिहिलेली वही मिळवलीय् मी. सध्या तीच परिष्करण करून लिहून काढतोय्. कोठार आहे कोठार! रूपयातली पाच आणे विद्या फक्त पडलीय आपल्या पदरात-'

'त्या कोठारातून आणखी उपसा करू.'

'जमायचं नाही. माझी चतकोर भाकरी जी मला निश्चितपणे मिळतेय् तीच खरी. मला या मोहात घालू नका. माणसाचं मन ही एक अद्‌भुत चीज असते शांताबाई. मी हे पत्करलं नि उद्या माझंच मन फिरून काही बखेडा निर्माण झाला तर त्या अकादमीचे नि विद्यार्थ्यांचे, तुमचे नि बाबुरावांचे शाप घेण्यापेक्षा मी आहे त्या स्थितीत राहणंच ठीक नव्हे का? हां, आता तुम्हाला किंवा मला लाभलेल्या विद्येत काही अडचणी आल्या, शंका आल्या तर पोस्ट खातं आहेच सेवेला. पत्रव्यवहारानं अथवा जमेल तेव्हा भेटून शंकानिरसन करून घेऊ शकतो आपण. उद्या ही माझी चतकोर भाकरीही मिळेनाशी झाली तर मात्र शब्द देऊन ठेवतो. जातिवंत मधुकरी आहे मी. पहिल्या 'ओम् भवती' साठी माझ्या गुरुभगिनीच्या दारी येईन. मला खात्री आहे की ती मला विन्मुख पाठवणार नाही.'

शांता आणि बाबुराव, दोघांचेही डोळे पाण्याने तरारले. मग डोळे पुसून शांताबाई पुन्हा म्हणाल्या, 'ठीक आहे, जशी तुझी मर्जी. आता आलाच आहेस तर आठवडाभर राहून जा.'

'तेही कठीण आहे. मी सोलापूरला उद्या दाखल होईन असं पत्र लिहून बसलोय् बायकोला. नवप्रसवा आहे ती, तिथं वाट बघेल.'

'निदान आजचं रात्रीचं' मृच्छिकटिक 'मधलं माझं काम तरी पाहून जा. पदं कशी बसवलीयत् ते बघ. राम मराठे चारूदत्ताची भूमिका करताहेत.'

'पदांच्या चाली बालगंधर्वांकडून बसवून घेतल्यात का?'

'त्या हिशोबानं गेले होते. पण ते म्हणाले, गोहरकडून तालीम घ्या. माझं अडलंय खेटर गोहरकडून तालीम घ्यायला. मी नारायणरावांच्या ध्वनिमुद्रिका आणि माझी अक्कल यांची गोळाबेरीज करून चाली बसवल्यात. तू आज राह्यलंच पाहिजेस नाटकासाठी.'

आणि तेच गणूने आपल्या गुरुभगिनीचे पाहिलेले एकमेव नाटक. त्या नाटकावर पडदा पडला त्याच वेळी या दोघांच्या भेटीवरही. नंतर ६४ साली त्याने फक्त वाचली बातमी, शांता आपटे यांच्या मृत्यूची! दहा वर्षात ते मनमोकळे बोलणे नव्हतेच. एकदा केव्हा तरी शांताबाईंच्या सगळ्या बहिणी जमल्या असता घळघळ अश्रू ढाळीत, बंगल्याच्या आवारात

खेळणाच्या मुलांकडे बघून शांताबाई म्हणाल्या होत्या, ‘हे या जन्मी माझ्या नशिबी नाही! मी फक्त त्याच्या इशाऱ्याबरहुकूम कामे करायची, पिंजऱ्यातल्या सिंहासारखी! नि लोकांनी टाळ्या पिटायच्या!’

‘शापित कलावंतांच्या व्यथा अखेर या अशा असतात!’

*　　　　　　　　*　　　　　　　　*

‘हे या जन्मी माझ्या नशिबी नाही.’ असे शांताबाई सूचकतेने म्हणाल्या होत्या हे खरे, पण त्यांच्या मनातून थोरल्या भावाचा मुलगा शांताराम याला दत्तक घ्यायचा होता. या प्रश्नावर शांताबाई आणि नारायणराव यांच्यामध्ये एकदा सहजसंवाद घडला होता. प्रभात स्टुडिओपुढील ‘उपोषण’ संपल्यानंतर चारदोन दिवसांनी नारायणरावांनी विचारले,

शांताबाई, खरं म्हणजे माझ्या सारख्यानं हा प्रश्न तुम्हांला विचारू नये, पण पगारवाढ हवी म्हणून तुम्ही उपोषण केलंत, रोज अठरा अठरा तास कॅमेऱ्यापुढं देह शिणक्ता, करणार आहात काय इतका पैसा मिळवून?”

“पैशापेक्षा कीर्तीचाच लोभ मला जास्त आहे, बाबा.”

‘असू दे. कीर्ती काय तुम्ही जशी मिळवाल तशी ती तुमच्यामागं राहील. पण हव्यासानं जो पैसा मिळवता त्याचा तुमच्यामागं धनी कोण?”

‘माझ्या थोरल्या भावाचा मुलगा शांताराम आलाय् ना, त्याला दत्तक घेणार आहे मी. त्याची मुंज, त्याचं शिक्षण, सगळं सगळं मी करणार.”

आदल्या रात्री हा संवाद झाला आणि दुसऱ्या दिवशी प्रभात स्टुडिओत दक्षिणेचा एक ज्योतिषी आला. संध्याकाळी शांताबाई त्या ज्योतिष्याला घेऊन बंगल्यावर आल्या. शांताराम त्यावेळी अंगणात बॅट आणि बॉल खेळत होता. त्याच्याकडे बोट दाखवून शांताबाई ज्योतिष्याला म्हणाल्या,

‘या मुलाला मी दत्तक घेणार आहे. याचं भविष्य कुंडली मांडून सांगा.”

ज्योतिष्याने शांतारामाचा चेहरा न्याहाळून बघितला नि तो म्हणाला, ‘माफ करा. कुंडली मांडत नाही. मुलगा अल्पायुषी आहे.’

दत्तक घेण्याचा विचार तिथेच जिरला.

ही ४० सालातली गोष्ट. त्यानंतर ३० वर्षांनी अगदी योगायोगानं या शांतारामाची आणि दीडेकरांची भेट इचलकरंजीत झाली. शांता आपटे यांच्या मृत्यूला सहा वर्षे झाली होती. शांताराम आता चाळिशीकडे झुकलेला. चार मुलांचा संसारी बाप होता. कुल्को

इंजिनियरिंगमध्ये नोकरी करीत होता. त्याच्या घरी जाऊन गणू दाडेकरांनी गप्पागोष्टी केल्या. उठता उठता गणू म्हणाला,

‘‘फार बरं वाटलं तुला इतक्या वर्षांनी बघून. काय बेवकूफ असतात हे ज्योतिषी लोक. तोंडाला येईल ते भविष्य वर्तवितात नि जन्माचं नुकसान करून ठेवतात एखाद्याचं.’’

‘‘कुणाबद्दल म्हणताय तुम्ही दांडेकर?’

‘‘तुझ्याबद्दल. शांताबाईच्या मनात होतं त्याप्रमाणं त्यांनी तुला दत्तक घेतला असता तर असं चाळीत राहावं लागलं असतं का तुला?’’

‘‘शांताआत्या मला दत्तक घेणार होती हे मी आज प्रथमच ऐकतोय्. मनात होतं त्यांच्या तर का नाही घेतला त्यांनी दत्तक मला?’’

“तो ज्योतिषी अडमडला ना मध्येच.’’

‘‘ज्योतिषानं काय सांगितलं?’’

‘‘ते नाही मी सांगत तुला. पण तुला आज बघून मला फार फार बरं वाटलं. आयुष्यमान हो.’’

पण दांडेकरांचे शब्द खरे ठरले नाहीत. खरा ठरला तो ज्योतिषीच! १९७० साली दाडेकर-शांताराम यांची झालेली भेट अखेरचीच ठरली. त्या भेटीनंतर ४८ तासांतच, सायकलवरून कुल्कोत नोकरीसाठी जात असता छातीत कळ येऊन शांताराम निवर्तला!

पं. नारायणराव थिटे, शांताबाई, गणू दांडेकर आणि शांताराम आपटे ही सगळी अखेर शापित मंडळीच ठरावीत ना? कारण दीडेकरही जीवनात यशस्वी होऊ शकला असं म्हणता येत नाही. तोही शापितच!

❀ ❀



# ४. गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर

मनातल्या मनात खंत करीत श्रीमती अंजनीबाईंच्या निवासस्थानाच्या पायऱ्या चढत होतो. आता त्या खंत करण्यालाही अर्थ उरला नव्हता. सारे काही संपले होते. दोन वर्षांपूर्वी जूनमध्ये एका सकाळी नित्यनेमास अनुसरून अंजनीबाई उठल्या. आईच्या तसबिरीस नमस्कार करून चार पावले चालून दत्ताच्या तसबिरीस त्यांनी वाकून वंदन केले नि तिथून नारायण महाराजांच्या तसबिरीस प्रणिपात करून त्या माघारी वळल्या न वळल्या तोच चक्कर येऊन कोसळल्या. उजव्या बाजूच्या मांडीत वरच्या अंगाला फ्रॅक्चर झाले होते. नामवंत धन्वंतरींनी घरी येऊन व्यवस्थित उपचार केले म्हणून त्या अंथरुणातल्या अंथरुणात उठू बसू तरी शकत होत्या. पण या दोन वर्षांत त्यांचा काही भरवसा उरलेला नाही हे वारंवार जाणवत असे. अखेरीस सात तारखेस झोपेतच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रोजची निद्राच सहजगत्या महानिद्रा व्हावी हे भाग्यलक्षण मानतात. ते खरे असेल तर अंजनीबाईंना भाग्याचे मरण आले खास.

अंजनीबाई म्हणजे ८०-८५ वर्षांतील सांगीतिक क्षेत्रातील घडामोडींचा चालताबोलता संदर्भग्रंथच होता. प्रश्न विचारायचाच अवकाश. खणखणीतपणे माहिती सांगणे सुरू व्हायचे. गेली दोन वर्षे पडून राहावे लागले तरी त्याही अवस्थेत कित्येकांनी जुनी जुनी माहिती त्यांच्याकडून मिळवलीच. भास्करबुवा कसे गात, ताराबाई शिरोडकर कशा गात वगैरे इतरत्र अनुपलब्ध असणारी माहिती जिज्ञासूंना तिथे मिळायची. मुंबई आकाशवाणीचे त्यावेळचे संगीतप्रमुख रमेश नाडकर्णी यांनी अंजनीबाईंचे असे एक खणखणीत भाषण आणि त्यांची गायनशैली ध्वनिमुद्रित केली आहे. आकाशवाणीने ती सुरक्षित ठेवली असेल तर म्हातारपणातही त्यांचा आवाज किती सुरेल व निकोप होता है समजू शकेल. तो आवाज ऐकल्यावाचून १९३३ साली अंजनीबाईंनी जाहीर मैफलीतून गाण्याचे सोडल्यानंतर वझेबुवांनी तसे कडवट उद्गार का काढले ते लक्षात यायचे नाही.

अंजनीबाईंनी अपार मेहनतीने गाणे मिळविले होते. या मेहनतीचे स्वरूप समजल्याखेरीज त्यांच्या संगीतसंन्यासाची खरी कल्पना यायची नाही. ग्वाल्हेरची ध्रुपद-धमार

गायकी अंजनीबाईंच्या घराण्यात त्यांच्या आधी चार पिढ्या होतीच. या रक्तातल्या गाण्याला वयाच्या आठव्या वर्षापासून नजीरखाँच्या तालमीची जोड मिळाली. नजीरखाँ, खादिम हुसेनखाँ आणि छज्जूखाँ हे तानसेन परंपरेतील तिघे बंधू रामपूरहून मुंबईस येऊन भेंडीबाजारात वास्तव्य करून होते यावरून त्यांना "भेंडीबाजारवाले" असे म्हणत. या तीन भावापैकी छज्जूखाँ हे ध्रुपदिये होते व त्यांनी पाचशे चिजाही बांधल्या होत्या. बाकीचे दोघे ख्यालिये. श्रीमती अंजनीबाईंना तालीम मिळाली ती दोघा ख्यालियांकडून. १९२० सालपर्यंत नजीरखाँ यांनीच तालीम दिली. त्या साली नजीरखाँ वारले. नंतर काही वर्षे बाईंनी खादिम हुसेनखाँ यांची तालीम घेतली. नजीरखाँ पहाटे चार वाजता तालीम सुरू करीत ती सकाळी ९-१० वाजेपर्यंत चाले. सतत १० वर्षे अशी तालीम चालू असता साडे तीन वर्षांत फक्त यमन आणि नंतरच्या दीड वर्षांत फक्त भैरवी हे दोनच राग सुरुवातीच्या पाच वर्षांत तयार करून घेतले. अंजनीबाई या शिक्षणाबद्दल बोलताना सांगत 'माझे गुरू म्हणत की यमन हा सर्व तीव्र सुरांचा आणि भैरवी हा सर्व कोमल स्वरांचा राग आहे.

या दोन रागांच्या सांगोपांग अभ्यासामुळे सप्तकातील सगळे स्वर गळयावर उत्तम प्रकारे चढतात. मग कोणताही राग गाणे कठीण जात नाही. खंडमेराच्या गणिती पद्धतीने स्वरांचे ८७२ प्रकार त्यांनी बसवून घेतलेच पण तानक्रियेला अवश्य असा एक मिनिटाचा दमसास त्यांनी माझा तयार करून घेतला.'

खुद्द नजीर खाँ यांची ख्यातीही तशीच होती. ते विलंबित लयीत ख्यालाची अस्थायी आणि अंतरा एका श्वासात म्हणत. त्यांच्या घराण्याला खरे तर मुरादाबाद घराणे असे नाव शोभून दिसले असते. कारण घराण्याचे संस्थापक मूळचे मुरादाबाद जिल्ह्यातील बिजनोर गावचे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी उस्ताद छज्जूखाँ, उस्ताद नजीरखाँ, उस्ताद खादिम हुसेनखाँ हे तिघे बंधू मुंबईस आले व भेंडीबाजारात राहू लागले. पारशी गायनोत्तेजक समाजात ते गाणे शिकवीत आणि पं. भातखंडे यांच्याबरोबर चर्चाही करीत. पं. भातखंडे यांच्याशी त्यांचे पुढे पुढे पटले नाही म्हणून भातखंड्यांच्या ग्रंथात या त्रिमूर्तीचा उल्लेख नाही. मुंबईत मुसलमान समाज बहुंशी भेंडीबाजारात राहतो म्हणून ते भेंडीबाजारात राहिले असे म्हणणे अधिक वास्तव ठरेल. श्रीमंत व्यापारी व गव्हर्नर यांची निवासस्थाने भेंडीबाजारात त्यावेळी होती म्हणून ते तेथे राहिले असावेत हा तर्क बरोबर नव्हे. एवढे खरे की या वसतिस्थानामुळे त्यांना भेंडीबाजारवाले म्हणू लागले व संयोग इतका वज्रलेप ठरला की त्यांच्या घराण्याचेच नाव 'भेंडीबाजार घराणे' असे पडले.



या तिघांचा व्रजभाषेचा आणि संस्कृतचा अभ्यासही डागर घराण्याचे उस्ताद इनायतखां यांच्याकडे ध्रुपद गायकी शिकत असता झाला होता. नजीरखाँ खानेपुरी भरण्यात व मुखविलास करण्यात अजोड होते. स्वरात व कणात त्यांच्याकडून यत्किंचितही फरक होत नसे. बोल म्हणणे, चिजेचे तोंड म्हणणे, खुलाबंद बोल, उचकसमेट, सूतमींड असे प्रकार ते हुकमतीने करीत असा लौकिक त्यांच्या शिष्यमंडळींकडून सांगितला जातो. पण उचकसमेट, सूतमींड म्हणजे नेमके काय याचा बोध होत नाही. खुल्या आवाजाने ठाय लयीत आकारात्मक ख्याल ते गात आणि दीर्घ श्वासामुळे त्यांचा स्वर अत्यंत सुरेल, स्थिर व वजनदार लागत असे यावरून खूपच बोध होतो. कोणत्याही बीनकाराला त्यांची बिलंपत हे आव्हान असे. बीन वाद्याच्या अंगाने ते गात. खंडमेर पद्धतीमुळे गवयाची आलापी समृद्ध होते व एकच राग निरनिराळ्या पद्धतीने गाता येतो असे म्हणतात. नजीरखाँनी या सर्व गोष्टी अंजनीबाईंच्या गळयावर चढविल्या होत्या. बलपेचाची तान, सपाट तान, गमक तान यांत त्या अजोड होत्याच पण गुरूप्रमाणे एका स्वरावर पुरे एक मिनिट त्या स्थिर राहू शकत असत.

नजीरखाँ निर्लोभ होते. गंडाबंधनाच्या वेळी तबकात विड्याच्या पानावर अंजनीबाईंच्या मातुःश्रींनी पांच रुपये दक्षिणा ठेवली होती. खाँसाहेबांनी रुपयाची मोड आणावयास सांगून त्यांतील फक्त सव्वापाच आणे घेतले आणि म्हणाले ‘मुलीच्या हाताला आज मी गंडा बांधला आहे; तो जेव्हा मी तिच्या गळयात बांधेन तेव्हा मी भरपूर नजर घेईन!’ आणि खरोखर मासिक वेतनाचीही अपेक्षा न ठेवता त्यांनी तालीम दिली. पुढे अंजनीबाई गायनावर हजारो रुपये मिळवू लागल्या, तेव्हा समारंभपूर्वक त्यांना पंधरा हजार रुपये नजर करण्यात आले.

अप्रतिम लावण्य आणि त्याच तोडीचे कंठमाधुर्य असणारी ही मुलगी विखारी दृष्टीची शिकार होऊ नये म्हणून नजीरखाँ आपल्या शिष्येला नेहमी सांगत, ‘ऐने में मुँह मत देखना बेटा! संगीत ही केवळ पोट भरण्याची विद्या नाही. ती एक तपश्चर्या आहे. कोणत्याही मोहात न पडता तू संगीतसाधना कर.’ ही त्यांची शिकवण अंजनीबाईंनी हयातभर पाळली यात शंका नाही.

अंजनीबाईंनी गळा तयार करण्यापुरतीच मेहनत केली असे नाही. पं. भातखंडे आणि उस्ताद छज्जूखाँ प्रभृति तिघे बंधू यांच्यात जी शास्त्रीय चर्चा चाले ती अभ्यासू वृत्तीने समजून घेतली आणि त्याहीपलीकडे जाऊन पुष्टिमार्गी वल्लभसंप्रदायाचे आचार्य श्री. जीवनलालजी महाराज यांची शागिर्दी करून विद्या संपादन केली. अवघी सोळा वर्षांची उमर असता त्यांनी संपादलेली ही विद्या पहिल्याच जाहीर कार्यक्रमात श्रोत्यांना थक्क करून न सोडती तरच

नवल!

पण अप्रतिम लावण्य हे अखेर या विद्येच्या आड आलेच. घरची माणसे तशी विचारी आणि संस्कारी. मुजफराबाद हॉलमधील पहिला जलसा झाल्यापासून मोठमोठ्या लक्ष्मीधरांची नजर अंजनीला बाधणार, असा रंग दिसू लागला. आईला वाटले मुलीचे लग्न करून दिले तर या नजरा बंद पडतील. म्हणून ऐन विशीतील तरुण उद्योगपती श्री. वसनजी भगवानदास वेद यांच्याशी अंजनीबाईंचा विवाह करून दिला आणि उभयतांना अठ्ठावीस वर्षे तो सुखाचा झाला. श्री. वसनजी संगीताचे षोकीन होते. बाईंच्या पहिल्या जाहीर कार्यक्रमाचा जबरदस्त प्रभाव त्यांच्या मनावर पडला आणि ते आकर्षिले गेले. सत्तावीस सालच्या आर्थिक मंदीत दुर्दैवाने त्यांना भयंकर फटका बसला. इतका की त्यामुळे प्रकृती कोसळून त्यांचा अंत झाला. ही दुर्घटना न घडती तर अंजनीबाईंच्या सुखासमाधानाला आणि पारमार्थिक साधनेलाही पारावार उरला नसता.

'मी गाण्याच्या बैठकीला आले की राजेमहाराजेही उठून उभे राहात एवढी मी स्वतःच्या चारित्र्याने प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली होती.' असे अंजनीबाई सांगत आणि ते खरेच आहे. सयाजीराव गायकवाड अंजनीला आपली कन्या मानून दर वर्षी साडीचोळीचा नजराणा करीत. अगदी परदेशात असतानाही महाराजांचा व नेम चुकला नाही. इंदूरचे तुकोजीराव होळकर त्यांना बहीण मानून भाऊबिजेची ओवाळणी घालीत. पालनपूरचे नवाब अंजनीबाईंना 'छोटी मीराबाई' म्हणत. इतकी प्रतिष्ठा असताही त्यांच्या सौंदर्यावर विखारी नजरा रोखल्या जाण्याचे दुर्धर प्रसंग आलेच. पण अंजनीबाई प्रसंगोचित अवधानाने निसटल्या.

पहिला दुर्धर प्रसंग ओढवला तो या मुंबईतच. लग्नानंतर दोन वर्षांनी वाळकेश्वरला जयपूरच्या महाराजांचा मुक्काम होता. अंजनीबाईंचा कीर्तिध्वज त्यावेळी चांगलाच फडकू लागला होता. महाराजांतर्फे बंगल्यावर बैठकीचे अगत्यपूर्ण निमंत्रण दिले गेले. गाणे इतके रंगले की महाराजांचे देहभान हरपून ते गायिकेच्या रोखाने निघाले आणि अखेर त्यांच्या तावडीतून निसटण्यासाठी अंजनीबाईंना खिडकीतून उडी टाकून धूम ठोकावी लागली. याहीपेक्षा कठीण प्रसंग गुदरला तो गोव्यात. बाई त्यावेळी ऐन तिशीत होत्या. श्रीमंत देसाईंच्या वाड्यात बाईंचे गाणे होते. गोव्यात त्या वेळी पोर्तुगीज राजवट. बाईंच्या गाण्यापेक्षा त्यांच्या सौंदर्याची कीर्ती ऐकून पोर्तुगीज गव्हर्नरचा तरणाबांड मुलगा गाण्याला आला होता. बरोबर त्याचा लवाजमाही होता. त्याच्या हालचाली लक्षात येताच बैठक अर्धवट टाकून बाई वाड्याबाहेर निसटल्या. चोवीस तास एका गोठ्यात दडून राहिल्या. गोवा स्वतंत्र होईपर्यंत

पुनः म्हणून बाईंनी गोव्यात पाऊल टाकलं नाही.

इतके कटू अनुभव येऊनही बाई सार्वजनिक रीत्या गात राहत्या. पण आणखी एका योगायोगाने केडगावचे नारायण महाराज बाईंच्या जीवनात प्रकटले आणि त्यांनी अंजनीबाईची मानसिक बैठकच आरपार बदलून टाकली. हे कसे घडले?

बाईंचा विवाह झाल्यानंतर तीन वर्षांनी हे गंडांतर उद्‌भवले. सेठ गोवर्धनदास तेजपाल यांच्याकडे गाऊन आणि मसालेदार दूध पिऊन बाई घरी आल्या तर आवाज गायब! गायक गायिकेवर आवाज गमावण्यासारखे दुसरे मोठे संकट नसतेच. सगळ्या दिशा अंधकारमय होतात. आयुष्याचे प्रयोजनच संपुष्टात येते. बाई हताश झाल्या. एकाकी बसून राहू लागल्या. मोठ्याने बोलू लागल्या की तोंडातून रक्त पडे. सारे उपाय हरल्यावर श्री. वेद आणि अन्य हितचिंतक मंडळी केडगावला नारायण महाराजांकडे गेली. महाराज त्यावेळी १३-१४ वर्षांचे असतील. त्यांच्या कानांवर ही आकस्मिक उद्भवलेली समस्या घालताच ते म्हणाले, ‘एवढं काळजी करण्यासारखं यात काहीच नाही. तिचा आवाज परत येईल. पण तो परत आल्यावर ती मला गाऊन दाखवील ना?’

आता या गोष्टीला नाही कोण म्हणणार? असे सांगतात की महाराजांनी दिलेल्या तीर्थप्रसादाने अंजनीबाईंचा आवाज पुन्हा पहिल्यासारखा झाला! सगळीकडे आनंदी आनंद जाहला! बाई पुन्हा गाऊ लागल्या. महाराजांसाठी आणि जाहीर कार्यक्रमातून. मुळात अंजनीबाई अंधश्रद्ध नव्हत्या पण या चमत्काराने जीवनपरिवर्तनच झाले. नारायण महाराजांचा मुक्काम आठ महिने मुंबईत असे. त्यावेळी त्या पाचसहा तास त्यांच्यापुढे भजने आळवीत. थोडीथोडकी नव्हे, एकवीस वर्षे त्या सार्वजनिक जलशातून गात तशाच नारायण महाराजांपुढेही गात.

मग असे काय घडले की, सार्वजनिक बैठकीतून न गाण्याचे बंधन स्वतःवर घालून घ्यावे? कोणत्याही कलावंताचे गाणे हे चाळिशीनंतर मुरलेले रसायन बनते. नेमक्या त्याच वेळी प्रवाद उठले की नारायण महाराजांनीच बाईंना सार्वजनिकरीत्या गाण्याची बंदी केली. असे प्रवाद मोठ्या कलावंतांबाबत उठतातच. त्यांत सत्यांश असतोच असे नाही. वझेबुवांच्या कानावर हा प्रवाद गेला तेव्हा ते म्हणाले, ‘त्या रांडेच्याला गाण्याची काय चव? एक चांगली गाणारी गेली याचं दुःख आम्हांला...’

परिश्रमपूर्वक ज्यांनी गायन-विद्या मिळविली तेच वझेबुवांचे उद्गार जाणू शकतील. पण महाराजांच्या आदेशामुळेच बाईंनी सार्वजनिक गाणे सोडले हे तितकेसे खरे नाही. जे गाणे अमाप पैसा देते पण आपल्या सौंदर्यामुळे वारंवार संकटातही लोटते ते गाणे पैशासाठी इतःपर

गायचेच कशाला असे बाईंच्या मनाने घेतले. खरोखर त्या काळाचा विचार करता आणि पती उद्योगपती असता बाई वैभवाच्या शिखरावरच होत्या. आयुष्यभर पुरेल एवढी संपत्ती आपल्यापाशी आहे, आता गायचे ते पारलौकिक वैभवासाठी, असे बाईंनी ठरवले त्यात वावगे काही नव्हते.

पण बाईंना पुढील चार वर्षांतच पतिनिधनामुळे त्यांचे कर्ज फेडण्यासाठी आपली दहा लाखांची इस्टेट विकावी लागेल ही कल्पना आली नाही. पुढे पन्नास वर्षांचे खडतर जीवन जगावे लागेल हे त्यांच्या मनाला शिवले नाही. शाब्बास अंजनीबाईंची की लाचारीचा शब्दही मुखावाटे न काढता त्यांनी सत्पात्री विद्यादान करण्यात आणि प्रभुचिंतनात आयुष्य घालविले.

वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांना स्वतंत्र भारतातील संगीत नाटक अकादमीच्या पहिल्या फेलो होण्याचा मान मिळाला. पण या महान गायिकेला मासिक मानधन सुरू व्हयाला आणखी सात वर्षे उजाडावी लागली. ज्यांच्या घरी स्वयंपाकासाठी देखील चांदीची भांडी असत त्यांची पुढल्या आयुष्यातील आर्थिक विवंचना कोणाही सहृदय माणसाचे काळीज पोखरणारी होती. गेली दोन वर्षे फ्रॅक्चरच्या वेदनांमुळे त्यांना झोपेची गोळी द्यावी लागत असे. कळसाला भिडलेली महागाई आणि असा हा सर्वस्वी परावलंबी बनविणारा आजार.

पण या शेवटच्या आजाराआधी त्यांचा परमेश्वर खानदानी अस्थायी अंतरा हाच होता. तो कोणी गायला लागले की त्या उच्चासनावरून खाली येत. एकदा माईंच्या वाढदिवशी पं. सीताराम फातर्फेकर सकाळी सकाळीच अंजनीबाईंना अभिवादन करण्यासाठी आले असता अशीच घटना घडली. त्यांना आशीर्वाद देताना माई म्हणाल्या.

‘‘सीताराम एखादी घराणेदार बंदीश ऐकवतोस?’’

माईंचे घर म्हणजे दत्तमंदिरच. त्या पवित्र वातावरणात सीताराम फातर्फेकरांनी बिलासखानी तोडीतील

***सद्गुरु लागो मन मेरे***
***आठ प्रहर आनंद तेरे***
***वे लोग परलोग करके दिखाये***
***ज्याकी रचना को समझे रे***

ही बंदीश सुरू केली. मरहूम नन्नेखांनी तिची तालीम दिली होती. जसजशी बढ़त सुरू झाली तसतसे बाईंच्या मुखावरील भाव पालटत गेले. डोळ्यांत आसवे उभी राहिली. अंजनीबाई खुर्चीवर आणि फातर्फेकर खाली बैठकीवर होते. पण बाईंना काय वाटले कुणास ठाऊक, चिजेचा मुखडा पूर्ण होताच त्या खुर्चीवरून उठल्या आणि खाली बसल्या. फातर्फेकर

गोंधळूनच गेले. म्हणाले, 'माई हे काय?'

तेव्हा माई म्हणाल्या 'हा मान तुला नव्हे, तुझ्या गादीला. *माका आज मरहूम महम्मदखांची याद इली. हो तुझो अस्थायी अंतरो ऐकुन माज्या डोळ्यात पाणी उभ्या रवलां'*

अंजनीबाई जरी भेंडीबाजार घराण्याच्या - नजीरखां यांच्या शिष्या होत्या तरी आग्रेवाले नथ्थनखाँ यांच्या घराण्याचे गाणे त्यांनी खूप ऐकलेले होते. त्याही घराण्याबद्दल त्यांच्या मनात आदर होता. पूर्वी भिन्न भिन्न घराण्यांत अस्थायी अंतऱ्यांचे आदानप्रदान चालत असे. हे आदानप्रदान म्हणजे चिजेची केवळ अक्षरे नव्हत. चीज याद असणे म्हणजे तिच्या गायकीच्या सर्व अंगोपांगांनिशी याद असणे असा त्याचा अर्थ आहे. महम्मदखां जशी गातील तशीच दुसऱ्या घराण्याचे गाणार. हे सर्व आठवून अंजनीबाई गलबलल्या. 'आपलं शरीर विरत चाललंय, अस्थायी-अंतरे विसरत चाललेयत. अशीच कुणी तरी याद आणून देतो त्यावेळी सगळा जमाना डोळयांपुढे उभा राहतो.' असे त्या म्हणत. शेवटच्या दोन वर्षांत मात्र माईंची स्थिती अगदीच केविलवाणी झाली होती.

या दोन वर्षांत कुमार गंधर्वांनी आपल्या या वंदनीय गुरूला सर्व परींनी मदत केली. किशोरी आमोणकर याही औषधांची मदत पोचवीत. बाईंचे शिष्य टी. डी. जानोरीकर यांच्याकडूनही काही पोच होत असे. त्या आधारावर अंजनीबाईंचे चैतन्यमय अस्तित्व परिस्थितीचे आव्हान पेलीत होते. खरे तर पतीचे कर्ज फेडण्याची पाळी आल्यावर त्या पुनः सार्वजनिक कार्यक्रम करू लागल्या असत्या तर आर्थिक आव्हान पेलणे अधिक सुखाचे झाले असते. पण मोठी माणसे व्रतभंग पत्करण्यापेक्षा कणाकणाने क्षीण होऊन मरण पत्करणे श्रेयस्कर मानतात हेच खरे. अंजनीबाईंनी तेच केले.


आता श्रीमती अंजनीबाईंच्या उभ्या हयातीचा एकच साक्षीदार उरला आहे. पण तो आहे मूक. १९३० सालापासून त्याने एकदाही झंकार काढलेला नाही. ३० साली आपल्या मातुःश्रींच्या अंत्य समयी त्यांची शेवटची इच्छा म्हणून तीन तास आपले गाणे ऐकवले आणि आपला तंबोरा गवसणीत घालून ठेवला. आजतागायत तो गवसणीतून बाहेर काढला नाही. हा तंबोरा आपणांस मिळावा म्हणून अनेक लक्षाधीशांनी मोठ्या रकमांची आमिषे दाखविली पण अंजनीबाईंनी तसे काही करण्यास ठोस नकार दिला. गानविद्या ही तपश्चर्या आहे, तोही जीवनमुक्त होण्याचा एक मार्ग आहे याचा विसर त्यांना कधीच पडला नाही. या मार्गावर वयाच्या आठव्या वर्षापासून तासन्‌तास साथ देणाऱ्या, काशीच्या गंगाप्रसादातील मैफिलीत अमाप कीर्ती आणि संपत्ती मिळवून देणाऱ्या, उत्तर भारतात कीर्तिमय होऊन आलेल्या अंजनीबाईंच्यावर मुंबईत सोन्याच्या गिनी उधळण्यात आल्या त्यावेळी खर्जात मंदस्मित

करणाऱ्या त्या तानपुऱ्याचा असा बाजार? छे! त्या मीरेला ती कल्पनाही असह्य होती. नॅशनल म्युझियममध्ये हा तंबोरा ठेवावा, तेच यथोचित स्मारक होईल असे त्यांना वाटे.

कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी १९०५ साली अंजनीबाईंचे गाणे प्रथम ऐकले. देवल क्लबने ते योजले होते. देवल क्लबची इमारत त्यावेळी झालेली नव्हती. त्या गाण्याने महाराज इतके मोहित झाले की राजवाड्यात अंजनीबाईंचे गाणे झाले पाहिजे असे त्यांना वाटले. आदेश सुटले. त्या वेळी अंजनीबाईंचे वय बावीस वर्षे होते. शाहूमहाराजांनी सरदारदरकदारांना नव्हे तर कोल्हापुरातील संगीतज्ञांनाही निमंत्रण केले होते. याच वेळी घसघशीत बिदागीबरोबरच महाराजांनी एक तंबोरा बाईंना भेटीदाखल दिला. सांगलीच्या एम्. के. देवल यांच्याकडून तो बनवून घेतला होता. १८/९/१९०५ ही तारीखही त्या तंबोऱ्यावर कोरलेली आहे. तोच हा तंबोरा.

तंबोऱ्याइतकीच त्यांच्या आयुष्यात महत्त्व पावलेली आणखी एक त्रयी होती. सळसळते चैतन्यच होते ती त्रयी. एक हिरामणी पोपट आणि कमा व गोविंदा ही कुत्र्याची जोडी. सर्व लहानथोर पै-पाहुण्यांचे स्वागत हिरामणी आपल्या 'राधेश्याम 'या गोड शब्दांनी करी तर कुत्र्यांची जोडी माईंच्या मांडीवर डोके टेकून त्यांचा रियाज ऐके. केवळ परमेश्र्वरासाठी गायचे असे ठरविल्यानंतर अंजनीबाईंनी भारतातील बहुतेक प्रमुख मंदिरांतून कार्यक्रम केले. बनारसला काशिविश्र्वेश्र्वरावर अभिषेक दोन्ही प्रकारे केला. जलाभिषेक आणि स्वराभिषेक. आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे विश्वस्तांच्या परवानगीने कमा कुत्र्याला तोंडात बेलाचे पान धरून शंकराच्या पिंडीवर वाहता आले! आता खुद्द अंजनीबाईच कैलासवासी होऊन त्यांनी आपले एका अर्थी कृतार्थ, एका अर्थी उद्ध्वस्त झालेले आयुष्याचे बेलाचे पान शंकरार्पण केले आहे.


❀ ❀



# ५. खांसाहेब भूर्जीखां

१९३६ साल होते ते. बऱ्याच वर्षांनी गंधर्व कंपनीचा मुक्काम कोल्हापुरास आला होता. बालगंधर्व पन्नाशीच्या जवळ पोचलेले. त्यांचे स्त्रीवेषातले सोंग हे आता तितकेसे आकर्षक राहिलेले नव्हते. नाटक पाहताना आत कुठे तरी जाणवायचे ते. पण उस्ताद थिरकवां यांच्या साथीत ते गाऊ लागले आणि त्या दोघांचा स्वरलयींचा खेळ रंगला की नाटकाला आलेला प्रेक्षक स्वतःचेच वय विसरत असे. स्वतःचेच वय विसरणाऱ्या प्रेक्षकाला नारायणराव राजहंसांचे वय विसरायला व्हावे यात काय नवल?

गंधर्व कंपनीचे आणखी एक वैशिष्ट्य होते. आडवारी कंपनीचा खेळ बहुधा नसेच. मग गावातील अभिजात संगीताचे षोकीन एखादी खाजगी मैफिल आयोजित करायचे आणि सगळी गंधर्व कंपनी तिथे हजर असायची. कंपनीचे ऐश्वर्य कमी होत चालले होते तरी या वैशिष्ट्यात खंड पडला नव्हता. विशेषतः कोल्हापुरासारख्या सर्व घराण्यांची गायकी अनेक वर्षे कानात मुरवलेल्या गावात काही तरी निमित्त शोधून अशा खाजगी मैफिली आयोजित करण्याचा प्रयत्न हटकून व्हायचाच. गंधर्व कंपनीत उस्ताद थिरकवां यांच्यासारखा अजोड तबलावादक असल्याने त्यांच्या साथीत आपल्या गावातील तय्यार गायकाला बसवून रंगतदार लढत अनुभवावी असा विचार कुणाला तरी प्रस्फुरित करी. मग ती विचारवेल आपसूकच पल्लवित होई. लढतीचा विचार ज्याच्या मनात भरविला जाई त्यालाही वाटायचे, उस्ताद थिरकवांच्या साथीत गायलो, निभावलो, छाप टाकली तर आपल्या मंदिलात तेवढेच एक मानाचे मोरपीस! आणि खुद्द थिरकवां यांनाही अशा लढतीत मनापासून रस असायचा!



कोल्हापूरलाही असाच योग जुळून आला होता किंवा जुळवून आणला गेला होता असे म्हटले पाहिजे. यामागचे सूत्रधार होते गानकोकिळ शंकरराव सरनाईक. ३५ साली आपली कंपनी बंद करून ते आता कायम कोल्हापुरातच राहू लागले होते. आज वयाची ७८ वर्षे पूर्ण केलेले पं. निवृत्तिबुवा सरनाईक त्या वेळी ऐन पंचविशीत होते. उस्ताद थिरकवां यांच्या साथीत आपल्या या तरुण, लयदार आणि नुकत्याच मैफिली गाजवू लागलेल्या पुतण्याला गायला बसवावे, त्याच वेळी योगायोगाने कोल्हापुरात उपस्थित असणाऱ्या खांसाहेब अल्लादियाखांना बहुमानपूर्वक निमंत्रण द्यावे, त्यांचाही आशीर्वाद घ्यावा असा विचार शंकरराव सरनाईक यांच्या मनात असणे अगदी स्वाभाविक होते. त्या खाजगी मैफिलीला सरनाईक यांच्या माडीवर कोण गर्दी झाली होती! एखाद्या मोत्यांच्या कंठयात कौस्तुभमणी शोभून दिसावा तशी संगीतसम्राट अल्लादियाखां यांची तपःपूत मूर्ती अग्रभागी विराजली होती. बालगंधर्व अदबीने जवळच बसले होते. पलीकडच्या अंगाला संगीतसम्राटांचे सुपुत्र भूर्जीखां, पुतणे नथ्थनखां होते. गंधर्व कंपनीतील मंडळींबरोबरच तालज्ञ शाळिग्राम, गानरसिक बाबुराव जोशी, बाबुराव जमदग्नी, श्रीमती धोंडूताई कुलकर्णी यांचे वडील गणपतराव, वामनराव सडोलीकर आणि त्यांचे बंधू नानासाहेब ही मंडळीही दिसत होती. इतकेच काय पण योगायोगाने कुमार गंधर्वही हजर होते. असा दर्दी, जाणकार श्रोतृवर्ग समोर बघितला की ज्याला गायचे असते तो थोडासा दबलेलाच असतो. पण ज्याला मुद्दाम साथ करण्यासाठी म्हणून निमंत्रित केलेले असते त्याचे बाहू स्फुरण पावत असतात. उस्ताद थिरकवां तो श्रोतृसमुदाय बघून मनात बहुधा म्हणाले असतील, “ बडा अच्छा मौका आया है, अभी देख लूंगा!”

कुमार गंधर्व सर्वांत लहान. त्यांनी प्रथम गाऊन एक प्रसन्न वातावरण निर्माण केले. मैफिलीत हे वातावरण टिकविण्याची जबाबदारी अर्थातच सर्वांची असते. कुणाच्या तरी मनात कली शिरला की मैफिलीचा बेरंग व्हायला उशीर लागत नाही. त्या रात्री खांसाहेब अल्लादियाखां यांचे पुतणे खांसाहेब नथ्थनखां यांनी अस्थायी मांडायला आरंभ करताच उस्ताद थिरकवां तेढे वाजवू लागले. बिचाऱ्या नथ्थनखांना जमू द्यायचेच नाही; ‘चैन’ येऊन फिरू द्यायचेच नाही असा उस्ताद थिरकवांचा इरादा जसजसा स्पष्ट होऊ लागला, तसतसे खांसाहेब अल्लादियाखां यांच्या शेजारी बसलेले खांसाहेब भूर्जीखां अस्वस्थ होऊ लागले. त्यांची अस्वस्थता त्यांचे डोळेच बोलून दाखवीत होते. आपल्या पिताजींच्या कानाशी तोंड नेऊन दोनतीनदा त्यांनी आपल्या मनातील भाव बोलूनही दाखविले. पण दर वेळी खांसाहेब अल्लादियाखांनी उजव्या हातानं खूण करून भूर्जीखांना आवरले. आणि तेच योग्य होते.

कारण उस्ताद थिरकवां तोडीस तोड अशा गायकाशी झुंज देते तर ते समजण्यासारखे होते. बिचाऱ्या नथ्थनखांना अडविण्याचा 'पुरुषार्थ' ते करीत आहेत हे योग्य नाही अशी साऱ्या मैफिलीचीच भावना झाली होती. मैफिल नाराज होती!

खांसाहेब नथ्यनखां गाऊन उठले. उस्ताद थिरकवां यांनी 'जितं मया' अशा नजरेने श्रोत्यांकडे बघितले. तेवढ्यात गेला अर्धा तास अस्वस्थ असलेले खांसाहेब भूर्जीखां ताडकन् उठले. खांसाहेब अल्लादियाखां यांना पादस्पर्शपूर्वक वंदन करून गायकाच्या आसनावर आरूढ झाले. त्यांची ती दमदार पाच-दहा पावलेच मैफिलीत आता काहीतरी समर झडणार असा संकेत देऊन गेली. सर्वांची नजर भूर्जीखां यांच्यावर खिळली होती. रुंद भालप्रदेश, पाणीदार डोळे, गौरवर्ण चेहऱ्यावर सात्त्विक संतापामुळे आलेली लालसर छटा, गळ्यातून छातीवरच्या खिशापर्यंत गेलेला, खिशातल्या घड्याळाशी बांधिलकी असणारा काळा गोफ... हे सर्व श्रोतृवर्ग निरखीत असतानाच खांसाहेबांनी तंबोरे मनासारखे बोलके केले आणि उस्ताद थिरकवां यांना ठेका सांगितला. चौदा मात्रांचा झुमरा! खांसाहेब भूर्जीखां यांच्या आवाजातील जरब पाहून उस्ताद थिरकवांच्या भिवया काहीशा वरखाली झाल्या.

आता हे इथे सांगायला हरकत नाही की झुमऱ्याचा ठेका हे उस्ताद थिरकवांचे वर्म होते. स्वतंत्र वादनाचे ते बादशहा होते याबद्दल दुमत नाही, पण साथीच्या वेळी झुमऱ्याचा ठेका पकडणे त्यांना जमत नसे. पं. गजानन बुवा जोशी यांनी उस्ताद थिरकवां यांच्या सत्कारप्रसंगी प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेत हे स्पष्टपणे लिहून ठेवले आहे. खांसाहेब भूर्जीखां यांना हे ठाऊक असेलच असे म्हणता येणार नाही. त्यांच्या मनात जी बंदीश स्फुरली तिला अनुरूप असा ठेका त्यांनी सांगितला असणार. पण त्याने केवढा चमत्कार घडून आला.

चिजेचे तोंड टाकले गेले. अस्थायी मांडून समेवर येताच खांसाहेब भूर्जीखां थिरकवांना उद्देशून म्हणाले, 'खांसाब, अभी जो चाहे वो बजाइये. मुझे तंग करनेकी जरूर कोशीश कीजिये. मुझे भी सामना देते हुए मजा आयेगा. चलो....!'

हे शब्द ऐकताच खांसाहेब थिरकवां यांनी रागरंग ओळखून एकदम दोन्ही हातच जोडले. स्वरात शक्य तितकी नरमाई आणून म्हणाले, "खांसाब, आप तो शेरके बच्चे, आपके साथ क्या बजाऊं? खाली ठेका लगाना भी मुष्किल है."

३६ सालची ही छोटीशीच आठवण खांसाहेब भूर्जीखां यांच्याविषयी बरेच काही सांगून जाते.

खांसाहेब अल्लादियाखां यांचे तिन्ही सुपुत्र त्या अर्थाने 'शेर के बच्चे' च होते. प्रकृतिभेदाने काय जो फरक असेल तेवढाच. पण बडेजी म्हणजे सर्वांत वडील असे खांसाहेब

नसिरुद्दिनखां यांच्या वाट्याला फारशी प्रसिद्धी आलीच नाही आणि सर्वांत धाकटे खांसाहेब भूर्जीखां यांच्या वाट्याला जी आली, आणि आज त्यांच्या मृत्यूला तीन दशके होत आल्यावरही जी येत आहे ती सगळी 'शाखाचंद्र न्याया' नेच येत आहे असे म्हटले तर ते वस्तुस्थितीला धरून होईल. खांसाहेब अल्लादियाखां यांचे मधले पुत्र मंजीखां आपल्या गानकलेने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर तळपले. वयाच्या ४८ व्या वर्षी, १९३७ साली, आपली गानकला उत्फुल्ल कमलाप्रमाणे विकसित झालेली असतानाच ते रक्तदाबाच्या विकाराने निधन पावले. खांसाहेब अल्लादियाखां यांनी प्रवर्तित केलेल्या गायकीवर झालेला हा दारुण वज्राघातच होय. तेजाचा लोळ दिसावा आणि सर्वांनी मान झुकवावी न झुकवावी तोच गुडुप अंधार व्हावा तसे मंजीखां यांच्या बाबतीत झाले. त्यामुळे प्रसिद्धीचा झोत त्यांच्या बाबतीत हळहळण्याइतपतच टिकला. बडेजींना प्रकृतीच्या कारणासाठी कोल्हापूर सोडून उनियारास जावे लागले म्हणून म्हणा अथवा करवीरमधील संस्थानी दबावकारणाचे बळी म्हणून जाणे भाग पडले म्हणून म्हणा, त्यांच्यासंबंधाने फारसे लिहिले गेले नाही हे समजू शकते. पण खांसाहेब भूर्जीखां यांच्या संबंधाने खूपच लिहिता येण्यासारखे असताना आजवर केवळ स्फुट लेखनच का झाले याचा मला नीटसा उलगडाच होत नाही. गेल्या २०-२५ वर्षांत पं. मल्लिकार्जुन मन्सूर, पं. वामनराव सडोलीकर, श्रीमती धोंडूताई कुलकर्णी, पं. मधु कानेटकर इत्यादींचे उस्ताद म्हणून त्यांची आठवण करून देण्यात येते तेव्हा कृतज्ञताबुद्धी त्यात नसते असे नाही. पण प्रामुख्याने ती 'शाखाचंद्र न्याया' ने करून देण्यात आलेली असते. तिच्यामुळे एक तेजस्वी चंद्रकोर दिसते, चंद्राच्या सर्व कलांचे दर्शन घडत नाही. उस्ताद भूर्जीखां एक थोर गायक, त्याहूनही थोर असे एक संगीतशिक्षक आणि त्यापेक्षाही, थोर माणूस होते हे महाराष्ट्राच्या लक्षात आणून देण्याची गरज आहे.

*　　　　　　　　*　　　　　　　　*

खांसाहेब भूर्जीखां यांची घडण, मनाची आणि प्रकृतीची, बालपणापासून कशी घडत गेली यासंबंधाने अगदी अधिकृतपणाने त्यांच्या पिताश्रींवाचून कोण सांगणार? तशी ती त्यांनी सांगितलेली असल्याने भावी पिढ्यांचा मोठाच फायदा झाला आहे. १९४६ साली आपला देहान्त होण्याआधी तीन वर्षे, अधूनमधून सवड मिळेल त्याप्रमाणे, खांसाहेब अल्लादियाखां आपले नातू (स्वर्गीय भूर्जीखांसाहेबांचे सुपुत्र) श्री. अजीजुद्दिन ऊर्फ बाबा यांना आत्मचरित्रपर निवेदन करीत. बाबांनी ते सर्व जसेच्या तसे उर्दूमध्ये उतरवून ठेवले आहे. त्यात या तिन्ही मुलांसंबंधाने आलेली हकीकत वाचनीय तर आहेच, पण मुलांचे संगोपन आणि शिक्षण किती दक्षतापूर्वक केले जात होते यावर प्रकाश टाकणारीही आहे. मुळात उर्दूमध्ये लिहिलेला तो

भाग इथे मराठीत जसाच्या तसा देणे अप्रस्तुत होणार नाही.

खांसाहेब अल्लादियाखांनी या आत्मनिवेदनात म्हटले आहे:

"लग्नानंतर एक वर्ष उलटल्यावर १८८६ साली जोधपूर इथे पहिला मुलगा झाला तो नसिरुद्दिन. नंतर १८८८ साली उनियारास बनुद्दिन आणि सर्वांत धाकटा शमसुद्दिन झाला तो बुंदी इथे १८९० साली. अशी ही दोन दोन वर्षांच्या अंतराने झालेली तीन मुले. नसिरुद्दिन सर्वांत वडील मुलगा म्हणून बडेजी, बद्रुद्दिन मधला, मंजला म्हणून मंजी आणि शमसुद्दिन सर्वांत धाकटा पण सर्वांत गोरा, भुऱ्या केसांचा, भुऱ्या डोळ्यांचा म्हणून भूरजी. अशी तिघांची नावे रूढ झाली. तिन्ही मुले बुंदीलाच शिकत होती. माझे मेहुणे अबदुल्लाखां त्यांना गाण्याची प्राथमिक तालीम देत असत. माझे बंधू हैदरखां अधून मधून कोल्हापूरहून बुंदीस जात तेव्हा तिन्ही मुलांना सरगम कशी करावी याचे पाठ देत. आपण फार महत्त्वाचे असे काही शिकून राहिलो आहोत अशी काही बालवयात त्या मुलांची भावना नव्हती. १९०० साली मी स्वतः कोल्हापुराहून बुंदीस गेलो आणि सर्व कुटुंबीय मंडळींना कोल्हापूरला घेऊन आलो. तिथे आल्यावर मात्र सर्वांना रोजची तालीम सुरू झाली.

सकाळी उठताक्षणीच तिन्ही मुलांकडून दोन तास स्वरशुद्धीची मेहनत करून घेत असे. आस्ते आस्ते तिघांनाही ध्रुपद धमाराची तालीम देऊ लागलो. मुलांची स्नाने आटोपली की लगेच ही तालीम सुरू व्हायची. दुपारी त्यांना उर्दू शिकवीत असे. दोन वाजता मी तानीबाईंना तालीम देण्यासाठी जायचा. (तानीबाई या शाहू छत्रपतींचे बंधू श्रीमंत बापूसाहेब कागलकर यांच्या परिवारातल्या. अती तयार गात असत असा त्यांचा लौकिक होता) तानीबाईंकडे जाताना अनेकदा तिन्ही मुलांना बरोबर घेऊन जायचा. आणि ही तिन्ही मुले अतिशय लक्ष देऊन तानीबाईंची तालीम ऐकत बसायची. एवढेच नव्हे तर घरी आल्यावर मी जवळपास नाही असे पाहून ऐकलेल्या अस्थायीवर मेहनत करायची, गळा फिरवायची. ध्रुपद-धमाराची तालीम चालू असेपर्यंत गळा फिरवायचा नाही अशी माझी सख्त ताकीद असल्याने माझ्या गैरहजेरीत मुले ही मेहनत करीत. संध्याकाळी दिवेलागणीच्या आत खेळ आटोपून घरी परत आलेच पाहिजे असेही मुलांवर बंधन होते. मग रात्रीचे जेवण होईपर्यंत शिकविलेल्या चिजांची उजळणी व्हायची. रात्रीचे जेवण झाल्यावरही कधी कधी मी मुलांना घेऊन बसत असे; नाही तर त्यांना झोप येईपर्यंत ती आम्हा दोघां भावांची (हैदरखां व अल्लादियाखां) मेहनत ऐकत बसत."

खांसाहेब अल्लादियाखां यांच्या आत्मचरित्रातील हा उतारा तिन्ही मुलांच्या समान शिक्षणाशी संबंधित आहे. १९०८ ते १९१० सालअखेर हे शिक्षण तिघांनाही चालू होते असे

ते सांगतात. पण भूर्जीखां यांच्या वाट्याला सतत दहा वर्षे हे शिक्षण आले होते असे दिसत नाही. भूर्जीखां यांच्यावर शाहू महाराजांचे विशेष प्रेम होते. महाराजांनी लहानग्या भूर्जीस, सरदार दरकदारांच्या अन्य मुलांसमवेत त्यांचे इंग्रजी व संस्कृतचे शिक्षण व्हावे म्हणून काही वर्ष बोर्डिंगमध्ये ठेवले होते. आठ-दहा दिवसांनी भूर्जी घरी येई तेव्हा भावांच्या बरोबर त्याला तालीम मिळे. शाहू महाराजांनी भूर्जीच्या शिक्षणात विशेष रस घेतला होता. आपले दोन्ही मुलगे, राजाराम महाराज व शिवाजी महाराज, आणि कन्या अक्कासाहेब यांच्याबरोबर भूर्जीलाही मास्तरांनी इंग्रजी व संस्कृत शिकवावे अशी त्यांची आज्ञा होती. पण प्रत्यक्षात काय झाले? भूर्जी मुसलमान म्हणून मास्तरांनी त्याला संस्कृत शिकवलेच नाही. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी तशी भूर्जीखां यांची स्थिती झाली. सरदारपुत्रांसमवेत इंग्रजी शिकणार म्हणून घरच्या गाण्याची रोजची तालीम नाही आणि मुसलमान म्हणून सरदारपुत्रांना मिळणारी विद्याही पूर्णांशाने नाही. दोन्हीकडे अंशभाग विद्येचेच भूर्जीखां भागीदार ठरले. तरीदेखील अछोप रागांचा त्यांच्याकडे एवढा खजिना होता हे पाहून आश्चर्य वाटते.

खांसाहेब अल्लादियाखां यांच्या आत्मचरित्रात या मुलांच्या गैरशिक्षणासंबंधीही स्वच्छ मतप्रदर्शन असून आपले बंधू खांसाहेब हैदरखां यांनी तिन्ही मुलांना नको ते षौक लावले असा ठपका ठेवण्यात आला आहे. ही तिन्ही मुले राजपरिवारात वाढत होती. बडेजींना क्रिकेटचा, मंजीखांना सायकल पोलोचा असे जे नाद लागले त्याला कारण राजपरिवाराचा सहवास. पण त्यानंतर १९०६-७ साली बडेजी आणि मंजी यांची वये विवाहयोग्य झालेली पाहून हे सर्व कुटुंब राजस्थानात उनियारास गेले आणि तिथे तलवार, लाठी दांडपट्टा, नेमबाजी, घोड्यावरून रपेट शिकण्यासाठी स्वच्छंद भटकणे या गोष्टी हैदरखां यांनी मुलांना शिकविल्या, एवढेच नव्हे तर, त्या बाबतीत षौक पैदा केला. यावर टीकाटिप्पणी करताना खांसाहेब अल्लादियाखां आत्मचरित्रात म्हणतात:

‘हैदरखांका ये सब काम मुझसे छुपकर चलता था। जब मैं देखता तो बहोत नाराज होता और कहता, हैदरखां- तुम बच्चोंको बहोत बुरी बाते सिखाते हो। उनके कामकी बाते तो नही बताते और वाहियात षौक लगाते हो।’

भूर्जीखां यांचे शिक्षण म्हणजे एक अडथळ्यांचीच शर्यत कशी होती याचा आणखी एक विशेष पुरावा म्हणजे दोघा बंधूंच्या लग्नानिमित्त उनियारास गेल्यावर एका आजाराने त्यांच्यावर केलेला जन्माचा आघात. लग्न झाल्यावर बडेजी व मंजी हे दोघे बंधू कोल्हापूरला परतले पण भूर्जीखां मात्र आईसह उनियारासच राहिले. हेतू हा की तिघा भावात भूर्जीखां यांचा आवाज विशेष पल्लेदार असल्याने साक्षात् ज्या जहांगीरखांकडून खांसाहेब

अल्लादियाखां यांना तालीम मिळाली त्यांच्याकडून ती भूर्जीखां यांनाही मिळावी. ती मिळूही लागली होती. तेवढ्यात भूर्जीखांना मोतीझऱ्याचे दुखणे झाले. या दुखण्यात अंगभर पुरळ उठतात आणि वारंवार घुणा फुटून नाकातून रक्त जाऊ लागते. भूर्जीखांच्या नाकातून दिवसाला पाच पाच तस्ते भरून रक्त जाऊ लागले!

उनियारासारख्या खेड्यात उपचारही खेडवळ, रोगापेक्षा इलाज जालीम म्हणतात त्यातला प्रकार! अंगाला पांढरी माती लावणे आणि डोक्यावर थंड पाण्याचे घडेच्या घडे रिते करणे! यामुळे झाले काय तर भूर्जीखांच्या डोक्यात सर्दीने कायमचे ठाण मांडले. मूळचा पल्लेदार आवाज बसकट झाला आणि स्मरणशक्ती क्षीण झाली! इत्यर्थ इतकाच की सरासरी दोन वर्षे जहांगीरखां यांची तालीम भूर्जीखांना मिळाली. कारण मोतीझऱ्याचा आजार १९१० साली झाला असा खांसाहेब अल्लादियाखां यांच्या आत्मचरित्रात उल्लेख आहे.

वयाच्या विसाव्या वर्षी सुरू झालेले हे घातचक्र भूर्जीखां यांना आयुष्यभर सतावीत राहिले. त्यातून ते बऱ्याच अंशी तंदुरुस्त होऊन बाहेर पडले पण त्यासाठी फार मोठी तपश्चर्या करावी लागली. या तपश्चर्येचा मंत्रही त्यांना मिळाला तो दुसऱ्या तिसऱ्या कोणाकडून नव्हे तर खुद्द शाहू महाराजांकडून! भूर्जीखांबद्दल शाहू महाराजांना तसेच अपत्यनिर्विशेष प्रेम होते असे म्हटले पाहिजे. शाहू महाराजांनी भूर्जीखां यांच्यासाठी जेवढा जीव टाकला तेवय खुद्द खांसाहेब अल्लादियाखां यांनीही टाकला नाही असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

भूर्जीखां क्षीण अवस्थेत उनियाराहून कोल्हापूरला परत आल्यावर सगळ्याच शिक्षणावर पाणी पडले होते. नुसते थंड बसून असत. महाराजांना हे समजल्यावर त्यांनी भूर्जीखांना बरोबर घेऊन खांसाहेब अल्लादियाखांचा जसा काही पाठलागच केला. खांसाहेब अल्लादियाखां मुंबईतच होते. तिथून कलकत्त्यास जायचे होते. शाहू महाराजांनी त्यांना मुंबईतच गाठले आणि सांगितले, 'खांसाहेब, भूर्जीला आता तुम्ही स्वतःच गाण्याची तालीम देणे योग्य होईल. असा मुलगा या वयात स्वस्थ घरी बसवून ठेवाल तर तो कानकोंडा होईल. मी त्याच्यासाठी दरमहा २० रुपये स्कॉलरशिप सुरू करतो.'

प्रत्यक्ष महाराजांनीच सांगितल्यावर खांसाहेब अल्लादियाखांचा इलाजच नव्हता. त्यांनी तालीम सुरू केली पण आजाराने धारणाशक्तीच क्षीण झालेली असल्याने सगळी पढाई व्यर्थ ठरू लागली. कालचे आज नाही, आजचे काल नाही. आणि यात बिचाऱ्या भूर्जीखांचा तरी काय दोष! पण मुलगा इतका कामातून गेला हे पाहून एके दिवशी खांसाहेब अल्लादियाखांना एवढा संताप आला की त्या भरात भूर्जीखांच्या हातातला तंबोरा छिनावून घेऊन ते म्हणाले, 'खत्म हुआ तेरा गाना। चल निकल मेरे सामनेसे। आजसे तेरी तालीम बंद।'

हे शब्द म्हणजे ऋषिवर्यांचा शापच. आता या शापावर उःशाप? बिचाऱ्या भूर्जीखांना मार्गच दिसत नव्हता. इथेही पुनः मदतीला धावले ते शाहू छत्रपतीच. त्याला, थोडेसे निमित्तही घडले. बापू दिंडे नावाचे एक चौघडेवाले होते कोल्हापुरात. महालक्ष्मीच्या मंदिरात चौघडा वाजवीत. कधी अगदीच गरज पडली तर खांसाहेब अलादियाखां या दिंडे महाशयांना तबल्याच्या साथीस घेत. तेवढ्यानेच आपण म्हणजे कुणीतरी अजोड तबलावादक आहोत असा बापूजी दिंड्यांचा समज! माणसे अशी धुंदीत वावरत असली म्हणजे काय वाट्टेल ते बोलत सुटतात. दिंड्यांनी गावात ह्याच्यापाशी, त्याच्यापाशी असे करीत करीत खांसाहेब अल्लादियाखां यांच्या सबंध कुटुंबाची बदनामीच सुरू केली. सांगू लागले, 'खांसाहेब अल्लादियाखां, त्यांचे बंधू हैदरखां आणि आता स्कॉलरशिप घेणारा त्यांचा मुलगा, खरे तर तिघेही दरबारचे नोकर. पण एक जण इमानेइतबारे दरबाराची सेवा करीत असेल तर शपथ! लुटताहेत दरबाराला!'

ही लावालावी शाहू महाराजांच्या कानावर गेल्यावाचून थोडीच राहणार? असे तिढे पायाच्या अंगठ्याने सोडविण्यात महाराज फारच हुशार. त्यांनी भूर्जीखांना बोलावून घेतले आणि म्हटले,

'भूर्जी, तुला एक सवाल विचारू?'

'जी हुजूर, जरूर विचारा.'

'सर्व उपाय हरले तर माणसाने कुणाला शरण जायचे असते?'

'देवाला.'

'तुझी आहे तयारी देवाला शरण जायची?'

'मी तर रोजच अल्लाची दुवा मागतो.'

'देवाची सेवा न करता मागतोस, सेवा करून मागशील तर देव आज ना उद्या तुझी प्रार्थना ऐकेल.'

'यासाठी मी काय करायला हवं?'

'हे बघ तुझ्यासाठी मी महालक्ष्मीच्या मंदिरात गवयाची आणखी एक नवी जागा निर्माण करतो. रोज एक तास तिथं जाऊन गाशील?'

'पण मला तर गाण्याचीच विस्मृती झालीय सरकार.'

'तु प्रयत्न तर कर. महालक्ष्मी ही महासामर्थ्यशाली शक्ती आहे. तुझं विसरलेलं गाणं ती पुन्हा तुझ्या कंठात आणून ठेवील.'

‘मिय्याजींना (अल्लादियाखांना) विचारावं लागेल.’

‘जरूर विचार. पण एकदा सेवा स्वीकारलीस की काही दिवस सेवेत खंड पडता उपयोगी नाही. तू नसलास तर तुझ्यासाठी दुसऱ्या कुणाला तरी तासभर गावंच लागेल.’

‘समजलो सरकार.’

आणि मग भूर्जीखांची करवीरवासिनी महालक्ष्मीच्या मंदिरातील सेवा न चुकता सुरू झाली. प्रथम कित्येक महिने नुसता तंबोराच वाजवीत बसायचे. काही सुचतच नसे. मग नुसता सूर भरू लागले. प्रदीर्घ कालावधीनंतर एकेका चिजेची याद येऊ लागली. याही अवधीत आशानिराशेचा खेळ चालू होताच. गाणे सोडावे आणि शेतीला वाहून घ्यावे असे वाटून दरम्यान शेतीचा प्रयोगही करून पाहिला. पण त्यातही अपयश आणि भरपूर नुकसान आल्याने मित्रांनी भूर्जीखांना पुन्हा देवीच्या सेवेकडे वळवले. आता आस्ते आस्ते यश येऊ लागले. घरी हैदरखांसाहेब तालीम देऊ लागले. कारण पिताश्रींनी ती वाट कधीच बंद करून टाकली होती.

भूर्जीखांनी मग देवीच्या सेवेबरोबरच आणखी एक प्रयोग केला आणि सगळया पूर्वस्मृतींना जाग यायला तोच उपयोगी पडला. कर्नाटकातील ‘वंटमुरी’ खेड्यातून एक मुलगी कोल्हापूरला गाणे शिकण्यासाठी आली होती. तिला भूर्जीखांनी तालीम द्यावी अशी मित्रांनी गळ घातली. प्रथम ते नाही म्हणाले, पण अतिशयच आग्रह झाल्यावर एक प्रयोग म्हणून भूर्जीखांसाहेबांनी मित्रांची विनंती मान्य केली. शिक्षणशास्त्राचे हे मुळी तत्त्वच आहे की शिकणाऱ्यापेक्षा शिकवणाऱ्याची बुद्धी अध्यापनामुळे अधिक तेज होते. भूर्जीखांसाहेबांच्या बाबतीत यथावकाश याचा प्रत्यय आला. खांसाहेब अल्लादियाखां यांनी याबाबत आत्मचरित्रात लिहिले आहे:

“दुसरेको बतानेकी जिम्मेदारी पडनेसे भूरजीको खुदको, गानेकी तरफ बहोत ख्याल करना पडा। नसिरुद्दिनकी और मंजीकी तालीमकी चीजें उन्हे बहोतही याद थी, उससेभी उसे बहोत फायदा हुआ। मैंने उसे बताई हुई बहोतसी चीजे, भूल गयी थी। उस लडकीको बतानेसे और महालक्ष्मी के देवलमे गानेसे भूरजीके गानेमें बहोत फर्क हुआ।”

महालक्ष्मीच्या मंदिरात जो नऊ कमानींचा पहिलाच सभामंडप आहे तिथे भूर्जीखां सेवेसाठी बसत. त्यांच्या गाण्यात होत असलेला फरक कर्णोपकर्णी थोरल्या खांसाहेबांच्या कानावर येऊ लागला. मग स्वतःच खात्री करून घ्यावी म्हणून आधी कुणालाही न कळविता खांसाहेब अल्लादियाखां महालक्ष्मी मंदिरात गेले आणि प्रवेशद्वारानजिकच्या गणपती मंदिराच्या पायऱ्यावर बसून भूर्जीखांचे गाणे ऐकताना त्यांना आनंदाश्रू आवरेनात. परतताना

पुन्हा पुन्हा मागे वळून महालक्ष्मीला अभिवादन करीत होते. भूर्जीखांसाहेब मंदिरातून परत येताच त्यांना कडकडून मिठी मारून म्हणाले, "बेटा भूर्जी, बदकिस्मतीसे जो कुछ हुआ सो हुवा. आजसे ये तानपुरा फिर तेरे हाथमें देते हुए मुझे बड़ी खुशी होती है. अल्ला तेरा भला करे."

भूर्जीखांच्या आयुष्यातील तो धन्यतेचा क्षण होता. सीतेप्रमाणे भूर्जीखांनीही एक अग्निदिव्यच करून दाखवले होते यात शंका नाही.

*            *            *

'महालक्ष्मी मंदिरातील नित्याची सेवा भूर्जीखांना आयुष्याच्या अंतापर्यंत उपकारक ठरली' असे एक वाक्य कै. गोविंदराव टेंबे यांनी खांसाहेबांच्या संदर्भात लिहून ठेवले आहे. त्याचे मर्म इतक्या विस्ताराने ती हकीकत सांगितल्यावर लक्षात यायला हवे. या सेवेतून त्यांच्यातील गायकाचे पुनर्वसन झाले आणि सेवेतूनच त्यांच्यातील सुप्त अध्यापकीय गुणांना वाव मिळून एक असाधारण योग्यतेचा शिक्षक आकाराला आला. जयपूर गायकीचे मर्म शागीर्दाला सोप्यांत सोपे करून सांगणे हे अवघडांतील अवघड काम. पण खांसाहेब भूर्जीखां यांची आजचे सर्वच मान्यवर कलावंत तारीफ करतात ती, हे मर्म ते अत्यंत कुशलतेने समजावून देत यासाठीच. विशेषतः आधी एखाद्या अन्य घराण्याची गायकी गळ्यावर चढलेल्या कलावंताला खांसाहेबांच्या या कौशल्याचा प्रत्यय हटकून आलेला दिसतो. पं. मल्लिकार्जुन, मन्सूर यांनी 'मुलखावेगळी माणसे' या ग्रंथातील एका लेखात आत्मचरित्रपर निवेदन केले आहे. खांसाहेब भूर्जीखां कधीच विलायतेस गेले नसताना पं. मन्सूर यांनी खांसाहेबांना विलायतची वारी घडवून आणली, हा त्या निवेदनातील दोष कोणाच्या तरी अनवधानाने घडला असला पाहिजे. पण खांसाहेबांच्या शिक्षण पद्धतीची मन्सूर यांनी केलेली तारीफ अगदी स्पष्ट आहे. पं. मन्सूर यांनी खांसाहेब मंजीखां यांचा गंडा बांधून शिकायला सुरुवात केली ती ३५ साली. मंजीखां ३७ साली अकस्मात वारले तेव्हा मन्सूर यांची स्थिती किती चमत्कारिक झाली होती ते त्यांच्याच शब्दात बघण्याजोगे आहे. पं. मन्सूर म्हणतात :

"[मंजीखां यांच्या निधनानं] व्यक्तिशः मला तर माझ्यावर आभाळच कोसळल्यासारखं वाटलं. मी इथं नाही, तिथं नाही, मध्येच पडलोय अशी माझी त्रिशंकूसारखी अवस्था झाली. माझी ग्वाल्हेरी गायकी राहिली नाही आणि मंजीखांसाहेबांची गायकी मला नीट समजली नाही अशा कात्रीत मी सापडलो... पुढे भूर्जीखांसाहेबांनी मंजीखां साहेबांच्या गायकीची रीत, वैशिष्ट्य सांभाळून तिची उपज किती करावी हे मला व्यवस्थित समजावून सांगितले. त्या गायकीची मूलतत्त्वं मला तेव्हा समजली. मला या गायकीचा आत्मा तेव्हा समजला."

पं. गजाननबुवा जोशी यांनी खांसाहेब भूर्जीखां यांच्याकडे त्यांचे शिक्षण सुरू झाल्यावरचा अनुभव आपल्या आत्मचरित्रात याहून मुक्तपणे दिला आहे. बुवांनी म्हटले आहे, "त्यांच्या घराण्याची गायकी इतकी वेगळी की ती मला भयंकर अवघड वाटली. मला काही ती गायकी जमेना. ज्या तऱ्हेनं खांसाहेब खानेपुरी करीत त्या तऱ्हेनं तालात स्वररचना फेकणं मला जमेचना. किती तरी प्रयत्न केला पण ही कधीच जिंकली न जाणारी झटापट दोनतीन महिने चालल्यावर मी थकलो, आणि खांसाहेबांना म्हटलं, "खांसाहेब मला काही तुमच्या पद्धतीचा उलगडा होत नाही. तेव्हा आता मला तुम्ही दोन पलटे बांधून शिकवा. एरवी माझ्या लक्षात येणार नाही. तेव्हा त्यांनी मला ठाय त्रितालातील दोन उपजांचे पलटे बांधून शिकवलं. मग मात्र मला लगेच गती मिळाली."

श्रीमती धोंडूताई कुलकर्णी या काही उपरिनिर्दिष्ट ख्यातनामांप्रमाणे अन्य घराण्यांकडून या घराण्याकडे वळलेल्या नव्हत. त्यांना शिकविण्यासाठी खांसाहेबांनी अगदी वेगळे तंत्र अवंलबिले. जो राग शिकवायचा त्यातील दोनतीन स्वरांचा तुकडा बांधून सुरुवातीला घटवून घेत असत. धोंडूताई खांसाहेबांकडे शिकू लागल्या त्यावेळी त्यांचे वय चौदा. लहान वयात रोजची तालीम झेपणार नाही म्हणून खांसाहेब आठवड्यातून दोन दिवस याप्रमाणे महिन्यातून आठ दिवस तालीम देत. म्हणजे आठवड्यास सहा दिवस रियाझच चालायचा. पहिले दीड वर्ष मुलतानी शिकवला. दुपारचे शिकवायला जात तीन-साडेतीनला. त्यामुळे समयानुकूल म्हणून त्यांनी तो राग घेतला. मग पूर्वी रागातील अस्थायी सांगितली. उपज कशी करावी, अनाघाती कसे उठावे हे सगळे व्यवस्थित सांगून घटवून घेत. आपली शिष्या सकाळच्या वेळी सूर भरणे, रियाझ करणे हे सर्व व्यवस्थित करते की नाही हे बघण्यासाठी पहाटेच्या वेळी फिरायला बाहेर पडले म्हणजे खांसाहेब धोंडूताईंच्या घराभोवती एकदोन चकरा टाकून जात. मेहनत ऐकल्याची जाणीव देत.

धोंडूताईंना तिसरा राग सांगितला तो खंबावती. मैफिली सामान्यतः रात्रीच्या असतात. कुणी गा म्हटले तर रात्री मुलतानी अथवा पूर्वी कशी गायची? म्हणून खंबावतीतील 'आली मैं जागी' ही प्रसिद्ध चीज सांगितली. मुंबईला हिराबाईंकडे गणपति-उत्सवातली अखंड गानरात्र होती ती. श्रीमान रामूभय्या दाते, श्रेष्ठ हार्मोनियमवादक कोरगावकर, श्री. शंकरराव सरनाईक अशी सगळी मंडळी हजर असता पहाटे तीन-साडेतीनला हिराबाईंनी धोंडूताईंना गायला बसवले आणि त्या खंबावती गायल्या. खांसाहेबांच्या तालमीचे पक्केपण असे की, ती खंबावती ऐकताच रसिकाग्रणी दाते उद्गारले, "मुलीचं वय काय, शिक्षण काय आणि काय हो गाऊन गेली लाजबाब!"

पण अनाघाती उठावणीने सलग स्वरदर्शन करीत अथपासून संपूर्ण आकाराने स्वरवाक्ये जोडीत जाण्याची आणि संपूर्ण बंदिशीला एकसंघ रूप देण्याची या घराण्याची किमया ज्याला एकदा हस्तगत झाली त्याला कोणत्याही रागाची मांडणी करणे मग कठीण वाटत नाहीच. पं. वामनराव सडोलीकर एकदा मला म्हणाले, "मात्रांची समविषम विभागणी करून वेगवेगळया प्रकारांनी त्यांची जडणघडण कशी करावी हे भूर्जीखांसाहेब अगदी बाळबोध करून सांगत. साधा धीम्या त्रितालाचा ठेका असला तर सोळा मात्रांचे आधी चार खाने. प्रत्येक खान्यातील चार मात्रा कशा विभागाव्यात याचे अनंत प्रकार सुचवून अनाघाती फिरणे म्हणजे काय याची निर्दोष कल्पना देत. एकदा घराण्याची ही तरकीब आत्मसात झाली की पुढे सगळे सुरळीत व्हायचे. कागदावर लिहायला हे सर्व सोपे वाटते पण लयीची ही काटछाट प्रत्यक्ष गाणाऱ्याला किती प्रयासाने लाभला असेल है 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे'

एक थोर गुरू म्हणून खांसाहेबांची ओळख करून देण्यासाठी एवढ्या तपशिलात शिरलो. पण आणखी एक किस्सा सांगितल्याशिवाय हा तपशील पूर्ण होणार नाही.

श्रीमती शोभा गुर्टू यांच्या मातुःश्री श्रीमती मेनका शिरोडकर या एके काळी खांसाहेब भूर्जीखां यांच्या शागीर्द होत्या. 'सुकुमारं प्रहरणं महेन्द्रस्य' हे कालिदासाने उर्वशीचे केलेले वर्णन त्या काळात मेनकाबाईंना यथार्थत्वाने लागू पडले असते. त्यांनी संगीत सृष्टीचा निरोप घेतला हे श्रोत्यांचे दुर्भाग्य. पण त्या गात्या राहत्या तर काय घडू शकले असते याची कल्पना पुढे देत असलेल्या घटनेवरून यावी.

बहुधा ३८ किंवा ३९ साल असेल. सेठ धनराज गिरजी यांच्या वाढदिवसानिमित्त लागोपाठ दोन रात्री गायनवादनाची मैफिल योजिली होती. पहिल्या रात्री सर्वांत शेवटी सूरश्री केसरबाई गाणार होत्या. त्यांच्या आधी श्रीमती मेनकाबाई जयजयवंतीमधील 'जिया तरपत' हा ख्याल निव्वळ आलापी अंगाने असा पेश करून गेल्या की कैसरबाईंनाच त्या नंतर स्वतः गायला बसणे प्रशस्त वाटेना. ही जयजयवंतीच्या आलापीने पैदा केलेली हवा आपण बदलू शकणार नाही असे वाटताच त्यांनी आयोजकांना सांगितले. 'मी आज गाऊ शकत नाही. उद्या शेवटी गाऊन मैफिलीची सांगता करीन.'

मेनकाबाईंच्या कानी हे गेल्याशिवाय थोडेच राहणार! म्हटले तर त्यांच्या अपूर्व विजयाचा तो क्षण होता. त्यांना स्वतःच्या गायकीचा तर अभिमान वाटलाच पण त्याहीपेक्षा गर्व वाटला आपल्या गुरूचा - खांसाहेब भूर्जीखांचा. खांसाहेबांचा त्या वेळी मुक्काम मुंबईतच होता. एवढेच नव्हे तर त्यांचे सहकुटुंब सहपरिवार वास्तव्यही मेनकाबाईंच्या घरीच होते. आपल्या जयजयवंतीने मैफिलीची काय अवस्था झाली हे गुरुवर्यांना केव्हा कळवीन

असे श्रीमती मेनकाबाईंना झाले. त्या तडक निघाल्या त्या सॅण्डहर्स्ट ब्रिजवरील दादाजी धाकजी बिल्डिंगमधील आपल्या निवासस्थानी आल्या. गुरुभक्तीचा उमाळा एवढा जबरदस्त होता की लिफ्ट खाली येण्याचीही वाट न बघता भराभर जिने चढून त्या वर गेल्या आणि खांसाहेब भूर्जीखांना बघताक्षणी त्यांनी साष्टांग नमस्कार घातला! या शुभघडीची आठवण म्हणून दुसऱ्या दिवशी त्यांनी खांसाहेबांना एक उत्तम हिऱ्याची अंगुठीही नजर केली. आज ती बघितली म्हणजे या घटनेचे स्मरण होते आणि मेनकाबाई गाण्याकडेच पाठ फिरवून निघून गेल्या याचा खेद होतो.

मंजीखांसाहेब हयात होते तोपर्यंत ते व भूर्जीखांसाहेब यांच्या जुगलबंदीच्या मैफिली होत. पण त्यांनी एकट्याने रंगविलेल्या किती तरी मैफिली अजूनही आठवणारे श्रोते आहेत. पोद्दार कॉमर्स कॉलेजमध्ये प्राचार्यपदी श्री. वेलीनकर असताना ४०-४१ साली खांसाहेबांनी गायलेला मुलतानी अजून आठवणीत आहे. श्री. कामूराव मंगेशकर साथीला होते. १९४४ साली मुंबईत भरलेल्या विक्रम कॉन्फरन्समध्ये शेवटच्या दिवशी सर्वांत शेवटी खांसाहेब अल्लादियाखां अत्यंत गाढ्या लयीत रामकली गायले. त्यावेळी त्यांची स्वरसाथ करण्यास एका बाजूला खांसाहेब भूर्जीखां हेच होते. नाही तरी थोरल्या खांसाहेबांच्या गाड्या लयीचे शिवधनुष्य पेलणे एरवी कुणाला जमणार होते? ४५ साली दिल्लीत रायबाबू आणि श्रीमती निर्मला जोशी यांनी भरविलेल्या संगीत परिषदेत खांसाहेबांचे गाणे झाल्यानंतर उस्ताद थिरकवां यांनी त्यांना स्टेजवरच कडकडून मिठी मारली. गायनाच्या प्रशंसेची तर ती द्योतक होतीच पण ३६ सालातली ‘त्या’ मैफिलीची कटू आठवण कुठे शिल्लक असलीच तर उभयपक्षी ती संपवून टाकणारीही होती.

एक माणूस म्हणून भूर्जीखांची योग्यता तितकीच मोठी होती. चित्रकलेचा छंद, घराण्याची सभ्यता आणि रीतभात पाळणारा निर्व्यसनीपणा, हे तर त्यांचे विशेष होतेच पण प्रकृतिअस्वास्थ्य आणि सिनेसृष्टीत केलेली आर्थिक साहसे अंगावर बेतल्याने आलेली अगतिकता यांचा मनस्वी ताण मनावर असताही त्यांच्यातला माणूस त्यांना कधीच सोडून गेला नाही. पं. वामनराव सडोलीकर खांसाहेबापेक्षा वयाने लहान. पण खांसाहेबांनी आदरार्थी बहुवचनाशिवाय त्यांना कधी हाक मारली नाही. एकदा तर खांसाहेब सडोलीकरांना म्हणाले,

“तुमच्या सडोलीकर घराण्यानं आमच्या प्रत्येक वेदनेत सहभागी व्हावं असं आमच्यापाशी काय हो आहे वामनराव?”

प्रश्न अगदीच अनपेक्षित होता. वामनराव चटकन बोलून गेले. ‘खांसाहेब आपली विद्या’.

हे उत्तर खांसाहेबांनी बरेच दिवस मनात ठेवले होते, आणि मग रंकाळ्याच्या काठावर एका संध्याकाळी वामनरावांशी गुजगोष्टी करता करता म्हणाले,

“वामनराव, तुम्ही आमच्या वेदनांत सहभागी झालात. आम्ही हे ध्यानात ठेवून आमच्या विद्येतही सहभागी करून घेतलं पाहिजे तुम्हाला.”

या संवादानंतरच वामनराव सडोलीकरांचे गंडाबंधन झाले आणि त्यामुळे त्यांना आणि त्यांचे धाकटे बंधू श्री. मधुकर सडोलीकर यांना जयपूर गायकीच्या सर्व वेशी मोकळ्या झाल्या. सडोलीकरांचे कोल्हापुरातील घर हे खांसाहेबांनी मनाने आपले दुसरे घरच मानले होते. अगदी हृदयाच्या चोरकप्प्यातील व्यथाही त्या घरी उघडी होई. एकदा तर मोठीच गंमत झाली.

दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते. खांसाहेब अल्लादियाखां आणि भूर्जीखां, सगळीच मंडळी कोल्हापूरच्या घराला टाळे लावून मुंबईला राहायला गेली होती. खांसाहेब भूर्जीखां कोल्हापुरात नसले म्हणजे देवीपुढची सेवा श्री. मधुकर सडोलीकर करीत. गुरूजींचे इतरही व्यवहार पाहत. एकदा मुंबईहून चिठी घेऊन एक माणूस आला. चिठीत लिहिले होते, “लढाईमुळे मुंबईत तलम धोतरजोही मिळत नाही. थोरले खांसाहेब तर दुसरं काही नेसूच शकत नाहीत हे तुला (मधुकर सडोलीकर) ठाऊक आहेच. म्हणून आता असं कर. आमचं घर उघड. वरच्या मजल्यावरील ट्रंकेत वरच्याच अंगाला मी माझ्यासाठी घेऊन ठेवलेली एक मर्सराइज्ड धोतरजोडी आहे. ती चिठी घेऊन येणाऱ्या इसमाबरोबर ताबडतोब पाठवून दे.”

नाना सडोलीकरांनी त्या बरहुकूम घर खोलून ट्रंक उघडली. नवी कोरी धोतरजोडी उचलली आणि एकदम त्यांना भीतियुक्त आश्चर्याचा धक्का बसला. कारण उघडच होते. नव्या धोतरजोडीखाली घरातली सगळीच चीजवस्तू! शिवाय एक नवा कोरा चांदीचा तांब्या. तोही रिकामा नव्हे, कलदार सुर्ती रुपयांनी भरलेला! नानांनी तांब्या चटकन ओळखला, मुंबईस परतण्यापूर्वी खांसाहेब अल्लादियाखां आणि खांसाहेब भूर्जीखां यांची सांगलीस जी बैठक झाली तिची बिदागी होती ती. पण म्हणून काय झाले? इतके पैसे आणि एवढी चीजवस्त अशी घरात ठेवून गुरुवर्य अनेक दिवसांसाठी मुंबईस जातात आणि यात त्यांना जोखीम वाटू नये? कोल्हापूरला चोरांचे संमेलन भरून शहरात कुठेही चोरी न करण्याचा ठराव चोरांनी मंजूर केला आहे असे का वाटते खांसाहेबांना? सडोलीकर लगेच कागदपेन्सिल घेऊन बसले. ट्रंकेतील सर्व चीजवस्त त्यांनी नोंदवली. दोन याद्या करून एक आपल्याकडे ठेवून दुसरी मुंबईस धाडली. त्यासोबत मर्यादाभंग न करता होईल तेवढा संताप व्यक्त करणारी चिठीही धाडली. त्या चिठीला खांसाहेबांनी टपालाने काय उत्तर धाडावे? खांसाहेबांनी लिहिले,

'अरे नाना, आम्ही एक चूक केली, पण ट्रंकेत एवढी चीजवस्त आहे हे आढळून आल्यावर तू ती ट्रंक तुझ्या घरी का नाही नेऊन ठेवलीस? अखेर तुझं घर हे माझंही दुसरं घर नाही काय?" माणसाचे उमदेपण हे अशा गोष्टींवरून समजते. भूर्जीखांचा दुसरा गुण म्हणजे दिल्या शब्दाला जागणे. फारच थोड्या कलाकारांना जीवनात हे मूल्य सांभाळता येते. भूर्जीखांसाहेबांनी एखाद्याला शागीर्द म्हणून स्वीकारले की गंडाबंधनानंतर महिनोन्-महिने फी दिली नाही तरी एका शब्दाने कधी मागणी करायचे नाहीत. घरात अडचणींचे डोंगर उभे असले तरी हे हक्काचे पैसे त्याने द्यावेत असे हस्ते परहस्ते सुचवायचेदेखील नाहीत. आपण शब्द दिलेला आहे. तो पाळला पाहिजे. त्याच्या तालमीत खंड पडता उपयोगी नाही यासाठी ते जपत. शिष्याच्या सोयीसाठी, अगदी अशी फी देण्यास टाळाटाळ करणाऱ्या शिष्यांच्या सोयीसाठीही दिवसातून दोनदोन वेळा तालीम देत. एक असे शिष्य चांगली प्रतिष्ठेची नोकरी मिळताच कोल्हापूर सोडून निघाले गुरुजींचा निरोप घेण्यास आले. त्या क्षणीदेखील तुझी इतक्या वर्षाची फी थकली आहे ती केव्हा देतोस? हा प्रश्न काही या निर्लोभ गुरूंनी विचारला नाही, त्यांचे अभिनंदन करून त्यांना गौरवाने निरोप दिला.

एखाद्या बैठकीसाठी दिलेला शब्दही वाट्टेल त्या परिस्थितीत खांसाहेब भूर्जीखांनी पाळला आहे. पुण्यात भानुविलासमध्ये डॉ. पाबळकरांनी आयोजित केलेल्या जलशात, प्रकृती खूप बिघडलेली असताही खांसाहेब गायले. याचे कारण डॉ. पाबळकरांना दिलेला शब्द. अशा वृत्तीने वचनाला जपणाऱ्याला मग ती बैठकही सांभाळून नेते एवढेच नव्हे तर ती संस्मरणीय करते. भानुविलासमध्ये तसेच झाले. खांसाहेब अझमतखां खांसाहेब भूर्जीखां यांच्या आधी बसून अत्यंत तय्यार असा पूर्वी गाऊन गेले होते. अझमतखां वयाने तरुण, तडफदार तर भूर्जीखां आजाराने पोखरलेले. ते कसा काय रंग जमवितात. याची चिंताच लागून राहिली होती सर्वांना. पण खांसाहेबांनी हेमनट मधील 'तुमबिन मैको' ही अस्थायी सुरू करून पुया दमसासाने संपूर्ण आवर्तनात ती मांडून सम गाठताच टाळयांच्या कडकडाटाने सारे भानुविलास दणाणून गेले. इतकी वर्षे झाली तरी पुण्याच्या रसिक श्रोत्यांना त्या रंगलेल्या हेमनटाची याद आहे.

या चंद्राला अधूनमधून असे अनेक शुक्लपक्ष आले, पण कृष्णपक्षांनी शुक्लपक्षावर ताण करावी असेच त्यांच्या आयुष्यात वारंवार घडले आहे. ४६ साली खांसाहेब अल्लादियाखां आजारी पडले आहेत असे कळताच खांसाहेब भूर्जीखां कोल्हापुराहून तडक मुंबईस गेले आणि पित्याचा दैवदुर्विलास असा की, सर्वेअर बिल्डिंगच्या त्या फ्लॅटमध्ये आजारी पितापुत्रांची दोन अंथरुणे झाली. सूर्यचंद्रासारखे हे पितापुत्र दोन खोल्यांत सर्वांच्या

जिवाला घोर लावून पहुडलेले. थोरल्या खांसाहेबांचे वय ९१ आणि भूर्जीखांसाहेबांचे ५६. पण मधुमेह आणि मूत्रपिंड या दोन आजारांनी भूर्जीखांसाहेबांची अवस्था अशी काही करून सोडली की ज्येष्ठाआधी कनिष्ठाचे मरण बघण्याचा प्रसंग पुनः एकवार थोरल्या खांसाहेबांवर येतो काय अशी भीती क्षणाक्षणाला वाटत होती. पण १६ मार्च १९४६ रोजी खांसाहेब अल्लादियाखां यांनी इहलोकाचा निरोप घेतल्याने मृत्यूने सर्वेअर बिल्डिंगवर टाकलेले पाश आवरते घेतले. पुढे श्रीमती धोंडूताईंनी भूर्जीखांसाहेबांना हैद्राबादला नेऊन त्यांच्या आयुर्वेदीय उपचार कसोशीने केल्यामुळे भूर्जीखांसाहेब पुन्हा तंदुरुस्त झाले. त्यांचा तो पुनर्जन्मच होता. महालक्ष्मीच्याच कृपेने तो लाभला ही कबुली देऊन खांसाहेबांनी आजारामुळे खंडित झालेली महालक्ष्मीची सेवा पुनः सुरू केली. आजाराच्या काळात ती सेवा कधी पं. मन्सूर तर बऱ्याच वेळां नानासाहेब सडोलीकर चालवीत.

तर पुन्हा एक शुक्लपक्ष सुरू झाला. आता थोरले खांसाहेब हयात नव्हते. आता भूर्जीखांना वडिलांचे वळण, त्यांची कीर्ती, त्यांच्या प्रथा, त्यांचे मानदंड हे सर्व सांभाळायचे होते. कुलधर्म समजून खांसाहेब परंपरा चालवू लागले. सांगलीच्या सांबारे वैद्यांकडील अनंतचतुर्दशीची मैफिल या कुलधर्मातच बसे. भूर्जीखांनी ती सकाळची बैठक ४६ नंतर तीनच वर्षे सांभाळली. त्याला त्यांचाही इलाज नव्हता. ४६ ते ५० एवढा चार वर्षांचाच अखेरचा शुक्लपक्ष त्यांच्या कुंडलीत होता.

४९ सालची सांबारे वैद्यांकडची अनंतचतुर्दशीची ती सकाळची मैफल आठवली की, भूर्जीखांच्या स्वभावाचे अनेक पैलू एकसमयावच्छेदेकरून दृष्टीस पडतात. थोरल्या खांसाहेबांचा संतापी स्वभाव त्यांनी किती उचलला होता है जसे यावेळी ध्यानात आले तसेच आपल्या आवडत्या शिष्याला न सांगितलेला राग अनवधानाने सुरू केला गेला तर पहिल्या पाचदहा मिनिटांत त्याची मांडणी मैफिलीला नकळत शिष्याच्या गळयात कशी उतरवायची हे थोरल्या खांसाहेबांचे कसब भूर्जीखां यांच्याकडेही कसे पुरेपूर होते याचा प्रत्यय या बैठकीच्या वेळी आला. खांसाहेबांचा संताप अकारण नसेच. सच्च्या गुणांना दाद न देणारे कद्रू बैठकीत समोर आढळले की ते संतापत.

त्या अनंतचतुर्दशीस सांगलीला तेच घडले. सकाळची मैफल. प्रथम पं. मधुकर सडोलीकर रामकली गायले. खूप जमले होते. सगळी मैफल दाद देत देत रामकलीचा आस्वाद घेत होती. पुढ्यात गुरुवर्य भूर्जीखां बसलेले. आपल्या शिष्याचे होत असलेले कौतुक पाहून त्यांना धन्यता वाटत होती पण त्याबरोबरच विषादही वाटत होता. श्रोत्यांत अगदी पुढेच बसलेले एक गायक सडोलीकरांच्या एकाही समेला दाद देत नव्हते; त्यांची

मानदेखील वरखाली होत नव्हती. मख्ख चेहरा करून आणि जणू पुतळा करण्यासाठी पोज दिली आहे अशा आविर्भावात ते बसले होते.

सडोलीकरांच्या मागून खांसाहेब स्वतः गायला बसले. नित्य सहचारिणी असलेली मुठीची काठी पुढ्यात होतीच. एकदम काय मनात आले कुणास ठाऊक? लंकादहन सारंगातील ख्याल खांसाहेबांनी सुरू केला. पहिले आवर्तन संपताच त्यांच्या ध्यानात आले की साथीस बसलेल्या मधु सडोलीकरांना या रागाची तालीम पोचलेली नाही. मग पहिल्या पाच-सात मिनिटांतच खांसाहेबांनी रागाचे चलन आणि ये-जा ची पद्धत सिलसिलेवारपणे दाखवून ती सडोलीकरांच्या लक्षात आणून दिली. सडोलीकरांचेही वैशिष्ट्य हे की, त्या ५-७ मिनिटांत लंकादहन सारंग त्यांनी जसा आत्मसात केला तसा उभ्या हयातीत केला नसेल. मैफलीचा दबाव ही एक विलक्षणच गोष्ट असते. आटोकाट एकाग्रतेने शिष्य त्यावेळी गुरूची शैली उचलीत असतो. बिलंपत विकसित होत गेली. पुढे खांसाहेबांचे गमकेचे पलटे सुरू झाले. एका आवर्तनात समेला अर्धी मात्रा उरली असताना प्रकृतिदौर्बल्याने खांसाहेबांचा श्वास तुटला! मधुकरराव सडोलीकरांची समयसूचकता एवढी दांडगी की पापणी लवण्यासही अवसर न देता विजेच्या वेगाने सट्टा मारून त्यांनी ती अर्धी मात्रा समेशी जोडली. त्यासरशी मात्र ‘रामकली’ च्या वेळी दाद न देणाऱ्या त्या गवईबुवांनी ‘ये बात है’ असा उत्स्फूर्त पुकारा केला! ही वाहवा सडोलीकरांच्या कौतुकापोटी नसून आपला श्वास तुटला या गोष्टीचा उणेपणा दाखविण्यासाठी आहे असे खांसाहेबांना वाटले आणि मूळचा संतापी स्वभाव उफाळून वर आला. पुढ्यात पडलेली काठी आपटून ते गर्जले,

“माझ्या आधी मधू जीव तोडून रामकली गायला तेव्हा एकदाही मान हलली नाही तुमची नि आता माझ्या तुटलेल्या श्वासावर टांच मारण्याची आलेली संधी हातची जाऊ नये म्हणून त्याला वाहव्वा देऊन मैफलीच्या डोळयांत धूळफेक करता काय? वा रे तुमची रसिकता!”

खांसाहेबांचा लंकादहन रंगला पण ही दाहक आठवण मागे ठेवून गेला. त्या दिवशी मैफिल संपली तरी खांसाहेबांचा संताप संपुष्टात आलेला नव्हता, तंबोरे गवसणीआड होत असतानाच खांसाहेब सर्वांच्या दृष्टीआड झाले. साबांऱ्यांच्या माडीवर जाऊन एकटेच विचारमग्न बसून राहिले. खाली सगळी पंगत त्यांच्यासाठी खोळंबून राहिली होती. पण ते असे साडेतीन सप्तके ओलांडून संतापले की पुनः मूळचा षड्ज गाठायला फार फार प्रयास पडत.

खांसाहेब सरलस्वभावी पण तितकेच मानी होते. आपल्या प्रकृतीमुळे आपण इतरांच्या

करूणेचा विषय व्हावे हे त्यांना मुळीच मान्य नसे. मानी माणूस अशा वेळी चिडचिडा होतो, त्या चिडचिडेपणातून प्रकृती आणखी बिघडते. सांबाऱ्यांकडील बैठकीचे हे एक निमित्त घडले आणि पुढील सहा महिन्यांत खांसाहेबांच्या प्रकृतीने अनिष्ट वळण घेतले. मुळात मधुमेह होताच, मूत्राशयाचा आजार पुढे आणखी बळावला आणि अखेर हृदयविकारही झाला. खांसाहेबांनी मनात काय ठरवले होते कुणास ठाऊक? बहुधा ताठ मानेने मृत्यूला सामोरे जायचे असा निश्चय केला असावा त्यांनी. मे महिन्याचे दिवस होते. पुन्हा एकदा धोंडूताईंबरोबर हैद्राबादला जाऊन आयुर्वेदिक उपचार करून घेण्याचे बेत चालले होते. पण उन्हाळा संपला की जाऊ या असे सांगून त्यांनी ते लांबणीवर टाकले.

पाच मे १९५०..! दोघांना या दिवसाची जन्माची आठवण. ते दोघे म्हणजे धोंडूताई कुलकर्णी आणि नाना सडोलीकर. त्या दिवशी शिष्य तालीम नको म्हणत होते पण गुरूला शेवटची बंदीश सांगून निरोप घ्यायचा होता. सौम्यसा हृदयविकाराचा झटका आलेला असताही दुपारी धोंडूताईंना काफी कानड्यातील ‘मन मे सोच करो’ ही अस्थायी सांगितली. संध्याकाळी मधुकर सडोलीकर प्रकृती बघायला म्हणून आले होते. त्यांना म्हणाले,

“बसलास काय, तंबोरा काढ.”

“आज तालीम नाही झाली तरी मला चालेल.”

“पण मला चालणार नाही.”

आवाजात जरब होती. सडोलीकर काहीशा नाखुशीनेच तालमीस बसले. काही तरी गाऊन आपण वेळ मारून नेऊ असे त्यांनी मनाशी ठरवले होते. तेवढ्यात खांसाहेब पुनः म्हणाले,

“रोजचा स्वर नको, चांगला पांढरी चारमध्ये लाव तंबोरा.”

आणि रोज शिष्यांना ‘हां चलो, म्हणणारे गुरुवर्य स्वतःच घुमारेदार षड्ज लावून धवलाश्री रागातील ‘तोहे कैसे देऊ वे’ हा ख्याल सांगू लागले. मध्य सप्तकातील निषादापर्यंत जाऊन धैवताला स्पर्श करून ते पंचमावर स्थिर झाले. तेव्हा मधू सडोलीकर यांच्या पोटात धस्स झाले! वाटले, आजचा रंग काही वेगळा दिसतो. दिवा विझण्यापूर्वी मोठा होतो म्हणतात तसे तर हे नसेल? मनात अशुभाची पाल चुकचुकली. सडोलीकरांनी ती बाहेर बोलून दाखवली नाही इतकेच. तालीम संपताच खांसाहेब म्हणाले,

‘उद्या तुला पन्हाळगडाला जाऊन यायला हवं.’

‘कशाला?’


‘मुंबईहून शंकरराव देशपांडे आलेत. [सुहासिनी मुळगावकरांचे वडील.] त्यांच्या

सोबतीलाकुणी तरी गेलं पाहिजे. संध्याकाळी पाचपर्यंत सहज परत याल.'

सडोलीकरांना नाही म्हणायची सोयच नव्हती. दुसऱ्या दिवशी ते पन्हाळगडला जाऊन पाचपर्यंत परत आलेही. पण काय उपयोग होता? येताक्षणी खरी गल्लीतील खांसाहेबांचे घर त्यांनी गाठले. तिथे दोन सूर्य मावळत होते. एक आकाशात आणि दुसरा खांसाहेब अल्लादियाखां यांनी संपादन केलेल्या वास्तूत. 'धवलाश्री' ची बंदीश अधुरीच राहिली होती.

असे हे खांसाहेब भूर्जीखां, श्रीमती लक्ष्मीबाई जाधव, श्रीमती आझमबाई, श्री. भाऊराव टेंबे, श्री. मधू कानेटकर, श्री. कल्लुबुवा कुलकर्णी, सडोलीकर बंधू, पं. गजाननबुवा जोशी, श्रीमती धोंडूताई कुलकर्णी, पं. मन्सूर, सी. बालाजी, या साऱ्यांचे गुरु. एक थोर गुरू म्हणून ते अमरच राहणार आहेत कारण इतक्या शिष्यांच्या द्वारा प्रसृत झालेली जयपूर गायकी अमरच आहे. भूर्जीखांचे सुपुत्र श्री. अजीजुद्दीन ऊर्फ बाबा यांना वैद्यकीय कारणासाठी मैफिलीत गायचे नसले तरी अनवट रागातील चिजा घेण्यासाठी अजूनही ही शिष्यमंडळी बाबांकडे हक्काने येतात तेव्हा भूर्जीखां यांचे पूर्वीचे ऋण स्मरूनच येतात. ५५ सालानंतर पं. मन्सूर सहकुटुंब कोल्हापूरला येऊन राहिले आणि बाबांकडून अनेक अछोप रागातल्या चिजा घेऊन गेले. हे देणे जोवर चालू आहे तोवर भूर्जीखांचे जाणे खरे असूनही खरे नाही असेच म्हणत राहावे लागणार!

❀ ❀



# ६. मोगूबाईंचे मतलबी टीकाकार

सूरश्री केसरबाई केरकर यांचे चरित्र त्यांचे बंधू बाबुराव केरकर यांनी १९८३ साली लिहिले. जयपूर गायकीत स्वतःचे एक अनन्यसाधारण स्थान अपार मेहनतीने निर्माण करणाऱ्या केसरबाई या पुस्तकात प्रतिबिंबित झाल्या आहेत याबद्दल वादच नाही, पण गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर या खांसाहेब अल्लादियाखां यांच्या शिष्या नव्हेतच हे सिद्ध करण्याची प्रतिज्ञा करून चरित्र लिहावयास बसल्यामुळे जाणतेपणाने वाचणाराची स्थिती खड्डयातून मोटरप्रवास केल्यासारखी होते. तो प्रवास घडविण्यापूर्वी, या चरित्रग्रंथात जे जे चांगले आहे त्याचा उल्लेख प्रथम करतो. ख्यातनाम संगीत समीक्षक प्रा. अरविंद मंगरूळकर यांच्या प्रस्तावनेचा उत्तरार्ध, प्रा. सदानंद रेगे यांची कविता, पद्मश्री पु. ल. देशपांडे यांचा सूरश्रींना भावांजली अर्पण करणारा पुनर्मुद्रित लेख, कै. गोविंदराव टेंबे यांच्या प्रा. मंगरूळकरांनी घेतलेल्या चार मुलाखती हा निर्विवादपणे वाचनीय आणि अभ्यसनीय भाग आहे. प्रा. मंगरूळकर यांची प्रस्तावना (मध्यंतरीची रेग्यांची कविता वगळता) एकूण तीस पानांची. त्यांतील पूर्वार्धातील अकरा पाने मधून मधून आत्मखंडन करणारी आहेत. आत्मखंडन या अर्थाने की खुद्द मंगरूळकरांनीच स्वतः १९४९ साली मोगूबाई कुर्डीकर यांच्यावर जो प्रदीर्घ आणि वाचनीय लेख लिहिला त्यातील त्यांच्याच विधानांना छेद देणारी विधाने येथे आहेत. 'मनोहर' मासिकातील तो लेख अभ्यासूंनी अवश्य वाचावा. त्यात प्रा. मंगरूळकरांनी पुढील विधाने केली आहेत :

प्रा. मंगरूळकर १९४९ साली आपल्या लेखात लिहितात : 'सांगलीचे राजवैद्य आबासाहेब सांबारे यांच्या घरी मोगूबाईंना गंधर्व बृहस्पतीप्रमाणे असलेल्या बाळकृष्णबुवा, अल्लादियाखां, रहिमतखां इत्यादी गायकांची गाणी ऐकावयास मिळाली आणि त्यांच्या अंतःकरणातील अभिजात संगीताची मुग्ध कळी खुलू लागली. एके दिवशी मोगूबाई आपल्या घरात 'चल ग गडे माडिवरी...' है मृच्छकटिकातील पद गात असताना खालून चाललेल्या अल्लादियाखां साहेबांना त्याची सुरेल सजावट अशी आकर्षक वाटली की आपखुषीने आपल्या संगीतविद्येच्या अमृताचे काही थेंब त्यांनी या नवशिष्येच्या कंठात टाकण्यास आरंभ

केला.



आता ८३ साली सूरश्री पुस्तकास प्रस्तावना लिहिताना त्यांनी 'आलापिनी' या ग्रंथाचे लेखक वामनराव देशपांडे यांनी त्यांच्या (वामनरावांच्या) मोगूबाईंवरील लेखात, जरा वेगळ्या धाटणीने लिहिलेला तोच सांगलीचा किस्सा उद्धृत करून ही दंतकथा नव्हे तर काय, असे विचारले आहे. खरोखरच ही दंतकथा आहे काय? संस्कृत साहित्यातील 'वटेयक्षन्याय' या योगायोगास लावता येईल काय? मोगूबाईंच्या गानतपस्येविषयी ज्यांनी ज्यांनी लिहिले त्या त्या सर्वांनी आपल्या शैलीनुसार सांगलीची ही कथा सत्यकथा म्हणूनच उल्लेखिली आहे. 'विश्रब्ध शारदा' ग्रंथात (खंड दुसरा) संगीतविषयक टिप्पणी लिहिणारे डॉ. शरच्चंद्र गोखले एका वाक्यात हा किस्सा सांगून जातात. (पृष्ठ २९९) 'अल्लादियांसारखा परीस अचानक घे म्हणू लागल्यावर नाटकी बेगडाची जरूरच नव्हती; मोगूबाईंनी अतःपर सर्वस्वी गायन विद्येला वाहून घेतले.' डॉ. ना. र. मारुलकर यांनी 'गोमंतकीय संगीतकार' या ग्रंथात सांगलीतील या लोकविलक्षण घटनेचे वर्णन 'मोगूबाईंच्या कलाजीवनातील तो एक महान परमेश्वरी साक्षात्कार' असे केले आहे. आणखीही भोबे प्रभृतींच्या लेखातील अवतरणे पुराव्यासाठी जोडता येतील. तर मग ही सत्यकथाच नव्हे, दंतकथाच आहे हे सिद्ध करण्यास पुरावा काय? मोगूबाईंनी ही कथा रचून सांगितली आहे असे प्रा. मंगरूळकरांना म्हणावयाचे आहे काय? तसे त्यांनी म्हटलेले नाही. ४९ साली 'मनोहर' मध्ये लिहिलेल्या लेखात ही 'विवाद्य' कथा आपण वापरली हेही उघड केले नाही. त्या वेळी आपली चूक झाली असाही खुलासा प्रा. मंगरूळकर करीत नाहीत. कलाक्षेत्रात फार वरच्या दर्जाची समीक्षा करणाऱ्या त्यांच्या सारख्यांनी हे स्पष्ट करावयास हवे होते की, ४९ साली त्यांना ती सत्यकथा वाटली, आज ती दंतकथा वाटते! तसा खुलासा ते करते तर ते त्यांच्या स्थानाला शोभून दिसले असते.'

प्रस्तावनेत (पृष्ठ २) प्रा. मंगरूळकर लिहितात, 'प्रस्तुत चरित्र लिहिण्याचे एक तात्कालिक कारणही घडले. केसरबाईंच्या मृत्यूनंतर मोगूबाईंची एक मुलाखत 'गोमंतक' च्या दिवाळी अंकात (१९७९) प्रसिद्ध झाली. तीत केसरबाईविषयी पुष्कळच जळकट स्वरूपाची विधाने मोगूबाईंनी प्रच्छन्न रूपाने केली. त्यांचा प्रतिवाद करून सत्यदर्शनासाठी बाबुरावांनी लेखणी हातात घेतली आणि मग हे चरित्र साद्यंत लिहिले. एका दृष्टीने मत्सराच्या या जाहीर प्रकटनाबद्दल मोगूबाईंचे आभार मानले पाहिजेत' 'मला नम्रपणे पण निर्धारपूर्वक प्रा. मंगरूळकरांना विचारावेसे वाटते, 'गोमंतक' च्या अंकातील मोगूबाईंची ती मुलाखत आपण वाचली का? वाचली नसल्याची शंका येते. बाबुराव केरकरांनी त्या मुलाखतीतील संदर्भहीन अशी जी दोन. विधाने पुढे ठेवली ती केसरबाईंना उद्देशूनच आहेत असे मंगरूळकर धरून चाललेले दिसतात. बाबुरावांनी दोन विधाने केसरबाईंची प्रच्छन्न निंदा म्हणून पुढे केली,

एवढेच नव्हे तर साडेतीन हजार शब्दांच्या त्या मुलाखतीत कोठेही नसलेले एक विधान मोगूबाईच्या तोंडी घालून 'सूरश्री' त (पृष्ठ १७५) बेधडकपणे छापून टाकले आहे! ते विधान असे : 'ख्याल गायकाने ठुमरी, भजने वगैरे गाऊ नये. केसरबाई ख्यालगायिका असून त्या गाण्यात ठुमरी, भजने गायच्या. मी गाण्यात ठुमरी, भजने गात नाही व रसहीन तानाही मारीत नाही.' ही वाक्ये त्या मुलाखतीत कोठे आहेत? मुळात ज्या आधारावर टीका करणार ते विधानच मुलाखतीत नसता त्याला प्रा. मंगरूळकरांनी 'जळकट' हे अश्लाघ्य विशेषण लावावे याचे मला खरोखरी दुःख होते.

मोगूबाईंची मुलाखत १९७९ साली झाली. सूरश्रींच्या देहावसानानंतर दोन वर्षांनी त्यांच्या पश्चात हे घडावे ही काही स्पृहणीय गोष्ट नव्हे, असे प्रा. मंगरूळकर म्हणतात. १९७९ साल हे मोगूबाईंच्या जीवनातील अमृतमहोत्सवी वर्ष. त्यांच्यासारख्या तपस्विनी गायिकेच्या मुलाखती त्या वर्षात पत्रकारांनी घेतल्या व त्यांनी दिल्या यात दोघांचेही काहीही चुकलेले नाही. ज्येष्ठ गुरुभगिनी दोन वर्षांपूर्वी निवर्तल्या म्हणून मी मुलाखतच देत नाही असे का त्यांनी सांगावयास हवे होते? आपली हयातभरची साधना मोगूबाई सांगत आहेत. वामन राधाकृष्ण यांनी शब्दांकन केलेल्या त्या मुलाखतीचे 'बेअरिंग' वेगळेच आहे. बाबुराव केरकर यांच्या ते आकलनापलीकडचे असले तरी प्रा. मंगरूळकरांनी मुळातून ती मुलाखत वाचली असती तर त्यांच्या सहज लक्षात आले असते की, मोगूबाईना आणि त्यांच्यासारख्याच अन्य भगिनींना गोमन्तकीय वरिष्ठ वर्गीय समाज जी वागणूक देत होता तिच्या विरुद्धचा संताप मोगूबाईंना प्रामुख्याने व्यक्त करावयाचा होता. देवदासीपणाच्या खातेऱ्यातून वर येऊन नादब्रह्मवादिनी झाल्यानंतरही हा उच्चवर्णीय समाज आपणाला अंगणात उभे करून करवंटीतून चहा देतो; मोगू, अंजनी, तारा, केशर अशा एकेरी नावांनी संबोधतो, याबद्दल त्यांना सात्त्विक संतापाच्या येणाऱ्या उर्मी त्या मुलाखतीत शब्दरूप झाल्या आहेत. त्या मुलाखतीतील एकच छोटासा परिच्छेद येथे उद्धृत करतो म्हणजे त्यावरून मोगूबाईंच्या अंतर्मनातील कालवाकालव स्पष्ट होईल. मोगूबाई सांगतात :

'माझ्या गाण्याच्या बाबतीत सुद्धा गोव्यात मला जो अनुभव आला तो नमूद करण्याजोगा आहे. मी गोव्याला गेले असताना कुर्प्याचा एक माणूस आला आणि म्हणाला, कार्यक्रमाचे बोलावणे आले आहे, येता का?'

मी म्हटले 'येऊ की. काय देतील?'

तो म्हणाला 'पन्नास रुपये देतील.'

मी मनात म्हटले ठीक आहे. गोव्यातल्या गोव्यात पन्नास रुपये मिळतात तर काही

वाईट नाही. मी कार्यक्रमासाठी गेले. एक तबलजी, एक मी आणि तंबोरा याशिवाय आणखी कुणी नव्हते. तिथे गेल्यानंतर त्यांनी आमचा आदरसत्कार काय करावा? मला त्यांनी गायला बोलावले पण मी आपली अंगणात उभी. कुणीतरी जाऊन सांगितले.

'मोगू आली आहे!' माझ्या कानाला कसेसेच वाटले. नुसती मोगू काय? पण मी गप्प राहिले. त्यांनी विचारले काय घेणार? चहा, कॉफी?

मी म्हटले, 'तुम्ही द्याल ते!'

आम्हाला चहा आला नारळाच्या करवंटीतून! मी करवंटी बाजूला सारली आणि म्हटले, 'मला नको आहे!'

असाच आणखी एक अनुभव. माझे मावसे सालेलकर यांनी मी फार आजारी असताना नवस केला होता. एक दिवस ते मला म्हणाले, 'मोगू, तू आजारी असताना नवस केला होता सांग्याच्या देवाला. नवसाप्रमाणे तुला देवापुढे गायला पाहिजे' लहान पोरीप्रमाणे ते माझ्यावर माया करीत. मी म्हटले ठीक आहे. आम्ही गायला गेलो पण आम्हांला बसायला जागा दिली खाली. महाजन चौकीवर बसले होते. मोठ्या लोकांनी वर बसायचे आणि आम्ही खाली बसून गायचे हे मला आवडले नाही. मी म्हटले, 'बाप्पा हे काय? असं मला गाता येणार नाही. देव तिथं, लोक तिथं आणि मी इथे? महाजन बसलेत तिथे बसून गाईन मी.' त्यावर ते म्हणाले, 'तसं गाता येणार नाही. लेव्हल सारखं होईल!' अशा या लेव्हलच्या गोष्टी अनुभवून अनुभवून तिटकारा आला मला या लोकांचा.'

मोगूबाईंच्या जीवनातील अशा कटू आठवणींनी जवळपास तीन चतुर्थांश मुलाखत भरलेली आहे. मोगूबाईंची परिभाषा गोदावरी परुळेकरांप्रमाणे नसेल पण त्या अनघड शब्दांखालीं अंगार तोच आहे. या परिस्थितीतून वर यायचे तर तपस्विनी व्हायला हवे, कठोर व्रताचरण करायला हवे हे त्यांनी जाणले. त्यातूनच 'मी तरुणपणी तोंडाला पावडर लावली नाही व दूरची असता तंबोऱ्याला स्पर्श केला नाही. कारण तंबोरा हाच माझा देव' अशी वाक्ये त्या मुलाखतीत आली आहेत. या वाक्यात बाबुराव केरकरांना प्रच्छन्नपणे केसरबाईंवर टीका दिसली म्हणे! संबंध काय इथे केसरबाईंचा? बाबुरावांना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी मोगूबाई केसरबाईवर प्रहार करीत आहेत असे दिसले तर, कावीळ या आजाराचा भाग म्हणून ते समजू शकते पण प्रा. मंगरूळकरही एक जळकट विधान म्हणूनच त्याकडे बघतात हे कसे? त्यांना तर मोगूबाईंची सगळी जीवनकथा ठाऊक. सत्यकाम जाबाली त्यांना आठवावयास हवा होता. एवढ्या सुसंस्कृत मनाकडून दुसरी अपेक्षा कशी करणार? सत्यकाम जाबाली मंगरूळकरांच्या मनश्र्चक्षूंसमोर उभा राहिला असता म्हणजे सांगलीची कथा ही त्यांना

दंतकथा वाटली नसती. बाबुरावांनी पुढे केलेले प्रत्येक 'जळकट' विधान प्रा. मंगरूळकरांनी तपासून बघितले असते. मुलाखतीत अजिबात नसलेले विधान मोगूबाईंच्या तोंडी घातल्याबद्दल मंगरूळकर कडाडले असते. पण या पैकी काहीच झाले नाही. बाबुराव जे जे पुढे करतील ते ते, ते स्वीकारीत गेले आणि बाबुरावांच्या लेखनात आवश्यक असा संक्षेप व सरळपणा आहे असे सर्टिफिकेटही देते झाले!

प्रा. मंगरूळकरांनी वामनराव देशपांडे यांची दुसऱ्या एका मुद्यावरून खिल्ली उडविण्याचा प्रयत्न केला आहे. 'मोगूबाईंना मधून मधून का होईना वीस सालापासून ते सेहेचाळीस साली खांसाहेबांच्या निधनापर्यंत, म्हणजे जवळ जवळ सव्वीस वर्षे तालीम मिळाली.' हे 'आलापिनी' मधील वाक्य उद्धृत करून प्रा. मंगरूळकर आश्चर्य व्यक्त करताना म्हणतात, 'सव्वीस वर्षे! अत्युक्तीची अतिशयोक्ती!'

मला वाटते वामनरावांनी हे एक सावध विधान केले आहे. वामनरावांच्या प्रमाणेच डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी देखील (विश्रब्ध शारदा, पृ. २९८) मोगूबाईवरील टिप्पणीत 'अशा प्रकारे एकूण सव्वीस वर्षे त्या अल्लादियाखांच्या विधियुक्त (गंडाबंद) शागीर्द आहेत' असे म्हटले आहे. 'गोमंतकीय संगीतकार' या ग्रंथात डॉ. मारुलकरांनी जसा बेसावध हिशेब दिला तशी चूक वामनरावांनी केलेली नाही. ऑडिटर ते, ते कशी चूक करतील? पण खुद्द प्रा. मंगरूळकरांनी केवढी पलटी खाल्ली आहे या प्रश्नावर! ४९ सालच्या त्या उपरिनिर्दिष्ट लेखात प्रा. मंगरूळकर स्वतः लिहितात : 'मोगूबाईंना सुमारे पाच वर्षे हैदरखांची व त्याहून पुष्कळच अधिक वर्षे अल्लादियाखांची तालीम मिळाली.' आता प्रस्तावनेत मात्र सगळाच हिशोब उडवून लावून अल्लादियाखांची मुदलात तालीमच मिळाली होती की नाही, असे प्रश्नचिन्ह ते निर्माण करतात. यामध्ये बाबुराव केरकरांच्या सुराशी सूर मिळवून घेण्याची चलाखी असेल अथवा नसेल पण समीक्षकत्वाचा तोल ढळला आहे हे स्पष्ट आहे. पुनः आपण स्वतःच या संबंधात केलेले पूर्वीचे विधान दुरुस्त करीत आहोत असा खुलासा करण्याचीही त्यांना आवश्यकता वाटत नाही, हे आश्चर्य नव्हे काय? त्या पेक्षा १९२० ते १९४६ या सव्वीस वर्षांत खंडित स्वरूपात मोगूबाईंना अल्लादियाखांची तालीम मिळाली हा आशय असणारे वामनरावांचे विधान सत्याशी अधिक जवळीक साधणारे नव्हे काय? संगीताच्या क्षेत्रात कोणाही शागीर्दाला त्याच्या गुरूकडून तालीम किती वर्षे मिळाली याचा हिशेब रोजच्या दूधखरेदीच्या हिशोबाप्रमाणे कोणी मांडून ठेवीत नसतो. एखाद्या शागीर्दाला आठवड्यातून दोन दिवस याप्रमाणे पाच वर्षे तालीम मिळाली असेल तर दोन गुणिले बावन्न गुणिले पाच याप्रमाणे पाचशेवीस दिवस तालीम मिळाली असेच सांगितले जाते. १९२१ ते १९३० असा

करार होऊन सूरश्रींना सलग दहा वर्षे व पुढे खंडित स्वरूपात काही वर्षे मिळून अठरा वर्षांचा जसा हिशोब बड़े मियांच्या तालमीबाबत देता येतो, तेवढ्या काटेकोरपणाने मोगूबाईंच्या बाबत देता येत नाही, हे मान्य केले तरी सालांची उडवाउडवी करून प्रस्तावनकारांनी आणि खांसाहेब हैदरखां यांची तालीम पाच वर्षावरून दीडदोन वर्षावर आणून बाबुरावांनी मोगूबाईंचा मानसिक छळ किती करावी याला काही मर्यादा? सांगलीचा किस्सा दंतकथा ठरवून तेथली दोन वर्षाची आणि चार रागांची तालीम प्रा. मंगरूळकरांनी उडवून लावल्यासारखीच आहे. ३७ ते ४६ खांसाहेब अनंतराव शिरगावकरांकडे शिकवीत म्हणून प्रा. मंगरूळकरांनी त्या नऊ वर्षावर हरताळ फासला! २१ ते ३० या कालखंडात अल्लादियाखां कराराने बांधले होते सूरश्रींच्या शिकवणीशी, म्हणून त्या दहा वर्षावर मंगरूळकरांची फुली! आणि हा सर्व हिशोब चुकीचा आहे असे कोणी म्हटले रे म्हटले की तो सूरश्रींचा टीकाकार! वस्तुतः हा प्रश्न सूरश्रींवर टीका करण्याचा नसून मोगूबाईंना न्याय देण्याचा आहे. तो दिला जाईल अशी अपेक्षा प्रा. मंगरूळकर यांच्याकडूनही होती. पण त्यांनी ती फोल ठरविली आहे.

मोगूबाईंना दंतकथा निर्माण करणाऱ्या म्हणून निंदलेत तरी तेवढ्याने सांगलीतील दोन वर्षांची खांसाहेबांची तालीम रद्दबातल होत नाही. ती गृहीत धरल्यावाचून व 'मुंबईस आलीस तर शिकवीन' हे खांसाहेबांचे शब्द मान्य केल्यावाचून कोणाही समीक्षकाची सुटका नाही. कारण त्यावाचून खांसाहेबांच्या मागोमाग २२ साली मोगूबाईंचे मुंबईस जे येणे घडले त्याची व खेतवाडीमधील शाहू महाराजांच्या पॅलेसमध्ये निदान वर्ष-सहा महिने खांसाहेबांनी जी तालीम दिली त्याची संगतीच लागत नाही. खांसाहेब व सूरश्रींचे हित पाहणारी मंडळी; यांच्या दरम्यान जो करार झाला होता त्याची कलमे तर जाहीरच आहेत. त्यात केसरबाईंकडील शिकवणी आटोपल्यावर अन्य कोणास शिकवावयाचे नाही असे कलम नव्हते. तदनुसार ही तालीम चालू होती व पुढे ती बंद करण्यास खांसाहेबांना भाग पाडण्यात आले. मात्र ती सूरश्रींनी खांसाहेबांना चिथावणी देऊन बंद करविली हा आरोप सूरश्रींवर येऊ नये म्हणून बाबुराव चरित्र ग्रंथात (पृष्ठ १७३) लिहितात, 'केसरबाईंनी वरील प्रकारची चिथावणी खांसाहेबांना देण्याचा प्रयत्न केला असता, तर खांसाहेबांनी केसरबाईंना, 'तुला तुझी तालीम व्यवस्थित मिळते किंवा नाही हे तू पहा. मी इतरांना तालीम द्यावी किंवा देऊ नये हे ठरविण्यास मी समर्थ आहे. या बाबतीत ढवळाढवळ करण्याचा अथवा मला सल्ला देण्याचा शहाणपणा करू नको' अशी कडक शब्दांत समज दिली असती! चरित्र लेखकाचा हेतू हा की, केसरबाई खांसाहेबांना अशा बाबतीत कोणत्याही बाजूने सल्ला देत नसत. पण पुढच्याच

पृष्ठावर (पृष्ठ १७४) बरेचसे आढेवेढे घेत बाबुराव केरकर लिहितात, 'हैदरखांना मुंबईस आणण्याचा सल्ला तिने (केसरबाईंनी) मोठ्या खांसाहेबांना दिला व त्यामुळेच हैदरखांसाहेबांचे मुंबईस येणे झाले ही सत्यकथा आहे.!' या विसंगतीवर आणखी वेगळे भाष्य हवे कशाला?

प्रस्तावना लेखक प्रा. मंगरूळकर बाबुराव केरकरांच्या एका कबुलीने चांगलेच गोत्यात आले आहेत. मोगूबाईंना थोरल्या खांसाहेबांची तालीम अजिबात मिळालीच नाही हे सिद्ध करण्यासाठी 'शिरगावकरांकडे खांसाहेब असताना जी नऊ वर्षे लोटली, ती प्रथम हिशोबातून वगळावयास पाहिजेत. १९२१ ते १९३० ही दहा वर्षे उघडच सोडून द्यायला हवीत, कारण त्या वेळी कराराप्रमाणे केसरबाईंचीच तालीम चालू होती.' (प्रस्तावना पृ. १०) असा हिशोब मांडून प्रा. मंगरूळकर मोकळे झाले. चरित्र लेखक बाबुराव केरकर मात्र '१९२१ ते ३० या कालखंडात खांसाहेबांची मोगूबाईंना तालीम सुरू झाली होती ही सत्यकथा आहे व बाळकृष्ण पर्वतकर यांच्यामुळे ती बंद झाली हीही सत्यकथाच आहे' असे लिहून प्रस्तावनाकारांना अडचणीत आणतात! बाबुरावांनी कोणत्याही कारणासाठी हे सत्यकथन केलेले असो, खांसाहेब अल्लादियाखांची तालीमच मोगूबाईंना मिळाली नाही हे तर त्यामुळे असिद्ध ठरते ना?

मोगूबाई थोरल्या खांसाहेबांच्या गंडाबंद शिष्या होत्या काय या प्रश्नाला वर्तमानकाळात काहीही महत्त्व नाही. पण ज्या काळात सूरश्रींनी, मोगूबाईंनी तालीम घेतली त्या काळात ती वैष्णवी तप्तमुद्रा होती हे मान्य करावयास हवे. सूरश्रींची तालीम गंडाबंधनानेच सुरू झाली. 'पाच हजार सुरती रुपये' खांसाहेबांना या समारंभप्रसंगी अर्पण केल्याचा उल्लेख या चरित्रग्रंथात आलेलाच आहे. मोगूबाईंचा गंडाबंधनविधी आधी अनेक वर्षे खंडित तालमी होऊन गेल्यानंतर झाला. गोविंदराव टेंबे यांना प्रमाण मानायचे तर खांसाहेबांच्या चरित्रात शिष्यपरंपरेचा उल्लेख करताना (पृष्ठ १४७) 'त्यांनी (मोगूबाईंनी) अल्लादियाखां यांचा नंतर गंडा बांधला तरी त्यापूर्वी खांसाहेबांचे बंधू हैदरखांजी यांच्याकडून त्यांना एकंदरीत अधिक तालीम पोहोचली होती' असे लिहून ठेवले आहे. 'विश्रब्धशारदे' त डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी मोगूबाईंना सव्वीस वर्षे गंडाबंध शागीर्द असेच म्हटले आहे. पण प्रस्तावनाकार प्रा. मंगरूळकरांना ही अवतरणे मान्य नाहीत. उपरिनिर्दिष्ट वर्षेच्या वर्षे उडवून लावण्याच्या क्रीडेत दंग असताना (पृष्ट १०, प्रस्तावना) ते विचारतात, 'उरता उरली १९३२ ते १९३७ ही सहा वर्षे. त्या अवधीत मोगूबाईंनी खांसाहेबांचा गंडा बांधला होता काय? कधी? कारण त्याशिवाय खांसाहेब दुसऱ्या व्यावसायिक गायिकेला शिकविणार कसे?'

माझे यावर उत्तर असे की, मोगूबाईंचा गंडाबंधनविधी १९३५ साली त्रिभुवन रोडवरील त्यांच्या राहत्या घरी झाला. किशोरीचे वडील त्यावेळी आजारी असल्याने गाजावाजा न करता झाला. सूरश्रींची तालीम खंडित स्वरूपात चालू होती कारण त्यांना मैफलींची निमंत्रणे येऊ लागल्याने वेळ नसे. करार १९३० सालीच पुरा झाला होता. ३१-३२ ही दोन वर्षे मोगूबाई गोव्यात होत्या. ३४ साली सुरश्रींचे तबलजी विष्णुपंत शिरोडकर मोगूबाईंकडे येऊन, खांसाहेब लौकरच तुमची तालीम पुन्हा सुरू करतात की नाही पहा, अशी आनंदवार्ता देऊन गेले होते. त्याप्रमाणे ते असेच अवचित एका सायंकाळी आले. यापुढे कधीही तालीम बंद करणार नाही असे त्यांनी सांगितले. 'सुखकर आयी' या काफी कानड्यातील चिजेने तालमीस सुरुवात झाली. थोरल्या खांसाहेबांच्या खांद्यावर प्रपंचाची आर्थिक जोडणी करून देण्याची जबाबदारी होतीच. त्यासाठी त्यांनी मोगूबाईंकडे गंडाबंधनविधीचा आग्रह धरला. मोगूबाईंनी ३२ रुपये तोळा या भावाने १२५ तोळ्यांचे दागिने विकून चार हजार रुपये उभे केले. तीन हजार रुपये गुरुदक्षिणा या खाजगी समारंभाच्या वेळी दिली. रघुवीरमामा रामनाथकर, यशवंतराव माशेलकर, लयभास्कर खाप्रूमाम पर्वतकर, सुदाम मांजरेकर, बाळकृष्ण पर्वतकर, ही मंडळी या घरगुती समारंभास हजर होती. यापैकी सुदाम मांजरेकर अजून हयात आहेत. बाकीचे सर्व निवर्तले. रघुवीरमामा रामनाथकर परवा परवापर्यंत हयात होते. ते शतायुषी झाले. पण त्यांच्या हयातीत हा प्रश्न निर्माण करण्याची बुद्धी कोणास झाली नाही.

प्रा. मंगरूळकर यांनी मरहूम सारंगीनवाज मजीदखां यांच्या मुलांची या प्रसंगी साक्ष काढली आहे म्हणा अथवा परिशिष्टातील त्या लेखाचा हवाला दिला आहे असे म्हटले तरी चालेल. मरहूम मजीदखां व त्यांचे पुत्र यांच्यांत कधीकाळी संवाद झाला, तो चरित्रलेखकाने त्यांच्याकडून ऐकला व नंतर लिहून काढला असे या हवाल्याचे स्वरूप आहे. आज तो मुळातून वाचला असता मुद्दाम पढवलेल्या साक्षीदाराकडून आपणांस हवे ते वदवून घेण्याचा आणि परस्पर त्या आश्रिताच्या मुलांकडून 'मोगूबाई चिजा चोरण्यासाठी आपल्या वडिलांची तालीम किशोरीसाठी मागत होत्या' असे ऐकवून गालिप्रदानाची हौस भागविण्याचा तो प्रयत्न दिसतो. धनदांडगी श्रीमंत मंडळी कोणाचा कसा उपयोग करून घेतात हे पाहावयाचे असल्यास ऐकीव माहितीवर चरित्रलेखकाने लिहून काढलेले हे परिशिष्टातील प्रकरण वाचावे. प्रा. मंगरूळकरांनी त्याचा हवाला देऊन आपल्या प्रस्तावनेस आणखी एक काजळबोट लावावयास नको होते. पहा की, ज्यांचा हवाला प्रा. मंगरूळकर देतात त्यांच्या तोंडी चरित्रलेखकाने 'कदाचित् त्या खांसाहेबांच्या गंडाबंध शिष्या होत्या हेही सत्य असू शकेल.' (पृष्ठ १२१) असे वाक्य घातले आहे आणि ते प्रा. मंगरूळकरांच्या तर्कमांडणीला पुष्टी देणारे

नाही. माझ्या मते (११७ ते १२४ पृष्ठे) परिशिष्टातील हा लेख अंतर्बाह्य विषदिग्ध आहे. १९५३ साली विष्णुपंत शिरोडकर यांच्या घरी गणपतीउत्सवात मोगूबाई व सूरश्री केसरबाई या दोघी गायल्या त्याचे यथार्थ चित्र या वर्णनात नाही. पुराव्यासाठी मजीदखां यांच्या लेखाचा काहीही उपयोग नाही. कोणालाच नाही. अगदी प्रा. अरविंद मंगरूळकरांना सुद्धा! कारण या प्रकरणी प्रा. मंगरूळकरांनी अनंतराव शिरगावकरांचे म्हणून जे उद्गार उद्‌धृत केले आहेत (पृष्ठ १०) ते मजीदखाँ यांच्या तोंडी घातलेल्या उद्गारांशी तंतोतंत जुळत नाहीत! शिरगावकर यांनी 'आजवर आयुष्यात मी कधी खोटे बोललो नाही' असे शब्द थोरल्या खांसाहेबांच्या तोंडी घालून सुंदराबाई हॉलमधील घोषणा निष्फळ ठरविली आहे पण (पृष्ठ १२१) मजीदखां यांच्या तोंडी जी वाक्ये आहेत त्यांत थोरल्या खांसाहेबांनी 'आजवर आयुष्यात मी कधी खोटे बोललो नाही' असे शब्द उच्चारल्याची नोंद नाही. तटस्थ अशा कोणत्याही न्यायाधीशापुढे ही दोन्ही अवतरणे ठेवल्यावर पुराव्यासाठी ती ग्राह्य धरता येणार नाही असाच निकाल तो देईल. बाबुराव केरकरांनी बिचाऱ्या प्रा. मंगरूळकरांना का बरे असे गोत्यात आणावे? प्रश्न विचार करण्यासारखा आहे आणि तोही खुद्द प्रा. मंगरूळकरांनीच विचार करण्यासारखा आहे. अस्तु. येथेच हा गंडाबंध शागिर्दीचा प्रश्न हातावेगळा करणे योग्य ठरेल. तरीही एका वाक्यात सांगितले पाहिजे की खांसाहेबांच्या तोंडचे,' आजवर आयुष्यात मी खोटे बोललो नाही' हे शब्द गाळून (प्रस्तावनेतील अवतरणातून) खांसाहेबांची ती वाक्ये अगदी वाच्यार्थाने घेतली तरी सूरश्री मोगूबाईंना नानाप्रकारे छळत होत्या हे सत्य शिल्लक राहतेच.

चरित्रलेखक बाबुराव केरकर यांनी १९७९ च्या 'गोमंतक' च्या दिवाळी अंकातील मोगूबाईंच्या मुलाखतीतून जी दोन अवतरणे घेतली व तिसरे मुलाखतीत नसता घुसडून दिले त्यांपैकी पावडर-कुंकू वगैरेंचा संबंध सूरश्रीशी दूरान्वयानेही पोचत नाही हे यापूर्वी दाखवून दिलेच आहे. आता राजेरजवाड्यांविषयी थोडेसे सांगितले पाहिजे. यासाठी मुलाखतीतील तो सबंध परिच्छेदच येथे उद्‌धृत करावयास हवा. तो परिछेद असा :

'खांसाहेबांकडून शागिर्दी घेण्यापूर्वीसुद्धा मी गात होते. माझ्या मैफिली होत होत्या. राजेरजवाड्यांमध्ये मात्र मी कधी घुसले नाही. कितीही पैसे देण्याचे आमिष आले तरी मी गेले नाही. राजेरजवाड्यांबद्दल इतर कलाकार काय बोलतात ते मला कळत होते. शिवाय माझाही अनुभव होता. माझ्या लहानपणी मी पुण्यप्रभावामधील किंकिणीची भूमिका करीत होते. एकदा आमची कंपनी एका मोठ्या संस्थानच्या राजधानीस गेली. महाराज नाटक पाहावयास आले होते. माझे काम पाहून ते खूष झाले आणि कंपनीच्या मालकिणीस म्हणाले, 'मला ही मुलगी पाहिजे. मी तिला सांभाळीन.' आमच्या नाटकमंडळीत साऱ्या स्त्रिया होत्या.

मालकीणबाई घाबरल्या, शेवटच्या अंकात किंकिणीचे काम नव्हते. मालकिणीने मला मोटरीत बसविले आणि पंचवीस मैलांवरील दुसऱ्या संस्थानच्या राजधानीस नेले. इकडे नाटक संपल्याबरोबर महाराजांनी पोलीस पहारा ठेवला. पण त्याचा काही फायदा झाला नाही. त्या प्रकारानंतर आमची कंपनी कोल्हापूरला गेली नाही. या अनुभवामुळे राजेमहाराजांपासून दूर राहिले.'

चरित्रलेखक बाबुराव केरकर फर्ग्युसन महाविद्यालयात होते. त्यांच्या अभ्यासाचा विषय मानसशास्त्र होता की नव्हता मला ठाऊक नाही. मोगूबाईंच्या जीवनात वरील घटना घडली त्यावेळी त्यांचे वय अदमासे तेरा असावे. या वयात एक जबरदस्त संस्थानिक आपले स्वातंत्र्य हिरावून घेऊन आपली जन्माची नाटकशाळा करणार याचा धसका मोगुबाईंच्या मनाने केवढा घेतल असेल? मनावर होणारे हे आघात पुढे जन्मभर कायम राहतात. व्रतस्थ तापसी होण्याचे आणि केवळ विद्येचीच आराधना करण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या मोगूबाई राजेरजवाड्यांकडे आमंत्रणे येऊनही का वळल्या नाहीत याचा उलगडा मानसशास्त्राच्या साहाय्याने त्यांना समजून घेतले तरच होऊ शकतो. बाबुराव केरकरांना मोगूबाईंच्या या उद्गारांत सुरश्रींवर प्रच्छन्न टीका असल्याचा शोध लागवा यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. एकदा त्या रंगाचा चष्मा वापरायचा म्हटल्यावर प्रत्येक वस्तूत त्यांना सूरश्रींचे टीकाकार दिसावेत हे अगदी स्वाभाविक आहे.

सूरश्रींच्या, राजेरजवाड्यांमध्ये ज्या मैफिली होत त्यांच्याशी अजिबात संबंध नसलेल्या मोगूबाईंच्या या विधानाचा उघड नसला तरी प्रच्छन्न संबंध असलाच पाहिजे हे गृहीत धरून केरकर ज. झियाप्रमाणे मोगूबाईंवर आसूड ओढीत सुटले आहेत की काय असे त्यांचे (पृष्ठ १५२) लेखन वाचून कोणाही सहृदय माणसाला वाटू लागेल. ते लिहितात : 'हत्तीच्या अंबारीतून ज्याला मिरवता आले नाही त्याने, मी हत्तीच्या अंबारीतून कधी मिरवलोच नाही, अनवाणीच हिंडलो, असे म्हणण्यासारखाच हा प्रकार. राजेरजवाड्यांत घुसावे लागत नाही. राजवाडा म्हणजे रेल्वेचा डबा नव्हे अथवा एस्. टी. ची बस नव्हे. राजवाड्यात जाण्यासाठी मान्यता लागते, पात्रता लागते.' तात्पर्य काय तर मोगूबाईंना पात्रता नाही! भले त्या पद्मभूषण झाल्या असतील, जनतेने त्यांना गानतपस्विनी म्हटले असेल. गोवा मुक्ती आंदोलनाच्या सत्याग्रहींसाठी त्यांनी रवींद्र नाट्य मंदिरात चिरंतन श्रवणीय अशी मैफल करून हजारो रुपये दिले असतील. हे सर्व खरे असले तरी पात्रता कुठे आहे? बाबुराव केरकर यांच्या अगाध तर्कप्रज्ञेपुढे इलाज नाही हेच खरे!

बाबुरावांचे मत काहीही असो वा मती कशीही असो. मी त्यांना ठामपणे सांगू इच्छितो

की मोगूबाई, वामनराव, बबनराव आणि आम्ही सर्वच सूरश्रींच्या गायनकलेचे चाहते आहोत टीकाकार नाही. सुरश्रींचे गायन आणि त्यांचे मोगूबाईंशी झालेले वागणे या दोन गोष्टी अगदी अलग अलग आहेत. एका क्षेत्रात आमचे कान धन्य झाले आहेत, दुसऱ्या क्षेत्रात आम्हाला कानात बोटे घालावी लागली आहेत. बाबुराव म्हणतील पुरावे द्या. तेही आता देतो. मोगूबाई यांच्यापासूनच सुरुवात करतो. सूरश्रींच्या गाण्याबद्दल त्यांना ममत्व, रसिकता, हृदयाची उदारता नसती तर त्यांनी धारचे शिल्पकार र. कृ. फडके यांना लिहिलेल्या पत्रात सूरश्रींचा उल्लेख गौरवाने भरलेल्या शब्दांत केला नसता. वीस डिसेंबर १९४८ ला लिहिलेल्या पत्रात मोगूबाई म्हणतात : 'खांसाहेबांचे स्मारक गुरुभगिनी केशरबाई आहेत तोवर त्याच थोडेबहुत स्मारक दिसत आहेत.' रसिक-उदार-जाणकार मोगूबाईंनी केसरबाईंच्या गानथोरवीला केलेला हा मुजरा आहे. (पहा पृष्ठ ३०१, विश्रब्ध शारदा, खंड दुसरा) हे चाहतेपणाचे लक्षण की निंदकीय वृत्तीचे, याचे उत्तर बाबुराव केरकर यांनीच द्यावयाचे आहे.

वामनराव देशपांडे यांनी सूरश्रींच्या जेवढ्या मैफली ऐकल्या तेवढ्या एक सत्येंद्रनाथ त्रिवेदी वगळता दुसऱ्या कोणीही ऐकल्या नाहीत, अशी कबुली खुद्द बाबुराव केरकर यांनीच या चरित्रग्रंथात दिली आहे आणि तरीही ते त्यांना सूरश्रींच्या जाणकार चाहत्यांच्या यादीत घालावयास तयार नाहीत. सूरश्रींचे टीकाकार म्हणूनच त्यांचा 'गौरव' बाबुरावांनी केला आहे. सूरश्रींच्या बिर्ला क्रीडा केंद्रात साजऱ्या झालेल्या पहिल्या पुण्यतिथीस अध्यक्ष होते वामनराव देशपांडे हेच. प्रस्तुत लेखकास केवळ एक उपवक्ता बनून सूरश्रींच्या स्मृतीस आदरांजली वाहण्याचा बहुमान प्राप्त झाला होता. बाबुराव केरकर यांना कदाचित् ठाऊक असेल अथवा नसेल पण गोविंदराव टेंबे यांच्या अमृतमहोत्सवी सत्कारप्रसंगी गाण्यासाठी वामनराव देशपांडे यांना सूरश्रींच्याकडून एक अनुरूप चीज बसवून हवी होती. वामनराव देशपांडे सोलापूरच्या धनराजगिरजी मिलचे ऑडिटर असल्याने त्या आधी दोन वर्षे झालेल्या धनराजगिरजींच्या सालगिरा समारंभास निमंत्रित होते. त्या समारंभात सूरश्रींनी धनराज गिरजींना बधावा देण्यासाठी 'मुबारकवाँ' ही चीज छान आळविली होती. तीच प्रसंगानुकूल चीज आपण गोविंदरावांच्या पंचाहत्तरीच्या समारंभात गावी असे ठरवून वामनराव सूरश्रींकडे गेले. सूरश्रींनी त्यांना तीन दिवस तालीम देऊन ती चीज बसवून दिली आणि गाववून घेतली. 'आता खुशाल जा आणि सत्कार समारंभात गा' असेही वामनरावांना त्या म्हणाल्या. वामनराव आपले चाहते आहेत, टीकाकार नव्हेत असे मनोमन वाटल्याखेरीज सूरश्रींनी एका चिजेची तालीम देण्याचे प्रयास घेतले असतील काय? या चिजेचा अर्थ त्या समारंभात प्रा. मंगरूळकर यांनी सांगितला होता.

५४ साली सूरश्रींच्याकडून चीज घेण्याइतकी त्यांची व सूरश्रींची जानपहचान होती. याचा अर्थ चाळीस सालापासून दोघेही परस्परांना ओळखत होते. वामनराव बॉम्बे म्यूझिक सर्कलचे सेक्रेटरी या नात्याने सुरश्रींची गाणी ठरवीत व गाण्यात दाद देऊन रंग भरणारी मोजकी माणसे अगदी पुढे असत. अशा स्थितीत वामनरावांच्यावर सूरश्रींचे प्रमुख टीकाकार म्हणून आरोप करणे हा केवळ सूरश्रींच्या चाहत्यांचा अपमान नसून बाबुरावांनी आपल्या ज्येष्ठ भगिनीचाही अपमान केला आहे असे म्हटले पाहिजे. केसरबाई महान कलाकार होत्या. पण कलाकार म्हणून माणूस कितीही मोठा असला तरी माणूस म्हणून तो अपूर्ण असतो व त्याच्या काही खामी असतात ही गोष्ट बाबुराव साफ विसरतात. सूरश्रींच्याही अशा काही खामी होत्या. वामनरावांच्या संदर्भातीलच एक उदाहरण येथे देणे अप्रस्तुत होणार नाही.

मर्चंट्स चेंबरमध्ये सूरश्रीची मैफल होती. वामनराव नेहमीप्रमाणे अगदी पुढेच बसले होते. या मैफलीस कमल तांबे, किशोरी आमोणकर, शीला नार्वेकर याही हजर होत्या. 'सकल दुखहरन' ही तिलककामोदातील चीज सूरश्रींनी सुरू करताच वामनरावांना विशेष आनंद झाला. कारण भोगूबाईंनी वामनरावांना त्या चिजेची तालीम पूर्वीच दिलेली होती. त्यामुळे आलापचारी जसजशी रंगू लागली तसतसे वामनराव स्वाभाविकपणेच अधिक मनापासून वाहवा देऊ लागले. इतक्यात सूरश्रींनी तंबोरा थांबवला आणि सर्व सभागृहाला ऐकू जाईल अशा आवाजत सूरश्री कडाडल्या...

'वामनराव, आज ही चीज ऐकाल आणि उद्या रेडिओत जाऊन गाल!'

पाचशे एक श्रोत्यांपुढे सवाल जवाब करणे प्रशस्त नव्हे म्हणून वामनराव गप्प राहिले, 'मला ही चीज आपल्याकडून घेण्याची जरुरी नाही. माझा मी ही चीज रेडिओत गायला समर्थ आहे. कारण माझ्या गुरुजींनी ती मला शिकविली आहे' असे तिथल्या तिथे उभे राहून सूरश्रींना वामनराव ऐकवू शकले असते. पण त्यांनी स्वतःचा अपमान गिळला. का, तर त्या थोर गायिकेचा अपमान होऊ नये म्हणून.

तरीही या घटनेचे मुंबईत सेन्सेशन झाले. मैफलीत सन्मान्य श्रोत्यांचा अपमान झाला असे कोणी म्हटले, तर काही ठिकाणी एका गोवेकरणीने गृहस्थाचा अपमान केला अशीही टीका झाली. त्या वेळी आचार्य अत्रे यांचे मराठी पत्र जोरात होते.' पडवळ या नावाने कुणीतरी पत्र लिहून 'बाईंना आपली चीज एवढी मोलाची वाटत असेल तर त्यांनी ती बरणीत घालून बरणी सीलबंद करावी' असा उपदेश केला. पुढे दोन चार दिवसांनी प्रा. अनंत काणेकर वामनरावांना रस्त्यात भेटले तेव्हा त्यांनी विचारले, 'वाचलेत का पडवळांचे पत्र?' आणि वामनरावांनी कोण हो हा पडवळ असा प्रश्न विचारण्याआधीच काणेकरांनी 'मीच तो पडवळ'

असे सांगून टाकले!

पुढच्याच आठवड्यात तेजपाल सभागृहात सूरश्रींचे गाणे होते. आणि अनाउन्सर होते वामनराव. पडदा उघडण्याच्या क्षणी गानमंचावर बसलेल्या सूरश्रींनी विंगेजवळ माईकपाशी उभ्या असणाऱ्या वामनरावांना जवळ बोलावून पाठीवरून हात फिरवून 'गेला का राग, मी ते तुम्हांला उद्देशून म्हटलं नव्हतं.' असा खुलासा करण्याचा प्रयत्न केला. पण मैफलीत कोणावरही असे तावदारणे योग्य नव्हे असे काही म्हणाल्या नाहीत. मनुष्यस्वभावातील खामी या अशा असतात.

या खामी दाखवणे म्हणजे टीक ढुश्या मारलेल्या आाकार होणे नव्हे. पण बाबुरावांनी या चरित्रभर अनेक जागी वामनरावांना ढुश्या मारलेल्या आहेत. ज्यांना त्यात रस असेल त्यांनी पृष्ठे ३८, ४२ व १७९ ते १८४ नजरेखालून घालावीत. कुतर्क प्रणालीने सगळीकडे कहर केला आहे असेच दिसून येईल. केसरबाईंच्या जास्तीत जास्त मैफिली ऐकलेले, गोविंदराव टेंबे यांच्या समवेत कैकदा सूरश्रींच्या घरी गेलेले व 'घरंदाज गायकी' सारखा विवेचक आणि पुरस्कारप्राप्त ग्रंथ लिहिणारे वामनराव स्वप्नात तरी सूरश्रींच्या तानांना उद्देशून 'तानांची गिरमिटे, आवाज ढसढसून लावणे' ही विशेषणे लावतील काय? हा आरोप करणारा चरित्रलेखक मात्र अगदीच 'कुड' असावा असे हे आरोप वाचल्यावर वाटू लागते. मोगूबाई ठुमरी, नाट्यगीत गात नाहीत व तानांची गिरमिटे अथवा आवाज ढसढसून लावण्याचा प्रकार त्यांच्या गाण्यात नसतो, हुकमी तिय्ये नसतात, असे म्हटले म्हणजे त्या सर्व गोष्टी सूरश्रींच्या गाण्यात असतात असेच वामनरावांना म्हणायचे आहे असे केरकर कसे काय गृहीत धरतात? किंवा ठुमरी, भजने गाणे वाईट असे वामनराव म्हणतात असे तरी बाबुरावांनी को मानावे? वामनरावांना सूरश्रींच्या गाण्यावर टीका करायचीच असती तर त्यांनी वेगळा लेख लिहिला असता व आपले स्वच्छ मूल्यमापन वाचकांपुढे ठेवले असते. वामनराव परवा भेटले असता मी विचारल्यावर म्हणाले, 'केसरबाईंच्या गाण्याला उद्देशून मी तानांची गिरमिटे, तिय्ये वगैरे शब्द वापरलेले नाहीत. ज्या तानांना काही अंदाज नाही, आस्था नाही, कसे तरी समेवर येण्यासाठी ज्या ताना घेतल्या जातात त्यांना गिरमिटे म्हणतात. केसरबाईंचा अद्‌भूत षड्ज आणि त्यांचे बलपेचयुक्त फिक्रे यांना गिरमिटे कोण म्हणेल?' यावरून वामनरावांच्यावर केरकर अकारणच भुंकले आहेत हे स्पष्ट होते.

थोर कलावंतांची चरित्रे पानापानांतून कुणाला तरी डिवचण्यासाठी, मुळात आधार नसलेले आरोप करण्यासाठी अथवा संदर्भहीन वाक्ये उचलून, गुन्हा गृहीत धरून फटकारण्यासाठी लिहायची नसतात हे बाबुराव केरकर यांनी समजून घेतले पाहिजे. मोगूबाई


खांसाहेब हैदरखां यांचेच नाव गुरू म्हणून लावीत नाहीत व खांसोहब अल्लादियाखां यांचे लावतात याबद्दलचा रोष केरकरांनी या ग्रंथात जागजागी व्यक्त केला आहे. एक तर मुळात मोगूबाई खांसाहेब हैदरखां यांचे नाव गुरू म्हणून सांगत नाहीत हाच खोटा आरोप आहे. बोल फिरविण्याचे कसब हैदरखांकडून आणि कोणत्याही जागेवरून उठून समेवर येण्याचे कसब अल्लादियाखांसाहेबांकडून आपणास मिळाले असे त्या सांगतात. हैदरखांची तालीम मोगूबाईंना १९२६ ते ३१ अशी सलग ५ वर्षे मिळाली आणि खांसाहेब अल्लादियाखां यांची १९१९-१९२० (दोन वर्षे), १९२२ ते २३ (एक वर्ष) आणि १९३४ ते १९४६ (बारा वर्षे), म्हणजे एकूण १५ वर्षे मिळाली. 'प्राधान्येन व्यपदेशाः भवन्ति' या न्यायाने खांसाहेबांच्या शिष्या म्हणूनच त्यांचे नाव सांगितले गेले तर त्यात काय चूक आहे? पण ३४ ते ४६ या कालखंडात खंडित स्वरूपाची का होईना त्यांना थोरल्या खांसाहेबांची तालीमच मिळाली नव्हती असे सिद्ध करण्यासाठी अकारण खटपटणाऱ्यांना आणि अपेशी ठरणाऱ्यांना कोण वाचविणार? नव्वदाव्या वर्षी (१९४५) खांसाहेब दादरच्या न्यू श्रीकृष्ण बोर्डिंगचे मालक यांच्या विनंतीवरून उत्तम गायले. त्यावेळी सूरश्रीही उपस्थित होत्या. चीज ऐकून सूरश्री बेचैन झाल्या. 'मला पुनः तालीम द्या' म्हणाल्या व खांसाहेबांनी ते मान्य केले अशी हकीगत

गोविंदराव टेंबे यांनी खांसाहेबांच्या चरित्रात दिली आहे. हे लगेच मानले जाते. पण १९३४ मध्ये म्हणजे वयाच्या ७९ व्या वर्षी मोगूबाईंना यापुढे आपण अखेरपर्यंत शिकवू असा त्यांनी शब्द दिला, असे कोणी लिहिले रे लिहिले की ते मात्र सर्वथा अशक्य! या आक्षेपकांत ज्यांच्याकडे खांसाहेबांना देण्याइतका उदंड पैसा, ते सर्व आघाडी बनवून मोगूबाईंच्यावर शाब्दिक हल्ला करण्यास सरसावतात. आता त्यांना प्रा. मंगरूळकर या थोर सरस्वत्युपासकाचेही साहाय्य लाभल्याचे दिसून येते. वामनरावांशी चाळीस वर्षांची मैत्री असता वामनरावांना ताकास तूर न लागू देता त्यांनी प्रस्तावनेची पहिली अकरा पाने लिहिली. आपला ४९ चा लेखही ते विसरले. यावरून 'कृशे कस्यास्ति सौहृदम्' हेच वचन खरे ठरते.

मला पुनः एकदा म्हणावयाचे आहे की हा प्रश्न सूरश्रींवर टीका करण्याचा नसून मोगूबाईंना न्याय देण्याचा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री ही नेहमीच अन्यायाने वागविली गेली आहे. उपेक्षित वर्गातील स्त्री तर दलिताहून दलित समजली गेली आहे. यात पुनः नाही रे आणि आहे रे गटातील महान कलाकार स्त्रियांचा जेव्हा प्रश्न निर्माण होतो तेव्हा नाही रे गटातील स्त्रीला दडपण्यासाठी आहे रे गटातील स्त्रीच्या बाजूने लोक उभे राहिलेले दिसतात व जे सत्य आहे ते मिथ्या कसे ठरेल याबद्दल प्रमाणांचा ढीग जमविण्याचा प्रयत्न करू लागतात. मोगूबाईंच्या बाबतीत असेच झाले आहे. 'सूरश्री' हा चरित्रग्रंथ अशा मिथ्या प्रमाणांनी ठासून

भरला आहे. म्हणून एवढ्या विस्ताराने शब्दप्रपंच करावा लागला. मोगूबाई नम्र, उदार पण तेवढ्याच परखडही आहेत. हा परखडपणाही क्वचित त्यांना अडचणीत आणणारा ठरला आहे. त्यांना गाण्याच्या बाबतीत सूरश्रींएवढी लोकप्रियता लाभली नसेल पण याचा अर्थ त्यांचे गाणे सूरश्रींच्याहून कमी कसदार असे नव्हे. गोविंदराव टेंबे लिहितात, "मोगूबाईंच्या गायनामध्ये (हैदरखां व अल्लादियाखां) उभयविध रंगांचे मनोहर मिश्रण झालेले सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास आढळून येईल. मोगूबाई या दोन्ही रंगांशी इतक्या समरस झालेल्या आहेत की कोणता रंग कोठे संपला व दुसरा रंग कोठे सुरू झाला हे सहसा उमगत नाही." सूरश्रींच्या या चरित्रग्रंथाचे प्रस्तावनाकार प्रा. अरविंद मंगरूळकर ४९ साली मोगूबाईंवर लिहिलेल्या लेखात अल्लादियाखांसाहेबांच्या या दोन्ही शिष्यांच्या गानवत्तेचे यथोचित गुणग्रहण करताना म्हणतात, 'केसरबाई काय किंवा मोगूबाई काय, त्यांची कला थोर तर खरीच पण केसरबाईंचे गाणे ऐटबाज, रुबाबदार व दरबारी वाटते, तर मोगूबाईंचे अंतर्मुख आणि गंभीर वाटते... बोल फिरवणे म्हणून जो एक सुंदर कलापूर्ण प्रकार आहे त्यात मोगूबाई फारच तरबेज आहेत. लयीचे, आडीतिडीचे वैचित्र्यपूर्ण प्रकार करून झोकदारपणे समेला येणे हे त्याचे सामान्यरूप म्हणता येईल. मैफिलीत याचा प्रत्यय घेताना श्रोत्यांच्या मनाला लयीचे इतके गोड डोल मिळतात की, अभिजात संगीतातील आभिजात्याची ती परिसीमाच म्हणावी लागेल.'

असे समतोल मूल्यमापन काहीसे पंडिती वाटते हे खरे पण मोगूबाईंचे गाणेच असे पांडित्यपूर्ण आहे. त्याला मादकतेची डूब सूरश्रींप्रमाणे देणे आपणांस न जमले तरी सूरश्रींचा तो गुण आपल्या शिष्यांनी यथाशक्ती उचलावा म्हणून कमल तांबे, किशोरी यांना सूरश्रींची मैफल कधीही चुकवीत जाऊ नका, असे मोगूबाई सांगत. त्यांच्या मनाची ही उदारता लक्षात न घेता 'आधी आईकडचं गाणं पूर्ण शीक आणि मग माझ्याकडे येण्याचा विचार कर' असा निरोप सूरश्रींकडून गेला, तेव्हा मोगूबाईंहूनही कांकणभर जास्तच परखड असलेल्या किशोरी आमोणकर त्या मध्यस्थास म्हणाल्या, 'जा, त्यांना जाऊन सांगा की, आईकडचं गाणं मला पूर्ण आत्मसात करता आलं तर मीच तुम्हांला तालीम द्यायला येईन!' बाबुराव केरकर यांना जी भाषा समजते त्या भाषेत हा निरोप आहे. त्यांना तो पुनः समजावा म्हणून उद्धृत केला आहे. परखडपणाला परखडपणाने, सत्यान्वेषीपणाला सत्यान्वेषित्वाने व नम्रतेला नम्रतेने उत्तर मिळते हे बाबुरावांनी ध्यानात ठेवावे.



# ७. पं. शरच्चंद्र आरोळकर

पं. शरच्चंद्र आरोळकर यांच्या आयुष्यातील एक घटना त्यांच्या समग्र जीवनाचे सूत्रसंचालन करीत आली असेल काय असा मला प्रश्न पडतो. जो जो त्यांच्या प्रदीर्घ पण 'एकला चलो रे' आयुष्याचा विचार करावा तो तो पुनः पुनः ती घटनाच डोळ्यांपुढे उभी राहते. आज पंडितजींचे वयोमान ७७ वर्षांचे आहे. ग्वालेर गायकीच्या मूलस्रोताचे सर्वांत ज्येष्ठ वारसदार आज तेच आहेत. त्या अर्थाने 'लास्ट ऑफ द रोमन्स' ही उपाधीही त्यांना शोभून दिसेल. काहीही झाले तरी ग्वालेर गायकीच्या मूलस्रोताबाबत अधिकारवाणीने बोलण्याचा त्यांचा अधिकार वादातीत आहे.

या वादातीत स्थानावर पोचेपर्यंतचेच नव्हे तर जीवनातील हरेक बाबतीत कसे वागावे याचे मार्गदर्शन मी वर उल्लेख केलेल्या घटनेपासून सुरू झाले असावे असा माझा तर्क आहे. नियती प्रत्येकालाच मार्गदर्शन करीत असते. पंडितजींना देखील नियतीनेच एक जन्माचा सोबती दिला असे मला म्हणायचे आहे. जन्माची सोबत लाभली पण या सोबतीचा जन्म नेमक्या कोणत्या सालात झाला हे मला सांगता येणार नाही. पंडितजींच्या कुमार वयात केव्हा तरी तो झाला असावा. 'मी एके दिवशी साईबाबांना घरी आणले आणि निश्चिंत झालो' असे बुवा म्हणतात. 'मी चष्मा आणला आणि मला सगळे स्पष्ट दिसू लागले' असे एखाद्याने सांगावे तसेच हे बुवांचे विधान आहे. तरुण पिढीला हे सगळे गूढ वाटेल, अतर्क्य वाटेल. जनरेशन गॅपमुळे तसे वाटणे स्वाभाविकही आहे. पण बुवा ज्या काळात जन्मले आणि ज्या वातावरणात कुमारवय आणि पौगंड दशा त्यांनी घालविली त्यांचा विचार करता 'साईबाबांना घरी आणण्याची घटना' हीच त्यांना 'जन्माची सोबत' लाभण्याची घटना असली पाहिजे असे मानण्यावाचून गत्यंतर नाही. नियतीने ही जन्माची सोबत बुवांच्या हाती सोपविताना बुवांना काय काय दिले असेल ते थोडक्यात सांगायचे तर मंगेश पाडगावकरांच्या एका कवितेत थोडा फरक करून असे सांगता येईल.


नियती म्हणाली असेल:

***सोबतीला साई देते***

*अंतरीचा ध्यास देते*
*तूं जिथे जाशील तेथे*
*मी तुला विश्र्वास देते*

साईबाबांची सोबत, योग आणि संगीत या क्षेत्रांत भरीव कमाई करण्याचा ध्यास आणि यश मिळणारच हा विश्वास या तीन मूलभूत गोष्टींवर बुवांचे जीवन घडत गेले आहे असा निष्कर्ष मी काढू इच्छितो.

बुवांचा जन्म २ डिसेंबर १९१२ सालचा. कराची ही त्यावेळी सिंध प्रांताची राजधानी. तो प्रांत त्या वेळी मुंबई इलाख्यात मोडत होता. अनेक महाराष्ट्रीय कुटुंबे कराचीस राहात. आरोळकरांचे कुटुंबही त्यांपैकीच. सुखवस्तू घराणे, प्रेमळ आई, करारी वडील, घरात आध्यात्मिकता ओतप्रोत, ग्रंथसंग्रहही त्याच क्षेत्रातला. अशा वातावरणात बुवांचा पिंड आध्यात्मिकतेवर जरा अधिक पोसला गेला असेल तर त्यात नवल कसले? १९१२ ते १९२५ अशी वयाची तेरा वर्षे शरच्चंद्रजींनी घरी काढली. संगीताच्या दृष्टीने या काळातील वातावरण किती अनुकूल होते हे फार विस्ताराने सांगायला नको. कराचीस पं. विष्णु दिगंबरजींचे शिष्य लक्ष्मणराव बोडस संगीत विद्यालय चालवीत. शरच्चंद्रजींनी पहिले धडे याच विद्यालयात घेतले. पं. भास्करबुवा बखले यांनी नवा बालगंधर्व घडवून ख्याल नाट्यगीतरूप बनविले ते याच काळात. भूगंधर्व रहिमतखां यांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या त्याही याच दहा बारा वर्षात. हे संगीतश्रवण शरच्चंद्रजी करीत आणि अनुकरणही करण्याचा प्रयत्न करीत. वयाच्या दहाव्या वर्षी शरच्चंद्रजींच्या वडिलांनी घरात एक पायपेटी आणली. पत्नी नको नको म्हणत असतानाही आणली. शरच्चंद्रजींच्या मातुःश्रींना ठाऊक होते की एकदा का हे बाळ पेटीवर बसले की दुसरे तिसरे त्याला काही सुचायचे नाही. आणि त्या माऊलीचा अंदाज खोटा ठरला नाही. त्या वेळची लोकप्रिय नाट्यगीते शरच्चंद्र गाऊ लागला. केवळ घरातच नव्हे तर कराचीस त्यावेळी जे एक नाव झालेले मुबारकखां होते त्यांच्यापुढेही नाट्यगीते गाऊन शरच्चंद्रजींनी दाद मिळवली होती. (हे मुबारकखां म्हणजे खांसाहेब अल्लादियाखां यांना आपल्या शैलीने प्रभावित करणारे मुबारक अल्ली खां नव्हेत) मुबारकखां है बन्नेखांचे सुपुत्र. उत्तम गायक. कराचीस चांगले गायक दावती देत आणि खूप चांगले गाणे ऐकायला मिळे. या प्रसंगी शरच्चंद्र असे. अशा मुबारकखांकडून त्या कुमारवयात शरच्चंद्रजींनी दाद मिळविली हा विशेष समजला पाहिजे.



वयाच्या तेराव्या वर्षी शरच्चंद्रजींनी कराची सोडली. त्यांची सोबत करणाऱ्या साई नामक चैतन्याने त्यांना योगाभ्यासासाठी स्वामी कुवलयानंदजींकडे नेले असे म्हणू या. पण कुवलयानंदांनी पौगंडदशेतील शरच्चंद्रजींना योगात रमण्याऐवजी गाण्यातच रममाण हो, रहिमतखां हो आणि संगीताच्या द्वारा योगसाधना कर असा सल्ला दिला. म्हणून शरच्चंद्रजी ग्वालेरला गेले. तिथे तब्बल चार वर्षे कष्ट काढून कडाक्याच्या थंडीत विहिरीवर थंड पाण्याने आंघोळी करून आणि खाणावळीत जेवून त्यांनी पं. कृष्णराव पंडित यांची तालीम घेतली. त्यांची गायकी त्यांनी उचलली आहे हे लक्षात येताच कुणी तरी शरच्चंद्रजींना कानमंत्र दिला की, 'मुला, यापुढे तू इथे राहणे इष्ट नाही.' त्यांना सांगितले 'इथला तुझा शेर संपला. पुनः महाराष्ट्रात चल.' शरच्चंद्रजी निघाले.

पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते आता मॅट्रिक होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले. त्यांना कुस्तीचा षौक लागला. क्रिकेटची मैदाने ते आपल्या गोलंदाजीने गाजवृ लागले. त्यांची शारीरिक उंची या दोन्ही खेळांना चांगलीच उपयोगी पडणार होती. ते तशीच वाटचाल करीत राहिले असते तर अनेक चषकांचे मानकरी झाले असते. पण त्यांचा अंतरीचा ध्यास वेगळाच होता. ग्वालेर गावाने अर्ध्या आडात आपल्याला सोडून दिले आहे, म्हणून आपण काय त्याच अवस्थेत राहायचे? आपला साई आपल्याला आज ना उद्या योग्य मुक्कामावर घेऊन जाणार असा त्यांना विश्वास होताच. त्यांनी वडिलांचा 'फॉरवर्ड ट्रेडिंग' चा व्यवसाय चार दिवस केला आणि सोडून दिला. पुण्यानंतर सोलापुरातही काही वर्षे राहिले. पण जेव्हा त्यांना समजले की कृष्ण शंकर पंडित यांचे चुलते एकनाथजी पंडित मुंबईस अमुक अमुक ठिकाणी आहेत तेव्हा ते मुंबईस आले. त्या वेळी आरोळकरबुवा ऐन तिशीत असावेत.

मुंबईस एकनाथजी पंडित होतेच. ते खारला मोघे यांचेकडे राहत. शरच्चंद्रजी त्यांच्याकडे जाऊन बसू लागले. जवळपास तीन वर्षे गुरुंचे गाणे ऐकत व कधीतरी तालीम मिळेल अशी नुसती प्रतीक्षा करीत बसून राहावे लागले. गुरुसेवा तशी थोडीशी हातून घडे. पण अगदी मामुली. एकनाथजींना धूम्रपानाची तलफ आली तर विडी पेटव, पाणी दे, चहा दे; पण या पलीकडे जाऊन शब्द नाही. शिष्याची शिकण्याविषयीची तळमळ किती याचा अंदाज ही बुजुर्ग मंडळी त्या वेळी अशा प्रकारे घेत असतील काय? तसेच असावे. मग केव्हा तरी तो सोन्याचा क्षण उगवला आणि आरोळकरांना तालीम मिळू लागली. सरासरी ७-८ वर्षांत पं. एकनाथजी आणि प्रो. कृष्णराव मुळे या दोघांचे मार्गदर्शन लाभून पं. शरच्चंद्र आरोळकर यांची गायन आणि वादन या दोन्ही क्षेत्रांतील तालीम सुरू झाली.

प्रो. कृष्णराव मुळे यांना संगीतक्षेत्र आज विसरलेले दिसते ही खेदाची बाब होय. प्रो. कृष्णराव यांनी कै. बाबा दीक्षित यांचे शिष्य गणपतरावजी आपटे यांचे जवळ सुमारे १८ वर्षे गायनाचे आणि बीन वादनाचे शिक्षण घेतले होते. त्यांनी बंदेअलीसाहेबांचे बीन, चुन्ना आणि रहिमतखां यांची गाणी मनसोक्त ऐकली होती. या गुरुदयाच्या तालमीमुळे रहिमतखांची शैली पं. आरोळकर यांच्या गायनात प्रतीत व्हावी हे ओघानेच आले. बुवांना आज थोर गायक म्हणून जग ओळखते. पण ते सतार उत्तम वाजवितात... बीनवरही त्यांचा हात सफाईने चालतो... दिलरुबा, कछवा ही वाद्येही त्यांच्या अंगुलिस्पर्शाने सजीव होतात... हे काही मोजक्यांनाच ठाऊक असावे. बीनकार कृष्णराव मुळे यांनी बुवांना ठुमरीचीही तालीम दिली आहे. वेचकच पण सुंदर अशा ठुमऱ्या बुवा बनारसी ढंगाने ऐकवितात. कलकत्त्यात बुवांच्या ठुमरीचे कौतुक झाले आहे. त्यांच्या ठायी संक्रांत झालेल्या रहिमतखांच्या शैलीचा अंदाज भर मैफलीत बालगंधर्वांनी व्यक्त केला तेव्हा सगळी मैफल स्तिमित झाली. ही मैफल मुंबईच्या संगीत शिक्षक संस्थेने आयोजित केली होती. बालगंधर्व त्या वेळी विकलांग अवस्थेतच होते, पण त्यांना कोपऱ्यात लोडाला टेकून बसवले होते. गाणे सुरू होताच काही मिनिटांच्या अवधीतच नारायणरावांची चुळबुळ सुरू झाली. 'बाप्पा मला पुढे नेऊन बसवा हो' म्हणू लागले. ते आणि त्यांच्याबरोबर टेकण्यासाठी असलेला लोड पुढे सरकू लागला. बुवांच्या अगदी समोर येऊन नारायणराव दाद देऊ लागले. बुवांनी प्रथम 'श्री' राग आणि नंतर 'पलखनसे पग झाख' ही यमन रागातील अस्थायी पेश केली. चीज संपताच बालगंधर्व म्हणाले 'देवा हे तर रहिमतखांचे गाणे. तुमच्याकडे कसे आले?'

बुवा म्हणाले, 'रहिमतखांचे चुलत बंधू निस्सार हुसेनखां यांचे शिष्य एकनाथ पंडितजी, त्यांचा मी शिष्य. परंपरेने आलेली तालीम.' त्यावर बालगंधर्व म्हणाले, 'तुम्ही इतकं चांगलं गाता की अजून तीन चार वेळा ऐकल्याखेरीज तृप्ती व्हायची नाही. पाय अधू नसते तर मी स्वतः तुमच्याकडे येऊन बसलो असतो ऐकायला.'

बुवा म्हणाले, 'इतकं माझं गाणं आवडत असेल तर मी स्वतः आपल्या घरी येऊन ऐकवीन ना.'

त्यानंतर बालगंधर्वांच्या माहीम येथील निवासस्थानी जाऊन बुवांनी तीन चार वेळां नारायणरावांना गाणे ऐकवले.

पंडितजींचा आणि माझा परिचय गेल्या वीस वर्षांतला. माझ्या दिवंगत मुलाच्या पहिल्या स्मृतिदिनी बुवांची एक श्रवणरम्य मैफल आयोजित केली होती आणि बिदागी किती याची पर्वा न करता बुवा गायला आले होते. नारायणराव इंदोरकर तबल्यावर होते. बुवांनी

अतिशय साक्षेपीपणाने तयार करवून घेतलेले जवारीदार तंबोरे याच मैफलीत प्रथम झंकारले. बुवांचा परिचय जसजसा वाढत गेला तसतसा त्यांचा कलाविचार खुद्द त्यांच्याच कडून समजून घेण्याचा धीर मी केला. या वेळी त्यांनी व्यक्त केलेले परखड आणि नेमके विचार या क्षेत्रातील जाणकारांनीही प्रशंसिले. पण ही मुलाखत काही अगदी सहजोपलब्ध अशी म्हणता येणार नाही. बुवांचा स्वभावविशेष व्यक्त करणारी खमाजमधील एक बंदीश बुवा अनेकदा गातात. त्या बंदिशीचे शब्द आहेत:

***नहि कछु लिया दिया***
***एरी सजनी, वे कन्हाई***
***जब चाहे करत झगरिया***

बुवांना समजून घेण्यासाठी म्हणून मी त्यांच्याकडे गेलो, तेव्हा सुरुवातीला थोडासा, प्रेमाचा असेल पण, झगडा झाला. मी बुवांना माझ्या भेटीचे प्रयोजन सांगताच ते म्हणाले, “समीक्षक आणि कलावंत यांच्या दरम्यान जी राजकारणं चालतात त्यांत मला रस नाही. मी तुम्हाला काहीही सांगणार नाही”

खडीसाखरेच्या खड्यावर बसलेली माशी उडवून लावावी तशी माझी स्थिती बुवांनी केली. पण पुढे जाता माझ्या सगळ्या प्रश्नांची त्यांनी छान उत्तरे दिली. मी म्हणालो, ‘ख्यालगायकी खूपच बदललीय् एवढंच नव्हे तर विकृतही झालीय् असं बुजुर्ग मंडळी म्हणतात. या उलट सामान्य श्रोते ‘आता गाणं फार पुढं गेलंय्’ असं मिटल्या डोळ्यांनी प्रशस्तिपत्रक देतात. गाण्याच्या बाबतीत अशी प्रशस्ती अथवा नालस्ती करण्याचा अधिकार त्यांनाच पोचूं शकतो की ज्यांनी ‘मागं गाणं काय होतं’ हे अनुभवलंय. शिवाय ख्याल गायन म्हणजे काय? ख्याल गायकीची सौंदर्यतत्त्वं कोणती? याबाबत आपण काही सांगावं अशी माझी इच्छा आहे.”

पंडितजी म्हणाले, “तुमचा उपक्रम ठीक आहे, पण तुम्हांला हे ठाऊक आहे का, की संगीताच्या विवरणाला शब्दांची मर्यादा येते आणि तिथंच मतलबी लोक हुज्जत घालतात. तुम्ही समीक्षक मंडळी देखील कमाल करता. अमक्यानं अमुक राग पेश केला किंवा तमक्यानं तमुक बंदीश ‘पेश’ केली असं लिहून जाता, तालासुरात अस्थायी ठाकठीक म्हणणं वेगळं आणि ती पेश करणं वेगळं याचं भान तुम्हांला राहात नाही. खरं म्हणजे या दोहोंत जमीनअस्मानाचं अंतर असतं. पहिला गायनप्रकार ही ख्याल गायनातली सर्वांत खालची पायरी असून ख्याल ‘पेश’ करणं ही सर्वात वरची पायरी होय. एखाद्या होतकरू गायकात थोडीफार कलात्मकता दिसताच त्या कलावंताला एकदम अभिजात कलावंत म्हणण्यानं

ख्याल गायकीला प्रतिष्ठा लाभत नाही. ख्यालगायकी म्हणजे नेमकं काय हे आधी समग्रपणे समजलं पाहिजे"

"तेच तर मला समजून घ्यायचंय्."

"हा विषय सूत्ररूपानं सांगता येईल."

"सूत्ररूपानं म्हणजे कसा?"

"वास्तविक 'राग' हे आसन 'असून ख्याल ही' 'अवस्था' आहे; एवढं सूत्रही सबंध ख्याल गायकीवर प्रकाश टाकू शकेल. ध्रुपदधमारातील भाववादित्व कमी झालं तेव्हा शोध घेता घेता ख्याल गायकी गवसली. अभिजात संगीताची अतिशय परिणत अशी ती अवस्था आहे. बंदिशीमधील शब्द, तिची धून थणि तिचा ठेका या तिहींचा ख्यालगायकीत समन्वय झालेला असतो."

"पण काही बुजुर्ग पंडळी तर बंदिशीतील शब्द हे स्वरालंकार टांगून ठेवण्याच्या खुंट्या होत; त्याहून त्यांना महत्त्व नाही असं म्हणतात...."

"ते काहीही म्हणोत; मी तसं मानीत नाही. आणि ग्वालेर गायकीच्या मूलस्रोताबाबत माझ्याप्रमाणंच ज्यांचं 'कन्व्हिक्शन' होईल तेही बंदिशीतील शब्दांना अशा उपेक्षणीय पायरीवर नेऊन ठेवणार नाहीत."

"ग्वालेर गायकीच्या मूलस्रोताची वैशिष्ट्यं तरी कोणती?"

"मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सहजसुंदर, भारदस्त व रसभरित असे अस्थायी अंतरे. जुने गवई, 'हम राग नहीं देखते अस्थायी की शकल देखते हैं' असं ज्या अस्थायी अंतऱ्यांना उद्देशून म्हणत ते. या अस्थायी अंतऱ्यातूनच शब्द, धून व ठेका यांचा समन्वय झालेला असतो. हा मूलस्रोत ज्या सदारंग, अदारंग यांच्यापासून निघाला ते होते बीनकार - त्यामुळं बीन अंगाची मींड हा या गायकीचा प्राण आहे."

"बीन अंगाचीच का?"

"त्याला खास कारण आहे. मींड सारंगीवरही निघू शकते पण बीनवर निघणाऱ्या मीडेचं सौंदर्य आणि आंस तीत नसते."

"पण मीड हाच ख्यालगायकीचा प्राण का?"

मींड नसेल तर अस्थायी अंतऱ्यात ठायी ठायी त्रुटी जाणवेल. ख्याल गायकीत अतूटपणा राखण्याचं काम मींड करते. शिवाय तिची कमनीयता अंतःकरणाचा ठाव घेते. अशा अस्थायीचा उद्घोष झाल्याबरोबरच तरंग येऊ लागतात. अस्थायीतील राग हाच तालमय होतो आणि एक अनुभव उमलू लागतो. एकाच रागात अनेक अस्थाया असल्या तरी

प्रत्येकीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व असते आणि म्हणूनच अनुभवही वेगळा असतो.''

''हा अनुभव गायक उमलवीत असता तो आलापी, बोल आलापी, बोलउपज, तानक्रिया यांचंही साहाय्य घेत असतो ना?''

''घेतो. पण याच क्रमानं गायचं असा त्याचा अर्थ नव्हे. अस्थायीची उकल करण्याच्या दृष्टीनं त्यांचा यथायोग्य वापर झाला पाहिजे. मला कुणावरही टीका करायची नाही पण ख्याल गायकीत आज विकृती निर्माण झालीय् असं सुरुवातीला तुम्ही जाणत्यांचं मत म्हणून सांगितलंत ती विकृती या क्रमगायनामुळं झालीय्.''

''म्हणजे कशी?''

''ग्वाल्हेर गायकीत बेहलावे, सावकाश व जलद बोलताना, नंतर आरोही, अवरोही व संचारी ताना असा प्राथमिक अभ्यास म्हणून सांगितला. मजा अशी की या प्राथमिक अभ्यासाचाच रियाज होऊन आता मालगाडीसारखा लांब ठेका, विजेचे तोकडे शब्द घेऊन घंटाघंटा बिलंपत, तालाशी दांडगाई, हळवे सूर, उपजेच्या तानेऐवजी आलंकारिक तानांचा पाऊस अशी विकृती निर्माण झाली आहे.''

''मगाशी आपण, अस्थायीचा उद्घोष झाल्याबरोबर तरंग येऊ लागतात असं म्हणालात. बहुधा गायकाच्या अंतरंगात घडणाऱ्या प्रक्रियेचं हे वर्णन असावं. ही प्रक्रिया आणखी थोडी स्पष्ट करता येणार नाही काय?''

''येईल की. एखादा अभिजात वक्ता डोळ्यापुढं आणा. तो त्या त्या वेळचा विषय प्रतिपादन करीत असतो तेव्हा काय करीत असतो? त्याच्या आजवरच्या चिंतनाचा आणि अभ्यासाचा परिपाकचे त्याच्या तोंडून बाहेर पडत असतो. त्याच्याही अंतरंगात ऊर्मी येत असतात. शब्दांसाठी तो अडून बसत नाही. कधी काळी व्याकरण तो शिकला असेल पण ते व्याकरण तो भाषणात मांडीत नाही. अगदी सहजपणे विचाराची एकेक ऊर्मी तो मांडीत असतो आणि ती मांडीत असता अंतर्मुख होऊन नवी ऊर्मी घेऊन येतो. जरूर तिथे 'पॉज' घेऊन तो श्रोत्यांनाही त्या क्षणापुरतं अंतर्मुख करतो. अस्सल ख्याल गायक ख्याल पेश करीत असताना अशाच ऊर्मी घेऊन येत असतो. त्याचेही 'पॉजेस' असतात. ख्यालातील रसानुभव प्रवाही ठेवण्यासाठी समेसारखा उत्कर्षबिंदू असतो. तो स्वरसप्तकात श्रोत्यांशी बोलतच असतो. आकाशातील पक्ष्यांचा किंवा पाण्यातील माशांचा विहार असावा अशी तानक्रिया, मुरक्या, खटके ही त्याच्या या 'वक्तृत्वा' ची उपांगे मूळ अंगाशी एकजीव होऊन येतात. असे जेव्हा घडते तेव्हा तो स्वतःला आणि श्रोत्यांना अविमनस्क स्थितीपर्यंत नेऊ शकतो. तिथे त्याच्या ख्यालगायकीचे सार्थक झाले असे म्हणायचे किंवा त्याने तो ख्याल अथवा राग

‘पेश’ केला असे म्हणायचे.”

“म्हणजे ख्याल ही एक अवस्था असे आपण म्हणालात, त्या अवस्थेची परिणती अविमनस्कतेत व्हायला हवी असेच ना!”

“खरे आहे. केवळ संगीतकलेचंच नव्हे, सर्वच कलांचं अंतिम ध्येय माणसाला ‘इंट्रोव्हर्ट’ बनवणं हे असतं, असलं पाहिजे.”

बुवांचे गाणे ऐकताना अस्थायीचे बेअरिंग टिकविण्यासाठी ते कसे तत्पर असतात हे जाणवते. ते दरबारी किंवा पूरियामधील बंदीश गात असतील तर मींडकाम आणि आलापी यांवरच जास्त भर दिसून यईल. याचे कारण बेअरिंग’ ची जपणूक.

सिद्धेश्वरीदेवी बुवांकडे मुद्दाम टप्पे ऐकण्यासाठी आल्या होत्या. केसरबाई ‘ओ मिया जानेवाले’ हे टप्याचे शब्द उद्घोषित होताच, मैफिलीतून निघून दारापर्यंत गेलेल्या, परतल्या! टप्पा ही एक शैली असून ते ख्यालाचेच एक प्रभावी अंग आहे असे बुवा मानतात. सदारंग-अदारंग यांच्या परंपरेतील ख्याल गायक गुलाम रसूल ऊर्फ शोरी मियां यांना टप्पा निर्माण करावा लागला. अनेकजण समजतात त्याप्रमाणे उंटाच्या चालीची सांगीतिक प्रतिकृती म्हणून टप्पा निर्माण झाला असे नाही. शोरी मियां पंजाबात गेले असता त्यांचे गाणे रंगले नाही व श्रोत्यांना खूष करण्यात ते कमी पडू लागले म्हणून नव्या चिजा रचून त्या नव्या ढंगाने त्यांनी पेश केल्या. ते हे टप्पे. टप्पे बाह्यतः चपळ वाटतात. प्रतिभेचा अवखळपणा किंवा मिस्किलपणा त्यांत दृग्गोचर होतो म्हणून ते चपळ वाटतात. ख्यालाप्रमाणेच बोल, धून व ताल ही तिन्ही अंगे खेळविणे, लयीच्या होणाऱ्या सूक्ष्म फरकांवर ताबा ठेवणे हे प्रतिभावंत कलाकाराशिवाय दुसऱ्याला जमत नाही. म्हणूनच टप्पा गाणारे हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच कलाकार आहेत व त्यांतही टप्पा ‘पैश’ करणारे बुवांसारखे अपवादात्मकचं. बुवा म्हणतात, “मला गुरुमुखाने मिळालेल्या ख्यालांच्या अस्थायांतून टप्यांची बीजं असलेल्या जागा सापडल्या. आणि सात मात्रांचा पश्तो वा धीम्या लयीतील १६ मात्रांचा त्रिताल हे ठेके मी वापरतो, त्यामुळं टप्प्यातील भारदस्तपणा व पिळदारपणा सांभाळला जातो.” ठेका ही एक भाषा आहे ही बुवांची संकल्पना.

स्वराविष्काराला ठेक्यामुळे अडथळा होतो अशी विचारसरणी एका नामवंत कलाकाराने जाहीरपणे अनेकदा मांडली आहे. समेच्या आसपास कुठे तरी तालचक्र जागृत झालेले दिसले म्हणजे पुरे असे त्या कलाकाराला वाटते. पण बुवा ठामपणे सांगतात की ही अडथळ्याची भाषा दिशाभूल करणारी आहे. लयीच्या आधाराविना स्वराविष्कार होऊ शकतो हेच मुळात चूक, कारण स्वर - गाण्यातला स्वर - हा आघातातून निर्माण झालेला

आहे. हे आघात ठराविक लयीने पडतात तेव्हा स्वर होतो.

बुवांना अनेक चांगले शिष्य लाभले आहेत. गंगाधर पाटील गाऊ लागले की थेट बुवा गात आहेत असा भास होतो. शरद साठे स्वतंत्रपणे गातात तेव्हा डी. व्ही. पलुस्कर आणि पं. आरोळकर या दोहोंच्या गायकीचे दर्शन घडवितात, पण बुवांच्या साथीला असतात तेव्हा बुवांच्याच गायकीचे अनुकरण करतात. नीला भागवत यांनी बऱ्याच अंशांनी बुवांची गायकी उचलली आहे. चित्तरंजन तोरगल, डॉ. कृष्णा जोशी, कलकत्त्याच्या रुबी... पण बुवांचे अपरंपार भांडार यांपैकी कोणा एकाला मिळाले आहे असे मात्र म्हणणे कठीण आहे. बुवांनी स्वतः केलेल्या रचनाच सहाशेच्या आसपास असतील. त्यांतही ख्यालनुमे फार. बुवांच्या विद्वत्तेची दखल संगीत नाटक अकादमीने १९७९ साली घेतली व त्यांना फेलोशिपचा बहुमान दिला. १९८४ साली आय्. टी. सी. रिसर्च संस्थेने दहा हजार रुपयांचा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले.

दिवसामागून दिवस जात आहेत. त्यांत बुवांना मोठ्या आणि लहान आजारांची आव्हाने मिळत आहेत आणि ती परतवून लावून बुवा पुनः छोट्या छोट्या मैफलींतून दाद घेत आहेत हे बघितले म्हणजे बुवांना लाभलेला जन्माचा सोबती याही संकटकाळात त्यांना मदतरूप होत असावा असे वाटते. असा स्वतःच्या साधनेत तृप्त आणि व्यवहारात अलिप्त असणारा बुजुर्ग बुवांच्या सारखा एखादाच.

❀ ❀



# ८. भ्रमणयोगी पं. निवृत्तिबुवा


आय्.टी.सी. रिसर्च अकादमीचे गायनगुरू म्हणून पं. निवृत्तिबुवांचे वास्तव्य ७९ सालापासून कलकत्त्यास असले तरी ते असे एका ठिकाणी ठिय्या देऊन राहणारे उस्ताद नव्हेत. ते गानयोगी आहेत तसेच भ्रमणयोगीही. अर्थात याला निवृत्तिबुवांचा तरी काय इलाज? त्यांच्या कुंडलीतच भ्रमणयोग आहे. पाचव्या वर्षापासून त्यांची भ्रमंती सुरू झाली आणि मध्यंतरी तीस वर्षे बिऱ्हाड कोल्हापूरला होते म्हणून ते कोल्हापूरला चिकटून होते इतकेच. पुणे, मुंबई, लखनौ, जालंदर, दिल्ली, कलकत्ता अशी त्यांची फिरस्ती चालूच असायची. चौसष्ट साली बुवा मुंबईस आले. थोड्याच दिवसांत गोरेगावी त्यांचे बिऱ्हाड झाले. मुम्बई विद्यापीठाच्या संगीतशाखेचे एक गायनगुरू म्हणून त्यांना स्थान मिळाले. गोरेगावी त्यांचा शब्द खाली पडू न देणारे एक रसिक वर्तुळ तयार झाले. पं. प्रभुदेव सरदार, प्रसाद सावकार, प्रभा अत्रे, मोहिले भगिनी, नीलाक्षी जुवेकर, केतकर कुटुंबीय, पद्मा तळवलकर अशा किती तरी जणांनी बुवांच्या संगीतधनावर, शिष्यत्व पत्करून, हक्क सांगितला. सत्तरीच्या रोखाने आयुष्याचा तानपलटा सुरू झाला असता नवीन गाव, नवीन हवा-पाणी कसे काय जमणार हा विचार कुणाच्याही मनात प्रथम डोकावला असता. पण नाव निवृत्ती असले तरी बुवा सतत प्रवृत्तिमार्गावरच राहिलेले आहेत. कुंडलीतील भ्रमणयोग त्यांना स्वस्थ बसूच देत नाही. ते गेले कलकत्त्याला.

बुवांचे मूळ घराणे जाधवांचे. त्यामुळे मूळ आडनावही तेच. कोल्हापूरला ताराबाईंनी वेगळे मराठी राज्य स्थापले तेव्हा हे जाधवांचे घराणे कोटकरी सरदार बनले आणि ते जाधवांचे सरनाईक झाले. पंचगंगेच्या काठावरची अत्यंत सुपीक अशी दीडशे एकर जमीन सरनाईक घराण्याच्या मालकीची होती! आता *होती* असेच म्हटले पाहिजे. कारण या क्षणी बुवांच्या वाट्याला अवघी दीड एकरच उरली आहे. काप गेले आणि भोके राहिली तशी संस्थानातील साऱ्या सरदारांची अवस्था! सरदारक्या संपल्या. सरनाईक आडनाव तेवढे शिल्लक राहिले. वयाच्या पाचव्या वर्षी चुलत्यांचे बोट धरून निवृत्तिबुवांना नाटक कंपनीत जाणे भाग पडले. निवृत्तिबुवांचे वडील हे उत्तम भजन करणारे आणि दर महिन्यास पायी

पंढरपूरला जाऊन येणारे. निवृत्तिबुवांसह त्यांना तीन मुलगे, पण निवृत्तिबुवांची आई त्यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षी वारल्याने, वडिलांनी फिरून लग्न केल्यावर या तीन मुलांचे काय हा प्रश्न आला. सावत्र आईकडून मुलांना त्रास पोचू नये म्हणून निवृत्तिबुवांच्या दोन वडील बंधूंना त्यांनी पहिल्या पत्नीच्या माहेरी म्हणजे मुलांच्या आजोळी धाडले आणि निवृत्ती चुलत्याबरोबर राहिला नाटक कंपनीत. हिंडेल मजेत, पुढचे पुढे पाहू असा विचार करून शंकरराव सरनाईक यांच्याबरोबर निवृत्तिबुवांना धाडले. भ्रमंती सुरू झाली ती येथून. शिवाय शंकरराव सरनाइकांनाही तोपर्यंत संततिसौख्य नसल्याने पाच वर्षांचा निवृत्ती त्यांना हवाहवासा वाटला यात आश्चर्य नव्हे.

ज्या शिवराज नाटक मंडळीत हे काका-पुतणे गेले तिची थोडी माहिती देणे इथे अप्रस्तुत होणार नाही. शाहूमहाराजांच्या आश्रयाखाली आणि त्यांच्या आज्ञेने ही मंडळी गोविंदराव टेंबे यांनी काढली. त्यामागे गंधर्व कंपनीतील हेवेदावे होते. नटवर्य बोडस यांनी गंधर्व कंपनीचा मुक्काम हैद्राबादेस असता वीस पंचवीस मंडळींना काढून टाकले. कारण काय तर हे लोक टेंब्यांच्याविषयी अभिमानाने व आपुलकीने बोलत. ती बेकार मंडळी पुण्यास थेट टेंब्यांकडे आली आणि शिवराज मंडळी निघाली. सन १९१५ चा नोव्हेंबर महिना होता तो. चांगले गाणारे नट हवेत म्हणून टेंब्यांनी मास्टर कृष्णराव यांच्या पालकांशी संधान बांधले पण कृष्णरावांनाही अखेर पळविले गंधर्व कंपनीनेच. याच शोधात टेंब्यांचे मित्र आणि कोल्हापूरच्या देवल क्लबचे संस्थापक केशवराव बाबा देवल होते. निवृत्तिबुवांच्या काकांना म्हणजे शंकरराव सरनाईक यांना मंडळीच्या बिऱ्हाडी त्यांनी नेले व टेंबे प्रभृतींना त्यांचे गाणे ऐकविले. कोल्हापूरचे ध्रुपदिये अथणीकर यांच्याकडे शंकररावांना ध्रुपदधमाराची तालीम मिळाली होती व त्याआधी खांसाहेब अब्दुल करीमखां यांच्या सहवासात राहून त्यांनी गाणे पैदा केले होते. शिवराजमध्ये टेंब्यांच्या समोर शंकरराव सरनाईक यांची चाचणी झाली. तीवर टेंब्यांचा अभिप्राय असा: शंकररावांचा आवाज अतिशय गोड व गळ्याला फिरतही चांगली. पण दाबून गाण्याची सवय. दहावीस मंडळींना गाणे ऐकावयास येईल एवढीच आवाजाची रुंदी. पण त्या आवाजाला सुईसारखे अग्र होते. हे लक्षात येताच टेंब्यांनी ज्या हॉलमध्ये चाचणी सुरू होती त्या हॉलच्या अगदी टोकास जाऊन आवाजाच्या फेकीचा अंदाज घेतला. शंकररावांचा वर्ण कोकिळेसारखा पण आवाजही तसाच कोकिळेसारखा, म्हणून टेंब्यांनी शिवराज कंपनीच्या सौभद्रातील सुभद्रेसाठी शंकरराव सरनाईक यांची निवड करून पदांची तालीम देण्यास सुरुवात केली. निवृत्तिबुवा आणि त्यांचे चुलते यांच्यांत वयाचे अंतर वीस वर्षांचे. निवृत्तिबुवा या घडामोडी घडत असता चार किंवा पाच वर्षांचे असणार. त्यांच्या

कानावर कोणत्या गाण्याचे संस्कार झाले व होत गेले या दृष्टीने या इतिहासाला जसे महत्त्व आहे तसेच शिवराजमधून शंकरराव सरनाईक यांना एका वर्षात बाहेर पडण्याचा प्रसंग का आला हे समजण्याच्या दृष्टीनेही आहे.



शंकररावांच्या सौभद्राची पहिली रंगीत तालीम टेंब्यांनी बापूसाहेब कागलकर (शाहूमहाराजांचे बंधू) प्रभृतींना दाखविताच नाटकाच्या यशाबद्दल कोणतीही शंका उरली नाही. शंकररावांना दीड-दोनशे रुपये पगार द्यावा असे टेंब्यांना सुचविण्यात आले. टेंब्यांनी ती सूचना शाहूमहाराजांच्या कानावर घातली तेव्हा महाराजांनी ती जवळपास उडवूनच लावली व म्हणाले, 'त्याला (बापूसाहेब) काय कळतंय, फार तर पन्नास रुपये दे, नाही तर शंकरला माझ्याकडे पाठव.' या भक्कम आधारावर टेंब्यांनी शंकरराव सरनाईक यांना वर्षभर जेवणावारी हिरॉइनच्या भूमिका करायला लावल्या! शंकरराव सपत्नीक आणि पुतण्या निवृत्ती यासह कंपनीत राहत होते. तिघांच्या जेवणखर्चापोटी पगाराची रक्कम कापून घेण्यात येत असे, असे निवृत्तिबुवांना ऐकल्याचे आठवते. तसे त्यांनी एका मुलाखतीत सांगितलेही आहे. पण टेंब्यांच्या मनात काही गोष्टी असाव्यात. ज्या अर्थी पदांच्या तालमी देऊन शंकररावांना आपण तयार केले त्या अर्थी ते आपले शागीर्द, आणि गुरूने शागिर्दाला पगार तो कसला द्यायचा? ही झाली मनातली बात. पण पुढे टेंब्यांनीच शंकररावांच्या पगार न घेण्याच्या वृत्तीचा एका लेखात गौरव केला आहे. शंकररावांनीच वर्षभर पगाराची रक्कम घेतली नाही व आकडाही कळविला नाही. इतकेच नव्हे तर केशवराव भोसल्यांनी सरनाईकांना आपल्या कंपनीत नेण्याची गुप्त कारवाई करून त्यांना चारदोन हजार रुपये देऊ केले तरी देखील शंकररावांना त्याची भुरळ पडली नाही असे टेंब्यांनी म्हटले आहे. एका परीने शंकरराव सरनाईक यांच्या सौजन्याचा टेंब्यांनी अंतच बघितला असे म्हटले पाहिजे. अण्णासाहेब किर्लोस्करांची सुभद्रा आपापल्या गायकीने त्या काळात चौघांनी लोकप्रिय केली. पहिले केशवराव भोसले, दूसरे बालगंधर्व, तिसरे सवाई गंधर्व व चौथे शंकरराव सरनाईक.

रामभाऊ कुंदगोळकरांना अमरावतीच्या मुक्कामात या सुभद्रेच्या भूमिकेतील नितान्तमधुर गायनामुळेच सवाई गंधर्व ही पदवी मिळाली. आधी ते वन्समोअर मिळण्यासाठी कसून गात आणि नंतर वन्समोअर मिळाला म्हणून गात, अशी चाहते देखील टीका करीत, पण इतके ओतप्रोत गाणे रंगभूमीवर होई, हे खरेच आहे. टेंब्यांनी शंकररावांच्या गळयाचे गुणधर्म ओळखून विशेष तरकिबीने त्यांना सुभद्रेची पदे शिकविली होती. टेंब्यांची शिकविण्याची धाटणी जयपूर गायकीच्या दाट छाया घेऊन आलेली असणार हे सांगावयास नकोच. म्हणजे मुळात किराणा घराण्याचा दाट संस्कार झालेल्या शंकररावांना इतपत जयपूर गायकीचे वळण टेंब्यांनी दिले असा तर्क निघतो. केशवराव भोळे यांनी टेंब्यांच्या या कलमबांधणीच्या पद्धतीबद्दल म्हटले आहे की शंकररावांची सुभद्रा लोकप्रिय व्हावी म्हणून टेंब्यांनी मधुर सुरावटी आलाप एकावर एक रंगतील अशा चढ्या रंगतीच्या तरकिबीने

शंकररावांकडून बसवून घेतल्या होत्या. आपली पेटीवादनातील करामत येथे टेंब्यांनी जास्त ध्यानात आणली असावी असे सरनाईकांची ही पदे ऐकताना वाटत असे. हे सर्व इतक्या विस्ताराने सांगण्याचे कारण एवढेचा की निवृत्तिबुवांच्या कानावर अगदी सुरुवातीच्या संस्कारक्षम वयात कोणत्या गायकीचे संस्कार झाले हे लक्षात यावे. निवृत्तिबुवांचे पहिले गुरू शंकरराव सरनाईक हेच होते आणि अष्टौप्रहर काकांचेच गाणे बालवयात त्यांच्या कानावर पडत होते हे ध्यानात ठेवले पाहिजे.

इंदूरला शिवराज कंपनीचा मुक्काम चांगला चालला असता शंकरराव नाईक यांनी कंपनी सोडली ती अर्थातच बिनपगारी राबण्याचा कंटाळा येऊन. ते निवृत्तीसह पुनः कोल्हापूरला येऊन राहिले. सरनाईक निघून गेल्यावर शिवराज कंपनीच पुढे बंद पडली, म्हणजे अशी की तुकोजीमहाराज होळकरांच्या इच्छेनुसार टेंब्यांनी तिला होळकर नरेशांच्या ओटीतच घातली. अशा प्रकारे होळकर सरकारांच्या मालकीची यशवंत कंपनी स्थापन झाली व तुकोजीमहाराजांनी शंकरराव सरनाईक यांना मुखत्यारी देऊ करून ती कंपनी चालविण्यासाठी तारेने इंदुरास बोलावून घेतले. सन १९१९-२० मध्ये निवृत्तिबुवांच्या आयुष्यात मध्यंतरीच्या अल्प विश्रांतीनंतर पुनः आलेली ही भ्रमंती पुढे सतत पंधरा वर्षे टिकून राहिली आणि संगीताध्ययन व अन्य विविध अनुभव यांनी त्यांचे पौगंडदशेतील व युवावस्थेतील आयुष्य ढवळूनच निघाले.

सात वर्षांचा निवृत्ती छोट्या-छोट्या भूमिका करायचा. सत्याग्रही नाटकातील निवृत्तिबुवांची नारदाची भूमिका गाजली होती. विशेष म्हणजे ‘देवा कुठे गुंतला’ या पदाने ते लोकप्रिय झाले होते. बसवून घेतलेली पदे निवृत्तिबुवा त्या वयात इतक्या प्रभावीपणे म्हणत की ‘धर्मध्यान आवत काम’ या त्यांच्या गाण्याला ७०० रुपये बक्षीस होळकर सरकारकडून देण्यात आले होते. पण ही सगळी बांधून दिलेली शिदोरी. बुवांच्या गायनशिक्षणाची खरी सुरुवात कंपनीत गोविंदबुवा भावे यांच्याकडे झाली. भावे हे विष्णु दिगंबर पठडीतले खरे पण त्यांची शिकविण्याची पद्धत थोडीशी विचित्रच होती. एकूण ७५ पलटे ते घोकून घेत आणि विद्यार्थ्याला तालमीला बोलावला की पलटा क्रमांक अमुक म्हण असा हुकूम करीत. पूर्वीची जशी काही परवचा पद्धती त्यांच्या हाडीमासी खिळली होती. कंपनीत एका बाजूला हे सुरावटी घोकण्याचे शिक्षण चालू असतानाच निवृत्तिबुवा तबल्याच्या प्रेमात पडले. कंपनीत कडुलाडूची प्रसिद्ध साथीदारांची जोडी होती, रुकडीकर हे ख्यातनाम तबलजीही होते पण बुवांना तबल्याचे खरे शिक्षण मिळाले ते बाबालाल इस्लामपूरकर यांच्याकडून. रुकडीकर दोनच वर्षे कंपनीत होते. इस्लामपूरकर (केशवराव भोसल्यांचे तबलजी) यांनी छोट्या

निवृत्तीला तबल्याचा जसा काही षौक लावला. आज निवृत्तिबुवांच्या गाण्यात तबल्याचा जो वरचष्मा दिसतो तो या षौकातून निर्माण झाला आहे. याचा अर्थ बुवांना आज याद असणारा सगळा तबल्याचा बाज त्यांनी कंपनीतच शिकून घेतला असा मात्र नव्हे. बुवांनी पुढे तबला वाढविला. पण कंपनीत ते गाण्यापेक्षा तबल्यावर अधिक प्रेम करीत आहेत आणि जेव्हा बघावे तेव्हा 'धिर् धिर् किटि तक' करीत बसलेले आहेत असे दिसून येताच शंकररावांच्या मावशीने त्यांची कानउघाडणी केली. 'तुला साजिंदा व्हायचे नाहीए. गवई व्हायचं आहे' हे लक्षात ठेवून गाण्याकडे वळ असे त्यांनी सांगितले.

भाव्यांच्या नंतर छोटा निवृत्ती आपल्या काकांकडेच गाणे शिकत होता. भैरवाची तालीम त्यांच्याकडून मिळाली. याखेरीज कंपनीत कृष्णराव गोरे, सवाई गंधर्व, वामनराव सडोलीकर यांच्यासारखी गाती मंडळी होती आणि कानावर नित्य गाणे पडतच असे. पूर्वीच्या स्थायी कंपन्या ही संगीताची फिरती विद्यापीठे होती, याचा खरा अर्थ इथे कळतो. चार घटका तबल्यावर रियाझ करावा; कंपनीत खादिम हुसेन म्हणून सारंगिये होते; त्यांच्या रियाजाच्या वेळी रोज बसावे आणि तानपलट्यांची बांधणी आणि उकल ते कशी करतात हे ऐकावे; सवाई गंधर्व स्वरांचा अभ्यास कसा करीत हे लक्षपूर्वक पाहावे अशा किती एक गोष्टींचा लाभ निवृत्तिबुवांना त्या काळात झाला. रामभाऊ कुंदगोळकर म्हणजे सवाई गंधर्व स्वरसाधनेसाठी तानपुरा उत्तम जुळवून कोणाला तरी छेडायला लावीत आणि गुंडाळलेल्या होल्डऑलमध्ये स्वतः तोंड घालून स्वराशी एकरूपता साधीत. कधी कधी भिंतीकडे तोंड करून आपल्या स्वराचा पडसाद कानाला कसा लागतो ते बघत. दीर्घकाळ तरुण निवृत्तीचे आराध्य दैवत सवाई गंधर्व हेच होते. सवाई गंधर्व दग्यात तोंड घालून तानपुऱ्यातून निघणाच्या स्वराशी स्वतःचा स्वर मिळवीतं हे बुवांनी बघितले आहे आणि तंद्री लागली तर बहिर्दिशेसाठी गेल्यावरही तास अर्धातास गात बसत हेही निवृत्तिबुवांनी बघितले आहे. पौगंड दशेत निवृत्तिबुवांवर या गोष्टींचा परिणाम व्हावा हे अगदी स्वाभाविकच होय आणि पुनः हेही लक्षात ठेवले पाहिजे की शंकरराव सरनाईक आणि सवाई गंधर्व या दोघांनी त्यांच्या कानावर आणि मनावर पहिला ताबा मिळविला. यावरून किराण्याच्या पायावर पुढची इमारत बांधली गेली आहे हा मुद्दा निवृत्तिबुवांच्या बाबतीत नेहमीच लक्षात ठेवला पाहिजे हे ध्यानात येईल.

सन १९२७ मध्ये कंपनीत खांसाहेब अब्दुल करीमखाँ काही दिवसांसाठी पाहुणे म्हणून आले होते. सवाई गंधर्व आणि शंकरराव दोघेही त्यांचे शागीर्द. त्यामुळे खांसाहेबांची बडदास्त काय विचारावी! पाहुणचारानंतर गाण्याचा कार्यक्रम ओघाने आलाच. पंधरा वर्षांचे निवृत्तिबुवा त्या मैफलीत कुतूहलाने काय काय घडते ते पाहत होते. खांसाहेबांनी किराणा

घराण्यातील खास हातखंडा पूरिया सुरू केला. 'पॅरी दे गर लागी 'खांसाहेब सायंकालीन राग पेश करू लागले की ते राग जगत आहेत, नुसता राग गात नाहीत असे वाटायचे. तीव्र मध्यम, गांधार, निषाद अशा दर्जाने लागत होते की खांसाहेबांना सर्व श्रुतिस्थाने गवसल्याचा साक्षात्कार श्रोत्यांना होत होता. एवढ्या अतुलनीय गायनात मागे तंबोऱ्यावर बसलेल्या व एरवी खूपखूप गाणाऱ्या सवाई गंधर्वांनी अथवा शंकरराव सरनाईक यांनी एकदा देखील स्वरानुकार करू नये याचे निवृत्तिबुवांना राहून राहून आश्चर्य वाटले. मैफल आटोपल्यावर आपण या संबंधात किमानपक्षी सवाई गंधर्वांना तर विचारायचेच असे निवृत्तिबुवांनी मनाशी ठरवून टाकले. काकांना विचारायला संकोच वाटला. उगाच भडकले तर घ्या काय? सवाई गंधर्वांना विचारणे खपून जाण्याजोगे होते. आणि निवृत्तिबुवांनी सवाई गंधर्वांना दुसऱ्याच दिवशी एकटे गाठून तो प्रश्न विचारलाच. तेव्हा रामभाऊ कुंदगोळकर म्हणाले,

"आम्ही आ का केला नाही ते तुला इतक्यात कळायचं नाही."

"मग केव्हा कळेल? आणि समजा न कळलं तरी सांगायला काय हरकत आहे?"

"सांगूच म्हणतोस?"

"सांगा ना. पाहू तरी मला समजतं की नाही."

"अरे आम्हाला खांसाहेबांची अस्थायी बिघडवायची नव्हती."

"तुम्ही नुसता स्वर लावला असतात तर अस्थायी बिघडली असती?"

"निश्चितच. अरे काय दर्जानं गात होते खांसाहेब!"

"ते खरं आहे पण मग तुम्ही स्वर भरला असता तर अस्थायी बिघडली असती, हे काही मला पटत नाही. एरव्ही तुम्ही इतकं गाता-"

"ते एरव्हीचं वेगळं आणि काल तू खांसाहेबांचं ऐकलंस ते वेगळं. तुझ्या समजण्याच्या पलीकडलं आहे सगळं."

"मला केव्हा समजू शकेल?"

"गाणं शिकलास तर समजू शकेल."

आणि यातूनच निवृत्तिबुवांना सवाई गंधर्वांची तालीम सुरू झाली. दोन वर्षे ही तालीम चालू होती. त्यातली 'दैयाँ बर दूबर 'ही तोडी मधील चीजच सहा महिने चालू होती. सवाई गंधर्वांनी तालीम देऊ लागण्यापूर्वी आपण बेसूर होतो व नंतर सुरेल झालो असा अनुभव तर बुवा सांगतातच पण परवा त्याही पुढे जाऊन त्यांनी जे एक विधान केले ते कदाचित् वादग्रस्त ठरण्याचाही संभव आहे. बुवा म्हणाले, **'ज्याला ज्याला म्हणून गाणे शिकायचे असेल त्याने प्रथम काही वर्षे किराणा घराण्याची तालीम घ्यावी. त्यामुळे तो कायमचा**

**सुरेला होईल.'** बुवांचे हे विधानही स्वानुभूतीतून आले असल्याने त्यांच्या गायकीचा विचार करताना किराण्याचा एक स्रोत या झऱ्यात सातत्याने येऊन राहिलेला आहे हे विसरता येणार नाही असे मला वाटते.

निवृत्तिबुवांच्या काकांना गायनक्षेत्रातील जबरदस्त उस्तादांना आपल्या कंपनीत ठेवून घेण्याची ओढच होती म्हटले तरी चालेल. कंपनी तशी उत्तमच चालू होती. कृष्णराव गोरे, वामनराव सडोलीकर, स्वतः शंकरराव सरनाईक आणि सवाई गंधर्व एवढा पट्टीच्या गायकांचा संच आणि मानापमान, सौभद्र तुळशीदास, सौभाग्यलक्ष्मी, लयाचा लय, चलती दुनिया या नाटकांनी खूपच पैसा मिळत असे. चलती दुनिया या नाटकात 'सोनेका यह समय है' हा एक गझल आहे. शंकरराव सरनाईक तो गाऊ लागले की प्रेक्षकांना सगळे पैसे वसूल झाल्याचे समाधान मिळे. आपले हे गानवैभव विकसित करावे अशी एक उर्मी त्यांच्या मनात असे. पैशाची वाण नव्हती त्यामुळे गंडाबंधनासाठी व गुरूच्या खर्चासाठी दरमहा पॉकेटमनी द्यायला ते तयार असत. यातूनच प्रथम सहा महिने खांसाहेब रजबअलीखां यांचे आगमन कंपनीत झाले व शंकररावांनी त्यांचा गंडा बांधला. दरमहा शंभर रुपये पॉकेटमनी व अडीच हजार रुपये गंडाबंधनाचे असे ठरून रजबअली कंपनीत आले होते. रजबअलींचे शिष्य देवासकर त्यावेळी कंपनीत होते त्यामुळेही रजबअलींना आणणे सुलभ झाले असावे. या सहा महिन्यांच्या वास्तव्याचा शंकररावांनी किती फायदा करून घेतला हे कळायलाच मार्ग नाही. पण अप्रत्यक्षपणे फायदा झाला तो निवृत्तिबुवांचा. भूपाची तालीम त्यांना रजबअलीकडून मिळाली असे बुवा सांगतात. प्रत्यक्षात काकांच्या तालमीच्या वेळी तंबोरा धरून निवृत्तिबुवा हजर असतच. रजबअलींचे सट्टे निवृत्तिबुवांनी त्यावेळी मनावर कोरून ठेवले असणार. आज त्यांच्या गाण्यात त्यांची साक्ष मिळते हे कोणासही कबूल करावे लागेल. खांसाहेब रजबअल्ली यांना सन्मानपूर्वक बोलावून सहा महिन्यात त्यांना निरोप देण्याचा प्रसंग का बरे उद्‌भवला असेल?

निवृत्तिबुवा म्हणतात की त्यांच्या काकांना कंपनीच्या कामापुढे तालमीस बसायला वेळच नसे म्हणून रागावून रजबअली निघून गेले. शंकररावांना सवड नसे हे तितकेसे पटत नाही. सहा महिन्यांच्या अनुभवावरून शंकररावांनी मनाशी निश्चित केले असावे की ही सट्टाप्रधान गायकी आपल्या गळ्यावर चढणे मुष्कील असल्याने रजबअलींना उपेक्षेने जायला भाग पाडायचे पण प्रत्यक्ष आपण होऊन तोंडाने त्यांना जा असे सांगायचे नाही. हा आपला माझा तर्क. निवृत्तिबुवांकडून जे या बाबतीत सांगितले जाते त्यावरून बांधलेला. रजबअली निवृत्तिबुवांना स्वतंत्रपणे तालीम देत असतीलही, पण शंकरराव तालमीस बसण्याची

टाळाटाळ करू लागले तेव्हा रजबअली कंटाळले असे निवृत्तिबुवा म्हणत.

'तुझ्या काकांना गाणं शिकायला वेळ आहे की नाही ते विचारून ये' असे रजबअली निवृत्तिबुवांना फर्मावतात त्या अर्थी ते काकांच्या टाळाटाळीवर वैतागत होते हे उघडच दिसते. निवृत्तिबुवा पुढे सांगतात की, रजबअली खांसाहेबांच्या इच्छेनुरूप आपण काकांना तो सवाल विचारायला गेलो तेव्हा काका कॅरम खेळत बसले होते यावरून ते कंपनीच्या कामात व्यग्र नव्हते हे स्वच्छच दिसते. शिवाय त्यांनी जे उत्तर रजबअलींना पुतण्यामार्फत धाडले ते देखील गुरूची अवज्ञा करणारेच होते असे दिसते. शंकररावांनी निवृत्तीला सांगितले,

'खांसाहेबांना सांग, म्हणावं मी आता कॅरम खेळतो आहे, मला वेळ नाही.'

कोणताही गंडाबंध शिष्य आपल्या गुरूचा असा उपमर्द करू शकेल असे वाटत नाही. शंकररावांच्या या दर्पयुक्त उद्गारांचा रजबअलींना मनस्वी संताप आला असला तर ते स्वाभाविक म्हटले पाहिजे. बाकी उभा जन्म अल्लादिया खांसाहेबांशी वैर करणाऱ्या रजबअलींना कोल्हापूरच्याच एका शागिर्दाकडून अपमानित व्हावे लागले ही काळाने उगविलेला सूडच होय.

निवृत्तिबुवांनी काकांचे उद्गार रजबअलींना जसेच्या तसे कळविताच खांसाहेब म्हणाले, 'क्या बोलता है वो बुचडीवाला' स्त्री पार्ट म्हणून काम करणारे पुरुष टोप घालण्याऐवजी केस वाढविणे त्या काळात पसंत करीत व बायकांप्रमाणे बुचडा बांधीत. कंपनीच्या मालकांचा असा कुत्सित उल्लेख करण्यापर्यंत रजबअलींचा संताप वाढला त्या अर्थी दोघेही एकमेकांना किती उबगले होते हे दिसून येते. कदाचित खांसाहेब अल्लादियाखां यांना कंपनीत आणावयाचे प्रयत्न सुरू झाले असावेत व ते रजबअलींच्या कानावर गेल्यानेही हे पारस्परिक असामंजस्य उद्‌भवले असावे. एक क्षणभरही रजबअली त्यानंतर कंपनीत राहिले नाहीत. आपला पुतण्या अमानत याला ते म्हणाले, 'सामान बांध, आता शंकररावांच्या घरी राहायचे नाही.' रजबअलींचा मुक्काम आणि तरुण निवृत्तीचे शिक्षण येथेच संपले.

सन १९२८-३० मध्ये यशवंत कंपनीत खांसाहेब अल्लादियाखांचे आगमन झाले. या ठिकाणी एक शंका जागरूक रसिकाला नेहमी येते ती ही की, खांसाहेब अल्लादियाखां सारखी अद्वितीय सिद्धीची व्यक्ती केसरबाई केरकर यांची तालीम अजून संपली नसताना यशवंत कंपनीत येऊन राहायला का कबूल झाली असावी? एक गोष्ट खांसाहेब अल्लादियाखां यांच्या चरित्राचे वाचन केल्यावर व बऱ्याच संबंधित व्यक्तींशी बोलल्यानंतर लक्षात आली ती ही की, अठ्ठावीस सालानंतर मुंबईतील शेअरबाजाराला मंदीचे धक्के बसून अनेक श्रीमंतांची आर्थिक स्थिती चिंताजनक होऊ लागली होती व असाच एखादा जबरदस्त

धक्का खांसाहेब अल्लादियाखां ज्यांच्याशी संबंधित होते त्यांना बसला असावा. खांसाहेब अल्लादियाखां यांचे एकूण कुटुंब बरेच मोठे होते व या सुमारास खांसाहेब हैदरखां यांना मुंबईत जरी ५-६ ठिकाणी तालमी होत्या व मोगूबाईकडून हैदरखांना दरमहा १५० रुपये मिळत असत, तरी खांसाहेब अल्लादियाखां यांच्यावरच प्रामुख्याने सबंध कुटुंबाचा भार होता. शिवाय उत्तरायुष्यात खांसाहेबांना झालेल्या एका मुलीच्या लग्नासाठी पक्की आर्थिक तरतूद करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे असे खांसाहेब मानीत होते. त्यामुळे दहा हजार एक रुपये देऊन शंकरराव सरनाईक खांसाहेबांचा गंडा बांधून घेण्यास तयार असल्याचे बोलणे शांताराम तेलंग या मध्यस्थाकडून झाले तेव्हा खांसाहेबांनी सर्व बाजूंनी विचार करून ते मान्य केले असणार. सर्व बाजूंनी केलेल्या विचारात खांसाहेबांच्या स्वतःच्या वयाचा विचारही आलाच. २८-३० साली खांसाहेब ७४-७५ वर्षे वयाचे होते आणि आपले आयुष्य किती उरले आहे हे पंचाहत्तरीस पोचल्यावर कितीही महान व्यक्ती असली तरी कसे सांगू शकणार?

याप्रमाणे खांसाहेब अल्लादियाखां कंपनीत आले आणि गंडा बंधन समारंभ व्यवस्थितपणे पार पडला. एक हजार रुपये रोख व नऊ हजार रुपयांची पोस्टल सर्टिफिकिटे यावेळी खांसाहेबांच्या स्वाधीन करण्यात आली. वामनराव सडोलीकर यांनीच ती पुढे वटवून पोस्टाच्या बँकेत दहा हजारांची रक्कम ठेवून दिली. खांसाहेबांचा महिन्याचा मुशाहिरा पाचशे रुपये होता. निवृत्तिबुवांना अगदी पहिल्यापासून खांसाहेबांची वेगळी तालीम मिळत असावी असे दिसत नाही. शंकरराव सरनाईक तालमीस बसत त्यावेळी तंबोरा घेऊन निवृत्तिबुवा साथीस बसत हे वामनराव सडोलीकर यांनी बघितलेले आहे व वामनरावांनी हे बघितले आहे याची जाणीव निवृत्तिबुवांना आहे. हे कसे घडले तो किस्सा येथे सांगण्यासारखा आहे.

कंपनीचा मुक्काम बेळगावी होता. बसवण्णा मंदिरालगतच्या एका माडीत रात्री खांसाहेब शंकररावांना तालीम देत असत. वामनराव सडोलीकर पुष्कळदा बसवण्णा मंदिरात बसून जिवाचा कान करून ही तालीम ऐकत आणि नवे नवे अलंकार उचलण्याची तत्परता असल्याने अभावितपणे रंगभूमीवरील कामातूनही ती तरकीब कळतनकळत त्यांच्याकडून व्यक्त होई. याबद्दल शंकरराव स्वतः जरी नव्हे तरी अन्य कोणाकरवी वामनरावांना, ‘आमची तालीम चोरून ऐकता ती ऐकता आणि पुनः त्यातल्या जाती रंगभूमीवर गाऊन मला खाली बघायला लावता हे ठीक नव्हे. याचे परिणाम चांगले होणार नाहीत.’ असा दम देत. पण परिणाम ठीक होणार नाही याचा अर्थ नोकरीस मुकावे लागण्यापलीकडे काहीही होणार नाही हे वामनरावांना ठाऊक असल्याने ते परहस्ते देण्यात येणाऱ्या या इशाऱ्याकडे मुळीच लक्ष देत

नसत. त्यांचे बसवण्णा मंदिरात बसणे चालूच होते.

पुढे बेळगावला पाऊस सुरू झाला. पावसात बसवण्णा मंदिर बसून राहायला चांगले होते पण तिथे तालीम ऐकू येऊ शकत नव्हती. वामनरावांनी मग नवे साहस केले. ज्या माडीत तालीम चालू असे त्याच्या समोरच्या घरापुढील ओट्यावर बसून तालीम ऐकायचे ठरविले. लीला चंद्रिका यांचे ते घर होते. वामनराव लीलाबाईंना भेटले व त्यांनी आपला मनोदय त्यांना सांगितला. वामनराव म्हणाले, ‘आधी अशासाठी कळवून ठेवतो की रात्री, हा कोण परका माणूस आपल्या ओट्यावर तासन् तास बसून आहे, चोर बीर तर नाही ना अशी शंका येऊन आरडा ओरडा झाला तर आमचं सारंच भांडवल बाहेर पडायचं!’ लीलाबाईंनी परवानगी दिली आणि अंधारात छपराच्या वळचणीत बसून वामनराव ऐकत राहिले! एका रात्री निवृत्तिबुवांना तालमीच्या वेळी देहधर्म अनावर झाला व हातात बॅटरी घेऊन निवृत्तिबुवा माडी उतरून खाली रस्त्यावर आले आणि नियत कार्य उरकावयास योग्य जागा शोधण्यासाठी विजेरीचा झोत इकडे तिकडे मारू लागले, तो झोत एकदम वामनरावांच्या अंगावर! दोघेही काय ते समजून चुकले!

अशा कथा खांसाहेब अल्लादियाखां यांच्या तालमीचे अगत्य कोणास किती होते यावर प्रकाश पाडून जातात. एवढे खरे की खांसाहेब अल्लादियाखां यांच्या कंपनीतील वास्तव्याचा आणि शिकवणीचा लाभ शंकरराव सरनाईक यांना जवळ जवळ मुळीच झाला नाही तरी निवृत्तिबुवांना तो झाला. आज त्या परंपरेतील एक नामवंत कलाकार म्हणून ते ओळखले जातात. खांसाहेबांचे कंपनीतील वास्तव्य या ना त्या प्रकारे निवृत्तिबुवांना उपकारक व्हावे हे क्रमप्राप्तच होते. मुळात खांसाहेब अल्लादियाखां यांना विद्या देण्याची अनिवार हौस होतीच. निवृत्तिबुवांचे वय त्यावेळी एकोणीस वीस वर्षांचे. ते नेहमी खांसाहेबांच्या सेवेस राहण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या बरोबर फिरायला जात. त्यांची गोरी गोरी पाठ साबणाने चोळून काढीत. खांसाहेब अल्लादियाखां यांच्या सेवेला त्यांचा मुका पुतण्याही असे. तो खांसाहेबांसाठी वेगळा स्वयंपाक करी. कपभर दूध, मुगाची खिचडी, दोन आमलेट, तुपातील मटण असा अल्लादिया खांसाहेबांचा आहार असे. पहिल्या वर्षी बागलकोटपर्यंत खांसाहेबांचा मुक्काम कंपनीबरोबर होता. त्यापुढे ते कंपनीत अधूनमधूनच येत असले पाहिजेत. ते संपूर्ण तीस वर्षे कंपनीबरोबर होते असे जे सांगितले जाते, ते तेवढेसे खरे नाही. कारण असे पाहा की, ३१ साली खांसाहेबांच्या शिष्या तानीबाई मुंबईत अकस्मात हृदयविकाराने वारल्या तेव्हा खांसाहेब मुंबईतच होते. ३२ साली खांसाहेबांचा आवडता नातू दिवाळीतील दारूच्या स्फोटात ठार झाला. तेव्हाही ते मुंबईतच होते, आपल्या बिऱ्हाडी होते. तात्पर्य, सतत तीन वर्षे

ते यशवंत कंपनीत होते असे मानता येत नाही. ३२ साली जवळपास वर्षभर यशवंत कंपनीचा मुक्काम मुंबईस होता व बाबुलनाथनजिकच्या सर्वेअर बिल्डिंगमधून निवृत्तिबुवा त्यांना कंपनीच्या बिऱ्हाडी नेत असतील हे शक्य आहे. माझ्या मते बुवांना खांसाहेब यांची तालीम किती वर्षे मिळाली याला महत्त्व नाही. या तालमीत त्यांना काय काय मिळाले हे महत्त्वाचे आहे. ‘बाजो रे महम्मद’ ही तोडीतील चीज दीर्घकाळ सांगितली कारण त्या रागात संपूर्ण गायकी मिळू शकते. निवृत्तिबुवांना तबला खूपच याद असल्याने पलट्यांची पेच बांधणी आणि उकल ही करता आली. आज तेच अंग त्यांच्या गायकीत प्रकर्षाने दिसून येते आणि प्रभाव टाकून जाते. एकाच थाटातील पाच रागांची एक पटमंजरी त्यांना खांसाहेब अल्लादियाखां यांजकडून मिळाली. चरजुकी मल्हार हा राग मात्र खांसाहेबांकडून मिळालेला नव्हे. निवृत्तिबुवांनी तो कुठून घेतला ते पुढे येणारच आहे. लक्ष्मी तोडी, बहादुरी तोडी, रूपमती मल्हार, बिहागडा, बिहाग, नटबिहाग, पटबिहाग व सावनी या बिलावल थाटातील रागांची मिळून झालेली पटमंजिरीतील बंदीश खांसाहेबांकडील. नोटेशनची कला अंगी असल्याने बुवा वेळचे वेळी नोटेशन करून ठेवीत.

बोलपटांचा उदय झाल्यापासून नाटक कंपन्या गुंडाळल्या जात होत्या, तरी देखील ३५ सालापर्यंत शंकरराव सरनाईक यांच्या कंपनीने आपला ग्रंथ गुडाळला नव्हता. अखेर ३५ साली जो गुंडाळला तोही ताठ मानेने. नाटक कंपन्यांच्या उभ्या इतिहासात कुणाचेही पै देणे अंगावर न ठेवता आणि सामान गहाण न टाकावे लागता बंद करण्यात आलेली कंपनी म्हणजे यशवंत कंपनी. ती बंद झाल्यावर बुवा चुलत्यासमवेत कोल्हापूरला आले त्यावेळी बुवांकडे बंदे आठ आणे शिल्लक होते आणि वयाची पंचविशीही पुरी व्हायची होती!

आता त्यांना सुस्थित करायला पुढे आले पं. जगन्नाथबुवा पुरोहित. त्या वेळी ते बुवा झालेले नव्हते. देवल क्लबात राहून गाण्याची सर्व प्रकारे सेवा करीत. त्यांनाही तबल्याचा षौक आणि निवृत्तिबुवांनाही हाच षौक. हेच दोघांच्या बाबतीत समानशील झाले. या उमद्या तरुणाला काही शिकवण्या दिल्या पाहिजेत त्या शिवाय तो आयुष्यात स्थिर होणार नाही हे जगन्नाथबुवांनी ओळखले व साहेबजान सुफीजान या तवाइफची मुलगी लाडकूजान हिची आणि सरदार बाई कारदगेकर हिची शिकवणी स्वतःकडे होती ती निवृत्तिबुवांकडे सुपूर्द केली. आणि मुख्य म्हणजे बुवांचे तबल्यावरील प्रेम आणखी संपन्न केले. यासाठी थिरकवां ज्या ज्या वेळी देवल क्लबात येत त्या त्या वेळी हे दोघेही वाहवा मिळवीत.

कोल्हापुरात त्यावेळी राजाराम महाराज गादीवर होते आणि संगीत विद्येबद्दल त्यांना जवळ जवळ मुळीच आस्था नव्हती म्हटले तरीही चालेल. तरीही संस्थानी आदब म्हणून

गवयाचे पालन पोषण होत असे. यामुळेच निवृत्तिबुवांना शालिनीराजे यांची शिकवणी मिळाली. बुवा आजूबाजूचे निरीक्षण करीत तेव्हा धक्का बसावा अशा गोष्टी नजरेस येत. गोव्यातील एक सुस्वरूप नृत्यांगना गाणे शिकण्याच्या इराद्याने मोठ्यांच्या सहवासात राहिली होती. तर तिचे सौंदर्य इतरांच्या दृष्टीचा विषय होऊ नये म्हणून तिला गोषात राहावे लागे. ज्या धनवंताचा आश्रय तिने घेतला त्याचे हात हुजूरस्वारीपर्यंत सहज पोचत असल्याने तिचे गाणे अपुरेच राहिले. हा धनवंत नाटक बघण्यासाठी त्या सौंदर्यवतीला घेऊन खास कुपेची तिकिटे खरेदी करून बसे. अशा वेळी भर थिएटरात बेळगावच्या एका वकिलाचे लक्ष त्या सौंदर्यवतीकडे सहज गेले तर श्रीमुखात खावी लागली! शेवटी त्या धनवंताच्या मगरमिठीतून ती मोठ्या युक्तीने निसटली आणि पुढे मुंबईला जाऊन तिने आपली विद्या वाढविली असे सांगतात.

ते असो. विद्या वाढवायची म्हणजे अशीच युक्तीने वाढवावी लागते. निवृत्तिबुवांकडील अनवट रागांतील अनेक बंदिशी ऐकता त्या सगळयाच्या सगळया त्यांना स्वर्गीय अल्लादियाखांसाहेबांकडून मिळाल्या असाव्यात असे वाटते. पण ते खरे नाही. आता हेच पाहा. हेम रागातील बंदीश त्यांना जगन्नाथबुवा पुरोहितांच्या कडून मिळाली. खेम रागातील ‘आजहू न आयी’ ही बंदीश बहिऱ्या वहीदखांचे शिष्य प्राणलाल यांच्याकडून. चरजुकी मल्हार मधील मिळाली आशिकखां यांच्याकडून. आणि ही एकच नव्हे, जवळपास दोन डझन बंदिशी त्यांनी आशिकखांकडून मिळविल्या आहेत. कोण हे आशिकखां? निवृत्तिबुवांचे आणि त्यांचे सूत कसे काय जमले?

तानके कप्तान म्हणून गाजलेल्या फतेअलींचे आशिकअली हे चिरंजीव. एकेकाळी अझमतखांनाही गाऊ देत नसत अशी यांची तयारी. त्यांच्याकडील चिजांचा भरणा दांडगा. फत्तेअलींकडून मिळालेला. फत्तेअलींच्या बाबतीतील अडाण्यातील बंदीश प्रसिद्धच आहे.

***तान के कप्तान कहाँ गयो***
***जगतमें फत्तेअली***
***जब गुनी गावे***
***तभी रिझावे***
***तान बलवंत की ऐसी फिरत***
***जैसे अर्जुनजी के बाण!***

अशा या ख्यातनामाच्या चिरंजिवांना निवृत्तिबुवांनी दिल्ली स्टेशनवर पाहिले ते देखील मोठ्या विचित्र अवस्थेत. निवृत्तिबुवा रेडिओ स्टेशनवर गाण्यासाठी म्हणूनच गेले होते. गुलाम

साब्रीखां सारंगीच्या साथीस होते. बुवांचा सूरमल्हार ऐकून ते म्हणाले, बुवासाहेब आपल्या गळयातील फिरतीला शोभतील अशा चिजांचा खजिना आज रेडिओ स्टेशनवर आला आहे. तुम्हांला त्याची ओळख करून देऊ काय? बुवा असे अनायासे कल्पवृक्षाखाली बसावयास मिळत असता नाही थोडेच म्हणणार? गुलाम साब्रीखांने कलावंतांच्या प्रतीक्षा कक्षात बसलेली आशिकखां यांची मूर्ती दाखविली. त्या वेळी रेडिओवर एक बाई गझल गात होती आणि आशिकअली आपल्याच तंद्रीत वाहव्वावर वाहव्वा देत होता. निवृत्तिबुवा आणि गुलाम साब्री यांनी आश्चर्याने एकमेकांकडे पाहिले. एका भुक्कड गझलेवर हा कोठीवाला गवय्या एवढा निहायत खूष कसा? निवृत्तिबुवांनी साब्रीला तो सवाल विचारलाच. त्यावर साब्री म्हणाला,

‘स्वारी गझलेवर फिदा नसून जिच्या गळयातून ती बाहेर पडत आहे तिच्यावर खूष आहे, मात्र आता दहा मिनिटांत ती बेगमा इथं येईल तेव्हा पहा खांसाहेब कसे उल्लूके पठ्ठे बनतात ते.’ दहा मिनिटांनी गझल संपला आणि त्या बाई प्रतीक्षा कक्षात आल्या मात्र, कुत्र्याने शेपूट हलवीत मालकिणीपुढे गोंडा घोळावा तसे खांसाहेब वागू लागले.

आशिकअलींना खास सिगारेट आणि त्या बाई ही दोन जबरदस्त व्यसने होती. निवृत्तिबुवांनी आशिकअलींना ‘ती’ खास मादक सिगारेट पुरवून आपले दोस्त बनविले. दर वेळी दिल्लीस जात तेव्हा आशिकअलींकडून अशा प्रकारे त्यांनी अनवट रागातील उत्तमोत्तम बंदिशी मिळविल्या. ज्या आज त्यांच्याकडून ऐकत असताना श्रोत्यांना इतरांपेक्षा वेगळे ऐकवणारा कलावंत असे वाटायला लावतात. मालकंस, शंकरा, पटदीप अशी पाच रागांतील एक पटमंजिरी निवृत्तिबुवा ऐकवितात ती आशिकअलींनी दिलेली. पंचकली रागातील ‘आ ले, ए मिया’ ही एक अफलातून बंदीश बुवांपाशी आहे तीही आशिकअलींकडीलच. या बंदिशीलाही एक इतिहास आहे. निवृत्तिबुवांनी एक उंची सूट आशिकअलींस देऊन ही बंदीश मिळविली.

रोशन आरा बेगम हिने आपल्याकडील बंदिशी घ्याव्यात व श्रोत्यांना ऐकवाव्यात असे आशिकअलींना वाटत होते. कुणाकरवी तरी निरोप पाठवून रोशन आरा येणार नाही म्हणून स्वारी आधी न कळविता रोशन आराच्या भेटीस गेली. बघतात तो रोशन आराच्या दारात टांगा उभा असून तिचे सामान टांग्यात भरले जात होते. तरीही आशिकअली देवडीतून आत जाण्यासाठी वळलेच. पण त्यांची दखल न घेता रोशन आरा बाहेर आली. दरवाज्यातच खांसाहेब तिला म्हणाले,

‘माझ्याकडे अशा बंदिशी आहेत की त्यांतली एखादी घेऊन लाहोरला जाशील तर नाव

कमावशील.’

त्यावर रोशन आरा म्हणाली, ‘ही काय वेळ झाली अशा सूचना करण्याची? माझे तिकीट रिझर्व्ह झाले आहे. मला आता स्टेशनवर गेलेच पाहिजे. चार दिवसांनी परत आले म्हणजे या.’ पण आशिकअली थोडेच दमणार, ते म्हणाले, ‘जाणार तर जा, पण एका मिनिटात मी बंदिशीची आउट लाईन ऐकवतो तेवढी ऐकून मग जा.’

आणि लगेच त्यांनी गुणगुणायला सुरुवात केली. ती चुस्त बंदीश ऐकताच रोशन आराने टांग्यातून खाली उडीच मारली. नोकराला तिने स्टेशनवर पाठवून तिकिटे रद्द केली. लाहोरला तार करून कार्यक्रम रद्द केला आणि आशिकअलींना घरात नेऊन आदरातिथ्य करून त्यांच्याकडून ती बंदीश शिकून घेतली! असे होते आशिकअली. त्यांना एकदा निवृत्तिबुवांनी विचारले, खांसाहेब आपण एवढे विद्धान असताना आपल्याला असे बायकांपुढे लाचार होताना काही खटकत नाही? त्यावर आशिकअली म्हणाले, ‘आयुष्यात एका बाईला छळून मारले. त्याची भरपाई आता लाचार बनून करतोय.’

आजचे सुप्रसिद्ध सरोदवादक अमजद अली यांचे पिता खांसाहेब हफीज अली यांच्याकडून ग्वालेर घराण्याच्या चिजा निवृत्तिबुवांनी मिळवल्या आहेत. ४४ साली विक्रमादित्य सहस्राब्दी कॉन्फरन्स झाली तिला हफीज अली खांसाहेब आले होते त्यावेळी त्यांना स्टेजवर स्थान देण्यात आले होते, कारण सर्वच त्यांना अत्यंत खानदानी कलाकार मानीत असत. सक्कारच्या छोट्या गुलाम अलीकडून त्यांनी सरफरदा बिलावलमधील ‘भला नि भाई यार’ ही चीज घेतली. थोडक्यात सांगायचे तर, निवृत्तिबुवांकडे बंदिशींचा जो साठा आहे तो असा मधुकर वृत्तीने त्यांनी मिळविलेला आहे. किराणा, ग्वालेर, जयपूर, पतियाळा अशा सर्व घराण्यांनी त्यांच्या झोळीत या चिजा घतल्या आहेत, त्यामुळे आज निवृत्तिबुवा एक ऐपतदार कलावंत झाले आहेत. जे विजांबद्दल तेच बोलाबद्दल म्हणता येईल. कंपनीत नथ्थूखां आले की त्यांच्याकडून, थिरकवांकडून, असे मिळेल तिथून घेता घेता बोल बांधण्याची समज आली. त्याचा आविष्कार त्यांच्या मैफलीत प्रकर्षाने दिसून येतो.

तबल्याचे वेड असलेली मंडळी एकत्र जमली की निव्वळ तबल्याचे बोल चढाओढीने म्हणण्याची मैफिलही बुवांच्या संगतीत जमलेली आहे. ६६-६७ साली पं. गजानन बुवांच्या औंध या गावी उत्सवाला कीर्तनकार कऱ्हाडकर बुवा, खांसाहेब थिरकवां, निवृत्तिबुवा, सुरेश तळवलकर अशी सर्व मंडळी जमली होती. बुवा एस्. टी. मधून उतरता उतरताच स्वागतार्थ आलेल्या सुरेश व बच्चूला (पं. गजानन बुवांचा मुलगा) उद्देशून म्हणाले, त्रितालात सम ते सम बेदम तिहाई सांगू शकाल का? त्या दोघांना फारसा वेळ न देता लगेच बुवांनी तशी तिहाई

ऐकवली. सुरेश तळवलकर सांगतात की त्या वेळी तबल्याच्या संबंधात विचारलेल्या सातएक प्रश्नांची उत्तरे तळवलकरांना देता आली नाहीत. आणि मग दुपारी भोजनोत्तर बोल ऐकविण्याची मैफल जमली आणि आश्चर्य म्हणजे थिरकवा, निवृत्तिबुवा यांच्या तोडीस तोड कऱ्हाडकर बुवांनीही तबल्याच्या बंदिशी ऐकविल्या.

चाळीस सालीच बुवांनी थिरकवां यांच्याकडून शाबासकी मिळविली होती. शंकरराव सरनाईकांनी खर्डीकरांच्या बोळात कोल्हापूरला थिरकवांच्या सोलो तबल्याचा व नंतर पं. निवृत्तिबुवांच्या गाण्याचा कार्यक्रम ठेवला होता. साथ अर्थातच थिरकवां यांची. बुवांनी सूरमल्हारातील 'बादरवाँ बरसन लागे' या बंदिशीत मूळ लयीची दुप्पट करून चक्रदार तिहाई घेताना जी बोलतान बांधली ती ऐकत असता थिरकवांच्या हातून सम हुकली आणि बुवा झडप घेऊन बरोबर समेवर आले तेव्हा हर्षभराने थिरकवांनी निवृत्तिबुवांनाच 'बहोत अच्छे' म्हणून त्यांचा गौरव केला. ३७ साली शिकारपूरच्या हंडी कॉन्फरन्सला बुवांची बिलावलमधील 'अरे हां रे कन्हाई' ही अस्थाई अशी जमली की श्रोत्यांनी खूष होऊन दहा दहाच्या नोटांचा हारच त्यांच्या गळयात घातला. पांढरी चार हा त्या वेळी त्यांचा आवाज, आता वयोमानाने पांढरी दोनवर आला असला तरी युयुत्सू वृत्ती पूर्वीइतकीच कायम आहे.

निवृत्तिबुवांची गायकी ही केव्हाच अमुक एका घराण्याची म्हणता येईल अशी नव्हती. आजही बुवा म्हणतात, खांसाहेबअल्लादियांच्या परंपरेतील पुष्कळसे गात असलो तरी मनाने मी अमीरखांच्या गायकीत रमलेला आहे. बुवांचे गाणे हे खास त्यांचे आहे, बहुधा एकाराने आणि किराण्याप्रमाणे तानपुरा ऐकून ते पहिला स्वर लावतात. जयपूर घराण्यात तिहाई कधी आढळायची नाही. बुवांच्या गायकीत ती हमखास येणार. बलपेच मात्र जरूर जयपुरी वळणाचे आहेत. ज्याने अनेक ठिकाणांहून साधनसामग्री जमवलेली असते त्या कलाकाराला विशिष्ट घराण्याचा छाप मारणे योग्य नव्हे असेच यावर कुणीही म्हणेल.

निवृत्तिबुवा सतत बदलत आले आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत त्यांचा बाह्यवेष तर बदललाच आहे. ऐनजिनसी रागव्यवस्था आणि त्यांची नावे यांवरच राग व्यक्त करायला हवा असे त्यांना वाटू लागले आहे. धोतर, कुडता, टोपी आणि कोल्हापुरी वहाण घालणारे १९६४ पूर्वीचे निवृत्तिबुवा जसे आता टेरेलिन पँट आणि झब्बा घालून विना शिरोभूषण वावरताना दिसतात तसेच ते संगीत चर्चेतही अद्ययावत दिसतात. मुंबई विद्यापीठाच्या संगीत शाखेत अनेक नव्या गोष्टी त्यांनी विचारान्ती पक्क्या केल्या असतील कदाचित. पण ते बदलणे म्हणजे या वयातही हिरवेपणा जपण्याची त्यांची प्रवृत्तीच होय. समय आणि राग यांचे पूर्वापारचे संकेत नव्या युगात चालवू नयेत असे त्यांना वाटते. आज वातानुकूलित श्रोत्रागारात

भर दुपारी मालकंस गायला तर मध्यरात्रीचा संकेत निर्माण करता येणार नाही काय असे ते विचारतात व रात्री गावयाच्या रागाची आकाशवाणी जेव्हा दुपारीच टेप करून घेते त्या वेळी तो समय-राग संकेताचा भंग कसा चालतो असे विचारतात तेव्हा त्यावर उत्तर नसते. कलावन्ताचा स्वर प्रसन्न असेल तर आपण अवेळी काही ऐकत आहोत असे वाटू नये असे त्यांचे म्हणणे. पूर्वीदेखील ललितागौरी सारखी रागिणी का अस्तित्वात आली असा सवाल करून ते म्हणतात,

'संध्याकाळच्या वेळी गौरीत थोडा ललत टाकला तर काय परिणाम होतो हेच त्या कलावंत मनाला बघायचं असणार? फैयाजखां पहाटे ३ वाजता मलुहा केदार गात तर उस्ताद विलायतखां पहाटे नटबिहाग ऐकवीत. त्यांना नाही कुणी सवाल केला, का संकेतभंग केलात म्हणून' ? बुवांच्या विचारसरणीत तर्कदृष्ट्या विसंगती नसेल पण संकेतभंग हा अपवाद व्हावा. तोच नियम बनला तर ज्या श्रोत्यांसाठी मैफिली असतात त्या फुलणार नाहीत.


निवृत्तिबुवांना कानडा, मल्हार, तोडी या रागांबद्दल नवी अभिधानव्यवस्था हवी आहे. ज्या 'ग म रे सा' एवढ्या अंगावर कानड्याचे पस्तीस प्रकार झाले तो कानडा मुंळात कोणता? दरबारी म्हणून गायला जातो तो मुख्य असेल तर मग काफी मध्ये नायकीचे अंग येत असेल तर त्याला काफी नायकी म्हणावे, कौशीत दरबारी येत असेल तर त्याला कौशी दरबारी म्हणावे. बुवांचा हा विचार ते वादापुरताच मांडत नाहीत. खांसाहेब अल्लादिया खां यांनी काफी कानड्यातील म्हणून जी अस्थायी सांगितली ती काफी नायकीच होय असा प्रचार करीत जातात आणि मग परंपरेस चिकटून राहणारी मंडळी म्हणतात, बुवांनी वाटल्यास नवी बंदीश बांधून तिला काफी नायकी म्हणावे पण जुन्या बंदिशीचे नामांतर करू नये. 'न बुद्धिभेदं जनयेत्' असेच परंपरावाद्यांना सुचवायचे असते. मल्हाराला मिया चिकटवून मूळ मल्हाराचा लोप का करावा असाही बुवांचा सवाल असून गौड, चंचलस, सूर हे त्याचे प्रकार आहेत त्यांची व्यवस्था लावताना हा मिया कुठे गडप होतो असा त्यांना प्रश्न पडतो. बहादुरी, बिलासखानी, लक्ष्मी या तोडींमध्ये भैरवीचे अंग प्राधान्याने असते. तर मग त्यांना बहादुरी भैरवी, बिलासखानी भैरवी का न म्हणावे अशी सरळ पृच्छा ते करतात. दोन्ही मध्यम घेणाऱ्या रागाला यमन म्हणावे पण नुसता तीव्र मध्यम घेणाऱ्यास कल्याण म्हणावे असे बुवांना वाटते. तीव्र मध्यम लावला की लोक त्याला यमन म्हणतात, शुद्ध मध्यम घातला की कल्याण म्हणतात. या गोष्टीस त्यांचा आक्षेप आहे. बुवांचे हे आक्षेप व ही मते विद्वानांनीच निकष ठरवून मान्य अमान्य करावयाची आहेत. बुवा स्वतः सरगम करीत नसले तरी त्या अलंकरणाला त्यांचा विरोध नाही. ते म्हणतात, 'ध्रुपद धमारातून तुम्ही ख्यालात आलात

आणि आस्ते आस्ते त्यात बोल आलापी बोलतान यांना स्थान दिलेत तसेच आता सरगमलाही द्यायला हवे.’

कलकत्त्यास त्यांनी अनेक कॉन्फरन्समधून छाप पाडली आहे. ७६ साली सुरेश तळवलकरांच्या साथीत ते गात असता आग्रेवाला कुमार मुखर्जी त्यांच्यावर इतका लट्टू झाला की भर कॉन्फरन्स मध्ये ठुमरीची फर्माइश करू लागला. बुवांनी कधी बापजन्मात कॉन्फरन्समध्ये ठुमरी म्हटलेली नाही. त्यांनी सभ्यपणे नकार दिला. सकाळची मैफल असल्याने मुखर्जीने पुनः विनंती केली की निदान भैरवी ठुमरी असू द्या, बुवांनी ‘बराय, बघतो प्रयत्न करून,’ असे म्हटले, आणि झक्कपैकी विराट भैरव ऐकवला. (नयो नयो बैरागी) मुखर्जी तसा अस्मानातच होता. धरणीवर नव्हताच. त्याला त्यात भैरवी कुठेच आढळेना. तेव्हा त्याचा पुनः ठुमरीचा आग्रह सुरू झाला. अखेर बुवांनी ‘ले गयोऽ गोकुल शाम’ ही तिलंगमधील ठुमरी सुरू केली. सुरेशने दुगण करीपर्यंत हसे अस्फुट ठेवले होते, पण दुगण वाजविण्याची वेळ येताच त्याला राहावेना. मान वेळातून हसून मोकळे होण्याचा त्याने प्रयत्न केला आणि त्याच क्षणी बुवांनी तबल्यावर हात ठेवून मैफलीतल्या मैफलीत अंगावर कोसळलेला भ्रमण-योग निभावून नेला. गानयोग्याला भ्रमणयोग कुठे येईल व कुठे नेईल हे सांगणे म्हणूनच कठीण.

आता वयोमानाने बुवांच्या तनायतीची धार पूर्वीइतकी कमनीय राहिलेली नाही. पण अछोप रागांचे भांडार निवृत्तिबुवांपाशी विपुल आहे. सकाळची बैठक असली तर कधी शिवमत भैरव, तर कधी विराट भैरव, वर्षाकालीन मैफिल म्हणजे बुवा धुलिया मल्हार, रामदासी मल्हार पुढे ठेवणार. यमनी बिलावले हा अधिक प्रिय की कुकुभ बिलावल की देवगिरी बिलावल हे सांगता यायचे नाही. जे उत्स्फूर्तपणे सुचेल ते पुढे ठेवतील. एका सकाळच्या बैठकीस त्यांनी चीज सुरू केली ती ‘गौरी’ सारखी वाटू लागली. सगळे थक्क! सकाळीच गौरी कशी गातात, हा श्रोत्यांपुढे प्रश्न. तेवढ्यात पंचमावरून कोमल रिषभावर अवरोही जागा घेताच ही गौरी सायंकालीन श्री कडे वळणार काय असा दुसरा प्रश्न. पण पुढे भैरवाने त्या बंदिशीचा कबजा घेतल्यावर हा राग तरी कोणता, म्हणून सर्वांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह. बुवा म्हणाले, हा ‘शुभागौरी’ . तर बुवा असे श्रोत्यांना कोड्यात टाकणारे नित्य नवे रंग करतात,पण सांगतात हे जुनेच आहे. जयपूर शैली आणि किराणा शैली यांचा मिलाफ करतात. त्यात आग्रा शैलीची लयकारी आणि बोल अंग यांचेही दर्शन घडवतात. असे हे मनोहर भ्रमण करणारे म्हणून ते भ्रमणयोगी...

❀ ❀



# ९. पं. जगन्नाथबुवा: पुरोहित की प्रेषित

*स एव गायको धन्यः श्रुत्वा यस्य च गायनम्*
*श्रोतुरुत्पधते ह्यक्ष्णो-र्युगपद्वदनाच्च वा:*

ज्या गवयाचे गाणे ऐकताना एकाच वेळी डोळयांत अश्रू आणि मुखात 'वा' असे उद्गार येतात तो अत्यंत श्रेष्ठ कलाकार, हा वर दिलेल्या सुभाषिताचा आशय आहे. श्रेष्ठ गायकाची इतकी नेमकी व्याख्या क्वचितच कोणी केली असेल. पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्याबद्दल असा अनुभव अनेकांना आला होता.

१९४३ साली देवल क्लबच्या सुवर्ण महोत्सवासाठी कोल्हापूरला आले होते. त्यावेळी सकाळी सकाळीच अगदी भरगच्च मैफल जमली होती. गोविंदराव टेंबे, भूर्जीखां, रामूभय्या दाते, हिराबाई अशी मातब्बर मंडळी फैयाजखांच्या समवेत समोर बसलेली. त्या वेळी जगन्नाथबुवांनी 'शिवमतभैरव' मधील 'एरी तू मान ले' ही बंदीश अशा खुबसुरतीने पेश केली की फैयाजखांच्या डोळयांत अश्रू उभे राहिले. 'बुवा मी भारावून गेलो आहे तुमच्या गाण्याने' असे ते म्हणाले.

आग्रा गायकीला भावावगुंठनाची ओढणी पांघरून नटविण्याची एक अनन्यसाधारण गुण जगन्नाथबुवांपाशी होता, त्यामुळे ते एकदम वेगळे उमटून पडत. बुवांनी आपल्या काळजालाच हात घातला अशी भावना श्रोत्यांमध्ये निर्माण करीत. त्यांच्या बोलतानेने तर ते अशा एका ठिकाणी पोचत की श्रोता उत्स्फूर्तपणे 'वा' म्हणून जाई. 'वा' हा उद्गार सर्वांना ठाऊक आहे, पण संस्कृत भाषेत 'वाः' म्हणजे पाणी असाही अर्थ आहे.



बुवांच्या निधनानंतर २१ वर्षांनी हा लेख लिहिण्याचा हेतू काही पुनर्विचारमांडावा, आजवर न सांगितलेल्या काही गोष्टी आवर्जून सांगाव्यात हा आहे. त्यांच्या सबंध जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकीत असता सहजच स्फुरते की बुवा पुरोहित हे आडनाव धारण करीत होते, तरी ते पुरोहित नसून एक प्रेषितच होते. प्रत्येक प्रेषित हा तसा मुळात पुरोहित असतोच. पण प्रत्येक पुरोहित हा प्रेषित होऊ शकत नाही. प्रेषित म्हणजे परमेश्वराने म्हणा वा नियतीने म्हणा, खास कामगिरी पार पाडण्यासाठी धाडलेला जीव. बुवा त्या अर्थाने प्रेषित होते असे मला म्हणायचे आहे. हे प्रेषित होणे म्हणजे सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे तसे होणे नव्हे; जे निसर्गक्रमाने आपोआप घडते. पुढे प्रेषित ठरणारा जीव स्वतःला घडवीत असतो. सेवा हे फार मोठे साधन त्याच्यापाशी असते. गुणिजन, मग ते गुरुजन असोत वा शिष्यत्व पत्करून आलेले असोत, त्यांची पडेल ती सेवा करणे हा प्रेषिताची स्वभावधर्म असतो. पं. जगन्नाथ बुवांचे जीवन याची साक्ष पटविणारे आहे.

बुवांचा जन्म निजामी हैदराबादेत १२ मार्च १९०४ रोजी कऱ्हाडे ब्राह्मणाच्या घरी झाला. बालपणी मातृवियोग, अकराव्या वर्षी पितृवियोग हे किशोरमनावर झालेले आघातच. पण वडिलांनाच गाण्याविषयी प्रेम असल्याने त्यांनी छोट्या जगन्नाथाला अनेक चांगली गाणी ऐकवून ते बीज रुजवले होते. एवढी एक गोष्ट सोडली तर सगळा आनंदच होता. ना पैसा, ना परिस्थिती ना कोणाचा आश्रय, अशा प्रतिकूलतेत वाढणाऱ्या मुलांना सेवेच्या बळावरच काही स्थान संपादन करता येते. किशोर वयात थोर सत्पुरुषांचे आशीर्वाद मिळवून जीवनात पालट घडवून आणावा अशी तळमळ असते. पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याशी खाजगीत बोलत असता बुवांनी माणिकनगरचे नाव अनवधानाने उच्चारले जाताच जीभ चावली होती असे कळते. बुवा हैदराबादेहून माणिकनगरला जात असले पाहिजेत एवढा तर्क यावरून केला तर चुकीचा ठरू नये. माणिकनगरला सर्व प्रकारचे गाणे दत्तजयंतीच्या उत्सवात ऐकायला मिळते. सबंध देशातून कलाकार तिथे जमा होतात. माणिकप्रभू त्यांना योग्यतेनुरूप पुरस्कार देतात. १९१५ ते १९२८ या काळात हैदराबादेत असताना बुवा किती वेळा माणिकनगरला गेले असतील हे सांगता येणार नाही पण केव्हा ना केव्हा त्यांना माणिकप्रभूंचा आशीर्वाद लाभला असेल व त्याचा उच्चार आपल्याकडून होऊ नये म्हणून बुवांनी जीभ चावली असणार असे मला वाटते.

बुवांसारख्या मनस्वी जीवनावर लिहिताना कल्पिताचा आश्रयही क्षम्य असतो. जे घडले असे दाखवले आहे, ते नक्कीच कल्पित आहे असा पुरावा येत नसल्याने आणि बहुतेक मुस्लिम उस्तादांनी शागिर्दांची अग्निपरीक्षाच घेतलेली असल्याने बुवांनी

महंमदअलीखां या आपल्या गुरुजींच्या पत्नीची नको त्या दिवसातील धुणी धुतली असे कोणी लिहिले तर ते क्षम्य किंवा अर्धसत्य मानून पुढे गेले पाहिजे असे नाही कारण खुद्द बुवांनीच ही हकीकत सर्वांना सांगितली आहे. आणि उस्ताद महंमदअलीखां आणि उस्ताद शब्बूखां या दोघांचाही रोष ओढवून घेतल्यानंतर पुनः त्यांना विद्यादानास राजी करण्यासाठी उस्ताद विलायत हुसेनखां यांचे हैदराबाद येथील साडू बद्रुज्जमाखां यांना मध्यस्थी करावी लागली, कारण उस्ताद बद्रुज्जमाखां यांना जगन्नाथाच्या अंगी काही वेगळे पाणी आहे याचा अंदाज होता. ही घटनाही कल्पित म्हणता येणार नाही. असे घडते. अनेकांबाबत घडले आहे.

बुवा १९२४ साली, म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी बेळगावी भरलेल्या कॅाग्रेसला जोडून जे संगीताचे कार्यक्रम झाले त्यांना हजर होते ही घटना महत्त्वाची. उस्ताद विलायत हुसेनखां यांचे गाणे या वेळी बुवांनी प्रथम ऐकले व ते खांसाहेबांच्या प्रेमात पडले. इंदिरा वाडकर याही याच वेळी गायल्या आणि त्या खांसाहेब विलायतहुसेन यांच्या शिष्या असून त्यांना तालीम देण्यासाठी खांसाहेब मुंबईहून बेळगावी येतात ही माहितीही तरुण जगन्नाथबुवांना इथेच मिळाली असली पाहिजे. या माहितीवर त्यांनी आपली भावी गणिते बांधली असली पाहिजेत. १९२८ साली ते हैदराबाद सोडून कोल्हापूरला आले आणि श्रीमंत अप्पासाहेब घोसरवाडकर (देवल क्लबचे एक देणगीदार) यांचेकडे तबलावादक म्हणून राहिले. श्रीमंतांना तबलावादकाची जरूर होती व बुवांना कोल्हापुरात पाय टेकण्यापुरता आधार हवा होता. त्यातही दुग्धशर्करा योग असा की श्रीमंतांना वर्षातून बरेच महिने जमिनींच्या व्यवहारासाठी बेळगावी राहावे लागे. हा जगन्नाथ म्हणजे एक होतकरू तरुण आहे. तो तबला तर चांगला वाजवतोच पण स्वयंपाकही करू शकतो हे श्रीमंतांनी जाणून घेतले होते. श्रीमंतांना हार्मोनियमवादनाचा छंद. त्यामुळे छंदाच्या वेळी तबला साथ आणि दुवक्त अन्नावर हात अशी सोय त्यांनी बघितली. बुवांचा सेवाधर्म इथे ‘निरर्थक’ नव्हता. नसणारच. उस्ताद विलायत हुसेनखां मुंबईहून केव्हा येतात यावर लक्ष ठेवून हैदराबादचे त्यांचे साडू बद्रुज्जमाखां यांना कळवून विलायतहुसेनखां यांचे शिष्यत्व प्राप्त करून घ्यायचे हा बुवांचा इरादा. हा इरादा १९३० साली सफल झाला व संगीताच्या दुनियेत मधुराभक्तीने भरलेली, अनेक बंदिशींच्या जन्मास कारणीभूत झालेली, गुरुशिष्ययुती जन्मास आली. बेळगावलाच ही घटना घडली.

१९२९ ते १९४२ या काळात बुवांना जे दोन महान गुरु लाभले त्यापैकी एक उस्ताद विलायत हुसेनखां आणि दुसरे उस्ताद थिरकवा. ३२-३३ सालापासून गंधर्व कंपनी लहानलहान गावीही जाऊ जागली तसा थिरकवांचा शिष्यसंप्रदायही वाढीस लागला.

३३-३४ सालीच सांगलीस बुवांनी थिरकवा साहेबांचा गंडा बांधला. हे दोन गुरू सांभाळायचे म्हणजे काही सोपे काम नव्हते. उस्ताद विलायत हुसेनखां सदैव प्रापंचिक गरजांनी त्रस्त असत. या थोर साधुपुरुषाला आणि अजोड कलावंताला शिकवण्या करीत करीतच आयुष्यातील तीसेक वर्षांचा काळ काढावा लागला. बंदिशीच्या सच्चाईबाबत नीर-क्षीर करायचे झाले तर ते उस्ताद विलायत हुसेन यांच्या 'धर्मकाट्यावर' होई. पं. जगन्नाथबुवांचे तर ते बहिश्चर प्राणच होते. पण थिरकवांचा 'बाज' वेगळा. त्यांना कोणत्या वेळी काय लागेल हे सांगणे कठीण. बुवा नेहमी पैशांची जोडणी करून ठेवीत. त्या साठी बुवा श्याम सिनेटोनमध्ये गुंडोपंत वालावलकर यांच्या हाताखाली, नंतर शालिनी सिनेटोनमध्ये गोविंदराव टेंबे यांच्या हाताखाली, कधी तर छत्रपती सिनेटोनमध्ये देखील कामे करून अर्थार्जन करीत. प्रसंगी 'सत्राणे उड्डाणे' सारखी आरती ब्रह्मचारी चित्रपटात त्यांनी गायली आहे. पण तेवढ्याने भागत नसे. देवल क्लबच्या कोपऱ्यावरील दत्त कॅफेमध्ये कपबशादेखील विसळीत! हे सर्व गुरुजनांच्या सरबराईसाठी त्यांनी केले आहे.

बुवांचे पहिले प्रेम तबलावादनावर होते हे उघडच आहे. कोल्हापुरात पाऊल ठेवल्यावर पहिली गुपचुप चाकरी स्वीकारली ती देखील तबलावादनाची. तर मग प्रश्न असा निर्माण होतो की उस्ताद थिरकवांचा गंडा बांधण्याआधी त्यांनी तबला कोणाकडून शिकून घेतला? बुवांनी हे कधीच कोणाला सांगितलेले नाही. तर्कच करायचा तर आजचे सुप्रसिद्ध तबलावादक निजामुद्दीन यांचे वडील उस्ताद अझीमबक्ष जावरेवाले यांच्या बाबतीत करता येतो. पण त्याबद्दल समर्थन देणारे कोणीच नाही. मोकळ्या मनाने एक गोष्ट कबूल केली पाहिजे की बुवा कोल्हापूरला येण्याआधीच कुशल तबलावादक होते. उस्ताद थिरकवांचे शागीर्द झाल्यावर ३७ साली केशवराव धर्माधिकारी बुवांकडे तबला शिकू लागले. बुवांनी 'कलंदर' नावाचाही एक शिष्य तबलावादनात तयार केला होता. पण तो अकाली मरण पावला. आज सुरेश ऊर्फ भाई गायतोंडे जगन्नाथबुवांचे शिष्य म्हणून सर्वांना परिचित असले तरी गायतोंडे ५५ साली जेव्हा मुंबईस आले आणि तबला साथीचे व सोलोचे कार्यक्रम करू लागले, तेव्हा त्यांना साक्षात् थिरकवासाहेबांचीच तालीम मिळाली असली पाहिजे असे जो तो म्हणत होता. खुद्द उस्ताद अल्लारखां यांचीही धारणा तीच होती! भाईंना जगन्नाथबुवांची तालीम मिळाली तीही एका अकल्पित योगायोगाने. कारण तोपर्यंत भाईंना अथवा त्यांचे वडील डॉ. भास्करराव गायतोंडे यांना बुवा तबला वाजवतात याची सुतराम् कल्पना नव्हती.

हा अकल्पित योगायोग कसा आला? १९५२ सालची एक सकाळ. डॉ. गायतोंडे देवल क्लबवरून दवाखान्याकडे जात होते. देवल क्लबमधील आतल्या खोलीतून ठुमरीचे सूर

त्यांच्या कानावर आले. कुणी तरी ढंगदार पंजाबी ठेका धरला आहे आणि त्यावर ठुमरी ठुमकत आहे असा अंदाज येताच डॉक्टर गायतोंडे चोरपावलांनी देवल क्लबच्या दरवाजापर्यंत गेले. आतून सूर तरंगत येतच होते. किंचित् वाकून त्यांनी बघितले तर काय! त्यांच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसेना. इचलकरंजीचे राम देशपांडे ठुमरी गात होते आणि जगन्नाथबुवांनी ठेका धरला होता! बुवा एवढ्या तरकिबीने तबला वाजवू शकतात? त्यांनी स्वतःला प्रश्न केला. क्षणभराने ते स्वतःशी उद्गारले. 'काय वाटेल ते होवो हा तबला माझ्या घरात आला पाहिजे.'

हे गायतोंडे मूळचे कणकवलीचे. ४२ साली कोल्हापुरात येऊन स्थायिक झाले होते. कणकवलीस भाईंचे शास्त्रशुद्ध नसले तरी तबल्याचे शिक्षण आणि बोलतुकड्यांचे भरणपोषण बालवयापासून झालेले. कोल्हापुरात आल्यावर एकीकडे शाळाकॉलेज चालू असताच भाईंनी म्हामूलाल सांगावकर यांच्याकडून सोलोचा आकार आत्मसात करण्यापर्यंत मजल मारली होती. प्रतिवर्षी देवल क्लबमध्ये स्पर्धा होत त्यातही ते पहिले येत. आणि तरीही वडिलांना वाटले, 'माझ्या घरात बुवांचा हात आला पाहिजे! कारण तसे लिपटून वाजवणे त्यांनी आजवर ऐकलेलेच नव्हते. ते तसेच क्लबचे सेक्रेटरी अँड. बाबुराव जोशी यांच्याकडे गेले. आपली तळमळ त्यांनी व्यक्त केली. बुवांना विनंती करा म्हणाले आणि जोशांनी विचारताच बुवा म्हणाले, 'द्या पाठवून उद्यापासून बरोबर सकाळी साडेसहाला.'

दुसऱ्या दिवशी सकाळी भाई वेळेवर हजर होताच बुवा म्हणाले,

"हं वाजव बघू, कट तिरकिट तक हा तुकडा वाजव"

पहिल्या पाचसात सेकंदातच भाईंचा भ्रमनिरास झाला! या तुकड्यातील एकही 'क' अर्थपूर्ण उमटत नव्हता. आपल्याला दरसाल स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळत असले तरी तबला तबला जो म्हणतात तो आपल्याला येत नाही याची भाईंना खात्रीच पटली. बोटांतील त्राणच संपले!

बुवा म्हणाले, 'अरे सुरेश, या कलेतील बुजुर्गांनी ही अक्षरं जी टाकली आहेत ती काय उगीच गंमत म्हणून? आपण बोलताना 'हे काम मीच करू शकेन' हे वाक्य कुठं कुठं जोर देऊन उच्चारतो? हे आणि मीच या दोन शब्दांवर योग्य प्रमाणात जोर दिला गेला नाही तर काय होईल? कुठल्याच शब्दावर जोर न दिला तर काय होईल? तबल्याची अशी भाषा असते आणि खूप रियाज केल्याशिवाय ती बोटांतून जशी निघायला पाहिजे तशी निघत नाही. म्हणून उद्यापासून सकाळी सहा ते साडे नऊ अथवा दहा पर्यंत रियाज. धर्माधिकारी पेटीवर लहरा धरतील. लहऱ्यावाचून रियाज नाही करायचा. कधीही नाही. लहऱ्याच्या लयीत वाजवायचंच

पण दुपटी चौपटीतही वाजवायचं ‘दोन मिनिटांत सूचना देऊन झाल्या.

दुसऱ्या दिवसापासून यथोक्त रियाज सुरू झाला. बुवा साडेतीन अथवा चार तास समोर बसून असत. जरासे तिरके. शेगावचे गजानन महाराज फोटोत बसलेले दिसतात तसे! मधून मधून बुवांच्या तोंडात विडी असे. दोन एक तासांनी त्यांच्या लक्षात यायचे की याला आता ५-१० मिनिटांची विश्रांती न दिली तर हा पुढे वाजवूच शकणार नाही. मग थांबवीत. काय चुकते आहे ते सांगत. १९५२ ते १९५५ भाईंचा असा रियाज करून घेतला. बुवा त्या काळात १५ दिवस कोल्हापूरला आणि १५ दिवस मुंबईला असत. तरीही रियाजात खंड पडला नव्हता.

५५ साली बुवांचे मुंबईहून भाईंना पत्र. ‘आपल्याला कानपूरच्या कॉन्फरन्समध्ये सोलो वाजवायचा आहे. आपण जास्तीत जास्त रियाज करावा असं मला वाटतं. आपण काय करायचं ते ठरवा.’

मग भाईंचा सकाळी रियाज होई तो जेवणापर्यंत. जेवण झाल्यावर पुनः बसत ते संध्याकाळी दिवेलागणीपर्यंत. पुनः रात्री जेवणानंतर. दहा एक दिवसांनी बुवा मुंबईहून कोल्हापुरास आले. भाईंचे बोट सुजले होते रियाज करून. ते बघून म्हणाले, ‘बोट तुटलं तरी चालेल. रियाज असाच चालू राहायला हवा.’

भाईंचा हात बुवांनी घडवला तो असा. १९५५ मध्ये बुवांनी कोल्हापूर कायमचे सोडण्याचा निर्णय घेतला. देवल क्लबचा सुवर्ण महोत्सव होऊन गेला होता आणि मुंबईच्या शिकवण्या वाढल्या होत्या. शिवाय १९५४ पासून पुणे आकाशवाणी केंद्रही सुरू झाले होते. त्या केंद्रावरूनच त्यांचे कार्यक्रम होत असल्याने आता त्यांना कोल्हापूरचे वास्तव्यच बंद करायचे होते. त्यांनी एके दिवशी दुपारी अडीच तीन वाजता भाईंना देवल क्लबवर बोलावून घेतले. आतल्या खोलीत स्टोव्हवर चहाचे आधण चढवले. चहा झाला. दोघेही प्यायले. मग बुवा म्हणाले,

‘भाई जरा तुझं नोटबुक काढ’

भाईंनी नोटबुक काढले, तर बुवांनी जपून ठेवलेली चिटोरी काढली. एकेक चिटोरे त्यांनी भाईंच्या हाती द्यायचे आणि भाईंनी ते लिहून घेऊन बुवांना परत करायचे. आश्चर्य हे की बुवांनी ते चिटोरे लगेच फाडून टाकायचे! सुमारे पाऊण एक तास हा प्रकार चालू होता. शेवटचे चिटोरे फाडून होताच बुवा म्हणाले,

‘संपलं! माझ्यापाशी जे खास म्हणून होतं ते तुला आज देऊन टाकलं! कधी मला लागलंच तर आता मी ते तुझ्याकडून घेईन. पण आता हे मला सांभाळून ठेवायचं नाही.’

बुवांच्या डोळ्यात अश्रू होते. वादनाचार्यपदाच्या राजीनाम्यातील जणू तो पूर्णविरामच.

भाई हे जगन्नाथबुवांचे शिष्य हा गौप्यस्फोट मुंबईत पुढे एका रविवारी झाला. भाई दर रविवारी बुवांच्या माहीमच्या खोलीवर जात अणि ज्या शिष्याची तालीम चालू असेल त्याची साथ करीत. एका रविवारी अचानक तिथे अल्लारखां हजर झाले. तेव्हा त्यांना समजले की भाई बुवांचे शागीर्द! मग अनेक जणांनी बुवांना विचारून पाहिले. तबला शिकण्याची इच्छा व्यक्त केली. बुवांनी सर्वांना सांगितले,

'माझ्या आयुष्यातलं ते प्रकरण संपलं आहे!'

बुवांच्या गौरवपर लिहिलेल्या अनेक लेखांत त्यांच्या वादनाचार्यत्वाची उपेक्षा झाली असे मला वाटल्याने हे एवढे सविस्तर लिहिले.

कोल्हापूरला नगरशेठ यांच्या चाळीत बुवा देवल क्लबमध्ये राहत. मदन बोंगाळे याला बुवांची तालीम या खोलीतच मिळे. त्या खोलीवर निकम नावाचे एक ज्योतिषी अधून मधून येत. मदन बोंगाळेला तालीम देत असतानाच हे ज्योतिषी आले. त्याबरोबर बुवा त्यांना म्हणाले,

"निकम गुरूजी, माझा हात एकदा नीट बघा ना. कधी तरी चांगले दिवस येणार आहेत का माझ्या आयुष्यात?"

त्यावर निकम म्हणाले, "हात तर सांगतोय की तुम्हांला फार चांगले दिवस येणार आहेत. इतके चांगले दिवस की बुवा, तुम्ही त्या वेळी आम्हांला ओळख देखील दाखविणार नाही."

निकमांचे हस्तसामुद्रिक बुवांच्या आयुष्यात १९४६ साली खरे ठरले. पुण्यात त्या रात्री सरदार आबासाहेब मुजुमदार यांचा षष्ट्यब्दिसोहळा लिमये नाट्यमंदिरात होता. मंदिर तुडुंब भरले होते. कुमार गंधर्व आणि त्यांच्या नंतर पं. मल्लिकार्जुन मन्सूर असे थोर कलाकार गायचे होते. पण मोठा चमत्कार घडला. रशियाने स्पुटनिक सोडल्यावर जग जेवढे स्तिमित झाले नसेल तेवढे ते श्रोतागार कुमारांनी ऐकविलेल्या अभूतपूर्व बंदिशीने स्तिमित झाले. पहिल्याच समेला उत्स्फूर्तपणे हजार-दीडहजार श्रोत्यांनी उठून उभे राहून वाहवा दिली. श्रोते दोन अंगुळे उंच उडाले असे त्या मैफलीहून परत आलेल्या मुंबईच्या श्रोत्यांनी सांगितले. ही बंदिश होती 'कौशिक' रागात बांधलेली 'सुघर बर पाया.' रचना पं. जगन्नाथबुवांची आणि त्यांनीच ती कुमारांना सांगितली होती. या घटनेने त्या बंदिशीमुळे लगोलग एक हवा निर्माण झाली. कुमारांच्या मागून मन्सूरजी गाणार होते. त्यांनी बेत रद्द केला. ही बंदीश बांधणारा रचनाकार कोण? महाराष्ट्रभर संगीताच्या दुनियेत चर्चा सुरू झाली. बुवांच्या भाग्योदयाचा तो

क्षण होता. जाणकार पुढे वारंवार म्हणू लागले की बुवांनी एवढी एकच बंदीश बांधली असती तरी बुवा श्रेष्ठ वाग्गेयकार ठरले असते.

ही रचना कोणत्या धुनीवरून झाली? माणिक वर्मा यांनी कधीतरी बुवांना पंचम अंगाच्या चंद्रकंसाची एक धून ऐकविली होती. 'होऽऽ बेगी आवन कर प्यार' ही ती धून. बुवांनी ती धून डोक्यात घोळवता घोळवता 'सुघर बर पाया' ही बंदीश कौशिक रागात बांधली. बुवा ४२ साली देवल क्लबात राहायला आल्यापासून अनेकदा मुंबईस येत असत व प्रो. देवधर यांच्या सँडहर्स्ट रोडवरील विद्यालयात उतरत असत. त्या वेळी विद्यालयात वसुंधरा श्रीखंडे, कांचनमाला बढे, पंढरीनाथ कोल्हापुरे, रामकृष्ण बोंद्रे, कुमार हे सर्व शिकत होते. जगन्नाथबुवाही तेथे आल्यावर शिकवीत. अशाच एका भेटीत बुवांनी कुमारांना ती बंदीश दिली. बुवांच्या रचनादृष्टीत दोन्ही गंधार एकामागोमाग एक यावेत व निषादाचा भास होणारा धैवत लागावा असे होते. एखाद्या नागिणीसारखी सळसळ करीत ही बंदीश निघे व समेवर येऊन विसावे तेव्हा डोलण्याची क्रिया श्रोत्यांची असे. कुमारांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मदतीसाठी झालेल्या संगीतोत्सवात ही बंदीश गाताना हा अनुभव मी घेतला आहे. पुढे कुमार आजारी झाले आणि बंदिशीचे नवे नामकरण झाले.

या बंदिशीने हवा केल्यामुळे ती चर्चाविषय झाली आणि प्रो. बी. आर. देवधर यांच्याकडे निर्णयासाठी गेली. देवधरांनी गंधार वैराग्याचा निदर्शक म्हणून सांगितला आणि बुवांनी तो मान्य केला. वैराग्यनिदर्शक प्रतिशब्द म्हणून योगकंस असे नाव त्या रागाला देण्यात आले. तो जोड राग नव्हे हे इथवर स्पष्टच होते. पुढे हिंदीत योग हा शब्द जोग असा उच्चारला जातो म्हणून जोगकंस असे नाव रूढ झाले. मूळचा कौशिक आज डॉ. कुमार गंधर्व आणि नीलकंठ अभ्यंकर हे दोघेच गातात. कुमारांना तर कौशिकचा जोगकंस होऊ देण्यास बुवांनी मान्यता दिली हेच नापसंत होते व आहे.

बुवांची दुसरी आकर्षक रचना 'स्वानंदी' रागातील. तशी प्रत्येक बंदीश ही उत्स्फूर्तच असते. पण उत्स्फूर्त म्हणजे 'पुशबटन' निष्पत्ती असे मात्र नव्हे. वाग्गेयकरांना नवी बंदीश कशी स्फुरते ते एक कोडेच आहे. बंदिशीची धून, तिची अक्षरे, तालाच्या अंगाने अक्षरांना द्यावे लागणारे वजन आणि रागाच्या अंगाने सांभाळावी लागणारी पथ्ये या सर्वांचे भान त्या झपाटलेल्या अवस्थेतही त्याला ठेवावे लागते. तरच चिरंजीव बंदीश साकार होते. बुवांना 'स्वानंदी' रागात बंदीश बांधताना रागेश्री, बिहाग आणि भटियार या तीन रागांचे मिळून एक रसायन बनवायचे होते. ही रचना करीत असता बुवांकडे पं. सी. आर. व्यासांना तालीम चालू होती तीही स्वानंदीचीच. दोघेही एकचित्त. संध्याकाळचा समय. तिन्ही रागांच्या चक्रव्यूहातून

सहीसलामत बाहेर पडताना काही चूक तर होणार नाही ना याविषयी दक्ष. अंतऱ्याची उठावण 'पप नि नि सां' अशी तार षड्जाला भिडणारी करताना बिलावल रागाच्या संगतीकडे नेऊन रचनेत भलताच विक्षेप तर निर्माण होणार नाही ना अशी शंका प्रथम सी. आर. व्यास यांच्या मनात डोकावली आणि ते सैरभैर झाले. त्यांनी नम्रपणे गुरुजींपुढे आपली शंका मांडताच गुरुजीही सैरभैर झाले. बुवा लगबगीने व्यासांना म्हणाले, 'आपण इथेच तालीम जरा थांबवू या. जरा समुद्रावर जाऊन भटकून परत येऊ या' दोघेही मोकळ्या हवेवर भटकून आले आणि त्यामुळे 'स्वानंदीचे' भरकटणे थांबून ती एक निर्दोष कलाकृती झाली.

'स्वानंदी' तील रचना करताना बुवांनी शिष्याशी चर्चा करण्यात कमीपणा मानला नाही. आपल्याला राम मराठे, सी. आर. व्यास, वसंतराव कुलकर्णी ह्यांच्यासारखे शिष्य लाभले ही भाग्याची गोष्ट असेच ते मानीत. इतकेच नव्हे तर एकान्तात रचना करताना कुठे तरी गाडी अडते आहे असे वाटले तर शिष्याला बोलावणे पाठवून हजर व्हायला लावीत. एकदा असेच घडले.

रात्रीचे अडीच वाजायला आले होते. पं. वसंतराव कुलकर्णी यांच्या ब्लॉकची बेल वाजली! वसंतरावांनी दरवाजा उघडला तर बुवांच्या शेजारी राहणारे नित्य परिचयाचे गृहस्थ दारात उभे! वसंतरावांनी विचारले,

"काय हो, इतक्या रात्री?"

"बुवांनी तुम्हांला असाल तसे या म्हणून निरोप दिलाय्"

"तब्येत ठीक आहे ना बुवांची?" वसंतरावांनी घाबरून विचारलं.

''तसे ठीक दिसले, पण चेहऱ्यावर चिंता होती."

वसंतराव लगेच झब्बा चढवून निघाले. पाच एक मिनिटातच बुवांच्या खोलीवर पोचले. कॉटवर बुवा बसले होते. डोक्यावर शाल पांघरून, मच्छरदाणी लावून, उकिडवे बसलेल्या बुवांना पाहून वसंतरावांच्या मनात आजाराचीच शंका आली. ते काही बोलणार तोच बुवा म्हणाले,

''कॉफी करून दे"

वसंतरावांनी स्टोव्ह पेटवून आधण ठेवले. पुनः वळून कॉटशी येतात तोच बुवांनी त्यांच्या हातात एक कागद दिला. 'हे काय लिहिलंय ते बघा' वसंतरावांनी कागद वाचला. अहिरभैरवात एक नवी बंदीश बांधलेली दिसत होती. ओळी अशा होत्या:

अरे तू जागत रहियो |
मान लो मोरी बात॥ (स्थायी)

जग झूटा सब माया झूटी।
कोई नही तेरा गुनिदास।। (अंतरा)

वसंतरावांनी दोनदा रचना वाचली. कॉफीचे कप भरता भरता बुवांना म्हणाले, 'छान झालीय्'

"कॉफीबद्दल नाही विचारलं."

"बंदिशीबद्दलच म्हणतोय मी"।

"समेवर यायला दोन मात्रा कमी पडत असूनही छान झालीय म्हणता. जरा हातानं ताल धरून बघा ना गुणगुणून"

वसंतरावांनी तसे करताच बुवांपुढची समस्या त्यांच्या लक्षात आली. मग दोघेही काही क्षण स्वस्थ, कॉफीचे कप खाली ठेवता ठेवता वसंतरावांना कल्पना सुचली. अखेरच्या ओळीच्या शेवटी 'ये जगमें' हे दोन शब्द घातले आणि ते 'कालात' टाकले तर सम बरोबर साधते असे त्यांना दिसले. त्यांनी बुवांना तशी जुळणी करून म्हणून दाखवताच बुवांच्या डोळयांत जे अपूर्व समाधान प्रगटले त्याचे वर्णन कोणत्याही शब्दांत होऊ शकणार नाही.

कोल्हापुरातील आपल्या वास्तव्यात बुवांनी आपल्या विद्वत्तेच्या कक्षा वाढविल्या आणि मुंबईत 'शिष्यांचा लोटला प्रवाहो' अशी स्थिती त्या विद्वत्तेच्या बळावर निर्माण केली असे संक्षेपाने म्हटले तर ते चूक ठरू नये. हा प्रवाह लोटायला आबासाहेब मुजुमदारांच्या साठी सोहळयात कुमारांनी गायलेली बंदीश बऱ्याच अंशी कारणीभूत झाली असावी असा तर्क केला तर तोही चुकीचा न ठरावा. बुवांना मुंबईत संगीतप्रेमी दादासाहेब आपटे यांच्या निवासस्थानी आणण्याचे श्रेय काणे बुवा आणि नीळकंठ अभ्यंकर यांना द्यावे लागेल. हे खरे की राम मराठे, सुरेश हळदणकर, माणिक वर्मा यांनी बुवा मुंबईस महिन्यातून काही दिवस तरी राहावयास यावेत म्हणून आग्रह चालविला होता. पण दादासाहेब आपटे यांचेकडे ते आले ते खुद्द दादासाहेब त्यांना देवधरांकडे जाऊन घेऊन आले तेव्हाच. १९४९ च्या जानेवारीतील ही घटना आहे. त्या आधी डिसेंबर १९४८ च्या २१-२२ तारखांना दादासाहेबांनी संगीतास वाहून घेतलेल्या काणे-अभ्यंकर या दोन तरुणांना आपल्या घरी आश्रय दिला होता. त्यांच्याशी बोलताना जगन्नाथबुवांच्या गरजेचा प्रश्न निघाला. दादासाहेबांनी काय म्हणावे? ते सहज बोलून गेले.

"एवढा विद्वान गायक माझ्या घरी राहून राम मराठे, सुरेश, माणिक वगैरेंना तालीम देणार असेल तर ते या वास्तूचे भाग्य असंच मी समजेन." आणि दादासाहेब स्वतः जाऊन बुवांना मोटारीत घालून घेऊन आले. राम, सुरेश यांना बुवांची तालीम सुरू झाली. बुवांच्या वास्तव्यामुळे उस्ताद विलायत हुसेनखां हेही येऊ लागले. सरस्वती सदन हे दुसरे संगीत

सदनच बनले. बुवा मुंबईत नसून कोल्हापूरला असले तरी खांसाहेब येत आणि शांताबाई आपटे यांचा तंबोरा काढून गात बसत. काणे बुवा खांसाहेबांचे गंडाबंध शिष्य तसेच बुवाही. फक्त नीलकंठ अभ्यंकर मात्र देवधर मास्तरांनी द. म. ४० रुपयांची शिष्यवृत्ती दिल्याने मास्तरांचे शिष्य. पण चोवीस तास ऊठबस आग्रा गायकीत. ऊठबस ती. थोडीच गळयात पडल्यावाचून राहते. तरीही बुवांना वाटे की कधीतरी खांसाहेबांनी अभ्यंकरांना तालीम द्यावी. ते खांसाहेबांकडे तसे बोललेही असावेत. खांसाहेब बुवांना म्हणालेही असावेत की, ‘मुझे वख्त नही मिलेगा लेकिन युनुस उसको तालीम देगा’ या पार्श्वभूमीवर एका संध्याकाळी अभ्यंकरांना बुवांनी खांसाहेबांपुढे गायला बसवलेच.

अभ्यंकरांनी पूरियामधील सर्वपरिचित बंदीश ‘फूलनके हरवा’ मांडली. मोठ्या दमखमाने गायले. बोल अंगाने बढन्त करीत समेसमेवर वाहवा घेतली. गाणे संपल्यावर उस्ताद विलायत हुसेनखां म्हणाले, ‘अरे जगन्नाथ, ये तो सब हमाराही गाना गाता है - इसको युनुस क्या सिखाएगा’ हे ऐकल्यावर अभ्यंकरांच्या लक्षात आले बुवा आणि खांसाहेब यांचे गोड कारस्थान!

माणसे कशी जोडावीत या कलेतही बुवा प्रवीण होते. एकदा त्यांनी ज्याला आपला म्हटले त्याला आजन्म अंतर दिले नाही. सरस्वती सदनानजिकच पन्नास एक पावलांवर डॉ. एम. डी. फळणीकर राहत. डॉक्टरांना ख्यालगायकीचे वेड. केसरबाईंकडे त्यांचा राबता. डॉक्टर पूर्वायुष्यात बाबुराव गोखले यांचेकडे गाणे शिकत होते. पुढे व्यवसायात पडेपर्यंत गाणे शिकण्याचे बेत जरा दूर सारावे लागले. बालगंधर्वांचे ऑर्गनवादक श्री. जंगम हे डॉक्टरांचे मित्र. डॉक्टरांनी जंगमांना विचारले, ‘अरे मी पूर्वी थोडंबहुत गाणं शिकलोय्. आता व्यवसाय सुस्थिर झाला असल्यानं कोणी नामवंत मला शिकवील तर पाहा ना.’

जंगमांनी प्रयत्न केला. प्रथम कोठेच यश आले नाही. मग एके दिवशी दवाखान्यात येऊन जंगम म्हणाले,

“काखेत कळसा आणि गावाला वळसा”

“का हो काय झालं? ‘डॉक्टरांनी विचारले.

“तुमच्या घरापासून चार पावलांवर कोल्हापूरचे जगन्नाथबुवा येऊन राहतात आणि राम, सुरेशना तालीम देतात, हे तुम्हांला वर्ष झालं तरी कळू नये म्हणजे आश्र्चर्यच.’

“अहो, पण बुवा मला तालीम देतील का?”

“ते माझ्याकडं लागलं.”

दुसऱ्या दिवशी जंगम बुवांना घेऊन दवाखान्यात हजर. प्राथमिक बोलण्यात बुवांनी

डॉक्टरांच्या पूर्वशिक्षणाबद्दलची माहिती काढून घेतली. मग सहज प्रश्न टाकला,

"डॉक्टर, कोणते राग तुम्हांला विशेष आवडतात?"

"आवडतात पुष्कळच. पण न आवडणारे चटकन् सांगू शकतो."

"'सांगा बघू."

"मुलतानी आणि पूर्वी हे राग मला मुळीच ऐकवत नाहीत."

"असं? ठीक आहे. एक कराल?"

"काय?"

''तुमच्या घरी संध्याकाळची एक बैठक आयोजित करा. मी येईन गायला. कराल ना एवढं?"

''मोठ्या आनंदानं."

आणि मग खास निमंत्रितांपुढच्या त्या बैठकीत बुवांनी 'मुलतानी' (रबा मेंदिया) आणि 'पूर्वी' (दिलिया नगरवा) हेच दोन राग पेश केले. डॉक्टरांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्या बैठकीची आठवण झाली की अजूनही डॉक्टर सद्गदित होतात. दुसऱ्या दिवसापासून बुवा डॉक्टरांच्या घरी येऊन तालीम देऊ लागले.

बुवा मुंबईत स्थायिक झाल्यावर माहीमला राहू लागले. जी. एन्. जोशी यांच्याकरवी मिळालेली ती खोली किती तरी मधुर आठवणी साठवून ठेवणारी ठरली. बुवांचा शिष्यवर्ग हजेरीपट ठेवण्याएवढा मोठा झाला तो याच खोलीत. पहाटेपासून कुणा ना कुणाला तरी बुवा तालीम देत असलेले दिसायचे ते इथेच. रात्री साडेदहा वाजले म्हणजे मात्र बुवा अन्य कोणाचे नसत. ते बंद असत ऑल वेव्ह रेडिओचे! कराची, लाहोर ही स्टेशने लावून ऐकत बसत. नव्या धुना शोधण्याचा त्यांचा हा आगळा छंद असे. या धुनाच त्यांना नवीन रचना करण्याची स्फूर्ती देत. कधी मोकळा वेळ मिळाला तर बुवा खाटेची नवारपट्टी खोलून ती पुनः टाईट करताना दिसत. हा खटाटोप स्वतःला सुखनिद्रा यावी म्हणून नसे. शरद तळवलकर हा आपल्या शिष्येचा नवरा स्टुडिओतून शूटिंग आटोपून दमून येतो. त्याला सुखाची झोप यावी म्हणून असे. म्हणजे बुवा इथेही 'गुणिदास' च होते. खरे तर हैद्राबादी उस्तादांनी दिलेली ती उपेक्षापूर्ण उपाधी. पण बुवांनी आपल्या हयातीत ती अपेक्षा पूर्ण केली.

एखादा शिष्य (अथवा शिष्या) एकदोन दिवस तालीम घेण्यास आला नाही तर बुवा भल्या पहाटे जाऊन शिष्याचा दरवाजा ठोठावीत. त्यांची मानसकन्या सौ. लीला करंबेळकर अशीच दोन दिवस आली नव्हती. त्या वेळी ते कुटुंब टिटवाळ्यास राहात असे. बुवा पहाटेच्या लोकलने निघून सूर्योदय होता होता शिष्येच्या दारात!

"अय्या, बुवा, इथपर्यंत येण्याची तसदी कशाला घेतलीत?"

"तू बरी आहेस की नाही याची शंका आली म्हणून आलो. आता जातो."

"जातो काय? आत तरी या."

"छे. परतीची लोकल चुकेल. आठ वाजेपर्यंत पोचले पाहिजे माहीमला. तालीम द्यायची आहे ना यशवंताला. तो तिष्ठत बसेल."

आणि हे वेळच्या वेळीच तालीम देणे फक्त आपल्या शिष्यांपुरतेच राखून ठेवलेले नव्हते. शिष्याचा शिष्य आला तरी तेच. योगिनी जोगळेकर या रामभाऊ मराठे यांच्या शिष्या. त्या पुण्याहून रामभाऊंकडे येत व कधीकधी तशाच पुण्यास परतत. एकदा माहीम येथे त्या आल्या असता बुवा म्हणाले, "परभारे पुण्यास जाता, जगन्नाथबुवा अजून जिवंत आहे!" यावरून काय समजायचे ते समजून रामभाऊ योगिनीबाईंना माहीमला बुवांच्या खोलीतच तालीम देऊ लागले. एकदा योगिनीबाई तालमीसाठी आल्या, पण रामभाऊंचाच पत्ता नव्हता. बुवा म्हणाले, "राम नसला तर नसला. मी आहे ना? काढा तंबोरा." आणि तोडीची तालीम सुरू झाली. तेवढ्यात रामभाऊ येताच बुवांनी त्यांना खडसावले,

"अरे पुण्याहून येतात त्या. किती वेळ तिष्ठत ठेवायचं त्यांना! वफादारी, इन्तजारी, बहोत बुरी...."

बुवांच्या संदर्भात असे किस्से अगणित. माहीमच्या खोलीवरील रविवारचा दिवस घेतला तरी किश्शांची गाथा होईल. त्या काळात व्हीडिओ शूटिंग नव्हते म्हणून. नाही तर दूरदर्शनला तिथे सुरेख दृश्ये टिपता आली असती. त्रिंबक जाधव पोळ्या लाटायला बसले आहेत, रामभाऊ तांदूळ निवडीत आहेत, खुद्द बुवा शिरा भाजताहेत, एकदम छोट्याशा गोकुळातली गजबज! सबंध रविवार असा गाजत असे.

बुवांचा षष्ट्यब्दिसोहळा अगदीच अप्रयास आकाराला आला. वर्गणी द्या असे कुणाला सांगावेही लागले नाही. मंदाग्नीवर ठेवलेल्या दुधावर सायीचा जाड थर आपोआप जमावा तसा निधी जमला. बुवांना ३१ हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली होती. १९६४ साली या रकमेला आजच्या हिशोबाने तीन लाखांचे मोल होते. बुवांचे दातृत्व ओसंडून जाईल व या निधीतील पैशांना पाय फुटतील हे जाणून दादासाहेब आपटे यांनी थैलीचा ताबा घेतला. म्हणाले, आता सरकारकडून मानधन मिळते आहे आणि सर्वच शिष्य फुकट शिकताहेत असे नाही. तेव्हा ती थैली आमच्या सौ. सांभाळतील. बुवांनी ते मान्य केले. थैली दिली.

पण तो पर्यंत त्यातले तीन हजार रुपये कृष्णार्पण झाले होते. अर्थात बुवांचे दान

सत्पात्रीच असायचे. हे तीन हजारही 'प्राणपियां' च्या घरीच बुवांनी धाडले होते. गुरुऋण ते नेहमीच फेडीत आले. पण बुवांची राजकीय जाणही विलक्षण होती. १९६२ साली चीनचे आक्रमण होताच बुवांनी मंत्रिमहोदय बाळासाहेब देसाईंना भेटून आपल्या जवळची ५०० रुपयांची पुंजी युद्धनिधीस अर्पण केली.

"बुवा हे तुम्ही करायलाच पाहिजे होतं का?" असे जितेंद्रजींनी विचारताच बुवा उद्गारले,

"मी या मातीतच जन्माला आलोय् ना? अरे हे संचित आहे. टाळता येणार नाही, आणि विचारी माणसानं टाळूही नये."

बुवांना त्यांच्या गायकीसाठी मानणारे सर्वच. पण शुद्ध चारित्र्य आणि मोठमोठ्या गुरूंची भांगचंडोलासारखी व्यसने पुरवून स्वतः आजन्म निर्लेप राहणे या साठी त्यांना मानणारे किती सापडतील? पुरोहिताचा प्रेषित होतो तो या गुणांमुळे.

बुवांची संगीतक्षेत्राला केवळ बंदिशींचीच देणगी आहे असे नाही. अहिरभैरव, मधुवंती, यांसारखे तोवर अप्रचलित असणारे राग त्यांनीच प्रचलित केले, त्यामुळे आता नवोदित कलाकारही ते बिनधास्त गातात. हमखास डोळयांत अश्रू उभे करण्याचे त्यांचे सामर्थ्य श्यामकल्याण, ललत, भैरवभटियार, मुलतानी, पूर्वी, शिवमतभैरव, अशा रागांतील बंदिशी मांडताना दिसून येई. भैरवावर तर त्यांचे विलक्षण प्रेम. पुकार ही त्यांचीच खासियत. बुवा कोल्हापूरला असताना त्यांच्या आवाजाला जी झार होती ती मुंबईत आल्यावर कमी झाली. पुढे तर घशावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर आवाज घोगराच झाला. तरी देखील १९६८ साली आपल्या मानसकन्येच्या घरी डोंबिवलीस गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांनी गायिलेला गौरवभटियार सर्वांच्याच काळजाला हात घालून गेला. निधनाआधीच चार महिने त्यांना मृत्यूची चाहूल लागली असेल काय? बहुधा असावी. ते वारंवार तसे सूचकतेने बोलत. आणि याआधी जी 'अरे तुम जागत रहियो' ही बंदीश उल्लेखिली ती शेवटचीच कृती. तिचा आशय तरी दुसरे काय सांगतो?

सही सही बुवांची गायकी गाणारे बालकराम अकाली गेले. राम मराठे, सी. आर. व्यास, माणिक वर्मा, सुरेश हळदणकर, सिंधू शिरोडकर, प्रभुदेव सरदार, वसंतराव कुलकर्णी, यशवंत जोशी, विमल वाकडे, कुंदा वेलिंग, पौर्णिमा तळवलकर, मोहनतारा अजिंक्य, मनोरमा वागळे, जितेंद्र अभिषेकी, जिनेंद्र धनाल, डॉ. फळणीकर, मदन बोंगाळे, लीला करंबेळकर, मालती पांडे, जे. एल्. रानडे, जी. एन्. जोशी यांना बुवांची तालीम त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप मिळाली इतकेच. नीळकंठ अभ्यंकर यांना सहवासाने बुवांचे गाणे आले. ते बुवांची आठवण करून देऊ शकतात. याचा अर्थ असा होतो की आपल्या शिष्यांची कलाविषयक स्वतंत्र

प्रतिभा निर्बंधित करून, मी सांगतो तसेच चला, असे त्यांनी कधीही बजावले नाही. पण एवढे मात्र ते बजावीत की ज्या कलाकारापाशी संस्कार, अभ्यास, परिश्रम अथवा स्वतःचा विचार नसेल तो कितीही ऐटीने मैफलीत बसला तरी क्षणार्धात त्याचे पितळ उघडे पडेल.

***सो पुंघट की औट करो ।***

***चंचल नयन छुपे न छुपे ।***

या ओळी ते अनेकदा याच संदर्भात ऐकवीत.

बुवांनी आपल्या मागे एक मोठी इस्टेट ठेवली आहे. एक आहे गणपतीची मूर्ती. ती वसंतराव कुलकर्णी यांना दिली आहे. दर वर्षी गणेशचतुर्थीला ती नव्याने रंगवून उत्सवमूर्ती बनते. बुवांनी दुसरी इस्टेट ठेवली आहे ती शंभरपेक्षाही अधिक बंदिशींची. ती विखुरल्या अवस्थेत आहे. कदाचित् गणपतीची मूर्ती हे सर्व शिष्यांना दिलेल्या विद्येचे प्रतीक आहे. त्या प्रतीकाला वंदन करण्यासाठी प्रतिवर्षी सर्वजण वसंतरावांच्या घरी गणेशचतुर्थीस येऊन जातात. पण हे खाजगी स्मारक म्हणता येईल. बुवांची जाहीर स्मारके तशी आहेतच. कोल्हापुरात केशवराव धर्माधिकारी यांनी चालविलेले ‘गुणिदास संगीत विद्यालय’ हे त्यापैकी एक. तसेच आणखी एक स्मारक म्हणजे पं. सी. आर. व्यास यांनी ‘गुणिदास संगीत महोत्सवा’ चा चालविलेला उपक्रम. गुणिदास विश्वस्त मंडळातर्फे प्रतिवर्षी जी गायन-वादन स्पर्धा होते तेही त्यांचे उचित असे स्मारकच म्हणावे लागेल. आता विश्वस्त मंडळ बुवांच्या विखुरलेल्या बंदिशींचे संकलन करून, स्वरलिपिबद्ध करून जो ग्रंथ तयार करू मागत आहे ते बुवांचे ‘अक्षर स्मारक’ होईल. बुवांच्या साठी सोहळयाच्यावेळी ‘स्वानंदिनी’ म्हणून एक छोटेसे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले, त्यांत बुवांच्या चौदाच बंदिशी आहेत. बुवांच्या शंभराहून अधिक बंदिशी आहेत. उर्वरित बंदिशीही लौकरच प्रसिद्ध होवोत.

१९६८ च्या सप्टेंबरात बुवा फ्लूच्या विळख्यात सापडले. तेव्हापासून ते आतल्या आत क्षीणच होत होते. ‘अरे तू जागत रहियो’ ही अहिरभैरवातील रचना याच काळातील. तीच शेवटची. तीत बुवांची वेदना व्यक्त झाली आहे. या आजारानंतर ते अनेकांना ‘आपलं काही खरं नाही’ असे बजावीत. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात शेवटी शेवटी त्यांना मुंबईबाहेर विश्रांतीसाठी जावे असे वाटू लागले. डॉ. फळणीकर व डॉ. दादासाहेब तुळपुळे यांनी कार्डिओग्राम काढून डोंबिवलीस मानसकन्येच्या-सौ. लीला करंबेळकर यांच्या घरी जाऊन राहाण्याची परवानगी दिली. अट एकच होती की बुवा डोंबिवलीस आहेत हे कुणालाही कळता कामा नये. वीस ऑक्टोबर १९६८ रोजी बुवांना गुपचुप डोंबिवलीस रवाना करण्यात आले. बावीस ऑक्टोबरला बुवा चुळबुळ करू लागले. त्यांना त्या विश्रांतीचाच

भार झाला. म्हणाले,

अंधार पडल्यावर थोडंसं भटकून यायला काय हरकत आहे? पाय मोकळे होतील.'

धनत्रयोदशीचा दिवस. आकाशकंदील घराघरावर लागलेले. जयराम करंबेळकरांनी बुवांना थोडेसे फिरवून आणले. घरी परत येताच बुवा कोसळले! निरभ्र आकाशात आणखी एक आकाशदीप झेप घेऊन उडाला! प्रेषिताची इहलोकीची खास कामगिरी आटोपली होती.

आज तो क्षण आठवला म्हणजे पुढील पंक्ती सुचतात.

फैयाजखां गेले,
आग्रा गायकीचे आकर्षण गेले,
विलायत हुसेनखां गेले,
आग्रा गायकीचे संरक्षण गेले,
जगन्नाथबुवा गेले,
आग्रा गायकीचे भावावगुंठन गेले...

होय, त्या प्रेषिताचे व्यवच्छेदक लक्षण तेच होते.



# १०. हे तो स्वप्नीचे धन

मुंबई महापालिकेच्या शिक्षण-विभागात, आयुक्त मधु देसाई यांनी आपल्या कारकीर्दीत, 'संगीत अकादमी' दाखल केली, ही घटना अलीकडची. पण पन्नास वर्षापूर्वी अशी अकादमी नव्हती तरी देखील मुंबईच्या प्रत्येक प्राथमिक शाळेत संगीत शिक्षक असेच. या शिक्षिकांपैकी काही तर नामवंत गवय्ये असायचे. त्यांच्या हातून जाणतेपणाने प्रज्ञाशोधही घडत. विद्यार्थ्याचा योग बलवत्तर असला तर या प्रज्ञाशोधातून गहिरा गायकही निर्माण होत असे. पं. रत्नाकर पई हे अशाच एका क्षणी प्रज्ञाशोध घडल्यामुळे गाणे शिकण्यास प्रवृत्त झाले असे म्हणावे लागेल.

ते १९३८ साल असावे. खेतवाडीतील नवव्या गल्लीच्या नाक्यावर महापालिकेची जी प्राथमिक शाळा होती तीत पहिल्या मजल्यावर मुलांचे आणि दुसऱ्या मजल्यावर मुलींचे वर्ग असत. एके दिवशी पहिल्या मजल्यावरच्या तिसऱ्या इयत्तेतील एक मुलगा शिक्षकांच्या सांगण्यावरून सुस्वर आवाजात कविता गात असता त्याच्या उंच आणि अत्यंत मधुर आवाजाने आकृष्ट होऊन दुसऱ्या मजल्यावरील एक शिक्षक त्या वर्गाच्या दरवाजात येऊन उभे राहिले. मुलाने कविता संपविली. त्याला खूण करून त्यांनी बाहेर बोलावले आणि विचारले,

"तुझं नाव काय बाळ?"

"रतन पई"

"घरी गाणंबिणं शिकत असतोस?"

"शिकत नसतो पण ऐकत असतो."

"कुणाचं?"

"हिराबाई, अब्दुल करीम खांसाहेब, बालगंधर्व..."

"ही मोठी मंडळी तुझ्या घरी ऐकायला मिळतात तुला?"

"छे हो. माझ्या घरात गाणं नाही. पण आमच्या शेजारी कुलकर्णी राहतात ना,

त्यांच्याकडे रेकॉर्डस् ऐकतो मी यांच्या. मला फुल परवानगी आहे त्यांची, केव्हाही रेकॉर्डस् लावून ऐकण्याची. ते देखील वेळ असेल तेव्हा बसतात माझ्या बरोबर.''

''छान. पण ही बडी मंडळी गातात तसं आपणही गावं असं नाही कधी वाटलं तुला?''

''नेहमीच वाटतं.''

''अरे मग त्या साठी पद्धतशीर गाणं शिकलं पाहिजे तुला. किती गोड आहे तुझा आवाज! गोड आणि उंच म्हणजे अगदी देवळाच्या शिखरासारखा! घरी जाऊन वडिलांना सांग की मला गाणं शिकायचंय्''

रतनने त्याच्याशी बोलणाऱ्या त्या व्यक्तीला आपादमस्तक न्याहाळले आणि म्हणाला, ''आज घरी गेलो की सांगतोच वडिलांना.''


घरी हा सर्व संवाद त्याने जसा घडला तसा सांगितला. त्याचे वडील तर लक्ष लावून ऐकत होतेच, पण त्यांच्या घरी राहणारे एन्. एल्. रानडे नावाचे गृहस्थही लक्ष देऊन ऐकत होते. आपल्याशी शाळेत बोलणारे गृहस्थ डोक्यावर केशसंभार असणारे, छानशी दाढी राखलेले आणि भगवी लुंगी नेसलेले असे होते; असे रतनने सांगताच रानडे म्हणाले,

''अरे रतन, ते तर बेहेरेबुवा! खांसाहेब अब्दुल करीम खां यांचे शिष्य! तुमच्याच शाळेत ते संगीत शिक्षक आहेत. आणि मी देखील त्यांच्याकडेच गाणं शिकत असतो.''

''मग मला शिकवतील ते?''

''मीच शिकवीन ना तुला सध्या. इतक्यात त्यांच्याकडे जायला नको.'' प्रज्ञाशोधाचा पहिला पलटा इथे पुरा झाला होता.

रतनचे प्राथमिक गायनशिक्षण असे घरच्या घरी सुरू झाले. रानडे यांना, कुठल्याही शिक्षणात श्वासोच्छवासाप्रमाणे सातत्य असावे लागते, हे ठाऊक नसेल असे नाही. पण माणूस कमालीचा अनियमित, अशा नियमितपणे अनियमित असणाऱ्या रानड्यांनी एक गोष्ट मात्र ठीक केली. तालासुरांचा रतनचा पाया पक्का करून घेतला. प्राथमिक अलंकार, तराणे, पलटे, निरनिराळे ताल - अगदी दादऱ्यापासून झुमरा, आडाचौताल येथपर्यंत. पण पुढे रानड्यांनाच बेहेरेबुवांची तालीम, बेहेरेबुवा सेवानिवृत्त होऊन कोकणात निघून गेल्यामुळे बंद झाली आणि ते स्वतःच कुणी मोफत शिकवणारा भेटतो का, या शोधात गुंतले. पईंच्या घरी विठ्ठलराव पई म्हणून एक पेटीवादक येत. त्यांनी रानड्यांना पं. मोहनराव पालेकर मिळवून दिले. पं. मोहनराव पालेकर यांचा पईंच्या घरी पहिला प्रवेश झाला तो असा.



आता पालेकर रानड्यांना आणि रानडे रतनला अशा दोन तालमी घरात सुरू झाल्या. पण पालेकर-रानडे गुरुशिष्ययोग फार दिवस टिकला नाही. रानडे कौटुंबिक अडचणी सोडवण्यासाठी अलिबागला गेले, ते वर्षभर आलेच नाहीत. अखेर १९४१ च्या शेवटी शेवटी रतनच्या वडिलांनी पं. मोहनराव पालेकरांनाच रतनला तालीम देण्याची विनंती केली आणि प्रज्ञाशोधानंतर कुचमलेला प्रवाह पुनः खळाळून वाहू लागला.

पं. मोहनराव पालेकर यांचे नाव त्या काळात जयपूर गायकांत विद्वान गायक, अनवट रागातील बंदिशींचे मर्मज्ञ जाणकार म्हणून प्रसिद्धच होते, आजही आहे. कृष्णराव चोणकरांनी त्यांच्याकडून तालीम घेऊन नाट्य व्यवसायात नाव कमावले होते. जयपूर गायकीपासूनच जो गाणे शिकायला आरंभ करतो त्याला प्रथम अनाघाती लय कंठात मुरवावी लागते. तसे पलटे गुरुमुखातून मिळाल्यानंतर ते गुरूबरोबर घोटावे लागतात. पं. मोहनरावांचा आवाज पातळ, लवचिक आणि गतिमान. झटकन् लयीच्या आठपटीत फिक्रे जायचे. मुस्लिम बँकेतील नोकरी सांभाळून ते शिकवीत. त्यांना स्वतःला जयपूर गायकी अशीच योगायोगाने मिळाली होती. पालेकरांचे घराणे गाणाऱ्यांचे नव्हते. पण मोहनरावांना पौगंडदशेतच गाणे शिकण्याचे वेड जडले. नाटक कंपन्या म्हणजे गायनशिक्षणाच्या शाळाच होत, हे कुठे तरी ऐकलेले असल्याने ते घरातून बाहेर पडून नाटक कंपनीत गुरूचा शोध घेत राहिले. तो शोध शेवटी गोविंदराव टेंबे यांनी स्थापन केलेल्या शिवराज नाटक मंडळीत संपला. इंदूरला शिवराज कंपनीचा मुक्काम असताना अहमदभय्या नावाचे गवय्ये कंपनीत होते. मोहनराव पालेकरांची नि त्यांची गट्टी जमली. विद्या गुरुशुश्रूषेने, पैशाने अथवा आपल्या जवळची विद्या गुरूला देऊन, अशा तीन प्रकारांनीच मिळू शकते. मोहनरावांनी गुरूचे सर्व लाड पुरवून विद्या मिळविली. हा चौथा प्रकार म्हणावा काय? अहमदभय्या कोण आहेत? त्यांची परंपरा काय? त्यांना बंदिशींची इतकी दौलत मिळाली कोठून? यांपैकी मोहनरावांना काहीही ठाऊक नव्हते. पण तोही साक्षात्कार अचानक घडला.

खांसाहेब अल्लादियाखां यांचे सुपुत्र उस्ताद भूर्जीखां एके दिवशी टेंबे यांना भेटण्यासाठी कंपनीत आले असता, अहमदभय्या त्यांच्या दृष्टीस पडले. पालेकर आणि अहदमभय्या शेजारी शेजारीच बसलेले.. भूर्जीखांनी अहमदभय्यांना बघताच लवून कुर्निसात केला. पालेकरांना आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले,

“भूर्जीखां, तुम्ही यांना ओळखता?”

“ओळखता? हा काय प्रश्न झाला? अब्बाजानच्या खालोखाल हे आम्हाला वंदनीय,

अब्बाजानना ज्या चचा जहांगीर खांसाहेबांनी तालीम दिली त्यांचे हे नातू!''

'तरीच...!'

''तरीच काय?''

''यांच्याकडील बंदिशींची असलियत आणि त्यांचा उगम कोठून याचं मला नेहमी कोडं पडे. आज ते सुटलं.''

''सिंदबादला रत्नांनी भरलेली गुहा सापडते तशी तुमची अवस्था आहे पालेकर, जितकं भरभरून घेता येईल तेवढं घ्या.''

पालेकरांनी मग केवळ अहमदभय्यांकडूनच नव्हे तर त्यांचे वडील काही काळ कंपनीत मुक्कामास असता, त्यांच्याकडूनही अस्सल अस्सल बंदिशी उचलल्या. पालेकरांना बंदिशींचा ज्ञानकोश म्हणत ते उगीच नव्हे.

रतनला पालेकर घरी येऊन शिकवू लागले. गुजरी तोडीने प्रारंभ झाला. मूळ तोडीतील पंचम वर्ज्य करून प्रायः उत्तरांगात खुलणारी गुजरी तोडी सर्वप्रथम का निवडली गेली असावी, हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. रतनच्या आवाजीची उंची जाणून हे घडले असेल काय? की गुजरी ही शुद्ध रागांत मोडते व शुद्ध रागरागिण्या संपूर्ण श्रुती घेतात हे जाणून गुजरी निवडली? इतके खरे की तोडीतील कोमलतर गंधार आणि तीव्र मध्यम यांचे लगाव नेमकेपणे जमण्यास खूपच मेहनत घ्यावी लागते. ती रतनने घ्यावी व तोडी बिनतोड गळयात बसावी म्हणूनही गुजरी निवडली असेल. गुरुजनांच्या मनात काय असेल ते सांगणे कठीणच. उस्ताद निसार हुसेन खां यांना ग्वालेर घराण्याची तालीम गौड सारंग रागापासून सुरू झाली असे त्यांनी सांगितले आहे. इथेही गौड सारंगच का निवडला हा प्रश्न येतोच, पण त्या चर्चेचे हे स्थळ नव्हे. सीतेला अशोकाच्याच झाडाखाली रावणाने का ठेवले, असा प्रश्न विचारणे गैर मानले गेले आहे. न्यायशास्त्रात 'अशोक वनिता न्याय' निर्माण करून ठेवलाय, तो असे प्रश्न फेटाळून लावण्यासाठीच.

गुजरी तोडीतील 'जा जा रे पथिकवा' ही चीज आडाचौतालात रतनला शिकविण्यात आली. त्या वेळी त्याचे वय तेरा वर्षांचे. रतनला विशेष लाभ झाला तो हा की, त्या आधी आणि नंतर; पालेकरांकडे सकाळी ज्यांना ज्यांना तालीम मिळे त्या सर्वांना रतनची तालीम सुरू झाल्यावर रतनच्या घरी येत जा, असे फर्मान काढले. त्यामुळे सकाळी इतरांबरोबर रतनला तालीम मिळे आणि संध्याकाळी त्याला एकट्याला खास तालीम मिळे. दोन्ही वेळा बंदिशी वेगळया, राग वेगळे. शिवाय हरेक बंदीश रूपक, झपताल, धीमा त्रिताल, आडाचौताल, झुमरा यापैकी कोणत्याही तालात. तालाच्या वजनाने गाण्यावर पालेकरांचा

कटाक्ष असे. ४३-४४ सालापासून रत्नाकर पई नावाचा प्रज्ञाशोधित युवक देवधरांकडील पं. विष्णु दिगंबर पुण्यतिथी उत्सवात, व्यास संगीत विद्यालयाच्या तशाच प्रतिवार्षिक उत्सवात, पं. भातखंडे पुण्यतिथीस, मार्कंडेश्वर उत्सवात गाऊ लागला व आपली छाप पाडू लागला.

अशाच एका महोत्सवीय मैफलीत देना दस्तुर नावाच्या बाईंनी रतनला ऐकले असावे. बाई स्वतः विलायत हुसेन खांकडे गाणे शिकत असत पण आपल्या घरी रतनने येऊन गावे असे त्यांना वाटले. त्यांनी तशी इच्छा प्रदर्शित करताच गुरुजींची परवानगी घेऊन आणि त्यांच्या समक्ष दस्तुरबाईंच्या घरी गाणे झाले. हार्मोनियमवर काळे आणि तबल्यावर प्रथमच परशराम कामुलकर हा गोवेकर तबलिया होता. अतिशय तेढा वाजविणारा, हा त्याचा लौकिक. पं. भास्करबुवा बखले यांचे तबलजी म्हणून ख्यातकीर्ती झालेल्या दत्ताराम नांदोडकरांचा परशराम कामुलकर हा शिष्य. रतनचे वय त्या वेळी अवघे पंधरा वर्षांचे. हा पोरगा अजून मिस्रूडही न फुटलेला, याला साथ करायची ती मध्य लयीतच केलेली बरी, असा परशराम कामुलकराचा विचार. रतनने तीन बोटे दाखवून इशारा देताच परशराम कामुलकरने मध्य लयीत ठेका धरला देखील. पालेकरांनी कोपऱ्यातून आवाज दिला,

“परशराम, बिलकुल गाढी लय पकडना”

काहीशी नापसंती दर्शवीतच परशरामने गाढी लय बांधली. एक आवर्तन पुरे होऊन रतन ठीक समेवर येताच परशराम काय समजायचे ते समजला. अशी चारेक आवर्तने होताच पालेकरांचा दुसरा इशारा.

“परशराम वाट्टेल ते, वाट्टेल तितके तेढे वाजव”

दस्तुरबाईंकडची बैठक खूपच रंगली. बाईंनी खूष होऊन सहा नोटा रतनच्या हाती ठेवल्या. गुरुदक्षिणा म्हणून पालेकरांनी त्यांतील फक्त एक रुपया स्वीकारला.

घरी जात असता परशराम पालेकरांना म्हणतो,

“काय हो किती वर्षं शिकतोय् पोरगा गाणं?”

“अडीच-तीन वर्ष झालीत.”

“नेहमी कोण असतं साथीला?”

“मीच डग्गा घेऊन असतो, कधी कधी माझा भाचा मनोहर...”

“असं? मग उद्यापासून मी येत जाईन तालमीच्या वेळी ठेका धरायला”

“कशाला? पैसे कोण मोजणार तुला?”.

“मागतोय् कोण लेकाचा पैसे?”

परशराम किल्न लेन मध्ये भावाकडे राहायचा. चांगले चांगले गवय्ये त्याच्या साथीला दबून असायचे. अनागत वाजवणारा तो आणि तसे वाजवणे आवडणारा रतन यांची पुढे जोडीच जमली. पालेकर तालीम देत असता दुवख्त तो यायचाच. पण इतर वेळीही ही दुक्कल रियाज करीत बसे. लॅमिंग्टन रोडवर मोगूबाई त्या वेळी नुकत्याच राहायला आल्या होत्या. आजच्या एवढी वर्दळ त्यावेळी नसल्याने त्यांच्या कानावर हा रियाज पडू लागला. रतन पांढरी सातमध्ये गायचा. त्याच पट्टीत रियाज चाले. मोगूबाईंच्या ओळखीचे वळण. इतक्या उंच पट्टीत कोण बरे गातोय? त्यांचे कुतूहल जागृत झाले. त्यांनी एके दिवशी पालेकरांना विचारलेच.

"मोहनराव, समोरच्या घरात पांढरी सात मध्ये सात सात तास आपल्या घराण्याचे गाणे गाणारे कोण रे राहते?"

"सांगतो, पण सात सात तास रियाज चालतो हे खरं?"

"खरं तर काय खोटं सांगते मी?"

"तो रतन पई म्हणून मुलगा आहे पंधरा सोळा वर्षांचा."

"आणि त्याला तालीम?"

"माझी."

"अहो मग जरा सांगा ना त्याला; एवढ्या लहान वयात इतक्या उंच पट्टीत इतके तास रियाज नको करू म्हणून. उरी फुटेल पोरगा."

त्या दिवशी रतनची पालेकरांनी उलटतपासणीच घेतली. परशरामला रिकामपण भरपूर असते म्हणून तुम्ही नसलात तरी तो येतो आणि बसतो आम्ही रियाजाला, असे रतनने सांगताच पालेकर म्हणाले,

"रतन गाण्याइतकाच तुझा शाळेचा अभ्यासही महत्त्वाचा आहे."

रतनचे दस्तुरबाईंकडील गाणे आणि त्याचा रियाज खांसाहेब अल्लादियाखां यांच्या कानी गेला. रतनचे गाणे आपण ऐकले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. पालेकरांची फेरी खांसाहेबांकडे असेच. त्यांच्या जवळच खांसाहेबांनी इच्छा व्यक्त केली. लौकरच व्यवस्था करतो असे पालेकरांनी सांगितले. संध्याकाळी रतनच्या घरी येताच पालेकर म्हणाले,

"रतन तो मार्कंडेयाचा उत्सव किती दिवसांवर आला रे?"

"दीड दोन महिने अवकाश आहे."

"असं ना. ठीक आहे. यंदा तू उत्सवात जैत कल्याण गायचास्."

“पण माझा झालाय् कुठे तो राग?”

“झाला नसला तर होईल, तू कशाला काळजी करतोस? अल्लादियाखां तुझं गाणं ऐकू इच्छितात. तेव्हा बड्या देवाला नैवेद्यही तसाच हवा.”

निष्णात क्रीडापटूंच्या सर्कशीत ट्रॅपीज्वरील कामे जशी चित्तथरारक असतात तसा जैतकल्याण रागाचा प्रकार आहे. सा ग प या तीन स्वरांत आरोही उडी तारषड्ज गाठते. अवरोही तरंग दोन पंचमांच्या तावडीत सापडलेल्या धैवताला ईषत् स्पर्श करून आणि रिषम मुद्दाम दाखवून भूपाचा भास निर्माण करून उठवितात. इतके सोपस्कार सांभाळून जैतकल्याण गायला जातो तेव्हा तो गंभीर प्रकृतीचा निर्माता न बनेल तर काय होईल? खांसाहेब अल्लादियाखांना साधा नव्हे तर महानैवेद्यच होता तो.

लक्ष्मीबागेत पालेकरांनी आयोजकांना आधी जाणीव देऊन रतनला सायंकाळी साडेसहाला बसविण्याची व्यवस्था केली. खांसाहेब उपस्थित होतेच. जैत-कल्याणमधील दोन विलंबित बंदिशी रतनने यथासांग ऐकविल्यावर अल्लादियांनी रतनच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. त्या नंतर दोन तीन दिवसांनी पालेकरांना मुद्दाम बोलावून घेऊन त्यांनी विचारले,

“काय रे, हा तुझा रतन या वयात जैतकल्याण पेलू शकतो हे आश्चर्यच आहे. तो हे तुझ्याकडे शिकतो तसाच देवधरांकडून पण तालीम घेत असतो काय?”

“मुळीच नाही. तालीम फक्त माझीच.”

“मी ऐकलंय् की तो देवधरस्कूलमध्ये जातो.”

“जात असेल, पण कुमारसारख्या समवयस्क मित्रांना भेटायला.”

“मग जैतकल्याण मधल्या दोन बंदिशी कशा पोचल्या त्याला?”

“अर्थातच, मी पोचवल्या म्हणून”

“आणि त्याचं वयबीय न पाहता तू एकदम दोन बंदिशी दिल्यास?”

“मग काय झालं? पात्रता आहे म्हणून दिल्या.”

“पण अशी खिरापत वाटीत सुटलास तर शेवटी तुझ्याकडे काय राहणार?”

“मी विद्यादान, त्यातही सत्पात्री विद्यादान पवित्र मानतो. आपलाच आदर्श मजपुढे आहे. आपणाला जी अपार विद्या मिळाली ती गुरूजनांनी दिली म्हणूनच ना?”

“तुझं तोंड देखील बघू नये असं वाटण्याजोगं बोलत असतोस कधी कधी. माझा सल्ला झिडकारायचा आणि मला आदर्श मात्र मानायचं याला काही अर्थ आहे का?”

“एका बाबतीत मी आपलं मानणार आहे; अगदी स्वयंप्रेरणेनं मानणार आहे”

“कोणत्या?”

“आपण माझे साक्षात् गुरु नसलात तरी मला गुरूसमान आहात.”

“समजलो. पुढं सांग.”

“आपण ज्या बंदिशी बांधल्यात त्या मात्र मी कोणालाही आपल्या हयातीत देणार नाही. पण उस्ताद अहमद भय्यांकडून अथवा अन्य कोणाकडून घराण्याच्या म्हणून ज्या बंदिशी मला मिळाल्यात त्या मी पात्रापात्र विवेक करून जरूर देईन”

जयपूर गायकीप्रमाणेच त्या घराण्यातील बुजुर्गांची वादावादीदेखील कशी तेढी असते याचा वरील संवाद म्हणजे एक नमुनाच होय. पण पालेकर बोलल्याप्रमाणे वागले. १६ मार्च १९४६ पर्यंत त्यांनी खांसाहेबांची जयजयवंतीमधील सर्वप्रिय बंदिश ‘ए आली पिया’ रतनला सांगितली नाही. पालेकरांचे म्हणणे असेही होते की अल्लादियाखांनी ‘एऽऽ आली पिया’ ही जयजयवंतीमधील अथवा ‘बालमुवा तू आ बिन रैनदिन’ ही खेमकल्याणातील, अशा ज्या काही नामांकित बंदिशी स्वतः बांधल्या त्या घराण्यातील मूळ चिजांच्या आधारेच बांधल्या आहेत. त्या मूळ चिजाही आपणांस पालेकरांनी सांगितल्या आहेत असा रत्नाकर पईंचा दावा आहे. ते कसेही असो जैतकल्याणच्या ज्या दोन बंदिशी रतनने ऐकविल्यामुळे ही वादावादी झाली, त्या दोन बंदिशी म्हणजे ‘पपिया न बोल’ ही एक व ‘ये झकोरा न थे पानी लो’ ही दुसरी. दोन्हीही मुखड्यांतच घराण्याची खास वैशिष्टये आणि लयींचा झोकनोक आविष्कृत करणाऱ्या.

हे वादावादीचे प्रकरण मिटते न मिटते तोच कलकत्त्याची तानसेन स्पर्धा रतनपुढे आव्हान म्हणून उभी राहिली. कमल केतकर, वसुंधरा श्रीखंडे, रतन असे तरुण महाराष्ट्रातून स्पर्धेसाठी गेले होते. शंकरराव व्यास स्पर्धेचे मुख्य परीक्षक, प्रत्यक्ष गायनात रतन पहिल्या क्रमांकाचा विजेता ठरला तर थिअरीत कमल केतकरांनी सर्वोच्च गुण मिळविले. कलकत्त्याहून परतल्यानंतर मात्र ‘नेमेचि येतो मग काळ काळा’ अशी परिस्थिती निर्माण झाली. निसर्गनियमास अनुसरून आवाज फुटतो तो हा काळ. रतनचा पांढरी सात मधील आवाज गेला. पार लुप्त झाला. अशा वेळीच खास मार्गदर्शनाची आवश्यकता असते. पालेकर रोज पहाटे रतनच्या घरी यायचे. बरोबर साडेपाचला खर्ज कसा भरावा याची तालीम मिळे. मंद्र सप्तकात सहज जेवढे खालच्या खालच्या स्वरावर जाता येईल तेवढेच जायचे. मान खाली करून अधिक खालचा स्वर घेण्याचा प्रयत्न कटाक्षपूर्वक टाळायचा. त्यामुळे गळयातील ध्वनियंत्रावर दाब पडतो. तरीही न कळत मान खाली जातच असेल तर उताणे झोपून, पोटावर

तंबोरे घेऊन मंद्रसाधना करायची. या कृतीत मान खाली जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मंद्रसाधनेने स्वर स्थिरावत असता आकाराने ताना घेण्याची खटपट करायची. तान स्पष्ट आकाराची यावी म्हणून दाढेत लहानशी सबंध सुपारी ठेवायची. हा रियाज झाल्यावर पोटात आग पडते त्या वेळी गरमगरम दूध घ्यायचे. इतक्या सोपस्कारांवर रोज निगराणी ठेवून पालेकरांनी रतनचा आवाज पांढरी चारवर प्रथम स्थिर केला. आता तो काळी दोनमध्ये अप्रतिहत कामगिरी बजावू शकतो. या काळात रोज पहाटे नाक चोंदायचे आणि त्यासाठी रतनला शीर्षासनही करायला लागायचे.

पण काळ जाऊ देणे हेच खरे या प्राकृतिक रोगावरचे औषध. आपल्या लयीने तो गेला. आता १९५४ साल उलटून सहा महिने होत आले होते. विष्णु दिगंबर पुण्यतिथीनिमित्ताने उत्सव सुरू होणारे होते. दादरमधील व्यास संगीत विद्यालयाचे कल्पक सूत्रधार वसंतराव राजोपाध्ये यांच्या मनात आले की मुंबईतील वेगवेगळ्या गवयांकडून उत्सवात कानड्याचे प्रकार गायले जावेत. या प्रयत्नात ते पालेकरांना भेटले. सगळ्यांना कानड्याचे प्रकार वाटून टाकले आहेत असे सांगू लागले. पालेकर म्हणाले,

"कुणी कोणता घेतला ते सांगा. उरलेले सर्व मी गाईन."

"आता तर पत्रं गेलीत, उत्तरं आली म्हणजे सांगतो."

"रतन काय गाणार आहे?"

"रायसा कानडा"

"ठीक आहे. सगळ्यांची उत्तरं आली म्हणजे ठरवू माझे कानडे." राजोपाध्ये गेले आणि काही दिवसांतच पालेकरांना हृदयविकाराचा पहिला झटका आला. बातमी पसरायला वेळ लागला नाही. राजोपाध्ये भेटायला आले. कानड्याचे सर्व प्रकार आता ऐकवणे अशक्य या मुळे ते खट्टू झाले होते. पालेकर म्हणाले,

"राजोपाध्ये खट्टू होऊ नका. मला जे कानडे आता गाता येणार नाहीत, ते रतन गाईल."

"काय सांगता?"

"पाहाच तुम्ही."

"जयंत कानडा, हुसेनी कानडा, मुद्रिका कानडा, मंगल कानडा हे प्रकार तुम्ही गाणार होता. हे सगळे रतन गाऊ शकेल?"

"मुद्रिका मी अजून त्याला सांगितलेला नाही. पण बाकीचे सर्व गाईलच." राजोपाध्ये यांना पालेकरांच्या आत्मविश्र्वासाचे कौतुक वाटले. तो आत्मविश्र्वास सार्थ होता. रतन 'री तुम समझत नाही' ही रायसामधील एकच बंदीश गाणार होता. पण, 'गुरूका नाम रोशन करने

के लिये' हुसेनी, मंगल, जयंत कानडा हे आणखी तीन प्रकार गायला.

वडिलांच्याच कंपनीत रतनला चांगल्या पगाराची नोकरी लागली होती. ही नोकरी करीत राहूनच गाणे करायचे हा निर्णय रतनने पक्का केला. मेहफिल-बहाद्दर होण्याची स्वप्ने मनाशी बाळगली तरी गाणाऱ्यांचा चरितार्थ चालणे बेभरवशाचे असते हे त्याला कळले असावे. त्या काळात वसंतराव देशपांडे, रेगे अशा भवतालच्या मित्रांची मनोगते त्याला ठाऊक होती. एखादा कुमार, एखादा भीमसेन समर्थपणे प्रपंच चालवू शकतो. केवळ गाण्यावर सगळेच निभावून जाऊ शकत नाहीत हे स्पष्ट दिसत असल्याने त्याने पेशा म्हणून गायक बनण्यापेक्षा गुरूचे अनुकरण करणेच योग्य असे मानले तर ते कालानुरूपच झाले असे म्हणावे लागेल.

हृदयविकाराच्या आघातानंतर तीन एक वर्षे पालेकर तालीम देऊ शकत नव्हते. पण ५७ ते ६२ अशी पुढची पाच वर्षे रतन पालेकरांकडे जाऊन अनवट रागांतील बंदिशी घेतच असे. मेघावली, गोधनी, शुद्ध नट, भटियार, बरारी, परज, कौशीबहार, बागेश्री-बहार, बसंतीकेदार असे जे जे म्हणून खास होते ते ते रतनला मिळत होते. ६२ साली एप्रिलच्या शेवटी शेवटी रतन असाच ऑफिसचे काम संपवून पालेकरांच्या घरी आला असता पालेकर म्हणाले,

"बरं झालं आलास...."

"का?"

"आज तुला चंपागुणकली रागातली बंदीश सांगायचं योजलंय्."

"आत्ता?"

"नाही तर केव्हा? सहज आठवण झाली, चीज आठवतेय् तोवर सांगितलेली बरी. काढ तंबोरा."

"अहो पण पहाटे मला कोकणात जाण्यासाठी निघायचंय्. मी आता तालमीला बसलो तर बोरिवलीस घरी केव्हा पोचणार आणि जेवून किती वेळ झोपणार?"

सौ. पालेकरांनीही रतनच्या म्हणण्यास पुष्टी दिली. तेव्हा पालेकर म्हणाले, "ठीक आहे. बंदीश तर घे उतरवून. स्मरत्येय तोवर सांगून टाकतो." रतनने वही काढली. पेन घेतले. तेवढ्यात पालेकरांच्या मनात काय आले कोण जाणे. म्हणाले,

"राहू दे. जा तू बोरिवलीस. पहाटे तुला लौकर निघायचंय्. पण परत आल्यावर मला फक्त 'चंपागुणकली' या नावाची आठवण दे."

रतन पत्नीसह कोकणात गेला. गर्भवती पत्नीस तिच्या माहेरी बैलगाडीतून पोचवीत असता खडकाळ वाटेमुळे तिची ओटी ओसंडली. रतनला मुंबईस परतण्यास विलंब झाला.

आदल्या दिवशीच (१ जून १९६२) पालेकर हृदयविकाराच्या दुसऱ्या आघाताने कालवश झाले होते. चंपागुणकलीच्या फक्त स्मृती उरल्या, मनोदाह करणाऱ्या.

पालेकरांनी सर्व बंदिशी दोन जाडजूड वह्यांत लिहून ठेवलेल्या होत्या. पण त्यांच्या अस्ताव्यस्त कारभारामुळे टेबलाच्या ड्रॉवरमधून त्या कोणी तरी मागेच लंपास केल्या होत्या. त्या वेळी रतन खूप चरफडला होता. त्याने आग्रह करकरून पालेकरांना स्मरणाने जेवढ्या जमतील तेवढ्या पुनः लिहून काढण्याची विनंती केली. गुरुवर्यांनी ती मानली. पुनः दोन चांगल्या बांधणीच्या वह्या तयार झाल्या. पण त्या वह्यांत चंपागुणकलीची बंदीश असेलच याचा भरवसा काय? शिवाय त्या वह्या तरी रतनच्या ताब्यात थोड्याच होत्या? श्रीमती पालेकर यांच्याकडे प्रत्येक शिष्य वह्यांची मागणी करू लागल्यामुळे त्यांनी त्या कुलुपबंद करून ठेवल्या होत्या. पालेकरांना जाऊन महिना दीडमहिना झाला असेल नसेल तो एका सकाळी रतनला श्रीमती पालेकरांनी तातडीचे बोलावणे केले. गुरुमाउलीस काही अडचण आली असावी म्हणून रतन तातडीने बोरिवलीहून आला.

“प्रकृती ठीक आहे ना?”

“प्रकृतीचं काय घेऊन बसलास माझ्या? निराळ्याच कारणासाठी बोलवून घेतलं तुला.”

“कोणतं कारण?”

“काल रात्री हे माझ्या स्वप्नात आले होते.”

“स्वाभाविक आहे...”

“ऐक तरी पुढं. मला म्हणाले, त्या दोन्ही वह्या रतनला देऊन टाक.”

“स्वप्नात काय वाट्टेल ते घडतं.”

“मी ते प्रत्यक्षात घडवणार आहे. वह्या तुला देणार आहे.”

“पण स्वप्नात येऊन सांगितलं म्हणून वह्या दिल्या हे सर्व संबंधितांना पटायचं नाही. तुम्ही कुणाचा तरी सल्ला घेतल्यावाचून, अखेरचा निर्णय घेऊ नका.”

रतनने हे शब्द उच्चारायला आणि पालेकरांचे कुलोपाध्याय पूजेसाठी तिथे येऊन टपकायला एकच गाठ पडल्याने त्यांचाच सल्ला घेण्यात आला. त्यांनी देवापुढे दोन चिठ्या टाकल्या. एकीवर लिहिले होते, ‘रतनला वह्या द्याव्या.’ दुसरीवर होते, ‘रतनला वह्या देऊ नयेत.’ एका लहान मुलाकरवी चिठी उचलण्यात आली आणि ते मुळातले ‘स्वप्नीचे धन’ रतनच्या स्वामित्वाखाली आले. पण त्या वह्यांतही चंपागुणकली रागातील ती अज्ञात बंदीश नव्हतीच!

पं. रत्नाकर पई यांचे मोठेपण कशात आहे? अन्यायाविरुद्ध लढत राहून स्वाभिमान

जपण्यात; स्पष्टपणे सत्य असेल ते सांगण्यात आणि बनचुके न होता विद्यार्थी म्हणून नवे नवे शिकण्यात. मला वाटते हे त्रैगुण्य त्यांच्या आजच्या स्थानाला कारणीभूत आहे.

१९४१ ते ६२ या एकवीस वर्षांपैकी मधला काही वर्षांचा काळ सोडला, तरी ओळीने अठरा वर्षे त्यांना पालेकरांची तालीम मिळालेली होती. पण तेवढ्याच भांडवलावर गुजारा करण्यात त्यांनी धन्यता मानली नाही. खांसाहेब अल्लादियाखांचे शिष्य उस्ताद गुलुभाई जसदनवाला यांनी आपल्याला तालीम द्यावी म्हणून श्रीमती पालेकरांना मध्यस्थी करावयास लावून गुलुभाईंना त्यांनी राजी केले. गुलुभाईंचा गाणे का षौक होता. ते एक बडे व्यापारी, रेसच्या घोड्यांचा स्टड ते पनवेलीस सांभाळीत. त्यांच्या थोरल्या बंधूंना गुलुभाईंच्या हिंदुस्तानी संगीतावरील प्रेमाबाबत केवळ घृणा होती. “आय हेट इंडियन क्लासिकल म्युझिक” असे ते पं. रत्नाकरांपाशी बंधूंच्या मृत्यूनंतर म्हणालेही होते. पण व्यापार व रेसच्या घोड्यांची निपज आणि निगा यांत मात्र दोघांनाही रस होता. या व्यापारात दिवसामागून दिवस, आठवड्यामागून आठवडे आणि वर्षांमागून वर्षे जाऊन ६४ सालीच दोघेही म्हातारे झाले होते. गुलुभाईंना प्रथम मंजीखांसाहेबांची आणि त्यानंतर म्हणजे ३६ ते ४६ मार्चपर्यंत खांसाहेब अल्लादियाखां यांची तालीम होती. जयपूर गायकीच्या तीन एक हजार बंदिशी त्यांच्या संग्रही चार चोपड्यांत लिहिलेल्या होत्या. पण हेही पुनः ‘स्वप्नीचे धन’ च होते. वेगळ्या अर्थाने. गुर्जरी मोडीत लिहिलेले. पं. रत्नाकरजींना ह्या वह्या गुलुभाईंच्या बंधूंनी मागताक्षणी देऊ केल्या. रत्नाकरजींनी त्या घेतल्या नाहीत. आता गुलुभाईंचे तंबोरे, सरोद, सतार इत्यादी हत्यारे यांचे एक छोटेसे संग्रहालय त्यांच्या बंधूंनी बनवले आहे. रत्नाकरजींनी वह्यांऐवजी तानपुरा मागितला होता, गुलुभाईंकडे. पण नकार मिळाला आणि या अर्थाने हे स्वप्नीचे धन आहे तिथेच राहिले.

पण गुलुभाईंकडून दर रविवारी मिळालेली तालीम घेण्याची पात्रता पं. रत्नाकर पई यांच्याकडेच होती हे निर्विवाद. गुलुभाईंनी पालेकरांच्या अंतिम इच्छेला मान द्यायचा म्हणून तालीम कबूल केली तरी रत्नाकरजींचे गाणे आकाशवाणीवर ऐकून नंतरच त्यांनी होकार भरला. त्याखेरीज आणखीही एक अट घातली ती ही की, खांसाहेब अल्लादियांच्या वारसांपैकी कोणी गाणे शिकण्याच्या इच्छेने आला तर त्यालाही रत्नाकरजींनी विनामूल्य, हे स्वप्नीचे धन, तो संतुष्ट होऊन जाईपर्यंत दिले पाहिजे. गुलुभाईंची तालीम स्वीकारण्याची रत्नाकरजींची खास पात्रता होती असे का म्हणायचे? गुलभाईंकडे नोटेशन नव्हते. मालीगौरा रागातील बंदीश शुद्ध रिषभ घेऊन गायची की कोमल रिषभ, हे गुलुभाई बंदीश गाऊन दाखवीत असत तेव्हा शिष्याने जाणून घ्यायचे असे. त्यांचे म्हातारपण स्वरसंभ्रम निर्माण

करण्याएवढे खासच होते. त्यामुळे ज्याने या गायकीत वीस-पंचवीस वर्षे मुरवलेली नसतील असा शिष्य संभ्रमित अवस्थेतच स्वाभाविकपणेच राही. उतरत्या धैवताची खंबावती असे म्हणत आणि गाऊन दाखवीत. शिष्याने नेमका उतरता धैवत दाखवीपर्यंत: 'ये गलत है' असे म्हणत आणि नेमका गवसला की, "हां, अभी बराबर" म्हणत. प्रत्येक बंदिशीचा अस्थायी अंतरा बसवून घेत आणि मग पकड सांगत. त्या पकडीवर रागविस्तार अवलंबून असे. खांसाहेब अल्लादियाखांनी सांगितलेले पलटे त्यांना जसेच्या तसे याद होते. खांसाहेब आठपटीने पलटा घेत तर हे एकपटीने एवढाच फरक, त्यांच्या वृद्धत्वामुळे गुलुभाई मध्यलयीत बंदीश सांगत. रत्नाकरजी ती मध्य लय निम्मी करून म्हणजे जिथे गुरूची सम तिथे स्वतः कालात गाऊन धीमी करीत आणि ती कंठस्थ करीत. खास पात्रता म्हणायची ती ही की, रत्नाकरजींचा प्रदीर्घ पूर्वानुभव गुलुभाईंकडे तालीम घेताना उपयोगी पडला.

गुलुभाईंपाशी बंदिशींचा साठा तर दृष्ट लागण्याएवढा मोठा होता. खांसाहेब अझमत हुसेन त्या साठ्यावर डोळा ठेवून यायचे. बंदीश म्हणजे दोन ओळींत बंदिस्त केलेला राग. किंवा असेही म्हणता येईल की त्या त्या रागाचे रचनाकाराला भावलेले एकडोळी चित्र (प्रोफाइल). अझमतखांनी एकदा कुकुभ बिलावलमधील बंदीश ऐकविली तेव्हा गुलुभाईंनी तशा चार बंदिशी ऐकविल्या आणि कुकुभचे आणखी दोन प्रकारही गाऊन दाखविले. मूळची बिलासखानी बंदीश (आज सर्वज्ञात असलेली नीके घुंगरिया नव्हे) देशीच्या अंगाने गात असत असे सांगून ती बंदीश सांगितली. पालेकर काय अगर गुलुभाई काय, कुस्ती धोबीपछाड करणारेच उस्ताद होते. रत्नाकरजींनी हे स्वप्नीचे धन असे मनमुराद लुटले. पालेकरांनीही गोधनी रागातील एक बंदीश रतनला देवधरांच्याकडील विष्णु दिगंबर उत्सवात गाण्यासाठी शिकविली होती. तो ती चीज गात असता पुढ्यात बसलेले देवधर-पालेकर तो राग कोणता असावा यावर चर्चा करीत होते.! पालेकरांनीच नव्हे तर गाऊन झाल्यानंतर रतननेही पृच्छा करणाऱ्यांना काही पत्ता लागू दिला नाही. पुढे पं. जगन्नाथबुवांनी त्या रागात एक नवी रचना केली. ती आता 'स्वानंदी' तील रचना म्हणून प्रसिद्ध आहे.

अशा गुरूंकडून स्वप्नीचे धन लाभलेले पं. रत्नाकर जयपूर गायकी नेकीने गातात. या गायकीस बुजुर्गांनी बोजेदार गायकी असा शब्द रूढ केलेला आहे. पण 'बोजा' हा शब्द सर्वसाधारण श्रोत्यास खटकल्याशिवाय राहणार नाही. चिजेचे तोंड या गायकीत दरवेळी समेवर येताना त्याच डौलात येते मग त्यामागे गवयाने कोठूनही उठावण केलेली असो व पलट्यांच्या पटी बदललेल्या असोत. लयीला लपेटून अनाघाती आलापी, बोलबांट आणि तनायत होते. आकाराचा शिक्का यत्र तत्र सर्वत्र! त्याच्याशी काडीमोड नाही. एकदा लय

बांधून घेतली की तीत बदल न करणे ही सर्व पथ्ये पं. रत्नाकरजी कटाक्षाने पाळतात. (सारेच जयपूरवाले पाळतात असे आता म्हणणे कठीण.) या सर्वांहूनही पं. रत्नाकर पईंचा विशेष असा की तार षड्जावरील त्यांचा सुरेल आणि प्रदीर्घ दमसासयुक्त न्यास, श्रोत्यांना चकित करणारा असतो. भूपनट, परज, बागेश्री कानडा, कौशीबहार, मेघावली, संपूर्ण मालकंस, जैत-कल्याण, बरारी, बागेश्री-बहार हे राग ऐकायला, पं. रत्नाकरजींची तबियत खूष असेल, म्हणजे आवाजी बसली नसेल तर असा मजा येतो की त्याला तोड नाही. आम राग, अनवट राग, जोड राग मिळून तीन हजार बंदिशींचे धन रत्नाकरजी पदरी बाळगून आहेत. दुहेरी पेडाची तानक्रिया, जोड रागात नेमका सांधा पकडून दोन्ही रागांच्या छाया दाखविणे हे कसब पई दाखवितात. आता त्यांचा आवाज काळी दोनवर स्थिरावला असला तरी त्याला चांगली उंची आहे आणि पातळपणामुळे धारही आहे. या मुळे सोहनी, परज यांसारख्या रागांत ते फार प्रभावी वाटतात.

आकाशवाणीवर ते स्वातंत्र्याचा पायरव ऐकू येऊ लागला तेव्हापासून गात आहेत. पण पुढे आकाशवाणीच्या झारीत कोणी 'बृहस्पती' येऊन बसले आणि हा सच्चा गायक आकाशवाणीच्या यादीवरूनच उखडला गेला. त्या 'बृहस्पती' वर त्या वेळच्या पंतप्रधानांचा वरदहस्त. त्यांनी म्हणे बृहस्पतींना आदेश दिला होता की 'तुमच्या पसंतीस न उतरणारे कलाकार उडवा'. बृहस्पतींनी बी. हाय्. श्रेणीतील १९० कलाकारांना उडविले. मग पं. रत्नाकर पई यांच्या गुणांचा गौरव करणारे अग्रलेख मोठ्या पत्रांतून आले. 'बृहस्पती' वर टीकेचा वर्षाव झाला. काही गानप्रेमी खासदारांनी 'बृहस्पतीं' ची 'कुऱ्हाड' पंतप्रधानांच्या दरवाजापर्यंत प्रदर्शनार्थ नेली. 'बृहस्पतीं' ना पुनर्निरीक्षणाचा बहुथा आदेश आला असावा. पं. रत्नाकर पईंना आकाशवाणीवर पुनः त्याच श्रेणीत ठेवण्याएवढी उदारता बृहस्पतींनी दाखविली. पण त्या उदारतेचा उपयोग नव्हता. रत्नाकरजींचा असहकार कायमच राहिला. केंद्रस्थानी नवी विटी नवे राज्य आल्यावर १९८३ साली त्यांना 'ए' श्रेणीत सन्मानपूर्वक दाखल करण्यात आले.

पं. रत्नाकर पई मुंबई विद्यापीठाच्या संगीतशाखेत जयपूर घराण्याचे उस्ताद म्हणून ६७ पासून काही वर्षे होते. त्यांच्या शिष्यांत चमकले व अजूनही चमकत आहेत ते पं. नरेंद्र कणेकर. पं. जितेंद्र अभिषेकींनी उस्ताद गुलुभाई यांच्या निधनानंतर रत्नाकरजींचीच तालीम सुरू केलेली आहे. आता एकसष्टीनंतर रत्नाकरजींना अध्यापनाला भरपूर वेळ उपलब्ध आहे. त्यांनी आपल्या संग्रही असणाऱ्या सर्व बंदिशी ध्वनिफितीवर कोरवून ठेवल्यास त्यांना प्रयासपूर्वक उपलध झालेले हे 'स्वप्नीचे धन' पुढील पिढ्यांना मार्गदर्शनासाठी उपयोगी

पडेल. गांधर्व महाविद्यालयाने त्यांच्या बऱ्याच बंदिशी १९८८ साली ध्वनिफितीवर घेतल्या आहेत. अमेरिकन बायॉग्राफिकल इन्स्टिट्यूटने आंतरराष्ट्रीय नामनिर्देशासाठी पईंची निवड केली आहे. आपल्या संगीत अकादमीचे लक्ष या बुजुर्गाकडे कधी जाणार?



**पत्रकार आणि संगीत समिक्षक**

**विदग्ध रसिक आणि ललित लेखक**

**साधना परिवाराचे ज्येष्ठ आप्त**

**रामकृष्ण धोंडो बाक्रे ऊर्फ तात्या ब्राके**

१५ , पंकज: मकरंद सहनिवास: सेनापती बापट मार्ग: दादर मुंबई - ४०० ०२८.



